# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## दूरशिक्षण केंद्र

**सत्र–५ पेपर १०** DSE - E 69

# मानवी हक्क
**(Human Rights)**

**सत्र–६ पेपर १५** DSE - E 194

# ग्रामीण समाजशास्त्र
**(Rural Sociology)**

**बी. ए. भाग–३ : समाजशास्त्र**

(शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२२
बी. ए. भाग-३ समाजशास्त्र पेपर (१० व १५) करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ३००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN- 978-93-92887-62-8

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


## ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**■ समाजशास्त्र अभ्यासमंडळ ■**

अध्यक्ष – **डॉ. मच्छिंद्र सकटे**

सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज, उंब्रज, जि. सातारा

- **डॉ. अरुण विठ्ठल पौडमल**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज (के.एम.सी.)
  कोल्हापूर
- **प्रा. डॉ. जे. एच. कराडे**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती प्रतिमा शहाजीराव पवार**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. संजय हिंदुराव शिंदे (सनदे)**
  सरदार बाबासाहेब माने कॉलेज,
  रहिमतपूर, जि. सातारा
- **डॉ. रमेश हिंदुराव पाटील**
  श्रीमती के.आर.पी. कन्या महाविद्यालय,
  उरुण–इस्लामपूर, जि. सांगली.
- **डॉ. सतीश सर्जेराव देसाई**
  एस. एम. डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज,
  मिरज, जि. सांगली

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण विभागाअंतर्गत बी. ए. पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या आणि समाजशास्त्र विषयाची निवड केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मी पेपर क्र. १० (मानवी हक्क) व पेपर क्र. १५ (ग्रामीण समाजशास्त्र) चा प्रमुख संपादक या नात्याने आपले मनःपूर्वक स्वागत करतो. शिवाजी विद्यापीठाचा समाजशास्त्र विषयाचा विद्यमान पदवी अभ्यासक्रम एकूण तीन वर्षाचा असून या विषयाची बी.ए. पदवी संपादन करण्यासाठी विद्यार्थ्यांना सत्रपद्धतीनुसार एकूण सोळा पेपर्सचा अभ्यास करावा लागतो. प्रथम वर्षासाठी पेपर क्र. १ व २, द्वितीय वर्षासाठी पेपर क्र. ३ ते ६ तर तृतीय वर्षासाठी पेपर क्र. ७ ते १६ हे पेपर्स अभ्यासावे लागणार आहेत. त्यामध्ये आतापर्यंत आपण पेपर क्र. १ ते ६ अभ्यासले असून बी.ए. च्या शेवटच्या वर्षासाठी पुढील पेपर्स क्र. ७ ते १६ यांचा अभ्यास करावा लागणार आहे.

बी. ए. भाग-३ मध्ये शिकत असलेल्या समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून सत्र ५ साठी पेपर क्रमांक १० ''मानवी हक्क'' आणि सत्र ६ साठी पेपर क्रमांक १५ ''ग्रामीण समाजशास्त्र'' हे अतिशय महत्त्वपूर्ण असे पेपर आहेत. यामध्ये एकूण ८ घटक समाविष्ट केले आहेत. या सर्व घटकांचा अभ्यास केल्याने विद्यार्थ्यांना मानवी हक्क, संयुक्त राष्ट्र संघटना आणि मानवी हक्क, भारतातील मानवी हक्क, भारतातील मानवी हक्कांचे उल्लंघन तसेच ग्रामीण समाजशास्त्राची प्रस्तावना, भारतीय ग्रामीण समुदाय, ग्रामीण समाजातील सामाजिक संस्था, भारतीय कृषक समाजातील बदल इत्यादी घटकांची माहिती मिळणार आहे.

शेवटी प्रमुख संपादक या नात्याने मी सर्वप्रथम मा. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, दूर शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. डी. के. मोरे, शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र विभागप्रमुख व अभ्यासमंडळाचे चेअरमन डॉ. मच्छिंद्र सकटे, समाजशास्त्र विद्याशाखेशी संबंधित सर्व प्राध्यापक आणि दूर शिक्षण केंद्रातील सर्व प्रशासकीय सेवकांचे मोलाचे सहकार्य मिळाल्यामुळेच मला संपादकीय जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडणे शक्य झाले हे मी प्रामाणिकपणे कबूल करू इच्छितो. वरील सर्वांचा मी शतशः ऋणी आहे.

**■ संपादक ■**

**डॉ. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज,
उंब्रज, जि. सातारा

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**पेपर–१० मानवी हक्क**
**पेपर–१५ ग्रामीण समाजशास्त्र**
बी. ए. भाग–३ : समाजशास्त्र

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–५ घटक क्रमांक | सत्र–६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **डॉ. दयावती पाडळकर**<br>मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगाव | १ | – |
| **प्रा. अशोक शामराव चव्हाण**<br>श्री विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालय, पेठवडगांव | २, ३ | – |
| **प्रा. डॉ. सुषमा अ. जाधव**<br>देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर | ४ | – |
| **प्रा. प्रकाश जगताप**<br>सरदार बाळासाहेब माने महाविद्यालय, रहिमतपूर<br>ता. कोरेगाव, जि. सातारा | – | १, २ |
| **डॉ. ममता कार्तिक कानडे**<br>राजश्री छत्रपती शाहू महाविद्यालय, कदमवाडी रोड, कोल्हापूर | – | ३ |
| **प्रा. बबन रणजित पाटोळे**<br>सहाय्यक प्राध्यापक, दूरशिक्षण केंद्र,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | – | ४ |

■ **संपादक** ■

**डॉ. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज,
उंब्रज, जि. सातारा

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | घटकाचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५ : पेपर–१०** | |
| १. | मानवी हक्क | १ |
| २. | संयुक्त राष्ट्र संघटना आणि मानवी हक्क | २६ |
| ३. | भारतातील मानवी हक्क | ५० |
| ४. | भारतातील मानवी हक्कांचे उल्लंघन | ६४ |
| | **सेमिस्टर–६ : पेपर–१५** | |
| १. | ग्रामीण समाजशास्त्राची प्रस्तावना | ९१ |
| २. | भारतीय ग्रामीण समुदाय | १०३ |
| ३. | ग्रामीण समाजातील सामाजिक संस्था | १२० |
| ४. | भारतीय कृषक समाजातील बदल | १६५ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२०-२१ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक – १
# मानवी हक्क
# (Human Rights)

**घटक संरचना**

१.१ उद्दिष्ट्ये

१.२ प्रस्तावना

१.३ विषय विवेचन

    १.३.१ मानवी हक्क-अर्थ व स्वरूप

    १.३.२ मानवी हक्काचा इतिहास

    १.३.३ मानवी हक्काबाबतचा दृष्टिकोण

१.४ सारांश

१.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## १.१ उद्दिष्ट्ये (Objectives)

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास-

- मानवी हक्काचा अर्थ व स्वरूप स्पष्ट होईल.
- मानवी हक्कांचा इतिहास माहिती होईल.
- मानवी हक्कांबाबतचा दृष्टिकोण स्पष्ट होईल.

## १.२ प्रस्तावना

समाजातील प्रत्येक व्यक्तीला मानव या नात्याने जन्मापासूनच स्वाभाविकपणे प्राप्त होणारे हक्क म्हणजे मानवी हक्क होय. मानवी हक्क हे मानवाच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग असतात. ते मानवाच्या संपूर्ण व्यक्तीमत्वाशी निगडीत झालेले असतात. काही झाले तरी मानवी हक्कांना आपण आपल्यापासून वेगळे करू शकत नाही. मानवी हक्कामध्ये अंतर्भुत होणारे हक्क म्हणजे जगण्याचा हक्क,

अन्न, वस्त्र, निवारा, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, हिंसेपासून मुक्तता, धार्मिक स्वातंत्र्य इत्यादी होत. हे सर्व हक्क आपल्या जगण्याचा भाग आहेत व हे हक्क आपणा सर्वांना प्राप्त झालेले आहेत.

विसाव्या शतकापासून मानवी हक्काच्या संकल्पनेचा जोरदार पुरस्कार करण्यात येऊ लागला. संयुक्त राष्ट्रसंघाने १९४८ साली मानवी क्रूरतेला आळा घालण्यासाठी 'मानवी हक्कांचा सार्वभौमिक जाहिरनामा' प्रसिध्द करून मानवी हक्कांचे संरक्षण, जतन व संवर्धन करण्याच्या दृष्टीने पहिले पाऊल टाकले. माणूस म्हणून प्रत्येक व्यक्तीला जागतिक स्तरावर जे हक्क मिळावयास पाहिजे, त्याची एक विशेष यादी त्यांनी तयार केली. हा दस्तऐवज म्हणजे मानवी हक्क प्राप्त होण्याच्या दृष्टीने टाकलेले पहिले व महत्त्वपूर्ण पाऊल होय. अर्थात, दुसऱ्या महायुद्धानंतरच खऱ्या अर्थाने मानवी हक्क या विषयाची जाणीव जागृती होण्यास प्रारंभ झाला.

## १.३ विषय विवेचन

मानवी हक्क हे मानवाच्या जीवनाचे एक अविभाज्य भाग आहेत. प्रत्येक व्यक्तीला 'मनुष्यप्राणी' या नात्याने हे हक्क नैसर्गिकरित्या प्राप्त झाले आहेत. म्हणून मानवी हक्कांशिवाय कोणत्याही व्यक्तीला आपल्या व्यक्तीमत्त्वाचा विकास करून घेणे शक्य होणार नाही. इतकेच नव्हे तर हक्कांशिवाय व्यक्तीला चांगल्या प्रकारे जीवन जगता येणार नाही, असे प्रतिपादन मानवी हक्कांचे समर्थक करतात.

या घटकामध्ये आपण मानवी हक्काचा अर्थ व संकल्पना व त्याचा ऐतिहासिक आढावा घेणार आहोत. त्याचबरोबर मानवी हक्कांबाबत दृष्टिकोनही अभ्यासणार आहोत. परंतु 'मानवी हक्क' ही संकल्पना अधिक स्पष्ट समजण्यासाठी प्रथम 'हक्क' ही संज्ञा समजून घेणे आवश्यक ठरते.

❑ **हक्क म्हणजे काय?**

मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. तो समाजाचा घटक या नात्यानेच आपले जीवन जगत असतो. मानवी जीवनाच्या अनेक गरजा असतात व व्यक्तीला समाजात राहूनच या गरजा पूर्ण कराव्या लागतात. मानवाच्या समाजातील वास्तव्यामुळेच त्याच्या व्यक्तीमत्त्वाची जडणघडण होते. अर्थात मानवाच्या वर्तनावर काही निर्बंध घातले जातात. पण असे निर्बंध असले तरी व्यक्तीची प्रगती व्हावी म्हणूनच हक्कांची गरज निर्माण होते, म्हणून हक्क म्हणजे व्यक्तीला तिच्या सर्वांगीण विकासासाठी समाज व राज्य यांनी प्राप्त करून दिलेली संधी होय, असे हक्कांचे वर्णन केले गेले जाते.

❑ **हक्काची व्याख्या :–**

काही राजकीय व समाजशास्त्रीय विचारवंतांनी हक्काची व्याख्या केलेली आहे ती पाहूया.

**१. प्रा. हेरॉल्ड लास्की :–**

''हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थिती होय की, ज्याशिवाय व्यक्तीला स्वत:चा सर्वांगीण विकास करून घेणे शक्य होत नाही.''

२. **प्रा. बोझांके :-**

''आपण ज्या समाजाचे घटक असतो, त्या समाजाच्या सर्वोच्च कल्याणाच्या दिशेने आपल्या जीवनाचा विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक असणारी साधने म्हणजे हक्क होत.''

❑ **हक्कांचे स्वरूप व वैशिष्ट्ये :-**

१. हक्काचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे हक्कांची निर्मिती ही समाजातच होत असते.

२. सामाजिक जीवनात होणाऱ्या परिवर्तनाबरोबर हक्कांचे स्वरूपही बदलत जाते.

३. हक्कांची निर्मिती समाजात होत असली तरी त्यांना राज्यांची मान्यता मिळणे ही गोष्ट तितकीच महत्त्वाची असते.

४. अर्थात राज्य हक्कांची निर्मिती करत नाही.

५. हक्काबरोबर कर्तव्येही उदयाला येतात. हक्क आणि कर्तव्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

थोडक्यात, हक्क व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहेत आणि समाज व राज्य त्यांना ही संधी मिळवून देतात.

### १.३.१ मानवी हक्क-अर्थ व स्वरूप (Meaning and Nature of Human Rights)

मानवी हक्क हे माणसांशी निगडीत असतात. आपले जीवन किमान सुखाने व आनंददायीपणे जगण्याच्या आपल्या नैतिक मागणीप्रती हे हक्क नैतिक हमी देण्याचे काम करतात. संकल्पनात्मक परिभाषेत 'मानवी हक्क' हे 'हक्क' या संकल्पनेतून निर्माण झाले आहेत. हक्क या संक्लपनेत शुध्दता, सद्‌गुण आणि निष्कपटपणा किंवा भोळेपणा हे अर्थ अंतर्भूत आहेत. हक्क या संकल्पनेचा वापर फायदा मिळणे व त्यासाठी लायक असणे या अर्थानेही केला जातो.

१८व्या शतकात मात्र 'मानवाचे हक्क' या संकल्पनेसाठी नैसर्गिक, स्वाभाविक, अदेय आणि अनिर्धारित इत्यादी शब्दांचा वापर केला जात होता. कारण प्रत्यक्षवादी किंवा सकारात्मक कायद्यापेक्षा मानवी हक्कांचे अस्तित्व स्वतंत्र आहे व ही मानवी हक्कांची संकल्पना पुढे संयुक्त राष्ट्रसंघाच्या १९४८ च्या मानवी हक्कांचा जाहिरनामा यात उपयोगात आणली होती.

❑ **मानवी हक्कांचे आकलन :-**

मानवी हक्कांचा तीन पातळ्यांवर विचार करता येईल. या तिन्ही पातळ्या एकमेकांशी निगडीत आहेत. तसेच त्या परस्परांशी देवाण-घेवाणही करतात. त्या पायऱ्या पुढीलप्रमाणे :-

**१. मानवी मूल्य :** आपल्या समाजव्यवस्थेत काही विशिष्ट मानवी मूल्यांचा समावेश होतो. जसे- समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, राष्ट्रप्रेम, एकात्मता ज्यांच्या आधारे आपण या हक्कांचा आनंद घेऊ

शकतो. आपल्या मूल्यव्यवस्थेची पातळी ही मानवी हक्कांच्या तत्त्वांच्या अंमलबजावणीशी थेट जोडलेली असते.

**२. राजकारण :** मानवी हक्कांची दुसरी पायरी म्हणजे राजकारण होय. लोकशाही शासनव्यवस्थेत आपल्या हक्कांवर गदा आल्यास किंबहुना मानवी हक्क नाकारले गेल्यास लोक सामूहिकरित्या सरकारी ध्येय-धोरणांना विरोध करीत ठामपणे उभे राहू शकतात. उपेक्षित, वंचित वर्ग समुदायातील लोक एकत्र येऊन संघटित होऊन त्यांचे मानवी हक्क मागू शकतात. अर्थात मानवी हक्कांचे राजकीय स्वरूप हे आपल्या मूल्यांशी आणि नीतीतत्त्वांशी निगडीत असते.

**३. कायदा :** मानवी हक्कामधील तिसरा स्तर हा कायद्याच्या पातळीवरून कार्य करत असतो. त्यातही स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय असे तीन स्तर आहेत. कायद्याच्या मदतीने मानवी हक्कांची अंमलबजावणी करताना राजकीय दबावाशी सामना करावा लागतो.

## ❑ मानवी हक्कांची व्याख्या :-

सर्व मानवांना नैसर्गिक हक्क असतात. त्यांचे हक्क स्वत:कडून, संबंधित राष्ट्राकडून संरक्षित केले गेले पाहिजेत. मानवी हक्क म्हणजे असे हक्क जे सर्व माणसांना असतात आणि जे त्यांच्यापासून वेगळे करता येत नाहीत. संयुक्त राष्ट्रसंघाने १९४८ साली मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा प्रस्तुत केला आणि मानवतेच्या विविध प्रश्नांवर करारनामे केले. या करारनाम्यांना सभासद राष्ट्रांनी मंजूरी देऊन या करारनाम्याशी प्रतिबध्द व्हावे यासाठी राष्ट्रसंघ प्रयत्नशील आहे. राष्ट्रसंघाच्या स्थापनेनंतर मानवी हक्कांना औपचारिक व वैश्विक स्वरूप प्राप्त झाले.

मानवी हक्कांचा उल्लेख काही वेळेला पायाभूत हक्क, मुलभूत हक्क, नैसर्गिक हक्क आणि स्वाभाविक हक्क या संज्ञांनी देखील केला जातो. मानवी हक्क हे मुलभूत हक्कांप्रमाणे अत्यंत महत्त्वाचे, पवित्र, सनातन व अलौकिक स्वरूपाचे असतात. काही तज्ज्ञांच्या मते, मानवी हक्क हे सर्व नागरिकांसाठी व्यक्ती म्हणून स्वाभाविक स्वरूपाचे ठरतात.

मानवी हक्क या संकल्पनेची व्याख्या पुढील वेगवेगळ्या प्रकारे करण्यात आली आहे.

### १. ॲड. जे. पी. एस. सिरोही :-

भारतीय गुन्हेगारी शास्त्रज्ञ ॲड. सिरोही यांच्या मते, ''मानवी हक्क म्हणजे असे हक्क की, जे मानवी व्यक्तींच्या जीवनाशी आणि स्वातंत्र्याशी निगडीत असून सर्व संस्थांद्वारे आणि संयुक्त राष्ट्रसंघासहित सर्व राष्ट्रांच्या कायद्यामार्फत त्यांना संरक्षण प्रदान करण्यात आले पाहिजे.''

### २. १९९३ सालचा मानवी हक्क संरक्षण कायदा कलम क्र. 2(I)(d) [2(a)(5)]

भारतातील १९९३ सालच्या मानवी संरक्षण कायद्यानुसार- ''मानवी हक्क म्हणजे असे हक्क की, जे मानवी जीवन, मानवी स्वातंत्र्य, मानवी समानता व मानवी प्रतिष्ठा यांच्याशी संबंधित असतात. भारताच्या

राज्यघटनेने त्यांच्या अंमलबजावणीची नुसतीच खात्री दिली नाही तर त्यांचा समावेश आंतरराष्ट्रीय करारानुसार, भारतीय राज्यघटनेत करून त्यांची अंमलबजावणी भारतातील न्यायालयाकडे सोपविली आहे.''

३. **''मानवी हक्क म्हणजे, असे सर्व हक्क जे प्रत्येकास निसर्गत:च मिळालेले असतात. ज्यांच्याशिवाय आपण माणूस म्हणून जगू शकत नाही.''**

४. **भारतातील मानीव हक्काच्या प्राचीनतेवर भाष्य करताना डॉ. के. एम. माथूर पुढील वैदिक श्लोकाची आठवण करून देतात.**

सर्वे भवन्तु सुखिन:

सर्वे संतु निरामय।

सर्वे भ्रदाणी पश्चन्तु

मा कश्चिद् दु:ख भाग्यवेत।।

अर्थात, सर्वांनी सुखी व्हावे. सर्वांना आरोग्य लाभावे, सर्वांचे कल्याण व्हावे व कोणाच्याही वाट्याला दु:ख येऊ नये. असा अर्थ स्पष्ट करणारा हा श्लोक म्हणजे मानवी हक्कांचे विश्लेषण होय.

५. **भारतीय राज्यघटनेतील मानवी हक्क :-**

भारतीय राज्यघटनेत मानवी हक्कांची चार सुत्रे प्रतिपादन केली असून ती खालील प्रमाणे :-

**१. न्याय** (Justice) **:** यात सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय अभिप्रेत आहे.

**२. स्वातंत्र्य** (Liberty) **:** यात विचार, अभिव्यक्ती, श्रध्दा, विश्वास, पूजा इत्यादी स्वातंत्र्याचा अंतर्भाव आहे.

**३. समता** (Equality) **:** यात दर्जा, संधी आणि बढतीची समानता अंतर्भूत आहे.

**४. बंधुता** (Fraternity) **:** यात व्यक्तीची प्रतिष्ठा राखण्याचे आश्वासन आणि राष्ट्रांची एकता व पूर्णता अभिप्रेत आहे.

दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे मानवी हक्क जन्मत: मिळालेले असे हकक आहेत, जे माणसाच्या व्यक्तीमत्व विकासासाठी, मानवी मूल्यांच्या जपणुकीसाठी, संवर्धनासाठी, बौद्धिक, वैचारिक व सद्सद्विवेक बुद्धीच्या वाढीसाठी महत्त्वाचे आहेत. तसेच ते मानवाच्या अध्यात्मिक व इतर गरजा भागविण्याकरिता आवश्यक असतात.

❑ **मानवी हक्कांचे स्वरूप :-**

मानवी हक्कांच्या वरील व्याख्यांवरून मानवी हक्कांची स्वरूपात्मक वैशिष्ट्ये स्पष्ट होतात.

मानवी हक्कांच्या जागतिक जाहिरनाम्याच्या भूमिकेनुसार मानवी हक्क म्हणजे मानवाचे अविभाज्य, वैश्विक आणि परस्परावलंबी हक्क होत. या तीन वैशिष्ट्याद्वारे मानवी हक्कांचे स्वरूप स्पष्ट होते.

१. **अविभाज्य हक्क :–**

मानवी हक्क हे अविभाज्य व परंपरागत असतात. ते आपल्याला निसर्गत: व जन्मजातच प्राप्त होतात. हे हक्क आपणास कोणी देत नाही किंवा कोणी हिरावूनही घेऊ शकत नाही. कारण प्रत्येक मनुष्याला तो माणूस आहे म्हणून हे सर्व हक्क मिळतात.

२. **वैश्विक हक्क :–**

मानवी हक्क वैश्विक असतात. म्हणजेच प्रत्येक व्यक्तीला ती कोणत्याही धर्म, जाती, वंश, लिंग, सामाजिक वा आर्थिक स्तरातील किंवा भाषा व प्रांतातील असली तरी तिला मानवी हक्क प्राप्त होतात. याचाच अर्थ असा आहे की, हे हक्क सर्वांनाच असतात. मग ती व्यक्ती कोठेही असली अगदी दुसऱ्या देशात गेली तरी त्याचे हक्क त्याच्या सोबत राहतात.

३. **परस्परावलंबी हक्क :–**

मानवी हक्क हे परस्परसंबंधी व परस्परावलंबी असतात. सर्व मानवी हक्क एकत्रितपणेच पहावे लागतात. अर्थात् कोणताही हक्क स्वतंत्र काढून बघता येत नाही. हे सर्व हक्क सर्व माणसांसाठी एकाचवेळी अस्तित्त्वात असतात. आणि त्यांना तसेच पहायला हवे. कोणताही एक मानवी हक्क इतर हक्कांपेक्षा अधिक महत्त्वाचा किंवा श्रेष्ठ नसतो. जीविताचा हक्क, अन्न मिळविण्याचा हक्क, अभिव्यक्ती व भाषणाचा हक्क हे सर्व हक्क परस्परावलंबी हक्क आहेत. हे सर्व इतर मानवी हक्कांना लागू पडते.

थोडक्यात, माणूस हा जन्मत: हक्क आणि प्रतिष्ठेच्या दृष्टीने समान आहे. याला नैतिक मानवी हक्क म्हणतात. नंतर त्याचे कायदेशीर हक्कांमध्ये रूपांतर होते. जीवीताचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क आणि सुरक्षिततेचा हक्क हे मुलभूत हक्क आहेत. जगण्याचा हक्क हा नैसर्गिक हक्क आहे. मात्र सन्मानपूर्वक जीवन जगणे हे मुलभूत हक्क आहेत. एकीकडे पारंपारिक हक्क आणि राजकीय हक्क यांचा तर दुसरीकडे नव्याने विकसित झालेल्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचाही समावेश होतो. प्रत्येकाला जगण्याचा, स्वातंत्र्याचा व सुरक्षेचा हक्क आहेच, मात्र त्याचबरोबर शिक्षण, आरोग्य व इतर हक्क हे त्याला सन्मानपूर्वक जीवन जगण्यासाठी आवश्यक असतात.

## १.३.२ मानवी हक्काचा इतिहास (History of Human Rights)

अनेक मानवी संस्कृतींना विविध स्वरूपामध्ये हक्कांच्या संकल्पनेचे आकलन झाले आणि त्या संकल्पनांचा अर्थ लावण्यात आला. हक्कांविषयीच्या संकल्पनांचा बायबल, प्राचीन ग्रीक आणि रोमन संस्कृतीमध्ये विकास झाला. इतिहासकालीन डरचा राजा, डर नम्मु याने ख्रिस्तपूर्व २०५० च्या कालखंडामध्ये कायदेविषयक संहिता निर्माण केली. ही संहिता निर्विवादपणे पहिली कायदेविषयक संहिता

आहे. अशाप्रकारे जतन केलेल्या दस्ताऐवजांचे हमुराब्बी (सी.ए. ख्रिस्तपूर्व १७८०) संहिता हे एक उत्तम उदाहरण आहे.

मानवी हक्क व त्यांचे जतन, संरक्षण या कल्पना प्रत्यक्षात जरी २०व्या शतकात व विशेषत: दुसऱ्या महायुद्धानंतर साकार झाल्या असल्या तरी मानवी हक्कांच्या संकल्पनांचा उल्लेख अगदी प्राचीन काळापासून आढळतो. मानवी हक्कांचा इतिहास पुढील तीन कालखंडातून अभ्यासता येईल.

१) प्राचीन कालखंड.

२) मध्ययुगीन कालखंड.

३) आधुनिक कालखंड.

या तिन्ही कालखंडाचे स्पष्टीकरण आता आपण पाहू या.

**(अ) प्राचीन कालखंड :–**

मानवी हक्कांच्या अभ्यासकाच्या मते, मानवी हक्कांची संकल्पना प्राचीन काळातील ग्रीक नगरराज्याइतकीच जुनी आहे. पण ग्रीक व रोमन परंपरेपूर्वी म्हणजे ख्रिस्तपूर्व काळापासून मानवी हक्कांचा अंतर्भाव केलेला दिसतो. प्राचीन कालखंडातील मानवी हक्कांच्या इतिहासात पुढील विभागानुसार स्पष्टीकरण पाहणे आवश्यक ठरते.

**१. ख्रिस्तपूर्व परंपरा :–**

पार्शियन (इराण) साम्राज्याने सम्राट सायरसच्या राजवटीमध्ये ख्रिस्तपूर्व ६व्या शतकात मानवी हक्कांची अभूतपूर्व तत्त्वे प्रस्थापित केली.

ख्रिस्तपूर्व ५३९ मध्ये राजाने बॅबिलॉनवर विजय मिळविला आणि आपल्या विजयानंतर त्याने सायरस वृत्तचित्ती काढली असे सन १८७९ मध्ये शोधून काढण्यात आले. आजही वृत्तचित्ती मानवी हक्कांचा पहिला दस्तऐवज म्हणून ओळखला जातो. या वृत्तचित्तीने गुलामगिरी नष्ट केली आणि त्यावेळी पार्शियन राज्यकर्त्यांचे सर्व राजवाडे पगारी मजुरांकडून बांधण्यात आले. सायरसने यहुदी धर्माच्या अनुयायांना गुलामगिरीतून मुक्त केले व त्यांना पुन्हा त्यांच्या भूमीवर स्थलांतर करण्यास परवानगी दिली.

**२. सम्राट अशोकची राजवट :–**

तीन शतकानंतर प्राचीन भारतातील मौर्य साम्राज्याने खिस्तपूर्व तिसऱ्या शतकतील सम्राट अशोकाच्या राजवटीमध्ये नागरी हक्कांची अभूतपूर्व तत्त्वे प्रस्थापित केली. सम्राट अशोकाने ख्रिस्तपूर्व २६५ मध्ये कलिंगावर स्वारी करून पाशवी विजय मिळविला. पण त्याच्या या कृत्याचा त्याला पश्चात्ताप झाला. परिणामी, त्याने बौध्द धर्माचा स्वीकार केला. आपल्या राजवटीमध्ये त्याने अहिंसेचे अधिकृत धोरण राबविले. सर्व पंथ आणि धर्माची सहिष्णुता राखणे, पालकांच्या आज्ञेचे पालन करणे, गुरुजनांचा आदर

राखणे, सर्वांशी माणुसकीने व प्रेमाने वागणे अशी मुख्य तत्त्वे लागू केली. या सुधारणा सम्राट अशोकाच्या आज्ञापत्रामध्ये वर्णन करण्यात आल्या आहेत. पुढे अशोक स्तंभावरही त्या कोरल्या.

ख्रिस्तपूर्व काळात हक्क व कर्तव्ये बहुधा धार्मिक तत्त्वावर पार पाडली जात असत. देवाने मानवाची निर्मिती केलेली आहे. त्यामुळे सर्व मानव समान आहेत. अशी हक्कांविषयीची मर्यादित जाणीव या काळात करून दिल्याचे दिसते. मानवी हक्कांची निर्मिती करण्यात आलेली नाही किंवा ते गृहित धरले नाही, तर ते प्रत्येक व्यक्तीच्या स्वाभिमानावर व समानतेवर आधारित आहेत. असे वरील काळातील घटनाक्रमावरून दिसते.

**३. ग्रीक परंपरा :–**

पाश्चात्त्य विचारसरणीतील अभिजात परंपरांचा उगम ग्रीक आणि रोमन संस्कृतीमध्ये आढळतो.

स्ट्राइकस या ग्रीक–रोमन तत्त्ववेत्त्याने मांडलेल्या नैसर्गिक कायद्याच्या सिध्दांतामध्ये मानवी हक्कांच्या आधुनिक विचारांचे बीज सापडते.

सॉक्रेटिस आणि प्लेटोच्या ग्रीक परंपरेनुसार, विश्वाचे स्वाभाविक आदेश ज्या कायद्यात प्रतिबिंबीत होतात, अशा कायद्याला नैसर्गिक कायदा असे म्हणतात. याचा अर्थ प्रामुख्याने निसर्गावर नियंत्रण ठेवणारी दैवी इच्छा असा होतो. याचे अभिजात उदाहरण ग्रीक साहित्यामध्ये आढळते. ते असे– ग्रीक नाटक 'ॲन्टीगॉन' यात मानवी हक्क हे नैसर्गिक हक्क असल्याचा उल्लेख सापडतो. ॲन्टिगॉनचा (नाटकाची नायिका) भाऊ ग्रीक राजाच्या विरोधी बंड करतो व त्यात तो मारला जातो. राजा (किंग क्रेऑन) त्याच्या दफनविधीवर बंदी घालतो. परंतु ती त्याचा आदेश धुडकावून लावते व भावाचे दफन करते. राजाज्ञा मोडल्याबद्दल तिला अटक केली असता, स्वतःच्या वर्तनाचे समर्थन करताना ती म्हणते की, तिने दैवी कायद्यानुसार कृती केलेली आहे व अशा कायद्याचे उल्लंघन प्रत्यक्ष राजासुध्दा करू शकत नाही. याचा मतितार्थ असा की, मनुष्य मेल्यानंतर त्याचे दफन करणे हा त्याचा नैसर्गिक हक्क असून राजासुध्दा तो नाकारू शकत नाही.

कालांतराने ग्रीक नगरराज्यातील नागरिकांना काही मुलभूत हक्क प्रदान करण्यात आले होते (नैसर्गिक हक्कांची संकल्पना येण्यापूर्वी) ते हक्क पुढीलप्रमाणे–

(i) भाषण स्वातंत्र्याचा हक्क (इसोगोरिया)

(ii) कायद्यासमोर सर्व समान असल्याचा हक्क (इसोनोमिया)

(iii) सर्वांना समान आदर दर्शविण्याचा हक्क (इसोटोमिया)

तथापि, हे हक्क स्त्रिया आणि गुलामांना देण्यास नकार दिला गेला.

प्लेटोच्या वैश्विक सत्य आणि सद्गुण यांच्या कल्पनेतून हक्कांची वैश्विक संकल्पना साकार झाली. प्लेटोच्या मते, सद्गुण हे हक्क व कर्तव्यांशी जोडले गेले आहेत. प्रत्येकाकडे सद्गुण असतातच व त्यानुसार प्रत्येकाचे हक्क व कर्तव्ये असतात.

**४. रोमन परंपरा :–**

प्राचीन रोममध्ये नैसर्गिक हक्कांची कल्पना पुढे चालू राहिली. रोमन कायदेपंडित उल्मीमानचा असा विश्वास होतो की, कुठलीही व्यक्ती मग ती रोमन असो किंवा नसो अशा प्रत्येक व्यक्तीस नैसर्गिक हक्क असतात.

रोमन कायदा पध्दतीमध्ये मार्क्स तुल्लस सिसेरो यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. सिसोरो हा एक मुत्सद्दी वकील, विद्वान व लेखक होतो. त्याच्या मते, नागरिकांनी चांगले वर्तन ठेवावे. ज्यामुळे मानवी जीवनाची सुरक्षा, शांती आणि सुख प्राप्त होते. जसे नागरी, राजकीय आणि सैनिकी कर्तव्यांना महत्त्व दिले तसेच कुटुंब ही देखील एक नैतिकता जपणारी संस्था आहे. त्यानुसार प्रत्येक माणसाने मानसिक शांती व चारित्र्य यावर आधारित वर्तणूक ठेवून जीवन जगावे व यासाठी ही सर्व माहिती सर्वांना पुरविण्याचे उद्दिष्ट होते.

**(ब) मध्ययुगीन कालखंड :–**

मध्ययुगामध्ये स्वाभाविक कायद्याच्या सिध्दांताची दैवी तत्त्वावर पुनर्रचना करण्यात आली. या कालावधीमध्ये ख्रिस्ती ईश्वरासंबंधी परंपरांचा प्रमाण स्पष्टपणे दिसून येतो. मध्ययुगातील तत्त्वज्ञ ॲबेलॉर्ड (१०७९ ते ११४२), सेंट थॉमस ॲक्विनास (१२२४ ते १२७४) यांनी नैसर्गिक कायद्याची संकल्पना ही सर्वश्रेष्ठ असल्याचे प्रतिपादन केले. कायद्याद्वारे हित साधले गेले पाहिजे आणि त्याचे अनुसरण केले पाहिजे. वाईट गोष्टी टाळल्या गेल्या पाहिजेत हा कायद्याचा प्राथमिक हेतू आहे. स्वाभाविक कायद्याच्या सर्व नियमांचा हा पाया आहे.

ॲक्विनासच्या मते, कायदा म्हणजे हेतूंशी संबंधित मानवी वर्तणुकीच्या नियम आणि आदर्श होय. त्यांच्या मते, संपूर्ण विश्वावर कायद्याच्या चतु:सूत्रीची सत्ता चालते. त्यामध्ये शाश्वत कायदा, स्वाभाविक कायदा, मानवी कायदा आणि दैवी कायदा यांचा समावेश आहे. शाश्वत कायदा दैवी हेतू दर्शवितो. समाजात मानवी वर्तणुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी मानवाने तयार केलेले कायदे म्हणजे मानवी कायदे आणि ईश्वरी इच्छेचा व चमत्कारातून मानवाशी संपर्क साधून देण्यात आलेला दैवी आदेश म्हणजे दैवी कायदे होय. अक्वीनास आणि अन्य ख्रिस्ती मानववंश शास्त्रज्ञानी असे प्रतिपादन केलेले आहे की, दैवी कायदा हा अन्य कायद्यांपेक्षा श्रेष्ठ कायदा आहे. दैवी कायद्याची चर्चच्या संस्थेमार्फत लोकांना जाणीव करून देण्यात आली. म्हणून चर्चचे स्थान हे राज्यापेक्षा अधिक श्रेष्ठ आहे.

ख्रिस्ती वेदान्तवाद्यांनी महत्त्वाची योगदाने दिलेली आहेत. म्हणजे त्यांनी खाजगी, मालमत्तेच्या महत्त्वावर जोर दिलेला आहे. सेंट ॲक्विनासने म्हटले आहे की संघटित आणि नियंत्रित समाजासाठी खाजगी मालमत्ता आवश्यक आहे. भौतिक स्वार्थामुळे माणूस देवाला विसरतो आणि गरिबांकडे दुर्लक्ष

करतो. म्हणून तो असा युक्तीवाद करतात की, प्रत्येकास मर्यादित मालमत्तेचे हक्क असतात आणि अशी मालमत्ता निर्माण करणे हे राज्याचे कर्तव्य आहे. अर्थात जेव्हा चर्चच्या संस्थेचे राज्यावर नियंत्रण असेल.

या महत्त्वाच्या योगदानाव्यतिरिक्त, हल्लीचे मानवी हक्क आणि भूतकालीन स्वाभाविक हक्क यामध्ये मुलभूत भेद आहेत. हक्कांची ही कल्पना अत्यंत धार्मिक आहे.

**(क) पाश्चात्त्य विचारसरणी :–**

सामाजिक संविदात्मक विचारवंतांनी नैसर्गिक, व्यक्तीगत हक्कांच्या कल्पनेला हातभार लावला आणि बऱ्याचशा अन्य पाश्चात्त्य विचारवंतांनी वेगवेगळ्या सिध्दांताद्वारे मानवी हक्कांच्या उत्क्रांतीस हातभार लावला. त्यातील प्रमुख विचारवंताचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे :-

**१. ह्युगो ग्रॉशियस :–**

ग्रॅशियस यांनी स्वाभाविक कायद्याचा त्याचप्रमाणे आधुनिक आंतरराष्ट्रीय कायद्याच्या तत्त्वांचा नवीन पाया घालण्यासाठी उत्कृष्ट रचना केली. १७ व्या शतकाच्या प्रारंभी ग्रॅशियसने प्रत्येक व्यक्तीच्या नैसर्गिक हक्कांच्या आधुनिक कल्पनेची ओळख करून दिली. त्याच्या मते, मानवास मनुष्यप्राणी म्हणून काही हक्क प्राप्त झालेले आहेत. म्हणून प्रत्येकाने हे मान्य केले पाहिजे की, प्रत्येक व्यक्ती स्वत:चे जीवन वाचविण्याचा प्रयत्न करण्यास हकदार आहे.

**२. हॉब्ज, लॉक आणि रुसो :–**

थॉमस हॉब्ज, जॉन लॉक आणि जिन रुसो यासारख्या आधुनिक संविदात्मक सुधारकांनी असा युक्तीवाद केलेला आहे की, ज्यांच्याकडे मुळात कोणतीही शासकीय संघटना नव्हती, अशा मानवानी सहभाग घेतलेल्या करारनाम्याचा निष्कर्ष म्हणजेच राज्य होय. अशा प्रकारे सामाजिक करार ही संज्ञा तत्त्वज्ञानात्मक सिध्दांताच्या मोठ्या वर्गाचे वर्णन करते. हॉब्ज, लॉक व रुसो हे तिघेही सामाजिक करार सिध्दांताचे प्रणेते आहेत. सामाजिक करार सिध्दांत ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असून असा करार कायेदशीर राज्य व शासन करण्याजोग्या संमतीतून बनते हे सुचवितो.

हॉब्जच्या मते, मानवी हक्क म्हणजे प्रत्येक व्यक्तीच्या जीवीताच्या विशेष सुरक्षितता होय. त्यांच्या मते, हा हक्क अन्य कोणत्याही हक्कापेक्षा मुलभूत स्वरूपाचा आहे.

जॉन लॉकच्या मते, मनुष्यप्राणी हा मूळात मुक्त, समान व स्वतंत्र आहे. म्हणून शांतता व सदिच्छा आणि परस्परसहकार्य या स्वाभाविक स्थितीच्या अटी आहेत. लॉकने प्रत्येक व्यक्तीस केंद्रस्थानी ठेवले आणि त्याला अदेय (देऊन टाकता न येणारे) असे नैसर्गिक हक्क दिले. त्यामध्ये खाजगी, मालमत्तेच्या हक्कास प्राधान्य देण्यात आले.

रुसो यांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या संकल्पनांना महत्त्व दिले. रुसोने सामान्यपणे समाजाच्या आणि प्रत्येक व्यक्तीच्या हक्कांमध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न केला.

सामाजिक करार सिध्दांतानी केवळ नैसर्गिक आधारावर आणि वैयक्तिक जमिनीवर आधारलेल्या लोकशाही संस्थेच्या संकल्पना प्रस्थापित केलेल्या आहेत असे नाही.

सामाजिक करार सिद्धांतवाद्यांच्या व्यतिरिक्त आणखी बरेचसे विचारवंत आहेत. ज्यांनी आपल्या सूज्ञ विचारातून मानवी हक्कांवरील आधुनिक विचारांच्या उत्क्रांतीसाठी योगदान दिले. त्यामध्ये प्राधान्याने इमॅन्युअल कांट, जे. एस्. मिल, जेरेमी बेन्थॅम आणि मॉन्टेस्क्यू इत्यादी.

**✪ इमॅन्युअल कांट :–**

इमॅन्युअल कांटच्या मते, प्रत्येक व्यक्तीत काही मुलभूत हक्क असतात. त्या हक्कांना संरक्षण मिळाले पाहिजे. कांटने स्वाभाविक हक्क आणि संपादन केलेले हक्क यांच्यात फरक केलेला आहे. त्याने केवळ एकाच नैसर्गिक हक्काला मान्यता दिलेली आहे. मानवी हक्कावरील कांटची संकल्पना नैतिकतेच्या आणि विवेकबुध्दीच्या तत्त्वावरून तयार झाली. कांटची मानवी हक्कांची संकल्पना म्हणजे नैतिक पाया आहे. कांटने या संकल्पनेला विश्वव्यापी किंवा सार्वत्रिक बनवते.

**✪ जेरेमी बेन्थॅम :–**

बेन्थमने त्याच्या प्रसिद्ध अशा उपयुक्ततावाद सिध्दांतामध्ये अदेय हक्कांच्या संकल्पनेस निराधार म्हणून नापसंती दर्शविली आहे. त्याने असा दावा केला आहे की, शासनाच्या कारवाईतून निर्माण होणारे हक्क किंवा परंपरेतून जन्म घेणारे हक्कच अदेय आहेत. नैसर्गिक हक्क व कायदे यावर तो टिका करतो. प्रत्येक माणूस सुखी होण्याच्या व दुःख टाळण्याचा प्रयत्न करत असतो. त्याच्या मते, आनंद व दुःख यांचे काही घटकांच्या आधारावर मूल्यांकन करता येते. म्हणून जास्तीत जास्त संख्येने लोकांना सुखी करणे हे राज्याचे व कायद्याचे अतिशय महत्त्वाचे कार्य आहे. त्याने व्यक्तीगत हक्क किंवा आनंदाबरोबर सामुदायिक हक्क किंवा आनंदही महत्त्वाचे असतात यावर भर दिला.

**✪ जॉन स्ट्युअर्ट मिल :–**

जे. एस्. मिल यांनी On Liberty (स्वातंत्र्य) या पुस्तकाच्या सुरवातीलाच उपयुक्ततावादाला कडाडून विरोध केला. बहुमत मिळवून जुलमी राजवट अंमलात आणण्याचा तो एक प्रकार आहे, असे त्याचे मानणे आहे. तो म्हणतो की, बौध्दिक आणि सामाजिक प्रगतीसाठी मुक्त भाषण ही एक आवश्यक अट आहे. मौन राहिल्यामुळे सत्य पूर्णपणे समजत नाही. त्याच्या मते, अभिव्यक्ती व समूह-स्वातंत्र्य निरमवाद असू शकत नाही. आपआपले स्वातंत्र्य प्राप्त करण्याकडे इतर व्यक्तींची क्षमता हिरावून न घेता असे स्वातंत्र्य अस्तित्त्वात असले पाहिजे.

✪ **मॉन्टेस्क्यू :–**

मॉन्टेस्क्यू हा प्रसिध्द फ्रेंच तत्त्वज्ञ त्याच्या स्वातंत्र्याच्या संस्थेविषयक लिखाणातील तत्त्वासाठी प्रसिध्द आहे. मॉन्टेस्क्यूचा स्वाभाविक कायदा आणि हक्कांवर विशेषत: स्वातंत्र्याच्या हक्कावर विश्वास आहे. तथापि, त्याने वैयक्तिक वर्तणूक तसेच नैतिक व सौंदर्यात्मक दृष्टिकोनातील सांस्कृतिक तफावत, धार्मिक श्रध्दा आणि स्वातंत्र्य मान्य करण्याची क्षमता यांच्या सामाजिक स्पष्टीकरणास अग्रक्रम दिला. मॉन्टेस्क्यू हा मुलभूत विचारांचा कट्टर धार्मिक असल्यामुळे तो व्यक्तीवादी नव्हता. त्याने दैवी कायद्यावर भर दिला. त्याने काही अंशी मानवी हक्कांच्या लौकिक रुपांवर जोर दिला. त्याने आनंदाचा पाया म्हणून स्वातंत्र्याकडे पाहिले. त्याला विश्वास होता की, राजकीय स्वातंत्र्य हे व्यक्ती, संस्था आणि सामाजिक वर्ग यांच्यातील सत्ता विभाजनावर अवलंबून आहे. संस्थात्मक पातळीवरसुद्धा व्यक्तीगत स्वातंत्र्याची हमी मिळविण्यासाठी वैधानिक, कार्यकारी आणि न्यायीक प्रक्रियेमध्ये सत्तेचे विभाजन होणे आवश्यक आहे, यावर त्यांनी भर दिला.

**(ड) आधुनिक कालखंड :–**

पहिल्या महायुध्दाच्या समाप्तीनंतर मध्यम पातळीवर मानवी हक्कांचे सार्वभौमिकरण करण्याचे प्रयत्न व्हर्सेल्सच्या करारानुसार झाले होते. पण ते यशस्वी होऊ शकले नाही. त्यावेळची सुसभ्य किंवा सुसंस्कृत जगाची न्यायिक सद्सद्विवेक बुध्दी ही मोठ्या प्रमाणात राज्याद्वारे केल्या जाणाऱ्या हिंसाचाराविरुध्द व्यक्तींच्या हक्कांचे जतन करण्याच्या बाजूची होती. व्यक्तीचे तिच्या स्वत:च्याच राज्याकडून होणाऱ्या अन्यायाविरुध्द संरक्षण केले पाहिजे, यासाठी आंतरराष्ट्रीय कायदा संस्थेच्या सभासदांनी मानवी हक्कांचे जतन करण्यासाठी काही उपाय सुचविणेस प्रारंभ केला. या संस्थेचे सभासद युरोप, अमेरिका आणि आशिया खंडातील विविध राष्ट्रांत विखुरलेले होते. त्यांनी मानवी हक्कांचे जतन करण्याबाबत प्रत्येक राष्ट्राच्या सहा कलमी कार्यक्रमाचा स्विकार केला. ही सहा कलमे खालीलप्रमाणे :-

१. प्रत्येक व्यक्तीचे जीवन, स्वातंत्र्य व मालमत्ता बाबत समान हक्कास मान्यता देण्यात येईल. त्यामध्ये राष्ट्रीयता, लिंग, वंश, भाषा व धर्म असा भेद असणार नाही. नागरिकांच्या समान हक्कांचे जतन केले जाईल.

२. प्रत्येक व्यक्तीच्या सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील मुक्त श्रध्दा, धर्म व विश्वास यानुसार केल्या जाणाऱ्या आचरणास मान्यता दिली जाईल.

३. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या आवडीची भाषा व त्या भाषेचे शिक्षण घेण्याचा अधिकार मान्य केला जाईल.

४. कोणत्याही राष्ट्राच्या नागरिकांमध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरूपात, सार्वजनिक वा खाजगी ठिकाणी लिंग, वंश, भाषा किंवा धर्म याआधारे भेद न करण्याच्या अधिकारास मान्यता देण्यात येईल.

५. राष्ट्राच्या जनतेत समानतेचा विचार करताना ही समानता नावापुरतीच असता उपयोगी नाही, तर ती परिणामकारक असली पाहिजे.

६. स्वत:च्या सर्वसामान्य कायद्याच्या आधाराशिवाय कोणत्याही राष्ट्राला लिंग, वंश, भाषा व धर्म याद्वारे प्राप्त झालेले नागरिकांचे राष्ट्रीयत्वाचे हक्क काढून घेता येणार नाही.

एकूण वरील जाहीरनाम्यात असे म्हटले गेले की, राज्याने त्यांच्या नागरिकात राष्ट्रीयत्व, लिंग, भाषा आणि धर्म या आधारावर भेद करू नये. तसेच सर्वांना जीवन जगण्याचा, स्वातंत्र्याचा, मालमत्ता संपादन करण्याचा समान हक्क प्रदान करणे आवश्यक आहे.

मानवी हक्कांचे सार्वभौमिकरण करण्याच्या प्रक्रियेचा दुसरा मैलाचा दगड ठरला तो म्हणजे जर्मनीतील नाझी यांनी वंश किंवा धर्म यांच्या नावावर केलेली ६ दशलक्ष 'ज्यू' लोकांची निर्घृण हत्त्या. दुसऱ्या महायुद्धातील या घटनेचा पडसाद संपूर्ण जगावर उमटला. या घटनेने व्यथित झालेले अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष रुझवेल्ट यांनी मानवी हक्कांची आवश्यकता प्रतिपादन करताना चार प्रकारच्या मानवी हक्कांची पायाभरणी करून त्याआधारे मानवी जगाचे स्वप्न पाहिले. हे जार अधिकार खालीलप्रमाणे :-

१. भाषण व भावना प्रकटीकरणाचे स्वातंत्र्य.

२. प्रत्येक व्यक्तीला तिच्या पध्दतीनुसार योग्य त्या ईश्वराची पूजा करण्याचे स्वातंत्र्य.

३. गरजा किंवा मागणीपासून स्वातंत्र्य.

४. भितीपासून मुक्ती किंवा स्वातंत्र्य.

मानवी हक्कांची ही यादी परिपूर्ण नसली तरी या यादीने मानवी हक्क चळवळींवर मोठा प्रभाव गाजिवला यात शंका नाही.

❑ **अटलान्टिक सनद :-**

ग्रेट ब्रिटनचे तत्कालीन पंतप्रधान विस्टन एस्. चर्चिल आणि अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष फ्रँकलिन डी रुझवेल्ट हे अटलांटिक महासागरात एकमेकांना भेटले व त्यांनी एक संयुक्त पत्रक ऑगस्ट १९४८ साली जाहीर केले. हे संयुक्त पत्रक 'अटलांटिक सनद' म्हणून ओळखले जाते. हे पत्रक जरी दोन नेत्यांचे मत असले तरी त्याद्वारे त्यांनी मानवी हक्कांसंबंधी काही सर्वमान्य तत्त्वे प्रतिपादन करून सुदंर व भव्य जगाचे आशादायी स्वप्न पाहिले होते. त्यांनी त्यांच्या पत्रकात स्वातंत्र्य, स्वराज्य व आर्थिक स्वातंत्र्य या मूल्यांवर भर दिला.

मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीयकरण या प्रश्नाला १९४४ साली डर्म्बटन ओक्स (Dumberton Oaks) येथे झालेल्या अधिवेशनात महत्त्व प्राप्त होणे गरजेचे होते. त्यामुळे जागतिक सत्तेचे लक्ष या मानवी हक्काच्या प्रश्नाकडे वळेल.

पुढे अमेरिकेतील सॅन फ्रान्सिस्को शहरात २५ एप्रिल ते २६ जून, १९४५ या कालावधीत आयोजित संयुक्त राष्ट्रसंघाच्या परिषदेत मानवी हक्कांच्या संदर्भात केलेल्या सनदेत 'मानवी हक्क आणि मुलभूत स्वातंत्र्य' याबाबत अनेक तरतूदी करताना वंश, लिंग, भाषा व धर्म या आधारे सर्व नागरिकांना समान हक्क वा अधिकार प्रदान करण्यात आले. याच अधिवेशनात सामाजिक व आर्थिक मंडळाने प्राप्त अधिकारांद्वारे मानवी हक्क आयोगाची निर्मिती करून त्याद्वारे हक्कांचा आंतरराष्ट्रीय कायदा तयार करून घेतला.

सामाजिक व आर्थिक मंडळाने ऐक्याने काम करताना संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण संसदेच्या १० डिसेंबर १९४८ रोजी झालेल्या आमसभेतून ''मानवी हक्कांचा'' जाहिरनामा जाहीर करून तो स्विकारण्यात आला. यात मानवी हक्कांच्या विविध पैलूंवर व प्रकारांवर चर्चा करण्यात आली. आज जगातील सर्व राष्ट्रांनी (अगदी साम्यवादीसुध्दा) मानवी हक्कांची संकल्पना स्विकारली आहे. आज जागतिक स्तरावर मानवी हक्क व मानवतावादी करारांची संख्या सुमारे ९० इतकी आहे. म्हणून २० वे शतक मानवी हक्कांचे शतक मानण्यास हरकत नाही.

अशा तऱ्हेने मानवी हक्कांची प्रचलित संकल्पना ही बऱ्याचशा पाश्चात्त्य विचारवंतांनी दिलेल्या योगदानाचे फलित आहे. अर्थात प्राचीन धार्मिक परंपरांपासून ग्रीक, रोमन विचारांची कल्पनाही आपण जाणून घेतली ख्रिस्तपूर्व काळातील मानवी हक्काबाबतची कल्पनाही लक्षात येते. त्यांनी हक्कांमध्ये समानतेची कल्पना आणली. प्रत्येक व्यक्तीच्या स्वाभाविक आणि अदेय हक्कांची कल्पना म्हणजे या उत्क्रांतीचा पाया होय. जरी नैसर्गिक हक्कांच्या, सिध्दांतास, कित्येक विचारवंतांनी आव्हान दिलेले होते तरी तो पुनरुज्जीवनाचा कालावधी होता. आधुनिक युगात बऱ्याचशा विचारवंतांनी हक्कांच्या कल्पनेसाठी योगदान दिले शांतता, प्रतिनिधिक शासन, आंतरराष्ट्रीय हक्क, सत्तेचे विभाजन, लोकमान्य सार्वभौमत्त्व इ. संकल्पना दिल्या. २०व्या शतकात १९४८ साली मानवी हक्कांचा जाहीरनामा स्विकारला. मानवी हक्कांच्या जागतिक जाहिरनाम्याने पुन्हा एकदा स्वाभाविक आणि अदेय हक्कांवर भर दिला.

### १.३.३ मानवी हक्कांबाबतचा दृष्टिकोण (Perspectives of Human Rights)

मानवी हक्कांची संकल्पना व ऐतिहासिक आढावा पाहिल्यानंतर मानवी हक्कांबाबतच्या दृष्टिकोनाचा अभ्यास करणार आहोत.

काही तज्ज्ञांच्या मते, मानवी हक्कांचे स्वरूप अधिक स्पष्ट होण्यासाठी मानवी हक्कांच्या अध्ययनाचे दृष्टिकोण अभ्यासणे गरजेचे आहे. मानवी हक्क अध्ययनाचे दृष्टिकोन पुढीलप्रमाणे :-

### अ) तत्त्वज्ञानशास्त्रीय दृष्टिकोन किंवा सैध्दांतिक दृष्टिकोन (Philosophical Approach or Theoretical Approach)

तत्त्वज्ञानशास्त्रीय दृष्टिकोन हा प्रामुख्याने काल्पनिकतेशी निगडीत असून त्यामध्ये पाच सैध्दांतिक दृष्टिकोन अंतर्भूत आहेत ते दृष्टिकोन खालीलप्रमाणे :-

## (१) नैसर्गिक हक्क सिद्धांत (The Natural Right Theory)

एलेन पॅगेल्स (Elaine Pagels) या समकालीन विचारवंताने मानवी हक्क या संज्ञेची व्याख्या अशी केली की, ''व्यक्तीचे काही हक्क समाजाच्या संदर्भात किंवा समाजाच्या विरोधात असू शकतात की, जे हक्क समाजाने मान्य केले पाहिजेत व त्याप्रमाणे क्रिया करणे व्यक्तीवर बंधनकारक असले पाहिजे तसेच ते व्यक्तींचा विचार करता मुलभूत स्वरूपाचे असावेत.''

या व्याख्येनुसार मानवी हक्क समाजाच्या बाजूचे व समाजाच्या विरोधात असले तरी मानवी हक्काचे अस्तित्त्व स्वतंत्र असते व मानवी हक्क समाज निर्माण होण्यापूर्वीपासून अस्तित्वात असतात. फक्त त्यांची जाणीव व्यक्तींना करून देणे गरजेचे असते. या नैसर्गिक हक्कांची वैशिष्ट्ये पुढील तीन प्रकारची आहेत.

### (अ) मानवी हक्कांना मान्यता मिळावी लागते :–

मानवी हक्क स्वाभाविकपणे मानवी व्यक्तीत वास करीत असतात. व्यक्ती समाजात सहभागी होण्याआधीपासून ते अस्तित्त्वात असतात. आणि म्हणून राज्यातर्फे त्यांना मान्यता दिली जाते. तार्किक दृष्टीने विचार करता हे हक्क त्यांच्या अस्तित्त्वासाठी समाजाच्या कायदेशीर व्यवस्थेपासून स्वतंत्र असतात. त्यामुळेच अनेक कायदेतज्ञ, राज्यशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ इ. विद्वान मानवी हक्कांचा उगम हा सकारात्मक किंवा प्रत्यक्ष कायद्याऐवजी नैसर्गिक कायद्यात असल्याचे मानतात. म्हणजेच मानवी हक्क हे नैसर्गिक कायद्याच्या तत्त्वाप्रमाणे कोणत्याही अधिकारातर्फे तयार केले जात नाहीत वा स्विकारले जात नाही, कारण मानवी हक्क स्वयंभू असतात. पण त्या हक्कांची जाणीव कायदा करून देतो.

### (ब) मानवी हक्क हे अदेय, नैसर्गिक व स्वाभाविक असल्याचे मानतात :–

मानवी हक्क हे अदेय आहेत म्हणजे ते व्यक्तीला स्वत:हून काढून टाकता येऊ शकत नाही. मानवी हक्क स्वाभाविक आहेत. मनुष्याचा स्वभावाचा तो एक भाग आहेत. या संदर्भात जॉकिज मॅरिटेन (Jackgnes Maritain) असे म्हणतात की, मनुष्यहक्क धारण करतात कारण तो स्वयंपूर्ण, स्वत:चा मालक व स्वत:च्या क्रियेचा कर्ता असून नैसर्गिक कायद्यानुसार मनुष्य स्वत:च धारण केलेल्या अधिकारांचा किंवा हक्कांचा आदर करू शकतो.

नैसर्गिक हक्क हे सकारात्मक किंवा प्रत्यक्षवादी कायद्यापासून स्वतंत्र असतात. आणि म्हणून मानवी हक्कांचा वापर सकारात्मक कायद्याचे नियम उत्क्रांत करण्यासाठी केला जातो. याशिवाय मानवी हक्कांच्या माध्यमातून कायद्यांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा, कायदेशिवाय संस्था आणि राज्यांची कृत्ये यातही उत्क्रांती करणे शक्य आहे.

### (क) सर्व मानवी व्यक्ती समान असतात असे मूलत:च मानले जाते :–

नैसर्गिक हक्काचा खरा हक्कदार केवळ माणूसच असतो. व्यक्तीच्या सद्गुणामुळेच माणसात माणुसकी निर्माण होते की, जी नैसर्गिक हक्काच्या पालनात महत्त्वाची भूमिका बजावते. अर्थात सर्व मानव समान आहेत. हा मानवी हक्काचा पाया आहे, बर्नाड मेयो (Barnard Meyo) याविषयी म्हणतात, ''मानवी

हक्क हे असे हक्क आहेत जे मनुष्याला त्याच्या सद्‌गुणांच्या वैशिष्ट्यामुळे प्राप्त झाले आहेत, कारण मानवात निश्चितपणे व सार्वभौमिकपणे मानवता आहे ही वास्तवता आहे.

### (२) कायदेशीर हक्क सिद्धांत (The Legal Right Theory)

जर्मी बेन्थम या तज्ज्ञांनी कायदेशीर हक्क सिध्दांताचे समर्थन केले. सर्वसामान्यपणे कायदेशीर हक्क सिध्दांताला पाठिंबा देणाऱ्या विचारवंताच्या मते, हक्क ही राज्याची निर्मिती आहे. म्हणून मानवी हक्क जसे निरंकुश नाहीत तसेच ते स्वाभाविकही नाहीत.

थॉम्स हॉब्ज हे देखील कायदेशीर हक्क सिध्दांताला पाठिंबा देणारे विचारवंत मांडतात की, व्यक्तीचे मुलभूत हक्क म्हणजे स्वसंरक्षणाचा हक्क होय की, ज्याचे संरक्षण राज्याने इतर कोणत्याही हक्कापेक्षा चांगल्या प्रकारे केले पाहिजे.

बी. बोसानकवेन्ट असे म्हणतात की, ''हक्काला कायदेशीर आणि नैतिक असे दोन्ही संदर्भ आहेत.''

या विविध तज्ज्ञांचे असे मत आहे की, हक्कांची अंमलबजावणी कायद्यामार्फत केली जाते. ज्यामध्ये भौतिक आज्ञाधारकता असू शकत नाही. मात्र हक्काला मान्यता राज्याने देणे गरजेचे आहे. थोडक्यात, कोणत्याही हक्काची निर्मिती व अंमलबजावणीसुध्दा कायद्यामार्फतच झाली पाहिजे.

### (३) हक्कांचा ऐतिहासिक सिद्धांत (The Historical Theory of Rights)

काही तज्ज्ञ असे मानतात की, ऐतिहासिक प्रक्रियेतून हक्कांची निर्मिती झाली. म्हणजे वाढदिवसाची किंवा लग्नाची भेटवस्तू देण्याच्या प्रथेतून ही भेट हक्क बनला. अशा ऐतिहासिक प्रक्रियेतून आकाराला आलेल्या हक्कात रस्त्याचा हक्क, दिवाबत्तीचा हक्क, इत्यादीचा समावेश होतो. परंतु हक्कांच्या ऐतिहासिक सिद्धांताला मर्यादा येतात. उदा. सती प्रथा, बहुविवाह प्रथा, बालविवाह प्रथा वगैरे. पूर्वी समाजात यांना मान्यता होती, परंतु आजच्या प्रबोधनाच्या युगात त्यावर कायद्याने बंदी घातली. त्यांचे हक्कात रूपांतर केले नाही. म्हणजेच पूर्वीच्या सर्वच प्रथांचे हक्कात रूपांतर होऊ शकत नाही.

### (४) हक्कांच्या सामाजिक कल्याण सिद्धांत (The Social Welfare Theory Rights)

हक्कांची सामाजिक कल्याण सिद्धांत हा सामाजिक स्वहितवादी किंवा उपयुक्ततावादी सिद्धांत होय. या सिद्धांताचे समर्थन करणाऱ्या तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की, कायदा, प्रथा आणि नैसर्गिक अधिकार हे सर्व सामाजिक स्वहितवादाच्या किंवा उपयुक्ततावादाच्या अटीत गुरफटले आहेत. उदा. भाषण स्वातंत्र्याचा हक्क हा निरंकुशपणे प्रदान करता येणार नाही. तर सामाजिक उपयुक्ततावादी दृष्टिकोनातून त्याकडे पहावे लागेल.

रॉस्की पाऊंड, शकी, बेन्थम जेरेमी व जॉन स्टुअर्ट मिल यांनी या सिद्धांताला पाठिंबा दिला होता, काही तज्ज्ञांच्या मते, सामाजिक कल्याण सिद्धांत, अनेक मानवी हक्काच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावते. अनेक प्रकारचे सामाजिक व आर्थिक हक्क मानवी हक्कांच्या सार्वभौमिक जाहिरनाम्यात समाविष्ट

करण्यात आले होते. नंतर त्यांचे आंतरराष्ट्रीय करारात समावेश करण्यात आला. परंतु या सिद्धांताला काही मर्यादा आहेत. एक म्हणजे सामाजिक कल्याण प्रक्रिया ही सामूहिक साध्य आहे. अर्थात साध्य हे हक्क नसतात व दुसरी मर्यादा म्हणजे या सिध्दांताद्वारे सामान्य सामूहिक ध्येयांचा पाठलाग करण्यासाठी जे उपाय योजण्यात आले त्यात व्यक्तीच्या हक्कांच्या उल्लघंन क्रिया समाविष्ट आहेत. थोडक्यात, व्यक्तींच्या हक्कापेक्षा सामाजिक कल्याण उपाययोजनेला महत्त्व अधिक दिले जाते.

### ५) हक्कांचा आदर्शवादी सिद्धांत (The Idealistic Theory of Rights)

हा सिद्धांत व्यक्तीमत्त्व सिद्धांत म्हणूनही ओळखला जातो. या सिध्दांतात 'मनुष्याचा अंतर्गत विकास' या संकल्पनेवर भर देण्यात आला आहे. तसेच हा सिद्धांत माणसाच्या सर्व प्रकारच्या क्षमतांचा संपूर्ण विकास करण्याचाही प्रयत्न करतो आणि म्हणून हा हक्कांचा आदर्शवादी सिद्धांत, व्यक्तिमतत्त्वाचा हक्क हा सर्वश्रेष्ठ व निरंकुश असल्याचे मानतो.

इतर सर्व हक्क म्हणजे, जगण्याचा, स्वातंत्र्याचा वा मालमत्तेचा हे सर्व एका मुलभूत अधिकारास निर्माण करण्यात आले. हे हक्क व्यक्तिमत्त्वाशी संबंधित आहेत. उदा. जगण्याचा हक्क.

हक्कांचा आदर्शवादी सिध्दांताचा प्रमुख गुण म्हणजे ते व्यक्तीमत्त्वाच्या हक्कांवर भर देतात. अर्थात, यालाही काही मर्यादा आहेत.

## ब) व्यावहारिक दृष्टिकोन किंवा उपयुक्ततावादी दृष्टिकोन (Progmatic or Utilitarian Approach)

मानवी हक्काच्या स्वरूपाकडे पाहण्याचा दुसरा महत्त्वाचा दृष्टिकोन म्हणजे व्यावहारिक दृष्टिकोन होय. प्रत्येक हक्क जो अदेय अथवा अन्य स्वरूपाचा आहे असा समज झाला असेल तर तो कायदेशीररित्या आणि परिणामकता काही प्रक्रियांच्या किंवा संस्थांच्यामार्फत तपासून पाहणे गरजेचे आहे. इथे भारतीय संदर्भ देवून बोलायचे झाल्यास भारताच्या राज्यघटनेत विभाग ३ मध्ये मुलभूत हक्कांचा समावेश करण्यात आला आहे. मात्र मुलभूत हक्काची व्याख्या कोठेही दिलेली नाही. परंतु मुलभूत हक्कांचे काळजीपूर्वक परिक्षण करता हे मानवी हक्क राज्याच्या अधिकारावर किंवा सत्तेवर मर्यादा घालतात आणि राज्यालाही सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या तत्त्वांना चिकटून रहावे लागते.

या दृष्टिकोनातून विचार करता मानवी हक्क व मुलभूत स्वातंत्र्य यांचा संदर्भ संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदीशी जोडावा लागतो.

संयुक्त राष्ट्रसंघाने मानवी हक्कांची यादी जाहीर केली ती तीन वर्गात विभागता येते.

**(अ) जागतिक पातळी :–**

जागतिक पातळीचा विचार करता यात मानवी हक्क सार्वभौमिक जाहिरनामा, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय लेखी करार, नागरी व राजकीय हक्काबाबत लेखी करार वंशभेद

निर्मूलनाचा करार, मानवी क्रूर वागणूकीविरोधी करार, स्त्री सरंक्षण, बालकांचे हक्क अशा अनेक करारांचा व जाहिरनाम्याचा आंतरभाव यामध्ये होतो.

**(ब) प्रादेशिक पातळी :–**

यामध्ये मानवी हक्क व मुलभूत स्वातंत्र्य यासंबंधी युरेजियन राष्ट्रांची परिषद, युरोपियन सामाजिक सनद, माणसाचे हक्क व कर्तव्ये याबाबतचा अमेरिकेचा जाहिरनामा मानवी हक्काची अमेरिकेतील परिषद, आफ्रिकन सनद इत्यादीचा समावेश होतो.

**(क) अन्य दुय्यम करार :–**

यामध्ये छोटे-छोटे करार येतात. जे मानवी कराराची हाताळणी करतात. उदा. निर्वासितांच्या दर्जासंबंधीचा ठराव किंवा राज्यविरहित म्हणजे कोणत्याही देशाचा नागरिक नसलेल्या व्यक्ती वगैरे यामध्ये आश्रित व्यक्तीच्या मानवी हक्काची नोंद ही मानवी हक्काच्या सार्वभौमिक जाहिरनाम्याच्या कलम १४ मध्ये, तर अमेरिकन मानवी हक्क कराराच्या कलम २२ मध्ये व आफ्रिकेत कलम १२ मध्ये निर्देशित केली होती.

मानवी हक्काच्या संदर्भात विविध प्रकारचे मतभेद होते. परंतु सध्या मात्र मानवी हक्क व मुलभूत स्वातंत्र्य यांचा अर्थ हा संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्क जाहिरनाम्यात दिलेल्या मानवी हक्कांच्या यादीसंदर्भात लावताना तिथे सार्वभौमिक जाहिरनाम्याचा विचार करणे गरजेचे आहे.

**❐ मानवी हक्काबाबत अन्य दृष्टिकोन किंवा सिद्धांत :–**

जेरोमि जे शेस्टॅक यांनी मानवी हक्कांच्या तत्त्वज्ञानशास्त्रीय पायावर सविस्तर चर्चा करताना मानवी हक्क सिद्धांताचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करण्याचा प्रयत्न केला होता.

**अ) तत्त्वज्ञानशास्त्रीय दृष्टिकोन किंवा सैध्दांतिक दृष्टिकोन**

**१. धार्मिक दृष्टिकोन :–**

धार्मिक दृष्टीने विचार करता मनुष्य हा पवित्र प्राणी मानला आहे. जर परमेश्वर जगातील सर्व प्राणीमात्रांचा सार्वभौमिक पिता म्हणून स्विकारला गेला असेल तर मग त्यातून सामान्य मानवतेचा जन्म होतो, जी मानवता काही हक्कांचे सार्वभौमिकत्व प्रवाहित करते. हक्कांचा उदय हा दैवी असल्यामुळे ते अदेय असतात. ही संकल्पना केवळ ज्यू-ख्रिस्ती धर्माचीच परंपरा नसून ती ईस्लाम, हिंदू धर्माचीही परंपरा आहे. या सर्वांनी मानवी हक्कांना दैवी आधार दिला आहे. अर्थात् मानवी हक्कांच्या बाबतीत धार्मिक सिद्धांत आशादायी असले तरी ते मोठ्या प्रमाणात अविकसित आहेत. मूलभूत समानतेचे तत्त्वज्ञान व न्यायाचे तत्त्वज्ञान व्यवहारात आणण्यात हे धर्म अपयशीच ठरले आहेत.

## २. नैसर्गिक दृष्टिकोन :–

हक्काचा नैसर्गिक सिद्धांत याबाबतचे स्पष्टीकरण या आधीच्या स्पष्टीकरणात सविस्तर आहे, त्याचाच इथे विचार केला जावा.

## ३. प्रत्यक्षवादी दृष्टिकोन :–

प्रत्यक्षवादी सिध्दांतकार हे मानवी हक्कांच्या उगमस्रोत कायद्याच्या कायदे तयार करण्याच्या व्यवस्थेत व त्यांना मान्यता मिळविण्याच्या प्रक्रियेत शोधतात. प्रत्यक्षवादी तत्त्वज्ञान कायद्याला अत्यंतिक महत्त्व देतात. मात्र ते समाजाच्या नैतिक तत्त्वज्ञानाकडे दुर्लक्ष करतात. यामुळे समाजाच्या अस्तित्त्वाला धोका येतो. म्हणजेच मानवी हक्काकडे वास्तवतेच्या दृष्टिकोनातून पाहणारा व मानवी हक्कांचा उगम स्रोत कायदा व अधिकार आहे असे मानणारा हा एक वेगळा सिद्धांत आहे.

## ४. मार्क्सवादी दृष्टिकोन :–

मार्क्सवाद हा मानवी व्यक्तीच्या स्वभावाशी संबंधित आहे. परंतु या ठिकाणी असा विचार केला आहे की, स्त्री–पुरुष स्वायत्त व्यक्ती नसून त्यांचे अधिकार हे दैवी आधारावर निर्धारित आहेत व ते स्वाभाविक स्वरूपाचे आहेत. हे जरी खरे असले तरी मानवी हक्कांचे मार्क्सवादी सिध्दांतकार हे स्त्री व पुरुष या स्वतंत्र जाती व वर्ग असल्याचे मानतात.

मार्क्स यांच्या विचारानुसार 'मानवी हक्कासंबंधीचा निसर्गाचा कायदा' हा दृष्टिकोन आदर्शवादी व ऐतिहासिक बनलेला होता. त्यांच्या मते, मानवी हक्कात नैसर्गिक आणि अदेय असे काही नसते. ज्या समाजात भांडवलशहांकडे उत्पादन साधनांच्या मालकीचा एकाधिकार असतो त्या समाजात मानवी हक्क म्हणजे एक प्रकारचे मध्यमवर्गीय मोहजाल असते.

मार्क्सवादाच्या मते, कायदा, न्याय, नैतिकता, लोकशाही, स्वातंत्र्य या आणि यासारख्या कल्पना ऐतिहासिक वर्ग म्हणून विचारात घेतल्यास त्यातील आशय मात्र भौतिक परिस्थिती आणि लोकांची सामाजिक वस्तुस्थिती याद्वारे निर्धारित केले जातात. मानवी जीवनाच्या परिस्थिती बदलल्या की, संकल्पनांचा आशय किंवा कल्पना यातही बदल होतो.

मार्क्सवादाचा थोडक्यात सारांश असा की, जरी मानवी हक्कांना मान्यता दिली असली तरी व्यवहारात मात्र साम्यवादी राष्ट्रांनी त्यांच्या राष्ट्रात अनेक मानवी हक्क नाकारले होते व आजही ते नाकारले जात आहेत, हेही लक्षात घेतले पाहिजे.

## ५. समाजशास्त्रीय दृष्टिकोन :–

२०व्या शतकात अनेक शास्त्रज्ञांचे मानवी हक्काच्या अध्ययनाकडे लक्ष वेधले गेले. नैसर्गिक शास्त्राप्रमाणेच सामाजिक शास्त्रातही लोक, त्यांची संस्कृती, त्यांच्यातील संघर्ष, त्यांचे हितसंबंध

याबाबतच्या अध्ययनाला आणि आकलनाच्या प्रक्रियेला गतिमानता प्राप्त झाली. सामाजिक शास्त्रज्ञांनी कायदेशास्त्राच्या संदर्भातून मानवी हक्काची संकल्पना मांडण्याचा प्रयत्न केला.

समाजशास्त्रीय न्यायतत्त्वशास्त्र हे पूर्वाश्रमीचे सिध्दांत आणि न्यायतत्त्वशास्त्राचे विश्लेषणात्मक प्रकारचे सिद्धांत या दोन्हीपासून दूर जात आहेत. त्यांच्या मानवी हक्कांशी संबंध जोडायचे म्हटले तर काही वेळा हा दृष्टिकोन संस्थात्मक विकासाच्या प्रश्नांकडे प्रत्यक्ष लक्ष देतो किंवा काहीवेळा सरकारी धोरणांच्या विशेष समस्यांवर प्रकाशझोत टाकतो.

मानवी हक्कांचा विचार करता समाज आणि कायदा या दोन घटकांच्या वर्तनात्मक पैलूंकडे समाजशास्त्रीय सिद्धांत आपले लक्ष वेधतो. मानवी हक्कांच्या संदर्भात विचार करता हा दृष्टिकोन मानवी हक्क व्यवस्थेचे प्रायोजिक अंगभूत घटक, सामाजिक प्रक्रियेच्या संदर्भात ओळखतो.

समाजशास्त्रीय संप्रदायाचे प्राथमिक स्वरूपाचे योगदान हे की, त्यात प्रचलित नैतिक भावना आणि प्रचलित काळी व स्थळी अस्तित्त्वात असलेली सामाजिक-आर्थिक परिस्थिती यातील हितसंबंधात संतुलन प्राप्त करण्यावर भर दिला आहे. या दृष्टिकोनाची बांधणी विल्यम जेम्स यांच्या पुढील व्यावहारिक तत्त्वावर करण्यात आली आहे. 'वस्तूंचा आवश्यक गुणधर्म हा केवळ मागणीचे समाधान वा पूर्तता करण्यात आहे.' हा दृष्टिकोन २०व्या शतकातील समाजातील विविध गरजांच्या वाढत्या मागणीच्या विकासाशी संबंधित आहे. या मागण्या प्राधान्याने बेरोजगारांना, अपंगाना, विशेषाधिकारांपासून वंचित असलेल्यांना, अल्पसंख्यांकांना व समाजातील अन्य मूलभूत तत्त्वांना सहाय्य करण्यासाठी केल्या आहेत.

तत्त्वज्ञानशास्त्रीय दृष्टिकोनाचे वरीलप्रमाणे मानवी हक्कबाबतचे विविध दृष्टिकोन होते. पण त्याचबरोबर मानवी हक्कांच्या काही आधुनिक सिध्दांतही आहेत, त्याचाही अभ्यास आपल्याला करावा लागेल.

**क) आधुनिक दृष्टिकोन :-**

जेरोमि जे शेस्टॅक यांनी आधुनिक मानवी हक्कांवर चर्चा केली आहे. हे हक्क पुढीलप्रमाणे :-

**१. नैसर्गिक हक्कांवर आधारित हक्क :-**

दुसऱ्या महायुध्दानंतर नैसर्गिक हक्क सिद्धांताचे पुनरुज्जीवन करण्यात आले. आधुनिक हक्कांचे समर्थन करणारे विद्वान पूर्वीच्या सिध्दांतकाराप्रमाणे आधुनिक/अध्यात्मिक पोषाख न घालता माणसाच्या हक्कांचे विश्लेषण करताना हे हक्क 'गुणवत्ताधारक नैसर्गिक हक्क' असल्याचे प्रतिपादन करतात व ते मूल्यांची ओळख शाश्वत आणि सार्वभौमिक पैलूंच्या आधाराने करून देतात.

आधुनिक हक्काचे समर्थक या गोष्टीला सहमती दर्शवितात की, फक्त प्रत्यक्षवादी कायदेशीर व्यवस्था ही मूल्यांच्या कार्याद्वारे परिणामकारक कायदेशीर व्यवस्था म्हणून कार्य करू शकते. नैसर्गिक हक्कांचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलून ते 'काय पाहिजे' च्या ऐवजी काय आहे असे करण्याचा प्रयत्न यात होता.

नैसर्गिक हक्कांच्या संदर्भात सामान्य विषयाचा जो उदय झाला तो अवाढव्य अशा कुटुंबाच्या सिध्दांताद्वारे ज्यामध्ये निरंकुश हक्क मध्यवर्ती गृहिततत्त्व हे कामापुरते असते असे मानून व्यक्तीच्या मूल्य स्वातंत्र्याला किंवा स्वायत्ततेला हक्कांच्या सार्वभौमिक व्यवस्थेत मान्यता मिळवून देणे महत्त्वाचे मानले गेले होते.

**२. उपयोगिता मूल्यावर आधारित हक्क :–**

मूल्य हा तत्त्वज्ञानाचा एक सार्वसामान्य भाग आहे, असे काही तज्ज्ञांचे मत आहे. प्रतिष्ठा, स्वातंत्र्य, समानता, न्याय, नीतीशास्त्र आणि नैतिक तत्त्वे इत्यादी मूल्ये समाजातील मानवी संबंधाना आकार देण्याचे कार्य करतात. मानवी मूल्यांची भूमिका ही मानवी हक्कांची निर्मिती, संरक्षण व संवर्धन यासाठी महत्त्वाची आहेत.

सर्वसामान्यपणे आपण मूल्यांचा विचार हा दैनंदिन जीवनात जी मूल्ये अंगीकारतो त्याविषयी करतो. व्यक्ती–व्यक्तीनुसार मूल्यांचे स्वरूप वेगळे असते व ते अनुभव व परिस्थितीनुसारही वेगळे असते. हे काही प्रमाणात बरोबर असेल तरी मूलभूत मूल्ये सर्वांसाठी समान असतात. स्वातंत्र्य, संरक्षण, सवलत तसेच जीवसंरक्षण, दयाळूपणा, दु:ख, आनंद इत्यादी भावनांवर आधारित मूल्ये समान असतात व समान मूल्यावरच मानवी हक्काची उभारणी होते. काही तज्ज्ञांच्या मते, मानवी हक्कांचे तत्त्वज्ञानशास्त्र हे मूल्यासारखेच समान आहे. म्हणून मूल्य हे मानवी हक्कांचे मूलभूत अधिकार आहेत.

मानवी हक्क आणि मूल्य यांची सांगड घालताना समाजशास्त्र उपयोगितेला महत्त्व देतात. त्यांच्या मते, समानता, सुखासीनता, स्वातंत्र्य, प्रतिष्ठा, मानसन्मान आणि अन्य मूल्ये मानवी वर्तनाशी संबंधित आहेत आणि ही मूल्ये समाजाच्या दृष्टीने उपयोगी आहेत व त्या मूल्यांचेच रूपांतर मानवी हक्कात होते. मानवी हक्कांचा मूलाधार हा मूल्यांची उपयोगिता असला पाहिजे असे उपयोगितावादी विचारवंतांचे मत आहे.

**३. न्यायावर आधारित हक्क :–**

'सामाजिक संस्थांचा सद्‌गुण म्हणजे न्याय' अशी न्यायाची व्याख्या जॉन रावल्स यांनी केली आहे. त्यांच्या मते, 'मानवी हक्क' म्हणजे न्यायाचा शेवट होय. म्हणून मानवी हक्कांचे आकलन करण्यात न्यायाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. आधुनिक समाजात मानवी हक्कांचा कोणताही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सिध्दांत रावल्स यांच्या सिध्दांताचा संदर्भ घेऊनच केला जातो.

रावल्स यांनी न्यायाची दोन तत्त्वे सांगितली आहेत ती म्हणजे – (१) रावल्स यांचे न्यायाचे पहिले तत्त्व हे की, प्रत्येक व्यक्तीला समान हक्क मिळाले पाहिजेत. (२) रावल्स यांचे न्यायाचे दुसरे तत्त्व हे वितरणात्मक न्यायाशी संबंधित आहे.

रायल्स यांचे पहिले तत्त्व मूलभूत स्वातंत्र्यावर प्रकाशझोत टाकते, तर दुसरे तत्त्व न्यायाच्या वितरणात्मक समस्यांवर प्रकाशझोत टाकते.

कायदेतज्ज्ञांच्या मते, न्याय म्हणजे साध्या शब्दात सदाचरणी, प्रामाणिक, योग्य आणि समानतेच्या पार्श्वभूमीवर वापरण्यात येणारी संज्ञा होय. न्यायाच्या संकल्पनेची जर मोजणी करावयाची असेल तर अनेक

साधनांचा वापर करावा लागतो. जर तुम्हाला परिपूर्ण न्याय साध्य करावयाचा असेल तर तुम्हाला समानता, नैतिकता, नीतिशास्त्र इत्यादी संकल्पनांवर भर द्यावा लागतो. मानवी हक्कांचा हेतू हा प्रत्येक राज्याने आपल्या नागरिकांना स्थिर परिस्थिती प्राप्त करून दिली पाहिजे असा असतो. शेवटी न्यायाच्या साहाय्यानेच अनेक मानवी हक्क साध्य करणे शक्य असल्याने मानवी हक्कांच्या अभ्यासात न्यायाचे अध्ययन तितकेच महत्त्वाचे आहे.

**४. प्रतिष्ठेवर आधारित हक्क :–**

अनेक मानवी हक्क सिध्दांतकारांनी बहुव्यापक मानवी हक्क व्यवस्था ही मूल्यधारणेच्या स्थितीज्ञानावर आधारित दृष्टिकोनावर स्थापित करून, मानवी प्रतिष्ठेला संरक्षण प्राप्त करून दिले. परस्परावलंबी मूल्ये ही मानवी प्रतिष्ठेच्या नियमाअंतर्गत येतात. मानवी प्रतिष्ठेत मान, सत्ता, प्रबोधन, कल्याण, आरोग्य, कौशल्य, प्रेम आणि नीतिमत्ता यांचा अंतर्भाव होतो.

मॅक्ड्युगल यांच्या मतानुसार मानवी हक्कांच्या मूल्यांचे अंतिम उद्दिष्ट हे आहे की, जागतिक समुदायात मूल्यांचे लोकशाहीवर आधारित वितरण करण्यास उत्तेजन देणे आणि उपलब्ध संसाधनांचा जास्तीत जास्त वापर करणे. तसेच सामाजिक धोरणांची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सामाजिक प्रतिष्ठेला संरक्षण देणे. समाजातील मानवी प्रतिष्ठा व तद्संबंधीची मूल्ये जतन करणे हे मानवी हक्क संरक्षण यंत्रणेचे महत्त्वाचे कार्य आहे.

मानवी संबंध व मानवी हक्क यांचे नियमन करण्यात प्रतिष्ठा अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. ज्या मानवी हक्कांचे नियमन प्रतिष्ठा करते त्यात प्रामुख्याने स्वातंत्र्य, समानता, स्वायत्तता इत्यादी मूलभूत हक्कांचा समावेश होतो. मानवी हक्कांच्या सार्वभौमिक जाहिरनाम्यात हे नमूद केले आहे की, 'कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान आहेत.' मूल्य प्रतिष्ठेशी निगडीत आहे. थोडक्यात प्रतिष्ठा एक मूल्य असून प्रतिष्ठेचे रक्षण म्हणजे एक प्रकारे मानवी हक्कांचे रक्षण होय व त्यासाठी राज्य व व्यक्ती यांचे प्रयत्न महत्त्वाचे आहेत.

**५. समानतेवर आधारित हक्क :–**

रोनाल्ड द्वारकीन ह्यांच्या सिध्दांताची सुरवात राजकीय नैतिकतेच्या गृहीततत्त्वापासून करतात. राजकीय नैतिकता या गृहीततत्त्व म्हणजे सरकारने त्यांच्या सर्व नागरिकांना समानतेने व सन्मानाने वागवावे.

द्वारकीन यांचा असा विश्वास होता की, स्वातंत्र्य ही संज्ञा अत्यंत मोघम स्वरूपाची आहे. परंतु काही विशिष्ट स्वातंत्र्यांना विशिष्ट स्वरूपाचे संरक्षण व हस्तक्षेपापासून मुक्ती मिळाली पाहिजे. या प्रकारच्या स्वातंत्र्यात भाषण स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य आणि वैयक्तिक व लैंगिक संबंध प्रस्थापित करण्याच्या स्वातंत्र्यांना विशेष संरक्षण मिळणे गरजेचे आहे. ही सर्व स्वातंत्र्ये समानतेचे द्योतक आहेत. द्वारकीन यांचा समानतेचा सिध्दांत हा मौल्यवान आहे. कारण या सिध्दांताने संघर्षात्मकतेपेक्षा तर्कसंगततेवर भर दिला होता. कायदेतज्ज्ञांच्या दृष्टिकोनातून मानवी हक्काचा अंगभूत घटक म्हणजे समानता होय.

## १.४ सारांश

मानवी हक्क हे मूलभूत हक्कांप्रमाणे अत्यंत महत्त्वाचे, पवित्र, सनातन व अलौकिक स्वरूपाचे असतात. मानवी हक्क हे सर्व नागरिकांसाठी व्यक्ती म्हणून स्वाभाविक स्वरूपाचे असतात. प्रस्तुत घटकामध्ये आपण मानवी हक्काची संकल्पना, स्वरूप, मानवी हक्कांचा इतिहास व मानवी हक्काबाबतच्या दृष्टिकोनाचे सविस्तर विवेचन केले.

प्राचीन काळी मानवी हक्कांच्या संकल्पनेची जाणीव जनतेत नव्हती व कायदेशीर दृष्टीने, विचार करता मानवाला तसे कोणतेच हक्क सरकारतर्फे दिले गेले नव्हते. मानवी हक्कांची तीव्रतेने जाणीव दुसऱ्या महायुध्दानंतर झाली. जर्मनीतील नझिने ज्यूंची केलेली निर्घृण हत्या. अमेरिकेने हिरोशिमा व नागासाकीवर टाकलेले अणुबाँब यात अनेक निरपराध व्यक्तींचा बळी गेला. या घटनेनंतर संपूर्ण जगातील नेते अंतर्भुख झाले व परिणामत: १९४८ साली 'मानवी हक्काच्या सार्वभौमिक जाहीरनामा प्रसिद्ध झाला व मानवी हक्कांच्या रक्षणाच्यादृष्टीने पहिले पाऊल टाकले.

मानवी हक्कांचे ऐतिहासिक समालोचन पाहता मानवी हक्कांचे विशेष कायदे व नियम, मानवी हक्कांचा उदय, विकास तसेच डॉ. उमेश चन्द्र यांनी प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक कालखंडातील मानवी हक्काच्या परिस्थितीवर चर्चा केली. तसेच मानवी हक्काच्या अध्ययनाच्या दोन दृष्टिकोनावर सविस्तर चर्चा केली.

सर्वसाधारणपणे या घटकात आपण मानवी हक्कांचा अर्थ, ऐतिहासिक विकास व त्याबाबतच्या सैध्दांतिक दृष्टिकोनावर स्पष्टीकरण दिलेले आहे.

**✻ स्वयं-अध्ययन प्रश्न ✻**

❒ **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. प्रा. हेरॉल्ड लास्की यांच्या मते हक्क म्हणजे काय?

२. १९९३ सालच्या मानवी हक्क संरक्षण कायद्यानुसार मानवी हक्क म्हणजे काय?

३. ग्रीक नगरराज्यातील नागरिकांना कोणते तीन मुलभूत हक्क प्रदान करण्यात आले होते?

४. सॉक्रेटिस व प्लेटोच्या ग्रीक परंपरेनुसार नैसर्गिक कायदा म्हणजे काय?

५. मानवी हक्क समजण्यासाठी हक्कांच्या कोणत्या तीन पातळ्यांचा विचार करणे आवश्यक आहे?

६. सामाजिक करार सिध्दांताचे प्रणेते कोण होते?

७. नैसर्गिक हक्काची तीन वैशिष्ट्ये कोणती?

८. रावल्स यांनी न्यायावर आधारित हक्कांबाबत कोणती दोन तत्वे सांगितली आहेत?

९. मानवी हक्काबाबतचे प्रमुख दोन दृष्टिकोण कोणते?

## १.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. प्रा. हेरॉल्ड लास्की यांच्या मते, ''हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थिती होय की, ज्याशिवाय व्यक्तीला स्वत:चा सर्वांगीण विकास करून घेणे शक्य होत नाही.''

२. १९९३ सालचा मानवी हक्क संरक्षण कायद्यानुसार- ''मानवी हक्क म्हणजे असे हक्क की जे मानवी जीवन, मानवी स्वातंत्र्य, मानवी समानता व मानवी प्रतिष्ठा यांच्याशी संबंधित असतात. भारताच्या राज्यघटनेने त्यांच्या अंमलबजावणीची नुसतीच खात्री दिली नाही तर त्यांचा समावेश आंतरराष्ट्रीय करारानुसार, भारतीय राज्यघटनेत करून त्यांची अंमलबजावणी भारतातील न्यायालयाकडे सोपविली आहे.''

३. ग्रीक नगरराज्यातील नागरिकांना तीन मुलभूत हक्क प्रदान केले होते ते असे- (१) भाषण स्वातंत्र्याचा हक्क (इसोगोरिया), (२) कायद्यासमोर सर्व समान असल्याचा हक्क (इसोनोमिया), (३) सर्वांना समान आदर दर्शविण्याचा हक्क (इसोटोमिया).

४. सॉक्रेटिस व प्लेटोच्या ग्रीक परंपरेनुसार ''विश्वाचे स्वाभाविक आदेश ज्या कायद्यात प्रतिबिंबीत होतात अशा कायद्याला नैसर्गिक कायदा असे म्हणतात.''

५. मानवी हक्क समजण्यासाठी मानवी मूल्य, राजकारण आणि कायदा या हक्कांच्या तीन पातळ्यांचा विचार करणे आवश्यक आहे.

६. थॉमस हॉब्ज, जॉन लॉक व जॅक्स रुसो हे राजकीय तत्त्वज्ञ सामाजिक करार सिध्दांताचे प्रणेते होते.

७. नैसर्गिक हक्कांची तीन वैशिष्ट्ये- (१) मानवी हक्कांना मान्यता मिळावी लागते. (२) मानवी हक्क अदेय नैसर्गिक व स्वाभाविक असल्याचे मानतात. (३) सर्व मानवी व्यक्ती समाज असतात असे मूलत:च मानले जाते.

८. रावल्स यांनी न्यायाची दोन तत्त्वे सांगितली ती अशी- (१) प्रत्येक व्यक्तीला समान हक्क मिळाले पाहिजेत. (२) वितरणात्मक न्यायाशी संबंधित.

९. मानवी हक्काबाबतचे प्रमुख दोन दृष्टिकोण- (१) तत्त्वज्ञानशास्त्रीय किंवा सैद्धांतिक दृष्टिकोण (२) व्यावहारिक किंवा उपयुक्ततावादी दृष्टिकोण.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

❐ **खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. मानवी हक्कांचा अर्थ व स्वरूप सविस्तर स्पष्ट करा.

२. मानवी हक्कांचा अर्थ सांगून मानवी हक्कांचा ऐतिहासिक आढावा विशद करा.

३. मानवी हक्काबाबतचा तत्त्वज्ञानशास्त्रीय दृष्टिकोण स्पष्ट करा.

४. मानवी हक्कांबाबतचा व्यावहारिक दृष्टिकोण विशद करा.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **कोतापल्ले लक्ष्मण**, ''भारतातील सामाजिक कल्याण, प्रशासन आणि समाज कार्य'', विद्या प्रकाशन, औरंगाबाद.

२. **य. च. म. मु. नाशिक**, ''मानवी हक्कातील मुलभूत संकल्पना''.

३. **प्रा. पी. के. कुलकर्णी**, ''मानवी हक्क आणि सामाजिक न्याय'', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०१३.


❑❑❑

# घटक – २
# संयुक्त राष्ट्र संघटना आणि मानवी हक्क
## (United Nations Organizations and Human Rights)

**घटक संरचना**

२.१ उद्दिष्ट्ये

२.२ प्रस्तावना

२.३ विषय विवेचन

 २.३.१ मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा १९४८

 २.३.२ आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६

 २.३.३ नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६

२.४ सारांश

२.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी प्रश्न

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

**२.१ उद्दिष्ट्ये :–**

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास,

- मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा (१९४८) समजून घेता येईल.
- आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा (१९६६) स्पष्ट होईल.
- नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा (१९६६) समजून घेता येईल.

## २.२ प्रस्तावना

प्राचीन काळापासून 'मानवी हक्क' या संकल्पनेचा विचार झालेला आढळतो. भारतात ऋग्वेदातील काही ठिकाणी यासंदर्भाचे लिखाण दिसून येते. तसेच संत वाङ्मयातही विषमता संपवून समता प्रस्थापित करण्याचा विचारही दिसून येतो. परंतु १८७९ मध्ये सापडलेली पार्शियन सम्राट सायरसच्या ख्रिस्तपूर्व ६व्या शतकातील 'सायरस वृत्तचित्ती'त मानवी हक्काबाबतची महत्त्वपूर्ण तत्त्वे अंतर्भूत केलेली आहेत. हिच 'सायरस वृत्तचित्ती', 'मानवी हक्कांचा पहिला दस्तऐवज' म्हणून मानला जातो. भारतात ख्रिस्तपूर्व ३ऱ्या

शतकात सम्राट अशोक यांनी 'नागरी हक्कांची तत्त्वे प्रस्थापित केली. तथापि, मानवी हक्कांच्या आधुनिक विचारसरणीची सुरवात स्टॉईक्स या ग्रीक तत्त्ववेत्याच्या 'नैसर्गिक कायद्याच्या सिध्दांता'पासून झाल्याचे मानले जाते. परंतु ग्रीक परंपरेचा हक्कांच्या संदर्भात विचार करता तेथे हक्कांची संकल्पना वर्गानुसार होती. कारण ग्रीकांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क, कायद्यासमोर समानतेचा हक्क व समतेचे हक्क यांना मान्यता दिली असली तरी स्त्रिया व गुलाम यांना मात्र ते नाकारण्यात आले होते. अशीच विसंगती जगातील अनेक परंपरांच्यामध्ये 'हक्कांच्या'संदर्भात आढळते. त्यामुळेच जगातील विविध देशांनी त्यांच्यावर प्रभाव असणाऱ्या परंपरा, विचारधारेनुसार आपल्या देशासाठी मानवी हक्कांची निश्चिती केली होती. त्यामुळे विविध देशातील 'मानवी हक्का'संदर्भात एकवाक्यता किंवा समानता नव्हती. ही एकवाक्यता आणण्याची सुरवात संयुक्त राष्ट्रांकडून झाली. म्हणूनच मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणात संयुक्त राष्ट्रांचे योगदान खूपच असाधारण आहे. त्या योगदानाची माहिति घेणे आवश्यक आहे.

## २.३ विषय विवेचन

'मानवी हक्क' या संकल्पनेचा विचार विविध देशात प्राचीन काळापासून केलेला आढळतो. तसेच या देशांनी आपल्या नागरिकांना काही हक्क दिल्याचेही आढळते. पण यामध्ये सर्व देशात, राज्यात समानता नव्हती. एखाद्या देशाने एखादा विशिष्ट हक्क 'मानवी हक्क' म्हणून दिलेला आहे व तोच हक्क दुसऱ्या एखाद्या देशाने नाकारलेला असेल असे चित्र होते. कारण जगातील या विविध देशांनी त्यांच्यावर ज्या परंपरांचा, विचारधारेचा प्रभाव आहे, त्यानुसार आपल्या देशासाठी, राज्यासाठी मानवी हक्कांची निश्चिती केली होती. साहजिकच त्यामुळे देशा-देशातील, राज्या-राज्यातील 'मानवी हक्क' संदर्भात एकवाक्यता नव्हती.

तथापि, संपूर्ण जगच दोन जागतिक महायुद्धांच्या भयावह व गंभीर परिणामांना सामोरे गेले. मानवी हक्कांच्या उल्लंघनाने परिसिमा गाठली होती. जागतिक शांतता व सुरक्षितता तसेच व्यक्तीस्वातंत्र्य व हक्कांची जागतिक स्तरावर पुर्नस्थापना करण्याची, यामध्ये एकवाक्यता आणण्याची गरज निर्माण झाली. याच उद्देशाने १९४५ ला स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्रांनी मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या प्रक्रियेला सुरवात केली व तिचा विकास केला. त्याकरिता आयोग, विधेयके, विविध संस्था स्थापन केल्या. त्या माध्यमातून मानवी हक्कांची सर्वसमावेशक यादी तयार करणे, जाहिरनामा तयार करणे, आंतरराष्ट्रीय करारनामे तयार करणे व त्यांच्या अंमलबजावणीची यंत्रणा कार्यान्वित करणे हे कार्य मानवी हक्कांच्या संदर्भात संयुक्त राष्ट्रांनी केले. या कार्याची ओळख व अभ्यास आपण या घटकात करणार आहोत.

### ❒ मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीयीकरण व संयुक्त राष्ट्रे

जागतिक शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी व त्याकरिता व्यक्तिस्वातंत्र्य व हक्कांची पुर्नस्थापना करण्याच्या विचारातून २४ आक्टोबर, १९४५ ला 'संयुक्त राष्ट्रांची' स्थापना झाली.

संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत जे उद्देश अथवा भूमिका स्पष्ट केल्या गेल्या, त्यातील एक उद्देश म्हणजे, 'मूलभूत मानवी हक्क, प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा व महत्त्व यांच्या संरक्षण, संवर्धनासाठी आणि पुरुष व

स्त्रिया तसेच लहान व मोठी राष्ट्रे यांच्या समान अधिकाराप्रती आस्था राखणे व ते बळकट करणे' हा होय. इथपासून आजपर्यंत मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या प्रक्रियेत संयुक्त राष्ट्र सातत्याने महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. मानवी हक्कांची यादी व नियमावलीबरोबरच त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक यंत्रणाही निर्माण करण्यात आली. संयुक्त राष्ट्रांनी मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणाची प्रक्रिया पुढील माध्यमातून गतिमान केल्याचे स्पष्ट होते.

१. महासभा/आमसभा

२. आर्थिक व सामाजिक परिषद.

३. संयुक्त राष्ट्र मानवी हक्क आयोग.

४. सुरक्षा परिषद.

५. मानवी हक्काने आंतरराष्ट्रीय विधेयक.

६. मानवी हक्कांसाठीचा उच्चायुक्त.

७. आंतरराष्ट्रीय न्यायालय.

८. मानव अधिकार सभा.

❀ **संयुक्त राष्ट्र मानवी हक्क आयोग :-**

सन १९४६ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी स्थापन केलेला 'मानवी हक्क आयोग' हा मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा टप्पा ठरला. या आयोगाची निश्चित केलेली उद्दिष्टे व कार्ये यावरून हे अधिक स्पष्ट होईल. तथापि, या आयोगाचे मुख्यालय 'जिनिव्हा' येथे होते.

✪ **उद्दिष्टे :-**

१. संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य राष्ट्रात मानवी हक्क संरक्षणाच्या स्थितीचा आढावा घेणे.

२. मानव हक्क बाबत जाणीव जागृती व संरक्षण.

३. अल्पसंख्यांक, महिला, बालक व युध्दकैदि यांच्या हक्कासंदर्भात जाणीव-जागृती करणे.

✪ **कार्ये :-**

१. मानवी हक्कांची यादी तयार करणे.

२. नागरी व राजकीय हक्क या करारनाम्याचा मसुदा तयार करणे.

३. आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क या करारनाम्याचा मसुदा तयार करणे.

४. अल्पसंख्याकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी विशेष तरतुदी करणे.

५. वंश, धर्म, भाषा, लिंग इ. आधारावरील भेदभाव नष्ट करण्यासाठी प्रयत्न करणे.

❀ **मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीय विधेयक :–**

मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून मानवी हक्कांच्या प्रसार व संरक्षणासाठी संयुक्त राष्ट्रांकडून जे अनेकविध ठराव संमत करण्यात आले. त्यातील महत्त्वाच्या पाच ठरावांना एकत्रित करून, त्यांच्या संचास 'मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीय विधेयक' असे म्हटले जाते. ते पाच ठराव म्हणजे–

१. मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा १९४८.

२. आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा, १९६६.

३. नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा, १९६६.

४. नागरी व राजकीय हक्काविषयीचा ऐच्छिक ठराव.

५. आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अधिकारांविषयीचा ऐच्छिक ठराव.

यातील प्रमुख ठरावांचे सविस्तर स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे :–

## २.३.१ मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा १९४८ (Universal Declaration of Human Rights 1948)

मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या प्रक्रियेतील पहिले महत्त्वाचे पाऊल म्हणून 'संयुक्त राष्ट्रांची सनद' ओळखली जाते. कारण या सनदेत जो उद्देश किंवा भूमिका निश्चित करण्यात आले, त्यापैकी एक उद्देश म्हणजे, 'मूलभूत मानवी हक्क, प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा व महत्त्व यांच्या संरक्षण, संवर्धनासाठी आणि पुरुष व स्त्रिया तसेच लहान व मोठी राष्ट्रे यांच्या समान अधिकाराप्रती आस्था राखणे व ते बळकट करणे' हा होता. तथापि, या सनदेत मानवी हक्काबाबतच्या सुस्पष्टतेचा, नेमकेपणाचा अभाव होता. मानवी हक्कांची सर्वसमावेशक यादी व त्यांच्या संरक्षणाकरिताच्या आवश्यक तरतूदी निश्चित व स्पष्ट होत नव्हत्या. म्हणूनच संयुक्त राष्ट्रांच्या अनेक सदस्य राष्ट्रांनी, मानवी हककांची सर्वसमावेशक यादी तयार करावी व दुसरे म्हणजे या हक्कांच्या संरक्षणासाठीच्या तरतूदी निश्चित व स्पष्ट कराव्यात अशा दोन मागण्या संयुक्त राष्ट्रांकडे केल्या. या मागण्यांचा विचार करून संयुक्त राष्ट्राने आपल्या 'मानवी हक्क आयोगा'कडे मानवी हक्कांची सर्वसमावेशक यादी तयार करण्याचे कार्य सोपवले. आयोगाने त्याकरिता, 'मानवी हक्कांचा जाहिरनामा' तयार करून तो आमसभेपुढे ठेवला. १० डिसेंबर, १९४८ ला आमसभेने हा जाहिरनामा स्विकारून, 'मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा १९४८' म्हणून घोषित केला.

❀ **जाहिरनाम्याचे उद्देश व भूमिका :–**

१. मानवी हक्कांची सर्वसमावेशक यादी तयार करून त्यास आंतरराष्ट्रीय समुदायाची राजकीय मान्यता प्राप्त करून घेणे.

२. जगातील प्रत्येक व्यक्तीला त्यांची जन्मजात प्रतिष्ठा व त्यांच्या समान, मूलभूत हक्कांना मान्यता देणे. याकरिता जगात स्वातंत्र्य, न्याय व शांतता यांच्या प्रस्थापनेकरिता प्रयत्न करणे.

३. प्रत्येक व्यक्तीला भाषण, श्रध्दा इत्यादी स्वातंत्र्याची प्राप्ती झाली पाहिजे व भिती, अभावग्रस्ततेपासून मुक्त असे जग साकार व्हावे ही लोकांची सर्वोच्च आकांक्षा पूर्ण करणे.

४. मानवी हक्कांना कायदेशीर संरक्षण प्राप्त करून देणे.

५. राष्ट्रा-राष्ट्रांत मित्रत्वाच्या नात्याचे संवर्धन करणे.

६. जास्तीतजास्त मुक्त वातावरणात सामाजिक प्रगती आणि चांगल्या दर्जाच्या जीवनमानाचे संवर्धन करणे.

७. संयुक्त राष्ट्रांच्या सहकार्याने मानवी हक्कांचा आणि मूलभूत स्वातंत्र्याचा सार्वत्रिक सन्मान व आचरण यांचे संवर्धन करणे.

**❀ मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा (१९४८) मधील मानवी हक्कांची यादी–**

संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्क आयोगाकडून तयार केलेला व संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने १० डिसेंबर १९४८ ला स्विकारलेल्या व घोषित केलेल्या 'मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा १९४८' यामध्ये एकूण ३० कलमे आहेत. यातून मानवी हक्काबाबत आश्वासन, राजकीय व नागरी हक्क व आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक हक्क स्पष्ट केले आहेत ते पुढीलप्रमाणे :-

- **कलम १ :** सर्व मानवी व्यक्ती या जन्मत: स्वतंत्र असून त्यांना समान अधिकार/हक्क व समान प्रतिष्ठा आहे.
- **कलम २ :** या जाहिरनाम्यातील सर्व हक्क व स्वातंत्र्य प्रत्येकास आहेत. वंश, लिंग, धर्म, वर्ण, भाषा, राजकीय अथवा इतर मतप्रणाली, राष्ट्रीय किंवा सामाजिक मूलस्थान, संपत्ती, जन्म किंवा इतर दर्जा इ.च्या आधारे कोणताही भेदभाव केला जाणार नाही.
- **कलम ३ :** प्रत्येक व्यक्तीस स्वातंत्र्याचा, जिवीताचा व सुरक्षित राहण्याचा हक्क आहे.
- **कलम ४ :** कोणत्याही व्यक्तीस गुलाम म्हणून ठेवता येणार नाही व गुलामगिरी तसेच गुलामांच्या व्यापारास प्रतिबंध केला पाहिजे.
- **कलम ५ :** कोणत्याही व्यक्तीस अमानुष, अपमानास्पद, क्रूर व कमीपणा आणणारी वागणूक कोणीही देता कामा नये व कोणाचा छळ करू नये.
- **कलम ६ :** प्रत्येक व्यक्तीस कायद्यासमोर 'माणूस' म्हणून मान्यता मिळवण्याचा हक्क आहे.
- **कलम ७ :** कायद्याच्या दृष्टिकोणातून सर्व व्यक्ती समान आहेत व प्रत्येकाला कायद्याचे समान संरक्षण मिळवण्याचा हक्क आहे.

✷ **कलम ८ :** मूलभूत हक्क जे घटनेने अथवा कायद्याने दिले आहेत. त्या हक्कांचा भंग झाल्यास, त्या विरोधात सक्षम राष्ट्रीय न्यायाधीकरणाद्वारे परिणामकारक उपाययोजना करवून घेण्याचा प्रत्येकास हक्क आहे.

✷ **कलम ९ :** कोणत्याही व्यक्तीस कोणीही मनमानी पध्दतीने हद्दपार, स्थानबध्द किंवा अटक करता कामा नये.

✷ **कलम १० :** कोणाही व्यक्तीस त्याचे हक्क, जबाबदाऱ्या व दंडनीय आरोप याबाबतच्या निर्णयासाठी स्वतंत्र व नि:पक्षपाती अधिकरणाद्वारे न्याय व जाहिर सुनावणीचा हक्क आहे.

✷ **कलम ११ :** न्यायालयीन चौकशीत आरोप सिध्द होण्यापूर्वी संबंधित आरोपीस निरपराध गृहित धरण्याचा हक्क तसेच एखाद्या व्यक्तीने केलेले कृत्य हे कृत्य केले त्यावेळेच्या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कायद्याने गुन्हा ठरत नसेल तर त्या व्यक्तीस दोषी धरता कामा नये तसेच गुन्हा घडला, त्यावेळी त्या गुन्ह्याबाबत जी शिक्षा असेल तीच्यापेक्षा जास्त कडक शिक्षा करता येणार नाही.

✷ **कलम १२ :** कोणाच्याही खाजगी जीवनात कोणालाही मनमानी पद्धतीने हस्तक्षेप करता येणार नाही. तसेच त्याच्या प्रतिष्ठेवर आघात करता कामा नये. यासाठी प्रत्येकास कायद्याने संरक्षण मिळवण्याचा हक्क आहे.

✷ **कलम १३ :** प्रत्येकाला संचार व वास्तव्य यांच्या स्वातंत्र्याचा हक्क आहे.

✷ **कलम १४ :** छळ होणाऱ्या कोणाही व्यक्तीस त्या छळापासून स्वत:ची मुक्तता करून घेण्याचा तसेच इतर देशात आश्रय मिळविण्याचा हक्क आहे.

✷ **कलम १५ :** प्रत्येकाला राष्ट्रीयत्व मिळवण्याचा हक्क आहे. तसेच कोणालाही कोणाचेही राष्ट्रीयत्व मनमानीपणे हिरावून घेता येणार नाही व राष्ट्रीयत्व बदलण्याचा हक्क नाकारता येणार नाही.

✷ **कलम १६ :** सज्ञान स्त्री-पुरुषांना कोणत्याही बंधनाशिवाय परस्पर संमत्तीने विवाह करण्याचा व कौटुंबिक जीवन जगण्याचा हक्क आहे. तसेच वैवाहिक जीवन व विवाह विच्छेद याबाबत प्रत्येकास समान अधिकार आहे. तसेच कुटुंबाला समाज व शासनाकडून संरक्षण मिळवण्याचा हक्क आहे.

✷ **कलम १७ :** प्रत्येकाला मालमत्ता धारण करण्याचा, मालमत्तेवर मालकी असण्याचा हक्क आहे. तसेच कोणाही व्यक्तीची मालमत्ता कोणीही मनमानी पद्धतीने हिरावून घेता कामा नये.

- **कलम १८ :** प्रत्येकास विचार व आचार स्वातंत्र्य आहे. या स्वातंत्र्याच्या अधिकरामाध्ये व्यक्तीला आपला धर्म व श्रध्दा बदलण्याचा हक्क, तसेच आपण स्वीकारलेल्या धर्म व श्रध्दा जाहिरपणे अथवा खाजगीत व्यक्त करण्याचा अधिकार आहे.

- **कलम १९ :** प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा, माहिती व विचार प्राप्त करण्याचा व ती प्राप्त माहिती, विचार इतरांना देण्याचा अधिकार आहे.

- **कलम २० :** प्रत्येकास संघटना व शांततापूर्ण सभा घेण्याचा हक्क असून कोणीही कोणासही कोणत्याही संघटनेचा सदस्य होण्याची सक्ती करता कामा नये.

- **कलम २१ :** प्रत्येकाला स्वत:ला किंवा त्याने निवडलेल्या प्रतिनिधीमार्फत शासनात सहभागी होण्याचा हक्क आहे. तसेच शासकीय सेवेत प्रवेश मिळविण्याचा समान हक्क आहे. निवडणूका या गुप्त मतदान पद्धतीने व निर्बंधरहित पध्दतीने झाल्या पाहिजेत.

- **कलम २२ :** प्रत्येक व्यक्तीला सामाजिक सुरक्षा प्राप्त करून घेण्याचा हक्क आहे व प्रत्येकास आपली प्रतिष्ठा, व्यक्तीमत्त्व यांच्या मुक्त विकासास आवश्यक आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकार प्राप्त करण्याचा हक्क आहे.

- **कलम २३ :** प्रत्येकास काम मिळवण्याचा, आपल्या इच्छेनुसार काम निवडण्याचा व बेकारीपासून मुक्त होण्याचा हक्क आहे. तसेच समान कामासाठी समान वेतन प्राप्त करण्याचा व व्यापारी संघ निर्माण करणे किंवा अशा संघात सहभागी होण्याचा हक्क आहे.

- **कलम २४ :** निश्चित केलेले कामाचे तास व पगारी सुट्ट्या या माध्यमातून प्रत्येकास विश्रांती मिळवण्याचा हक्क आहे.

- **कलम २५ :** प्रत्येकास तो व त्याचे कुटुंबीय यांना आरोग्य व स्वास्थ्य यासाठी आवश्यक राहणीमान प्राप्त करण्याचा हक्क आहे. तसेच त्याला उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध नसेल तर सुरक्षितता प्राप्त करून घेण्याचा हक्क आहे. त्याचबरोबर माता व मुले यांना आवश्यक मदत मिळवण्याचा हक्क असून सर्व मुलांना सारखेच संरक्षण प्राप्त झाले पाहिजे.

- **कलम २६ :** प्रत्येकास शिक्षण मिळवण्याचा हक्क असून प्राथमिक शिक्षण मोफत असले पाहिजे व माध्यमिक शिक्षण सक्तीचे असले पाहिजे. उच्च शिक्षण गुणवत्तेनुसार सर्वांना समान उपलब्ध झाले पाहिजे. व्यावसायिक व तंत्र शिक्षणाची सोय उपलब्ध असली पाहिजे. आपल्या मुलांना कोणत्या प्रकारचे शिक्षण देण्यात यावे हे ठरवण्याचा अधिकार त्याच्या माता-पित्यांना आहे. तथापि, त्या शिक्षणातून परस्पराप्रती सलोखा, सहकार्य, शांतता वृध्दिंगत झाली पाहिजे.

- **कलम २७ :** प्रत्येकास समाजाच्या सांस्कृतिक जीवनात भाग घेण्याचा, वैज्ञानिक प्रगतीतून प्राप्त लाभ मिळविण्याचा व स्वनिर्मित गोष्टीतून निर्माण होणाऱ्या हितसंबंधाना संरक्षण प्राप्त करून घेण्याचा प्रत्येकास हक्क आहे.
- **कलम २८ :** जाहिरनाम्यातील हक्क, स्वातंत्र्य प्राप्त होण्यासाठी सामाजिक व आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचा लाभ घेण्याचा प्रत्येकास हक्क आहे.
- **कलम २९ :** प्रत्येक व्यक्तीने इतरांच्या हक्कांचा व स्वातंत्र्याचा आदर राखावा. नितीमत्ता, सार्वजनिक सुव्यवस्था व लोकांचे कल्याण यासंबंधी न्याय गोष्टीचे आचरण करावे. तसेच कायद्याच्या चौकटीत प्रत्येने रहावे.
- **कलम ३० :** वरीलपैकी कोणत्याही हक्कात ढवळाढवळ, हस्तक्षेप करण्यास, ते नष्ट करण्यास प्रतिबंध.

अशाप्रकारे जाहिरनाम्यातील कलम एक व दोन हे मानवी हक्कांबाबतचे आश्वासन सर्वांना देतात. तर, कलम तीन ते कलम एकवीस अशी एकोणीस कलमे नागरी व राजकीय हक्क स्पष्ट करतात. तसेच,

कलम बावीस ते कलम तीस मानवी हक्कांच्या सनदेतील आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क स्पष्ट करतात.

### २.३.२ आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६ (International convenant on Economic, Social and Cultural Rights, 1966)

संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने १६ डिसेंबर १९६६ ला 'आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा' स्विकारला. परंतु या करारनाम्याच्या अंमलबजावणीसाठी ३५ सदस्य राष्ट्रांचे समर्थन या करारनाम्यास आवश्यक होते. हे समर्थन प्राप्त झाल्यानंतर ३ जानेवारी १९७६ ला हा करारनामा अंमलात आला.

व्यक्तीगत विकासासाठी आणि प्रतिष्ठेकरिता आवश्यक असलेले सर्व आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क या करारनाम्यात प्रस्थापित करण्यात आले आहेत. केवळ आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा अंतर्भाव असलेला आंतरराष्ट्रीय पातळीवरील पहिला करारनामा म्हणून या करारनाम्यास ओळखले जाते. या करारास मान्यता देणाऱ्या सदस्य राष्ट्रांनी तो तात्काळ अंमलात आणावा असे बंधन घालण्यात आले नव्हते कारण यातील काही अधिकारांची अंमलबजावणी ही त्या राष्ट्रांच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून होती. म्हणून सदस्य देशांनी आपल्या आर्थिक परिस्थितीनुसार उत्तरोत्तर या करारनाम्याची अंमलबजावणी करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

या करारनाम्याच्या अंमलबजावणीसाठी एक विशेष समिती स्थापन करण्यात आली. या करारातील हक्कांच्या प्रचार-प्रसाराची जबाबदारी संयुक्त राष्ट्रांच्या 'सामाजिक व आर्थिक परिषदेकडे' सोपवण्यात आली.

या करारनाम्याचे उद्देश व भूमिका तसेच करारनाम्यात स्पष्ट केलेले आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क आणि त्यांचा अर्थ तसेच त्या हक्कांच्या संरक्षणासाठीची उपाययोजना पुढीलप्रमाणे.

**❀ करारनाम्याचे उद्देश व भूमिका**

१. प्रत्येकाला व्यक्तिगत विकास व प्रतिष्ठा याकरिता आवश्यक आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांची सर्वसमावेशक यादी करून त्यास आंतरराष्ट्रीय समुदायाची मान्यता प्राप्त करून घेणे.

२. वंश, धर्म, वर्ण, लिंग, भाषा, राष्ट्रीय किंवा सामाजिक मूळ, संपत्ती, जन्म किंवा इतर दर्जा इत्यादीवरून कोणताही भेदभाव न करता सर्वांना आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक बाबतीत समान हक्क प्राप्त करून देणे.

३. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या शारीरिक व मानसिक उत्तम आरोग्यासाठी आवश्यक हक्क प्राप्त करून देणे.

४. प्रत्येक व्यक्तीस शिक्षणाचा हक्क व त्यासंदर्भातील सोयी-सुविधा प्राप्त करण्याचा हक्क आहे, तो त्यांना प्राप्त करून देणे.

५. प्रत्येकाला काम मिळवण्याचा, काम करण्याचा व यासंदर्भातील सोयी-सुविधा प्राप्त करण्याचा हक्क आहे. तो त्यांना प्राप्त करून देणे.

६. प्रत्येकास आवश्यक आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क प्राप्त करून देणेसाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर योग्य समन्वय, नियोजन व कार्यवाहीची यंत्रणा स्पष्ट करणे.

या उद्देशपूर्तीसाठी करारनाम्यात अंतर्भूत केलेली कलमे व त्यातून स्पष्ट होणारे हक्क व कार्यवाहीची यंत्रणा पुढीलप्रमाणे :-

**❀ आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा (१९६६) मधील कलमे :-**

या करारनाम्यामध्ये एकूण २६ कलमे आहेत. अभ्यासाच्या सोयीसाठी आपण या करारनाम्याचे पुढील तीन भागात विभाजन करू.

(अ) करारनाम्यात देण्यात आलेली आश्वासने, हमी व वचने (कलम १ ते ५)

(ब) करारनाम्यात स्पष्ट केलेले आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क (कलम ६ ते १५)

(क) करारनाम्याचे समर्थन, स्वीकृती व अंमलबजावणी/कार्यवाहीची पध्दत (कलम १६ ते २६)

**(अ) आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांच्या करारनाम्यात देण्यात आलेली आश्वासने, हमी व वचने:–**

- **कलम १ :** प्रत्येकास स्वयंनिर्णयाचा तसेच स्वत:चा आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास साधण्याचा व त्याकरिता स्वत:च्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुरेपूर वापराचा हक्क असून त्यापासून कोणाला वंचित केले जाणार नाही. अर्थात, हे करताना परस्परांचा लाभ सिध्दांत, आंतरराष्ट्रीय कायद्यावर आधारित आंतरराष्ट्रीय सहकार्यावर प्रतिकूल परिणाम केला जाणार नाही, असे आश्वासन या करारनाम्यातील पक्षकार राष्ट्रे देतात.

- **कलम २ :** या करारनाम्यातील पक्षकार राष्ट्रे अशी हमी देत आहेत की, या करारनाम्यातील हक्क कोणताही भेदभाव न करता (उदा. वंश, वर्ण, धर्म, लिंग, ......) प्रत्यक्षात आणले जातील. तसेच विकसनशील देश बिगर नागरिकांना या करारनाम्यातील आर्थिक हक्क कधीपर्यंत देऊ शकतील यासंदर्भातला निर्णय ते स्वत: घेऊ शकतील.

- **कलम ३ :** या करारनाम्यातील पक्षकार राष्ट्रे करारनाम्यातील सर्व आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क पुरुष व स्त्रियांना समानतेने उपभोगता येतील अशी हमी देत आहेत.

- **कलम ४ :** या करारनाम्यातील पक्षकार राष्ट्रे अशी हमी देतात की, कोणत्याही राष्ट्रातील अस्तित्वात असणाऱ्या हक्कांच्या उपभोगावर तीच नियंत्रणे लादली जातील, जी कायद्याने निश्चित केली असतील व त्यांचा हेतू लोकशाही समाजाच्या सार्वजनिक कल्याणाचा विकास असेल.

- **कलम ५ :** या करारनाम्यातील स्वीकृत हक्क व स्वातंत्र्य यांची हमी किंवा नाश होईल असा या करारनाम्यातील कोणत्याही भागाचा अर्थ लावू नये व लावला जाणार नाही.  तसेच,

कोणत्याही देशातील मान्यताप्राप्त व प्रचलित मूलभूत मानवी हक्क की जे या करारनाम्यात नाहीत म्हणून त्या देशाच्या अशा मूलभूत मानवी हक्कांवर निर्बंध लादले जाणार नाहीत व त्यांची अप्रतिष्ठा केली जाणार नाही.

**(ब) आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांच्या करारनाम्यात स्पष्ट केलेले आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क**

- **कलम ६ :** प्रत्येक व्यक्तीला रोजगार प्राप्त करून घेण्याचा हक्क आहे. तसेच कोणता रोजगार अथवा काम करावयाचे हे ठरवण्याचा हक्क आहे व निवडलेले काम करण्याचा हक्क आहे. या हक्काच्या सुरक्षेसाठी राष्ट्र आवश्यक ती पाऊले उचलेल. यामध्ये त्या व्यक्तींच्या राजकीय व आर्थिक स्वातंत्र्याचे रक्षण होईल, अशी परिस्थिती निर्माण करणे व पूर्ण वेळ, उत्पादक रोजगार निर्माण करणे यांचा समावेश होतो.

- **कलम ७ :** प्रत्येक व्यक्तीला न्याय व अनुकूल परिस्थितीत रोजगाराच्या हक्काचा उपभोग घेण्याचा हक्क आहे.

  यामध्ये सुयोग्य वेतन, समान काम, समान वेतन, सुरक्षित आणि स्वास्थ्यकारक कामाची परिस्थिती, सेवाज्येष्ठता व सक्षमता या कसोटीवर पदोन्नती मिळवण्याची समान संधी, योग्य प्रमाणात कामाचे तास, विश्रांती, मनोरंजन व त्याच्या कुटुंबियांचा योग्य जीवन स्तर इत्यादीचा समावेश होतो.

- **कलम ८ :** कोणत्याही कामगाराला स्वत:च्या विकासासाठी व सुरक्षेसाठी कामगार संघटना स्थापन्याचा, स्वइच्छेनुसार कामगार संघटनेचा सदस्य होण्याचा हक्क आहे. तसेच त्यास राष्ट्रीय महासंघ किंवा संयुकत संघ स्थापन्याचा तसेच या माध्यमातून आंतरराष्ट्रीय मजूर महासंघ बनवणेचा, त्यामध्ये सामील होण्याचा हक्क आहे. तसेच त्या-त्या देशाच्या कायद्याच्या चौकटीत राहून संपावर जाण्याचा हक्क आहे. तसेच,

  कामगार संघटनेस कायद्याच्या माध्यमातून, राष्ट्रीय सुरक्षितता व सार्वजनिक सुव्यवस्था तसेच इतरांचे हक्क व स्वातंत्र्याचे रक्षण इत्यादी संदर्भातील निर्बंध सोडून इतर कोणत्याही निर्बंधाशिवाय स्वतंत्रपणे कार्य करण्याचा हक्क आहे.

  तथापि, सशस्त्र दले, पोलीस किंवा राज्याच्या प्रशासनातील कर्मचारी यांना या हक्कांच्या वापराबाबत जे निर्बंध घातले आहेत त्या निर्बंधाना हे कलम प्रतिबंध करणार नाही.

- **कलम ९ :** प्रत्येक व्यक्तीस सामाजिक विम्यासह सामाजिक सुरक्षिततेचा हक्क आहे.

- **कलम १० :** या करारनाम्यातील पक्षकार राष्ट्रे या गोष्टींचा स्विकार करतात की,

  (१) प्रत्येक कुटुंबाला संरक्षण व साहाय्य द्यावयास हवे.

  (२) हे संरक्षण व साहाय्य कुटुंबातील मूलांचे पालन-पोषण व शिक्षण याबाबत प्राधान्याने मिळावे.

  (३) विवाहास इच्छुक जोडीदारांच्या परस्पर संमत्तीनेच विवाह होईल.

  (४) प्रसूतीपूर्व व प्रसूतीपश्चात मातांना योग्य काळ आवश्यक संरक्षण मिळावे. कामकरी मातांना पगारी रजा किंवा सामाजिक सुरक्षिततेच्या फायद्यासह रजा द्यावी.

  (५) बालके व लहान मुले यांना कोणत्याही भेदभावाशिवाय सहाय्य व आर्थिक-सामाजिक शोषणापासून संरक्षण मिळावे तसेच त्यांना धोकादायक कामाच्या रोजगारास ठेवणे कायद्याने शिक्षेस पात्र व्हावे व बालमजूरांची वयोमर्यादा निश्चित करावयास हवी.

- **कलम ११ :** या करारनाम्यातील पक्षकार राष्ट्रे प्रत्येक व्यक्तीला भुकेपासून मुक्ती मिळविण्याच्या हक्कास मान्यता देतात. त्याकरिता प्रत्येक व्यक्ती व तिच्या कुटुंबास अन्न, वस्त्र, निवारा व आवश्यक जीवनस्तराचा हक्क मान्य करतात.

- **कलम १२ :** प्रत्येक व्यक्तीच्या शारीरिक व मानसिक उत्तम आरोग्यासाठी आवश्यक हक्क व कृतींचा स्वीकार केला आहे. यामध्ये –

  (१) मृतावस्थेत जन्म व बालमृत्यू दर कमी करणे.

  (२) साथीचे रोग व अन्य रोगासाठी प्रतिबंधक उपाय.

  (३) वैद्यकीय सेवा व देखभाल इ. सोयी उपलब्ध करून देणे.

  (४) पर्यावरणीय व औद्योगिक आरोग्यविषयक सुधारणा करणे यांचा समावेश होतो.

- **कलम १३ :** प्रत्येक व्यक्तीच्या शिक्षणाच्या हक्काचा स्वीकार केला आहे. यामध्ये शिक्षणविषयक पुढील बाबी स्पष्ट केल्या आहेत.

  (१) शिक्षणाचा उद्देश हा मानवी व्यक्तीमत्त्वाचा पूर्ण विकास तसेच मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्य याबाबत आदरभाव वाढवणे हा मान्य केला गेला.

  (२) प्राथमिक शिक्षण सर्वांना सक्तीचे व मोफत असेल.

  (३) तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणासह विविध प्रकारचे माध्यमिक शिक्षण सर्वांना उपलब्ध असावे.

  (४) उच्च शिक्षण क्षमतेनुसार सहज उपलब्ध करून देण्यात येईल.

  (५) सर्व स्तरावर शाळा पध्दतीचा विकास, शिष्यवृत्ती पुरेशा प्रमाणात उपलब्ध व शिक्षकांच्या भौतिक सोयीसवलतीत सतत सुधारणा करण्यात येतील.

  (६) मातापिता अथवा पालक यांना मूलासाठी शाळा निवडण्याचे स्वातंत्र्य असेल.

- **कलम १४ :** या करारनाम्यातील पक्षकार राष्ट्रे आपल्या राष्ट्राने सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण अंमलात आणू शकले नाहीत त्यांनी दोन वर्षांच्या आत त्याबाबत नियोजन करून त्याबाबत खात्री देत आहेत.

- **कलम १५ :** हे कलम सांस्कृतिक हक्काबाबत आहे. यानुसार प्रत्येक व्यक्तीला सांस्कृतिक जीवनात भाग घेण्याचा, वैज्ञानिक प्रगतीचा लाभ घेण्याचा, साहित्य व कलात्मक कृतीतून होणाऱ्या नैतिक, भौतिक संरक्षणाच्या लाभाचा हक्क आहे. तसेच वैज्ञानिक संशोधन आणि सर्जनशील निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या स्वातंत्र्याच्या हक्काचा आदर करण्याची खात्री सर्व पक्षकार राष्ट्रे देत आहेत.

**(क) आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांच्या करारनाम्याचे समर्थन, स्वीकृती व अंमलबजावणी/कार्यवाहीची पध्दत**

- **कलम १६ :** पक्षकार राष्ट्रे या करारनाम्यात मान्य झालेल्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक हक्कांच्या अंमलबजावणीचा व प्रगतीचा अहवाल संयुक्त राष्ट्रांच्या महासचिवाकडे सादर करतील.

- **कलम १७ :** पक्षकार राष्ट्रे आर्थिक व सामाजिक परिषदेने ठरवून दिलेल्या कार्यक्रमानुसार आपल्या कार्याचा अहवाल एक वर्षाच्या आत सादर करतील. या कार्यात कोणत्या बाबी सहाय्यभूत ठरल्या व कोणत्या अडचणी आल्या हे अहवालात नमूद करतील.

- **कलम १८ :** संयुक्त राष्ट्र संघाच्या सनदेत अंतर्भूत असणाऱ्या मानवी हक्क व मुलभूत स्वातंत्र्ये याबाबत पक्षकार राष्ट्रांनी पार पाडावयाच्या जबाबदारीचा पाठपुरावा, आर्थिक व सामाजिक परिषद करेल व यासंबंधीच्या प्रगतीचा अहवाल मागवण्यासंबंधी विशेष समित्यांच्या माध्यमातून सोय करेल.

- **कलम १९ :** पक्षकार राष्ट्राकडून उपरोक्त १६, १७ व १८ या कलमात स्पष्ट केलेले अहवाल तसेच कलम १८ नुसार विशेष समित्यांनी मानवी हक्कासंबंधी केलेले अहवाल मानवी हक्क आयोगाकडे अभ्यासासाठी, शिफारशीसाठी व माहितीसाठी पाठवू शकेल.

- **कलम २० :** मानवी हक्काबाबत पक्षकार राष्ट्रे, विशेष समित्या व आर्थिक व सामाजिक परिषदेकडून प्राप्त अहवालात केलेल्या शिफारशी किंवा मानवी हक्क आयोगाने त्यांच्या कोणत्याही अहवालात अशा सर्वसाधारण शिफारशीसंबंधी दिलेल्या संदर्भाविषयी मानवी हक्क आयोग स्वत:ची टिप्पणी सादर करू शकतील.

- **कलम २१ :** या करारनाम्यातील हक्कांच्या अंमलबजावणीचे आर्थिक व सामाजिक परिषदेकडे प्राप्त झालेल्या पक्षकार राष्ट्रांच्या अहवालाची माहिती परिषद महासभेला देईल.

- **कलम २२ :** या करारनाम्याच्या परिणामकारक व प्रगतीशील अंमलबजावणीसाठी आवश्यक उपाययोजना केल्या जातील.

- **कलम २३ :** मान्यताप्राप्त हक्कांच्याप्राप्तीसाठी पक्षकार राष्ट्रासोबत आंतरराष्ट्रीय कृती करणे. उदा. संमेलने व विभागीय बैठकांचे आयोजन, शिफारशी स्वीकारणे, तांत्रिक साहाय्य देणे इत्यादी.

- **कलम २४ :** संयुक्त राष्ट्रांच्या संसदेतील तरतुदी व या करारनाम्यातील बाबीसंबंधी संयुक्त राष्ट्रांच्या विविध जबाबदाऱ्यांची व्याख्या करणाऱ्या इतर विशेष समित्यांच्या घटना यांना बाधा पोहचेल अशा पध्दतीने या करारनाम्यातील कोणत्याही बाबींचा अर्थ लावण्यात येऊ नये.

* **कलम २५ :** या करारनाम्यातील कोणत्याही बाबींचा असा अर्थ लावू नये की, ज्यामुळे नैसर्गिक हक्क व उपभोगावर विपरित परिणाम होईल.

* **कलम २६ :** (१) या करारनाम्यावर पुढील घटक स्वाक्षरी करू शकतील. संयुक्त राष्ट्रसंघाचे सदस्य, त्याच्या विशिष्ट समित्यांचे सदस्य, आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या सनदेतील पक्षकार राष्ट्रे तसेच महासभेद्वारा या करारनाम्यातील पक्षकार म्हणून निमंत्रित राष्ट्र. (२) हा करारनामा समर्थनाच्या अधीन असेल व समर्थनाचे दस्तऐवज संयुक्त राष्ट्राच्या महासचिवाकडे जमा केले जातील. त्यानंतर या करारनाम्याची स्वीकृती निश्चित धरली जाईल.

## २.३.३ नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६ (International Convenant on Civil and Political Rights, 1966) :-

संयुक्त राष्ट्राने, 'मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा' १० डिसेंबर १९४८ ला घोषित केला. या जाहिरनाम्यात मानवी हक्कांची एक सर्वसमावेशक यादी प्रथमच आंतरराष्ट्रीय पातळीवरून जाहिर केली गेली. परंतु हा जाहिरनामा मार्गदर्शक स्वरूपाचा होता. त्याची अंमलबजावणी करणे सदस्य राष्ट्रावर बंधनकारक नव्हते. परिणामी, हा जाहिरनामा मानणारे काही राष्ट्रे याच जाहिरनाम्यातील मानवी हक्कांचे उल्लंघन करत होती. त्यामुळे मानवी हक्कांचे संरक्षण सदस्य राष्ट्रांनी केलेच पाहिजे असे बंधन करण्याची गरज निर्माण झाली. म्हणूनच मानवी हक्कांचे संरक्षण सदस्य राष्ट्रावर बंधनकारक करण्यासाठी संयुक्त राष्ट्राने दोन महत्वाचे करार केले. त्यापैकी पहिला करार म्हणजे 'नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा' हा होय. हा करारनामा संयुक्त राष्ट्राने १६ डिसेंबर, १९६६ ला स्विकारला, परंतु त्याच्या अंमलबजावणीसाठी ३५ राष्ट्रांची स्वीकृती गरजेची होती. ही स्वीकृती प्राप्त झाल्यानंतर १९७६ ला हा करारनामा खऱ्या अर्थाने अस्तित्वात आला. या करारनाम्यातील तरतुदी केवळ मार्गदर्शक स्वरूपाच्या नव्हत्या तर त्यावर स्वाक्षरी करणाऱ्या राष्ट्रांवर त्यांची अंमलबजावणी बंधनकारक होती.

हा करारनामा ५३ कलमासह एकूण सहा भागात विभागण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रथमच एवढ्या विस्तृत स्वरूपात नागरी व राजकीय हक्कांचा समावेश करण्यात आला असून यातील हक्क स्वातंत्र्य, न्याय आणि शांततेच्या तत्वावर आधारलेली आहेत. या करारनाम्याचे आणखी एक विशेष म्हणजे यामध्ये व्यक्तींच्या हक्काबरोबरच समूहाचे हक्कही स्पष्ट करण्यात आले.

या करारनाम्यातील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी १८ सदस्यांची, 'मानवी हक्क समिती' स्थापन करून तिला या कराराच्या अंमलबजावणीचे अधिकार देण्यात आले आहेत.

### ❀ करारनाम्याचे उद्देश व भूमिका :–

१. जगात स्वातंत्र्य, न्याय व शांततेच्या निर्माणासाठी संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत समावेश असलेल्या सर्व व्यक्तींच्या मूलभूत हक्कांना कायदेशीर स्वरूप देत त्या हक्कांना आंतरराष्ट्रीय समुदायाची मान्यता प्राप्त करून घेणे.

२. संयुक्त राष्ट्राच्या सनदेत समावेशीत मानवी हक्क हे मूलत: मानवाच्या अंत:करणातील आत्मसन्मानातून आलेले असल्याने ते त्यांना प्राप्त करून देणे.

३. प्रत्येकाला स्वत:चे नागरी व राजकीय हक्क तसेच आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क उपभोगता येतील तेव्हाच भय व अभाव यांच्यापासून मुक्त मानव ही संकल्पना सत्यात उतरवण्यासाठी प्रयत्न करणे.

४. संयुक्त राष्ट्राच्या सनदेवर स्वाक्षरी करणारे देश हे मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्य यांच्याबद्दल सार्वत्रिक सन्मान जागवणे व त्याची अंमलबजावणी करण्यास कटिबध्द असल्याने नागरी व राजकीय हक्काबाबत करारनामा करून त्यास कायदेशीर स्वरूप देणे.

५. प्रत्येक व्यक्ती व समुदायाची, दुसऱ्या व्यक्ती व समुदायाप्रती काही कर्तव्ये आहेत. या कर्तव्याकरिता व मानवी हक्क, मूलभूत स्वातंत्र्य यांचा विकास व बंधनकारक अंमलबजावणीसाठी करारनामा करणे.

❀ **नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा (१९६६) मधील कलमे :–**

हा करारनामा सहा भागात विभागला असून यामध्ये एकूण ५३ कलमांचा समावेश करण्यात आला आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी आपण त्याची पुढील तीन भागात विभागणी करू.

(अ) व्यक्तीच्या जगण्याशी अथवा अस्तित्वाशी संबंधीत व व्यक्तीच्या मूलभूत स्वातंत्र्यासंबंधीचे हक्क, (ब) समूहाचे हक्क, (क) राजकीय हक्क.

उपरोक्त तीन भागातून आपण नागरी व राजकीय हक्कांचा करारनामा पुढीलप्रमाणे समजावून घेवू.

**(अ) व्यक्तीच्या जगण्याशी अथवा अस्तित्वाशी संबंधित व व्यक्तीच्या मूलभूत स्वातंत्र्यासंबंधीचे हक्क :–**

- **कलम ६ :** या करारनाम्यातील कलम सहाच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीस जीविताचा हक्क जन्मजात आहे. त्यामुळे कोणाचेही प्राण मनमानीपणे कोणालाही हिरावून घेता येणार नाही. कायद्याद्वारे प्रत्येक व्यक्तीच्या जगण्याच्या व जीवनाच्या जन्मजात हक्काचे रक्षण करण्यात येईल हे स्पष्ट केले आहे.

  याचबरोबर देहान्ताची शिक्षा झालेल्या व्यक्तीस दयेचा अथवा शिक्षा कमी करण्यासाठी विनंती अर्ज करण्याचा हक्क आहे, आणि वयवर्ष अठरा खालील व्यक्ती तसेच गर्भवती स्त्रीस देहान्ताची शिक्षा दिली जाणार नाही.

- **कलम ७ :** कलम सात मध्ये हे स्पष्ट केले आहे की, कोणत्याही व्यक्तीचा छळ केला जाणार नाही. तसेच कोणत्याही व्यक्तीला अमानवी, क्रूर व अपमानास्पद वागणूक अथवा शिक्षा दिली जाणार नाही. यामध्ये विशेषत: कोणत्याही व्यक्तीच्या पूर्वसंमतीविना त्याच्यावर वैज्ञानिक,

वैद्यकीय प्रयोग केले जाणार नाहीत. अशाप्रकारे छळ व क्रूर अमानवी वागणूकीविरुध्दचा हक्क देण्यात आला आहे.

* **कलम ८ :** प्रत्येक व्यक्तीला गुलामगिरी अथवा दास्यत्वाविरुध्दचा अधिकार देण्यात आला. या अधिकारानुसार कोणत्याही व्यक्तीस गुलाम म्हणून ठेवता येणार नाही तसेच सर्व प्रकारची गुलामी व गुलामांच्या व्यापारास बंदी घालण्यात आली आहे. तसेच विशिष्ट परिस्थितीचा अपवाद वगळता कोणाही व्यक्तीकडून वेठबिगारी किंवा जबरदस्तीने श्रम करून घेतले जाणार नाही.

* **कलम ९ :** प्रत्येक व्यक्तीला वैयक्तिक स्वातंत्र्याचा व संरक्षणाचा हक्क स्पष्ट केला आहे. त्यानुसार,

    कायद्याने निश्चित केलेली कारणे व प्रक्रियेशिवाय कोणाही व्यक्तीची मनमानी पध्दतीने धरपकड केली जाणार नाही व त्या व्यक्तीचे स्वातंत्र्य हिरावून घेतले जाणार नाही. ज्या व्यक्तीला अटक केली जाईल तेव्हा त्यास अटकेची कारणे व त्याच्यावरील आरोप त्याला त्याचवेळी सांगितले जातील. तसेच त्या व्यक्तीला सुयोग्य काळात खटला चालविण्याचा व त्यातून सुटकेचा हक्क असेल. तसेच त्याला न्यायालयीन प्रक्रियेचा लाभ घेण्याचा हक्क असेल.

    त्याचबरोबर बेकायदेशीर अटक झालेल्या व्यक्तीस नुकसान भरपाई मागण्याचा हक्क आहे.

* **कलम १० :** ज्या व्यक्तीला अटक, स्थानबध्द केले आहे; स्वातंत्र्य हिरावून घेतले आहे, त्या व्यकतीस मानवतेची वागणूक देत त्याच्या जन्मजात आत्मसन्मानाचा आदर केला जाईल. तसेच,

    आरोपी व्यक्तीस शिक्षा झालेल्या व्यक्तीपासून वेगळे ठेवण्यात यावे. शिवाय बाल अरोपीवरील खटला लवकरात लवकर चालवण्यात यावा व त्यांना प्रौढ आरोपीपासून वेगळे ठेवण्यात यावे.

* **कलम ११ :** कोणत्याही व्यक्तीस, त्याने झालेल्या करारानुसार जबाबदारी पार पाडली नाही म्हणून किंवा घटनात्मक उत्तरदायित्वाची पूर्तता करण्यास सक्षम न ठरल्यावरून कोणालाही शिक्षा करता येणार नाही.

* **कलम १२ :** प्रत्येक व्यक्तीला देशाच्या सीमांच्या अंतर्गत स्वइच्छेने संचार करण्याचा व वास्तव्य करण्याचा हक्क स्पष्ट केला आहे. तसेच, प्रत्येक व्यक्तीला आपला देश किंवा इतर कोणताही देश सोडण्यास कायद्याने निश्चित केलेल्या प्रतिबंधाशिवाय इतर कोणतेही निर्बंध घालण्यात येणार नाहीत. त्यास देश सोडण्याचा हक्क असेल व कोणत्याही व्यकतीचा स्वदेशात परतण्याचा हक्क मनमानी पद्धतीने कोणालाही हिरावून घेता येणार नाही.

* **कलम १६ :** प्रत्येक व्यक्तीला सर्व ठिकाणी कायद्यासमोर 'एक व्यक्ती' म्हणून मान्यता मिळवण्याचा हक्क आहे.

- **कलम १७ :** कोणाही व्यक्तीच्या खाजगी आयुष्यात इतर कोणासही मनमानीपद्धतीने हस्तक्षेप करता येणार नाही व त्याच्या आत्मसन्मान तसेच प्रतिष्ठेवर आघात करता येणार नाही. तसे झाल्यास त्या व्यक्तीस अशा हस्तक्षेपाविरोधात कायदेशीर संरक्षण मिळवण्याचा हक्क आहे.

- **कलम १८ :** प्रत्येक व्यक्तीला धर्म, पंथ व विचार याबाबतचे स्वातंत्र्य आहे. तो आपल्या इच्छेनुसार धर्म, पंथ व विचार निवडू शकतो. त्याच्या इच्छेशिवाय त्याच्यावर कोणताही धर्म, पंथ, विचार स्वीकारण्याची सक्ती कोणासही करता येणार नाही. तसेच,

  कायद्याने निश्चित केलेल्या मर्यादेत राहून प्रत्येकास आपल्या धर्माचे आचरण करण्याचा हक्क असेल. तसेच माता-पिता अथवा कायदेशीर पालकांना त्यांच्या मुलांचे धार्मिक, नैतिक शिक्षण निश्चित करण्याचे स्वातंत्र्य व हक्क असेल.

- **कलम १९ :** प्रत्येक व्यक्तीला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क आहे. या हक्कानुसार प्रत्येक व्यक्तीला जगातील कोणतीही माहिती, विचार मिळवण्याचा, ती स्विकारण्याचा तसेच ती हस्तांतरित करण्याचा हक्क आहे. अर्थात, यास कायद्याने निश्चित केलेल्या बाबींची मर्यादा असेल.

**(ब) नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनाम्यातील समूहसंबंधी हक्क :-**

- **कलम १३ :** एखाद्या देशात कायदेशीररित्या एखादा विदेशी नागरिक वास्तव्य करीत असेल तर त्या व्यक्तीस राष्ट्रीय सुरक्षिततेच्या कारणास्तव कायद्याद्वारे झालेल्या निर्णयानुसारच त्या देशाबाहेर घालविता येईल. अर्थात त्या देशाच्या अशा निर्णयाचा त्यांना पुर्नविचार करण्याची विनंती करण्याचा हक्क त्या नागरिकास असेल.

- **कलम १४ :** न्यायालये व न्यायाधिकरणे यांच्यासमोर सर्व व्यक्ती समान असतील. तसेच कायद्याने जोपर्यंत गुन्हा सिध्द होत नाही तोपर्यंत त्या गुन्ह्याच्या आरोप असलेल्या व्यक्तीस निरपराध मानले जाईल. त्याचबरोबर त्याला पुढील अधिकार असतील.

  (अ) त्याच्यावरील आरोप त्याला समजेल अशा भाषेत लवकरात लवकर समजून देणे.

  (ब) स्वत:च्या बचावासाठी स्वत:च्या वकिलासोबत चर्चा करता येईल.

  (क) त्याला कायदेशीर सहाय्य उपलब्ध नसेल तर आवश्यक कायदेशीर सहाय्य प्राप्त करून घेणे.

  (ड) न्यायालयातील प्रचलित भाषा समजत नसेल तर विनाशुल्क दुभाषा मिळवून घेण्याचा हक्क असेल.

  (इ) शिक्षा झाल्यास किंवा न्याय मिळाला नाही असे वाटल्यास उच्च न्यायाधिकरणाकडे दाद मागण्याचा अधिकार आहे.

(ई) एकाच गुन्ह्यामध्ये एकदा अंतिम निर्णय झाला असेल तर त्याच गुन्ह्यासाठी त्या व्यकतीवर पुन्हा खटला भरता येणार नाही.

- **कलम १५ :** एखाद्या व्यक्तीने केलेली एखादी कृती अथवा वर्तन हे ज्यावेळी ती कृती केली त्यावेळी ती कृती राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार दंडनीय गुन्हा ठरत नसेल तर त्या कृतीबाबत त्या व्यक्तीला गुन्हेगार ठरविता येणार नाही.

- **कलम २१ :** लोकांना शांततापूर्ण रितीने एकत्र येण्याचा, सभा, संमेलने भरवण्याचा हक्क आहे. अर्थात, त्यास कायदेशीर परवानगी घ्यावी लागेल.

- **कलम २२ :** प्रत्येक व्यक्तीला संघटना स्थापन करण्याचा हक्क आहे. याअंतर्गत कामगार संघटना स्थापण्याचा अथवा अशा संघटनात सामील हाण्याचा हक्क असेल.

- **कलम २३ :** कलम तेवीसनुसार, कुटुंब ही समाजातील एक मुलभूत सामाजिक संस्था व समाजाचा घटक आहे. त्याला समाज व राजसत्ता या दोहोकडून आवश्यक संरक्षण मिळविण्याचा हक्क आहे. तसेच,

  सज्ञान स्त्री व पुरुष यांना परस्परांच्या संमतीने विवाह करण्याचा आणि कुटुंब स्थापन्याचा हक्क आहे.

  तथापि, या करारनाम्याचा स्वीकार केलेली राष्ट्रे विवाह, पती-पत्नीचे वैवाहिक जीवनातील हक्क व भूमिका तसेच घटस्फोट व घटस्फोटानंतर मुलांना योग्य संरक्षण देण्यासंबंधी तरतुदी करतील हे स्पष्ट करण्यात आले आहे.

- **कलम २४ :** सर्व बालकांना त्यांचा वंश, वर्ण, धर्म, पंथ, भाषा, राष्ट्रीय व सामाजिक उगम, संपत्ती इत्यादी कोणत्याही भेदभावाशिवाय स्वत:चे कुटुंब, समाज व राजसत्तेमार्फत संरक्षण मिळविण्याचा हक्क आहे. तसेच,

  प्रत्येक बालकाची जन्माची नोंद तात्काळ करण्यात येईल व त्याचे एक नाव असेल व त्याला एक राष्ट्रीयत्व प्राप्त करण्याचा हक्क असेल.

- **कलम २७ :** असे लोक जे वांशिक, धार्मिक, भाषिक अल्पसंख्यांक आहेत. त्यांना स्वत:ची भाषा, संस्कृती, धर्म यांची जपणूक व संवर्धन करण्याचा अधिकार या अल्पसंख्यांक समाजाला असेल.

**(क) नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनाम्यातील राजकीय हक्क :-**

- **कलम १ :** या करारनाम्यातील कलम १ असे स्पष्ट करते की, सर्व लोकांना स्वयंनिर्णयाचा अधिकार आहे, ज्यायोगे ते त्यांच्या राजकीय दर्जाविषयी मुक्तपणे निर्णय घेऊ शकतील. तसेच,

सर्व लोकांना आपल्या स्वत:च्या उद्दिष्टपूर्तीसाठी स्वत:च्या नैसर्गिक संपत्ती व साधनांचा मुक्तपणे वापर करण्याचा अधिकार आहे. आणि,

सर्व सदस्य राष्ट्रे वरील स्वयंनिर्णयाच्या हक्कप्राप्तीच्या दिशेने आवश्यक कार्यवाही करतील.

✷ **कलम २ :** कलम २ अन्वये या करारनाम्यावर स्वाक्षरी करणारे प्रत्येक राष्ट्र, आपल्या राष्ट्रातील व आपल्यावर अवलंबून असणाऱ्या सर्व व्यक्तींच्या बाबतीत वंश, वर्ण, धर्म, भाषा, राष्ट्रीय किंवा सामाजिक उगम, संपत्ती, जन्म किंवा इतर दर्जासंबंधात कोणताही भेदभाव न या करारनाम्यातील हक्कांचा सन्मान करतील व त्यासाठीची अंमलबजावणी करण्याचे वचन देत आहेत. या करारनाम्यातील हक्क व स्वातंत्र्याचे उल्लंघन झाल्यास त्याबाबत सक्षम न्याय देण्याचे वचन देत आहेत.

✷ **कलम ३ :** कलम तीननुसार या करारनाम्यावर स्वाक्षरी करणारी राष्ट्रे, करारनाम्यात सामील सर्व नागरीकांना, स्त्री-पुरुषांना सर्व राजकीय हक्क समानतेने वापरता व उपभोगता येतील याचे वचन देतात.

✷ **कलम ४ :** कलम चार अन्वये हे स्पष्ट केले आहे की, या करारनाम्यातील पक्षकार राष्ट्रांपैकी एखाद्या राष्ट्रात आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास, तेथील लोकांचे, समूहांचे अस्तित्व धोक्यात आल्यास अशा परिस्थितीत आवश्यक त्या मर्यादेपर्यंत आंतरराष्ट्रीय कायद्याप्रमाणे कोणताही भेदभाव न करता हक्कांचा, बांधिलकीचा संकोच करण्याचा त्या राष्ट्रास अधिकार आहे.

✷ **कलम ५ :** कलम पाच अन्वये हे स्पष्ट करण्यात आले आहे की, या करारनाम्यामध्ये अंतर्भूत असणाऱ्या कोणत्याही तरतुदीचा, भागाचा असा अर्थ लावू नये की, ज्यामुळे कोणतेही राष्ट्र अथवा समुदाय, स्वीकृत हक्क, स्वातंत्र्य यांचे उल्लंघन करतील, त्यांच्यावर अनिर्बंध बंधने लादतील असा अर्थ लावण्यात येवू नये.

✷ **कलम २० :** कलम वीस नुसार युध्दाचा प्रचार करण्यास कायद्याने बंदी घातली आहे. तसेच वंश, वर्ण, धर्म, जात यासंबंधाने वंशा-वंशात, धर्मा-धर्मात, जाती-जातीत मत्सर व द्वेष, हिंसा घडवून समूह जीवनावर आघात करणाऱ्या व्यक्ती, गट, संघटना यांना कायद्याने बंदी असेल.

✷ **कलम २५ :** कलम पंचवीस अन्वये हे स्पष्ट करण्यात आले आहे की, सर्व नागरिकांत, समूहांना वंश, वर्ण, धर्म, भाषा, पंथ, संपत्ती, राष्ट्रीय व सामाजिक उगम यावरून भेदभाव न करता सर्वांना पुढील हक्क देण्यात येत आहेत.

(अ) प्रत्यक्षपणे अथवा स्वतंत्रपणे निवडलेल्या प्रतिनिधीमार्फत सार्वजनिक कार्यामध्ये सहभाग घेणेचा हक्क आहे.

(ब) नियमित व पारदर्शीपणे होणाऱ्या निवडणुकीत गुप्त मतदान पद्धतीने आपल्या पसंतीच्या व्यक्तीस मतदान करण्याचा हक्क आहे.

(क) आपल्या देशातील सार्वजनिक सेवामध्ये दाखल होण्यासाठी सर्वांसाठी समान नियम, अटी असतील.

- **कलम २६ :** कलम सव्वीस द्वारे सर्व लोकांस कायद्याने समानता दिली असून, सर्वांना समान आणि प्रभावी संरक्षणाची हमी दिली जाईल. याबाबत कायद्याने वंश, वर्ण, धर्म, पंथ, भाषा, जन्म, संपत्ती, राष्ट्रीयता किंवा सामाजिक उमग, दर्जा या आधारावर भेदभाव केला जाणार नाही.

**य) नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा–अंमलबजावणी, संचालन पध्दती :–**

या करारनाम्याच्या अंमलबजावणीचे सर्व अधिकार 'मानवी हक्क समिती'स आहेत. तथापि, या करारनाम्यातील कलम २८ ते कलम ५३ ही या करारनाम्याच्या अंमलबजावणी, संचालन संबंधीची, करारावर स्वाक्षरी करणेसंदर्भात व कराराच्या भाषेच्या संदर्भात आहेत.

कलम २८ ते ४५ मध्ये आपणास 'मानवी हक्क समिती'ची रचना व तीच्या कार्यपध्दतीबाबतच्या तरतुदी आहेत. ढोबळमानाने या कार्यपध्दतीचे वर्णन असे करता येईल की,

१. सर्व सदस्य राष्ट्रे व करारनाम्यावर स्वाक्षरी करणारे राष्ट्रे 'नागरी व राजकीय हक्कांच्या आंतरराष्ट्रीय करारनाम्यात' समाविष्ट अधिकाराच्या अंमलबजावणीची आपल्या राष्ट्रात काय परिस्थिती आहे याबाबत मानवी हक्क समितीकडे प्रतिवर्षी अहवाल पाठवतील.

२. सदस्य राष्ट्राकडून आलेल्या अहवालाचे समिती अवलोकन करेल व त्यासंदर्भात काही सूचना असतील तर त्या सूचना संबंधित राष्ट्राला करेल 'मानवी हक्क समितीचे' अधिकार व कर्तव्ये या करारनाम्यातील कलम एकेचाळीसमध्ये स्पष्ट केलेले आहेत.

३. एखाद्या पक्षकार राष्ट्रांकडून या करारनाम्यातील अधिकारांचा भंग अथवा उल्लंघन झाले आहे अशी दुसऱ्या पक्षकार राष्ट्राला वाटत असेल तर त्यांनी त्या उल्लंघनासंबंधी आपले म्हणणे अथवा तक्रार 'मानवी हक्क समिती'समोर सादर करावे.

४. एखाद्या पक्षकार राष्ट्राकडून या करारनाम्यातील अधिकाराचा भंग झाल्याची तक्रार आलेनंतर त्याबाबत आवश्यकता भासल्यास त्या तक्रारीच्या चौकशीसाठी समिती 'विशेष आयोगाची' स्थापना करते. हा आयोग आपला 'चौकशी अहवाल' अथवा 'शिफारशी' समितीसमोर सादर करतो.

५. मानवी हक्क समिती आपल्याकडे प्राप्त झालेले सर्व अहवाल, तक्रारी, विशेष आयोगाच्या शिफारशी इत्यादीच्या माध्यमातून आपला 'वार्षिक अहवाल' तयार करून आवश्यक त्या शिफारशींसह संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक व सामाजिक परिषदेच्या माध्यमातून संयुक्त राष्ट्राच्या महासभेसमोर सादर करते.

६. करारनामा पुढील भाषेत तयार करून तो संयुक्त राष्ट्रांच्या 'अभिलेख संग्रहालयात' जमा करण्यात येईल. त्या भाषा- चायनीज, इंग्लिश, फ्रेंच, रशियन व स्पॅनिश इत्यादी.

## २.४ सारांश

या घटकामध्ये आपण मानवी हक्कांच्या संदर्भात संयुक्त राष्ट्राचे योगदान याचा अभ्यास केला आहे. मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणाची गरज व त्यासाठी संयुक्त राष्ट्राने केलेले कार्य अभ्यासताना, या कार्यासाठी संयुक्त राष्ट्राने यंत्रणा कार्यान्वित केल्या त्यांचा आढावा घेतला आहे. हा आढावा आपण संयुक्त राष्ट्राची आमसभा, आर्थिक व सामाजिक परिषद, संयुक्त राष्ट्र मानवी हक्क आयोग, सुरक्षा परिषद, मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीय विधेयक, मानवी हक्कासाठीचा उच्चायुक्त, आंतरराष्ट्रीय न्यायालय, मानव अधिकार सभा यांच्या आढावातून घेतला आहे. तसेच संयुक्त राष्ट्रानी मानवी हक्कांच्या संदर्भातील 'मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा, १९४८', 'आर्थिक सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६', 'नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६' यांचाही सविस्तर आढावा घेतला. यातून एक बाब स्पष्ट होते की, मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणात संयुक्त राष्ट्रांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

**※ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ※**

❑ **रिक्त जागा भरा.**

१. संयुक्त राष्ट्रांची सनद ............... ला लागू करण्यात आली.

२. संयुक्त राष्ट्र मानवी हक्क आयोगाचे मुख्यालय ............... येथे होते.

३. मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा संयुक्त राष्ट्राने ................ तारखेस घोषित केला.

४. 'मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा १९४८' या जाहिरनाम्यात एकूण ................ कलमे आहेत.

५. मानवी हक्कांच्या जागतिक जाहिरनाम्यातील कलम ................. नुसार गुलामगिरी व गुलामांच्या व्यापारास प्रतिबंध करण्यात आले.

६. प्रत्येकाला संचार व वास्तव्य आपल्या इच्छेनुसार करण्याचे स्वातंत्र्य आहे हे संयुक्त राष्ट्राच्या 'मानवी हक्कांच्या जागतिक जाहिरनाम्यातील' कलम ................ मध्ये नमूद करण्यात आले आहे.

७. कुटुंबाला समाज व शासनाकडून संरक्षण मिळवण्याचा हक्क 'मानवी हक्कांच्या जागतिक जाहिरनाम्यामध्ये कलम ................. मध्ये नमूद करण्यात आला आहे.

**⁕ स्वयं–अध्ययन प्रश्न–२ ⁕**

❑ **रिक्त जागा भरा.**

१. 'आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६' संयुक्त राष्टांच्या आमसभेने ......................... तारखेस स्विकारला.

२. 'आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६' मधील हक्कांच्या प्रचार-प्रसाराची जबाबदारी संयुक्त राष्ट्रांनी आपल्या ................. सोपवली.

३. 'आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६' च्या अंमलबजावणीसाठी संयुक्त राष्ट्राच्या ........................... सदस्य राष्ट्रांचे समर्थन आवश्यक होते.

४. रोजगार निवडीचा हक्क, स्वातंत्र्य हे आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६' मधील ....................... कलमात नमूद करण्यात आला.

५. 'आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा, १९६६' मधील ........................... कलमात 'कामगार संघटने' संदर्भातील हक्क नमूद करण्यात आला आहे.

**⁕ स्वयं–अध्ययन प्रश्न–३ ⁕**

❑ **रिक्त जागा भरा.**

१. 'नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६' मध्ये एकूण ............... कलमे आहेत.

२. 'नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६' च्या अंमलबजावणीसाठी .............. स्थापन करण्यात आली.

३. देहांताची शिक्षा झालेल्या व्यक्तीस दयेचा किंवा शिक्षा कमी करण्यासंदर्भातील विनंती अर्ज करण्याचा हक्क 'नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनाम्यातील' ............... कलमामध्ये देण्यात आला.

४. प्रत्येक व्यक्तीला धर्म, पंथ व विचारबाबतचे स्वातंत्र्य 'नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा'तील ............... कलमामध्ये दिले आहे.

५. नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनाम्यातील ................... कलमामध्ये अशी तरतूद केली आहे की, लोकांना शांततापूर्णरीतीने एकत्र येणे, सभा, संमेलने भरवण्याचा अधिकार आहे.

## २.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

*** स्वयं-अध्ययनासाठीचे प्रश्नांची उत्तरे-१ ***

१. २४ ऑक्टोबर १९४५.

२. 'जिनिव्हा'.

३. १० डिसेंबर, १९४८.

४. ३० कलमे.

५. कलम ४० नुसार (०४).

६. कलम १३ मध्ये.

७. कलम १६ मध्ये.

*** स्वयं-अध्ययनासाठीचे प्रश्नांची उत्तरे-२ ***

१. १६ डिसेंबर, १९६६.

२. सामाजिक व आर्थिक परिषद.

३. ३५ सदस्य राष्ट्रांचे.

४. कलम ०६ मध्ये.

५. कलम ०८ मध्ये.

*** स्वयं-अध्ययनासाठीचे प्रश्नांची उत्तरे-३ ***

१. एकूण ५३ कलमे.

२. मानवी हक्क समिती.

३. कलम ०६ अन्वये.

४. कलम १८ अन्वये.

५. कलम २१ अन्वये.

## २.६ सरावासाठी प्रश्न

**प्रश्न १ : टीपा लिहा.**

१. मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा १९४८-उद्देश व भूमिका.

२. संयुक्त राष्ट्र मानवी हक्क आयोग.

३. ‘आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६’ ची उद्देश व भूमिका.

४. ‘आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांच्या आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६’ मध्ये देण्यात आलेली आश्वासने, हमी, वचने.

५. नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनाम्याचे उद्देश व भूमिका.

**प्रश्न २ : पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीयकरण व संयुक्त राष्ट्रे यावर चर्चा करा.

२. ‘मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा १९४८’ स्पष्ट करा.

३. ‘आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा स्पष्ट करा.

४. ‘नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा १९६६’ लिहा.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ‘मानवी हक्कांची ऐतिहासिक वाटचाल’, नाशिक, २००९.

२. Patil The Economics of Social Welfare in India, Somayya, Bombay, 1978.

३. कोतापल्ले लक्ष्मण - भारतातील सामाजिक कल्याण, प्रशासन आणि समाजकार्य, विद्या प्रकाशन, औरंगाबाद.


❑❑❑

# घटक – ३
# भारतातील मानवी हक्क
# (Human Rights in India)

**घटक संरचना**

३.१ उद्दिष्ट्ये

३.२ प्रस्तावना

३.३ विषय विवेचन

    ३.३.१ भारतीय राज्यघटना आणि मानवी हक्क

    ३.३.२ भारतातील ''राष्ट्रीय मानवी हक्क आयोग'' (संरचना आणि भूमिका)

    ३.३.३ भारतातील ''राष्ट्रीय अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आयोग'' (कार्ये)

३.४ सारांश

३.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे

३.६ सरावासाठी प्रश्न

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.१ उद्दिष्ट्ये :

'भारतातील मानवी हक्क' या घटकाच्या अध्ययनातून आपणांस पुढील बाबी जाणून घेता येतील.

- भारतीय राज्यघटनेत समाविष्ट मानवी हक्कासंबंधीच्या तरतुदी आपणांस जाणून घेता येतील.
- भारतातील 'राष्ट्रीय मानवी हक्क आयोग' या आयोगाची रचना व भूमिका (कार्य) या संबंधीची माहिती प्राप्त करून घेता येईल.
- भारतातील 'राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग' आणि 'राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग' या आयोगांची मानवी हक्कांच्या संदर्भाने कार्ये अभ्यासता येतील.

## ३.२ प्रस्तावना

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारताने भारतासाठी तयार केलेली भारतीय राज्यघटना २६ जानेवारी १९५० ला स्विकारली व लागू केली. आणि, भारत एक स्वतंत्र व सार्वभौम प्रजासत्ताक गणराज्य म्हणून अस्तित्वात आले. भारताने सुरुवातीपासुनच मानवी हक्कांचे समर्थन केले.

प्रत्येक नागरिकाला हे मानवी हक्क प्राप्त झाले पाहिजेत. यासाठी घटनात्मक, कायदेशीर तरतुदी केल्याच पण त्याचबरोबर त्यांच्या अंमलबजावणीकरीता यंत्रणा कार्यान्वित केल्या. कारण मानवी हक्काशिवाय व्यक्तीला आपल्या व्यक्तीमत्त्वाचा विकास साधणे शक्य नसते. इतकेच नव्हे तर मानवी हक्काशिवाय व्यक्तीला चांगल्या प्रकारे जीवन जगता येणार नाही. म्हणूनच प्रत्येक व्यक्तीला मानव या नव्याने जन्मतःच, स्वाभाविकपणे जे हक्क प्राप्त होतात ते मानवी हक्क मानवाच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग असतात. ते हक्क व्यक्तीच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाशी निगडीत झालेले असतात. म्हणूनच प्रत्येक व्यक्तीला मानवी हक्क प्राप्त झालेच पाहिजेत या हेतूने भारतात घटनात्मक, कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या. तसेच या मानवी हक्क अंमलबजावणीकरीता आवश्यक यंत्रणाही कार्यान्वित केल्या. यामध्ये प्रामुख्याने राष्ट्रीय स्तरावरून, 'राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग', 'बालहक्क संरक्षण कायदा २००५ साठी असणारा आयोग' यांचा समावेश होतो. प्रस्तुत प्रकरणात आपण भारतीय राज्यघटनेत समाविष्ट मानवी हक्कासंबंधीच्या तरतुदी जाणून घेणार आहोत. तसेच, 'राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची रचना व भूमिका (कार्ये)' आणि 'राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग', 'राष्ट्रीय अनुसचित जमाती आयोग' यांची मानवी हक्कांच्या संदर्भाने कार्ये पहाणार आहोत.

## ३.३ विषय विवेचन :

लोकशाही देशामध्ये प्रत्येक व्यक्तीला राज्यघटनेने मानवीहक्क प्राप्त व्हावेत यासाठी प्रयत्न केले आहेत. मानवी हक्कात अंतर्भूत होणाऱ्या हक्कामध्ये प्रामुख्याने 'जगण्याचा हक्क', 'अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण प्राप्ती', 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य', 'हिंसेपासून व भितीपासून मुक्ती', 'धार्मिक स्वातंत्र्य' यांचा समावेश होतो. हे सर्व हक्क आपल्या जगण्याचा भाग आहेत. या हक्कासंबंधी घटनात्मक तरतुदी व अमंलबजावणी यंत्रणा काय आहे? त्यांचे कार्य काय? या संदर्भाने विवेचन करणार आहोत.

### ३.३.१ भारतीय राज्यघटना आणि मानवी हक्क (Indian Constitution and Human Rights)

भारतीय राज्यघटनाकारांनी सर्व मानवी हक्कांचा केवळ पुरस्कार व समर्थनच केलेले नाही तर हे सर्व हक्क प्रत्येक भारतीय नागरीकाला प्राप्त झालेच पाहिजेत या दृष्टीने या सर्व हक्कांचा अंतर्भाव, तरतुदी राज्यघटनेत केलेल्या दिसून येतात. विशेष म्हणजे १० डिसेंबर १९४८ ला संयुक्त राष्ट्रांनी जो 'मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा १९४८' जाहीर केला. या जाहिरनाम्यातील मानवी हक्कांचे यथार्थ दर्शन २६ जानेवारी १९५० ला भारतात लागू केलेल्या भारतीय राज्यघटनेत होते. या सर्व पार्श्वभूमीवर असे म्हणता येते की, 'भारतीय राज्यघटना खऱ्या अर्थाने मानवी हक्कांचा आरसा आहे.' भारतीय राज्यघटनेतील 'मूलभूत हक्क', 'राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे' आणि 'नागरीकांची मूलभूत कर्तव्ये, मानवी हक्कांच्या संदर्भाने पुढीलप्रमाणे आपणांस जाणून घेता येतील.

#### अ) भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क

भारतीय राज्यघटनेच्या भाग तीनमध्ये कलम १२ ते ३५ मध्ये सुरुवातीला सात मूलभूत हक्क नागरीकांना देण्यात आले. तथापी १९७९ पासून ४४ व्या घटना दुरुस्तीने या सातपैकी एक असणारा

'मालमत्तेचा हक्क' रद्द करण्यात आला. त्यामुळे मुलभूत हक्कांची सध्या संख्या ०६ आहे. हे सहा हक्क पुढीलप्रमाणे–

**१) समतेचा हक्क (कलम १४ ते १८) :**

राज्यघटनेतील कलम १४ ते १८ ही समतेच्या हक्कांशी संबंधित आहेत. यातील कलमवार तरतुदी पुढीलप्रमाणे–

i) **कलम १४** : नुसार, राज्य कोणत्याही व्यक्तीला भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता किंवा कायद्याचे संरक्षण नाकारणार नाही. थोडक्यात, कायद्यापुढे सर्वजण समान असतील.

ii) **कलम १५** : नुसार, (अ) राज्य कोणत्याही नागरीकाला प्रतिकूल होईल अशा प्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान याआधारे किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून भेदभाव केला जाणार नाही, करता येणार नाही. (ब) कोणत्याही नागरीकांस धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या आधारे भेदभाव करून दुकाने, सार्वजनिक उपहारगृहे, सार्वजनिक मनोरंजन केंद्रे, सार्वजनिक विहिरी, तलाव, पाणवठे, सार्वजनिक वस्तीस्थाने, रस्ते येथे प्रवेश नाकारता येणार नाही. याठिकाणी सर्वजण समान असतील.

iii) **कलम १६** : नुसार, राज्याच्या नियंत्रणाखालील, अखत्यारीतील कोणत्याही रोजगार किंवा पदावरील नियुक्तीसंबंधी सर्वांना समान संधी असेल. धर्म, वंश, जात, लिंग याआधारे भेदभाव करून कोणालाही रोजगार किंवा पदनियुक्तीत अपात्र ठरवले जाणार नाही. तथापि या संदर्भाने काही विशिष्ट बाबतीत तरतुदी करण्याचा अधिकार राज्याला असेल. त्याचे विस्तृत विश्लेषण यामध्ये करण्यात आले आहे.

iv) **कलम १७** : नुसार, अस्पृश्यता नष्ट केली आहे. तसेच याबाबतीतील कोणतेही आचरण निषिद्ध ठरवण्यात आले आहे. तसेच, अस्पृश्यतेतून उद्‌भवणारी कोणतीही अपात्रता लागू करणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.

v) **कलम १८** : नुसार, जे किताब नागरिकात असमानता निर्माण करण्यास जबाबदार ठरू शकतात असे किताब देता येणार नाहीत. यासंदर्भाने कोणालाही परकीय किताब स्वीकारता येणार नाहीत. तथापि, राज्याच्या अखत्यारीतील लाभाचे किंवा विश्वासाचे पद धारण करणाऱ्या व्यक्तीस राष्ट्रपतींच्या संमतीनेच असे किताब स्वीकारता येतील अशी तरतुद करण्यात आली आहे.

**२) स्वातंत्र्याचा हक्क (कलम १९ ते २२)**

राज्यघटनेतील कलम १९ ते २२ मध्ये भारतीय नागरीकांना कोणत्या स्वरूपाचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे हे स्पष्ट होते. ती स्वातंत्र्ये पुढीलप्रमाणे

i) **कलम १९** : नुसार, ४४ व्या घटनादुरुस्तीपूर्वी सात व या घटनादुरुस्तीनंतर सहा प्रकारची स्वातंत्र्ये भारतीय नागरीकांना घटनेने दिली आहेत.

अ) भाषण व मतप्रदर्शन करण्याचे स्वातंत्र्य (अभिव्यक्ती स्वातंत्र्य)

ब) शांततामयरित्या व निःशस्त्रपणे एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य

क) संस्था व संघटना स्थापण्याचे स्वातंत्र्य

ड) भारतात कोठेही संचार करण्याचे स्वातंत्र्य

इ) कोणताही पेशा आचरण्याचा व कोणताही व्यवसाय, व्यापार, धंदा करणे - चालवण्याचे स्वातंत्र्य

ई) भारतात कोठेही वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य

फ) मालमत्ता मिळवणे, तिचे जतन करणे व तिची विल्हेवाट लावण्याचे स्वातंत्र्य

उपरोक्त स्वातंत्र्यापैकी मालमत्तेच्या स्वातंत्र्याचा हक्क ४४ व्या घटनादुरुस्तीने २० जून १९७९ पासून रद्द केल्याने सध्या सहा स्वातंत्र्ये आहेत. तसेच १६ व्या घटनादुरुस्तीने 'भाषण व मतप्रदर्शने करण्याचे स्वातंत्र्य' या हक्कावर काही बंधने घालण्यात आली आहेत.

ii) **कलम २०** : नुसार (अ) कोणत्याही व्यक्तीवर प्रचलित कायद्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही आधारे, कोणत्याही कारणास्तव आरोप ठेवला जाणार नाही, शिक्षा देता येणार नाही. तसेच, (ब) कोणत्याही व्यक्तीस एकाच गुन्ह्यासाठी अधिकवेळा आरोपित करता येणार नाही, शिक्षा देता येणार नाही. (क) आरोपीवर स्वतःविरुद्ध साक्ष देण्याची सक्ती केली जाणार नाही.

iii) **कलम २१** : नुसार, प्रचलित कायदा सोडून इतर कोणत्याही आधारे व्यक्तीचे जिवित व वैयक्तिक स्वातंत्र्य हिरावून घेतले जाणार नाही.

iv) **कलम २२** : नुसार, अटक केलेल्या व्यक्तीस अटकेची कारणे त्वरीत सांगून २४ तासाच्या आत मॅजिस्ट्रेट समोर उभे करणे बंधनकारक असेल. तसेच अटकेतील व्यक्तीस तिच्या पसंतीच्या वकिलाचा सल्ला घेण्यापासून वंचित ठेवता येणार नाही. अशी तरतूद करण्यात आली. (परंतु, या तरतुदी विदेशी शत्रुला किंवा प्रतिबंधित कायद्याद्वारे अटक केलेल्या व्यक्तीला लागू असणार नाही.

**३) शोषणाविरुद्ध किंवा पिळवणुक विरुद्धचा हक्क (कलम २३ व २४)**

कोणत्याही प्रकारच्या शोषण, पिळवणुकीमुळे माणसाचा एक माणूस म्हणून जगण्याचा हक्कच हिरावून घेतल्यासारखे होते. असे शोषण, पिळवणूक होऊ नये यासाठी भारतीय राज्यघटनेत शोषण किंवा पिळवणुक विरुद्धच्या हक्कांची तरतूद करण्यात आली आहे. ती पुढीलप्रमाणे

i) **कलम २३** : नुसार, माणसाचा अपव्यापार किंवा दुर्व्यापार करणे, वेठबिगारी प्रथा व यासारख्या अन्य स्वरूपातील वेठबिगारी, सक्तीने श्रम करून घेणे यावर बंदी घालण्यात आली आहे.

ii) **कलम २४** : नुसार, चौदा वर्षाखालील कोणत्याही बालकास, कोणत्याही कारखान्यात, खाणीत अथवा अन्य कोणत्याही धोकादायक कामावर ठेवता येणार नाही.

### ४) धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क (कलम २५ ते २८)

'धर्मनिरपेक्षता' हा राज्यघटनेचा मुलभूत गुणधर्म आहे. म्हणून १९७६ साली ४२ व्या घटनादुरुस्तीद्वारे राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये 'धर्मनिरपेक्ष' हे विशेषण नव्याने अंतर्भूत करण्यात आले. भारताच्या संदर्भातून विचार करता धर्मनिरपेक्ष म्हणजे, राज्य कोणत्याही धर्माचा अनुनय करीत नाही व दुसरे म्हणजे, राज्यासाठी सर्व धर्म समान आहेत. घटनेच्या कलम २५ ते २८ मध्ये धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क अंतर्भूत आहे. तो पुढीलप्रमाणे

i) **कलम २५** : नुसार हिंदू या शब्दात शीख, जैन व बौद्ध धर्म अनुसरणाऱ्या व्यक्तींचा अंतर्भाव केलेला आहे. तसेच स्वतःजवळ 'कृपाण' बाळगणे ही बाब शीख धर्मांतर्गत असल्याचे स्पष्ट केले आहे. कलम २५ (१) नुसार, सार्वजनिक सुव्यवस्था, नितीमत्ता व स्वास्थ्य यांच्या अधिनतेने सद्सद् विवेकबुद्धीच्या स्वातंत्र्याला आणि धर्म मुक्तपणे प्रकट करण्याच्या व आचरण करण्याचा सर्व व्यक्तींना समान अधिकार आहे.

ii) **कलम २६** : नुसार, धार्मिक कार्यासाठी संस्था स्थापन करण्याचा व त्या चालवण्याचा तसेच, धार्मिक व्यवहाराची व्यवस्था पाहण्याचा व त्यासंदर्भाने स्थावर व जंगम मालमत्ता मिळवण्याचा, सांभाळण्याचा व कायद्यानुसार या संपत्तीचे प्रशासन चालवण्याचा अधिकार सर्व धर्मातील व्यक्तींना समान आहे.

iii) **कलम २७** : नुसार, कोणालाही आपला धर्म वाढवण्याकरीता किंवा पाळण्याकरीता मिळवलेल्या संपत्तीवर कर देण्याची सक्ती केली जाणार नाही.

iv) **कलम २८** : नुसार, राज्याच्या निधीतून चालणाऱ्या शिक्षणसंस्थेत धार्मिक शिक्षण देता येणार नाही. तथापि, धार्मिक शिक्षण देण्याच्या उद्देशाने स्थापन केलेल्या शिक्षणसंस्थेत धार्मिक शिक्षण देता येईल. तसेच राज्याकडून अर्थसहाय्य घेणाऱ्या संस्थेत धार्मिक शिक्षण दिले जात असेल तर ते शिक्षण घेण्याची, तेथील धार्मिक कार्यात सहभागी होण्याची सक्ती करता येणार नाही.

### ५) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क (कलम २९ व ३०)

भारतीय राज्यघटनेतील कलम २९ व ३० च्या तरतुदीतून सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क स्पष्ट केले आहेत. ते पुढीलप्रमाणे

i) **कलम २९** : नुसार, भारतात कोणत्याही भागात राहणाऱ्या नागरीकांच्या गटास त्यांची स्वतःची वेगळी भाषा, लिपी व संस्कृती जतन करण्याचा हक्क आहे. तसेच, राज्याद्वारे किंवा राज्याच्या अनुदानावर चाललेल्या शिक्षणसंस्थेत धर्म, वंश, जात, भाषेच्या आधारे प्रवेश नाकारता येणार नाही.

ii) **कलम ३०** : नुसार भाषिक, धार्मिक अल्पसंख्यांकांना त्यांच्या पसंतीप्रमाणे शिक्षणसंस्था स्थापण्याचा व चालवण्याचा हक्क आहे. राज्य त्यांना अनुदान नाकारणार नाही.

**६) घटनात्मक उपाय योजण्याचा अधिकार (कलम ३२)**

उपरोक्त मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्यास, या हक्कांवर आक्रमण झाल्यास दाद मागण्याचा, घटनात्मक उपाय योजण्याचा हक्कही घटनेने दिला आहे. कलम ३२ नुसार या संदर्भात उच्च व सर्वोच्च न्यायालयांना पुढील पाच आदेश काढण्याचा अधिकार आहे.

i) **बंदी प्रत्यक्षीकरण किंवा देहोपस्थिती :** एखाद्या व्यक्तीस बेकायदेशीरपणे अटक किंवा बंदिवान केले असल्यास त्या व्यक्तीला किंवा तिच्या संबंधितांना त्याविरुद्ध न्यायालयाकडे बंदी प्रत्यक्षीकरणाचा अर्ज करून दाद मागता येते.

ii) **परमादेश किंवा महादेश :** दिलेल्या आदेशाप्रमाणे कृती करण्याचा आदेश उच्च किंवा सर्वोच्च न्यायालय एखाद्या व्यक्तीला, शासकीय अधिकारी, कनिष्ठ न्यायालय इ. ना. देऊ शकते.

iii) **प्रतिषेध :** कनिष्ठ न्यायालयाने आपल्या अधिकारक्षेत्राच्या बाहेरील खटला चालवू नये असा आदेश उच्च किंवा सर्वोच्च न्यायालय देऊ शकते.

iv) **अधिकारपृच्छा :** एखादा अधिकार नसताना तो अधिकार घेणाऱ्या व्यक्तीस संबंधित अधिकार सोडायला लावण्याचा आदेश म्हणजे अधिकार पृच्छा आदेश होय.

v) **उत्प्रेषण किंवा प्राकर्षण :** न्यायदानाचा अधिकार असलेल्या निमसरकारी संस्था, कनिष्ठ न्यायालय यांच्याकडे असणाऱ्या न्यायप्रविष्ट प्रकरणाबाबतीत वरीष्ठ न्यायालयाने निर्णय देणे योग्य आहे असे वरिष्ठ न्यायालयाचे मत बनल्यास ते संबंधित प्रकरणाची कागदपत्रे व पुरावे स्वतःकडे मागवण्याचा आदेश संबंधिताना देऊ शकते.

**ब) राज्यघटनेतील राज्याच्या धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे आणि मानवी हक्क**

भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागाअंतर्गत कलम ३६ ते ५१ मध्ये राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे स्पष्ट करण्यात आली आहेत. जरी या तत्त्वांची न्यायालयाद्वारे अंमलबजावणी करता येत नसली तरी कायदे करताना ही तत्त्वे लागू करण्याचे कर्तव्य राज्याचे असेल असे घटनेने स्पष्ट केले आहे. म्हणूनच या तत्त्वांना प्रमाण मानून केंद्र व राज्य सरकारांनी नागरीकांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करणारे विविध कायदे केले आहेत. म्हणूनच भारतीय राज्य घटनेतील 'राज्याच्या धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे' ही मानवी हक्कांच्या प्राप्तीसाठी, संरक्षणासाठी खुपच सहाय्यक ठरतात. राज्याच्या धोरणांची मानवी हक्कांच्या संदर्भाने काही विशेष तत्त्वे पुढीलप्रमाणे–

i) **कलम ३८** : नुसार, राज्य विविध लोकसमूहात उत्पन्नाच्या बाबतीतील विषमता किमान पातळीवर आणण्याचे प्रयत्न करील. दर्जा, सुविधा व संधीतील विषमता नष्ट करण्याचे प्रयत्न करील.

ii) **कलम ३९** : नुसार, स्त्री-पुरुषांना उपजीविकेची पुरेशी साधने मिळवण्याचा हक्क आहे, तसेच जीच्यामुळे समाजाचे अहित होईल अशी अर्थव्यवस्था अंमलात नसावी, स्त्री व पुरुष यांना समान कामास

समान वेतन मिळावे, नागरीकांना त्यांचे वय किंवा शक्ती यांना न पेलवणारा व्यवसाय करण्यास भाग पाडले जाणार नाही. युवक व बालक यांचे शोषणापासून व नैतिक आणि भौतिक गरजांच्या बाबतीत होणाऱ्या उपेक्षेपासून संरक्षण व्हावे.

iii) **कलम ४१** : नुसार, राज्य आपली आर्थिक स्थिती व विकासानुसार शिक्षणासाठी तसेच बेकारी, वार्धक्य, दिव्यांगत्त्व इ. मुळे प्राप्त झालेल्या कमकुवत आर्थिक स्थितीतील व्यक्तींना सार्वजनिक मदत मिळवून देण्यासाठी योजना राबवतील.

iv) **कलम ४३** : नुसार, शेती, उद्योगधंदा आणि इतर सर्व क्षेत्रातील कामगारांना योग्य काम, योग्य वेतन आणि कामाच्या ठिकाणची चांगली परिस्थिती, सेवा-सुविधा राज्य कायदे करून किंवा आर्थिक संघटन अथवा अन्य रितीने उपलब्ध करून देईल. राज्य गामीण भागात ग्रामोद्योग वाढवण्याचा प्रयत्न करील.

v) **कलम ४४** : नुसार, नागरीकांना भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र समान नागरी कायदा लागू करण्याचा राज्य प्रयत्न करेल.

vi) **कलम ४५** : वय वर्ष १४ पर्यंत सर्व मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळेल अशी योजना राज्यघटना लागू झाल्यापासून दहा वर्षाच्या आत राज्य करेल.

vii) **कलम ४६** : राज्य, दुर्बल वर्गाचे विशेषतः अनुसूचित जाती-जमातींच्या शैक्षणिक व आर्थिक हितसंबंधांची काळजी घेईल व सामाजिक अन्याय तसेच सर्व प्रकारच्या शोषणापासून त्यांचे रक्षण करील.

viii) **कलम ४७** : सार्वजनिक आरोग्य हे प्राथमिक कर्तव्यातील कर्तव्य आहे असे राज्य मानील आणि औषधाच्या उपयोगाव्यतिरीक्त मादक पेये, अंमली पदार्थ जे आरोग्याला हानीकारक आहेत त्यांच्या सेवनावर बंदी घालेल.

ix) **कलम ५१** : नुसार, राज्य पुढील बाबीसाठी प्रयत्न करेल. अ) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा यांचे संवर्धन करणे, ब) राष्ट्रा-राष्ट्रात न्याय व सन्मानाचे संबंध स्थापणे, क) आंतरराष्ट्रीय कायदा व तहातील बाबी (अटी) संदर्भात आदर वाढवणे, ड) आंतरराष्ट्रीय कलह लवादामार्फत सोडविण्यास उत्तेजन देणे

### क) भारतीय राज्यघटनेतील नागरीकांची मूलभूत कर्तव्ये आणि मानवी हक्क

नागरीकांची एक 'नागरीक' म्हणून कोणती कर्तव्ये आहेत किंवा असली पाहिजेत हे स्पष्ट करण्यासाठी 'स्वर्णसिंग समिती'च्या शिफारसीनुसार ४२ व्या घटनादुरुस्तीद्वारे राज्यघटनेत नव्याने 'भाग ४-अ' व 'कलम ५१-अ' समाविष्ट केले. यामध्ये प्रथम १० आणि सन २००० सालापासून ८६ व्या घटनादुरुस्तीद्वारे ०१ अशी एकूण सध्या ११ कर्तव्ये स्पष्ट केली आहेत. ही कर्तव्ये मानवी हक्कांच्या प्राप्तीसाठी व संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण ठरतात. अशी ही कर्तव्ये पुढीलप्रमाणे-

१) राज्यघटनेचे पालन व तिचे आदर्श, संस्था, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे.

२) स्वातंत्र्यलढ्यात प्रेरक ठरलेल्या उदात्त आदर्शाप्रती आस्था बाळगणे व त्यांचे अनुसरण करणे.

३) भारताचे सार्वभौमत्त्व, ऐक्य व एकात्मता यांना पाठिंबा देऊन त्यांचे रक्षण करणे.

४) देशाचे रक्षण करणे व आवाहन केल्यानंतर राष्ट्रीय सेवा करणे

५) धार्मिक, भाषिक, प्रांतिक किंवा विभागीय भेदांच्या पलीकडे जाऊन सर्व भारतीयात ऐक्य व बंधुत्वाची भावना वाढलणे. तसेच, स्त्रियांच्या प्रतिष्ठेच्या विरुद्ध अशा प्रथांचा त्याग करणे.

६) आपल्या संमिश्र संस्कृतीचा समृद्ध वारसा जपणे व त्याचा आदर करणे.

७) वने, सरोवरे, नद्या व वन्यजीव आदिसह नैसर्गिक पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे आणि प्राणीमात्राबद्दल अनुकंपा बाळगणे.

८) वैज्ञानिक दृष्टीकोण, मानवतावाद, चौकसवृत्ती आणि सुधारणावादी दृष्टी यांचा विकास करणे.

९) सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे आणि हिंसेचा निगृहपूर्वक त्याग करणे.

१०) व्यक्तीगत व सामूहिक कार्याच्या क्षेत्रात उत्कृष्टता साध्य करणे व राष्ट्र सतत वरच्या पातळीवर प्रगत होत राहिल असा प्रयत्न करणे.

११) (८६ वी घटनादुरुस्तीद्वारे सन २००० पासून) 'पित्याने अपत्यास, पालकाने पाल्यास वयवर्ष ०६ ते १४ पर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.'

उपरोक्त पद्धतीने भारतीय राज्यघटना व त्यातील मानवीहक्क स्पष्ट करता येतात. मानवी हक्कात अंतर्भूत होणाऱ्या हक्कामध्ये प्रामुख्याने जगण्याचा हक्क, अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्यप्राप्ती, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, हिंसेपासून व भितीपासून मुक्ती, धार्मिक स्वातंत्र्य यांचा समावेश होतो. हे सर्व हक्क आपल्या जगण्याचा भाग आहेत आणि भारतीय राज्यघटनेच्या उपरोक्त अध्यनातून हे स्पष्ट होते की, या सर्व मानवी हक्कांचे यथार्थ दर्शन आपल्या राज्यघटनेत होते.

### ३.३.२ भारतातील 'राष्ट्रीय मानवी हक्क आयोग' (संरचना आणि भूमिका) (National Human Right's Commision in India – Structure and Role)

भारतात भारतीय राज्यघटनाकारांनी मानवी हक्कांच्या प्राप्तीसाठी तरतुदी केल्या. प्रत्येक भारतीय नागरिकाला हे मानवी हक्क प्राप्त झालेच पाहिजेत यासाठी त्यांच्या अंमलबजावणीसाठीच्या वैधानिक यंत्रणाही कार्यान्वीत करण्यात आल्या. यामध्ये 'राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचा' प्रामुख्याने समावेश होतो. प्रस्तुत ठिकाणी आपण या 'राष्ट्रीय मानवी हक्क आयोगा'च्या स्थापनेमागील पार्श्वभूमी, आयोगाची रचना आणि आयोगाची भूमिका किंवा कार्ये पहाणार आहोत.

**अ) पार्श्वभूमी :** व्हिएन्ना या ठिकाणी मानवी हक्कासंबंधीची आंतरराष्ट्रीय परिषद १९९३ ला संपन्न झाली. सदर परिषदेतील सहभागी राष्ट्रांनी मानवी हक्कासंदर्भात अधिक दक्ष राहण्याचा निर्णय घेतला. या आनुषंगाने भारताने, 'मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३' हा कायदा संमत केला. या कायद्यातील तरतुदीनुसार १२ ऑक्टोबर १९९३ ला भारतात 'राष्ट्रीय मानव अधिकार आयोग'ची स्थापना करण्यात

आली. हा आयोग एक वैधानिक संस्था आहे. या आयोगाचे 'सर्वे भवन्तु सुखिनः' हे बोधवाक्य आहे. आयोगाचे मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे. आयोगाचे पहिले अध्यक्ष न्यायमुर्ती रंगनाथ मिश्रा हे होते. तर वर्तमान अध्यक्ष न्यायमूर्ती अरुणकुमार मिश्रा असून वर्तमान महासचिव श्री. आर. के. भार्गव हे आहेत. अशा या राष्ट्रीय मानवी आयोगाची रचना व भूमिका आपण पहाणार आहोत.

**ब) राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची रचना**

**१) अध्यक्ष व सदस्य :** राष्ट्रीय मानवी हक्क आयोगात एक अध्यक्ष व नियुक्त, पदसिद्ध असे एकूण ८ सदस्य असतात.

i) अध्यक्ष हे सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीशपद भूषविलेली व्यक्ती असतात.

ii) सदस्यामध्ये एक सदस्य सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधिशपद भूषविलेली व्यक्ती असतात.

iii) एक सदस्य उच्च नयायालयाचे मुख्य न्यायाधिशपद भूषविलेली व्यक्ती असतात.

iv) दोन सदस्य हे मानवी हक्कांशी संबंधित ज्ञान किंवा व्यावहारिक अनुभव असलेल्या व्यक्ती असतात.

v) 'अनुसूचित जमातीसाठीचा राष्ट्रीय आयोग', 'अनुसूचित जातीसाठीचा राष्ट्रीय आयोग', 'राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग' आणि 'राष्ट्रीय महिला आयोग' या चार राष्ट्रीय आयोगांचे अध्यक्ष हे या 'राष्ट्रीय मानवी हक्क आयोगा'चे पदसिद्ध सदस्य असतात.

vi) याशिवाय एक व्यक्ती आयोगाचा 'सचिव' म्हणून नियुक्त असते.

**२) अध्यक्ष व सदस्यांची नेमणूक :** या आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांच्या नावांची शिफारस राष्ट्रपतींना करण्यासाठी एक समिती असते. या समितीचे अध्यक्ष पंतप्रधान असतात. तर लोकसभा अध्यक्ष, केंद्रीय गृहमंत्री, लोकसभा विरोधी पक्षनेता, राज्यसभा विरोधी पक्षनेता, राज्यसभेचे उपसभापती हे पाच या समितीचे सदस्य असतात.

उपरोक्त समितीच्या शिफारसीनंतर अध्यक्ष व सदस्यांची नेमणूक राष्ट्रपती करतात.

**३) अध्यक्ष व सदस्यांचा कार्यकाल :** राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांचा अध्यक्ष, सदस्य म्हणून कार्यकाल मर्यादा ही नेमणुकीपासून पाच वर्षे किंवा त्यांच्या वयाची ७० वर्षे होण्याचा दिनांक यापैकी जे प्रथम येईल तिथपर्यंत अध्यक्ष व सदस्यांचा कार्यकाल असतो.

**४) पदच्युतीची कारणे :**

i) अध्यक्ष किंवा सदस्य यापैकी कोणावर गैरवर्तनाचा, अकार्यक्षमतेचा आरोप झाल्यास व तो सर्वोच्च न्यायालयाकडून चौकशीत सिद्ध झाल्यास संबंधितांना राष्ट्रपती पदच्युत करतात.

ii) अध्यक्ष किंवा सदस्य यापैकी कोणाचा नादार, वेडेपणा सिद्ध झाल्यास संबंधितांना राष्ट्रपती पदच्युत करू शकतात.

iii) अध्यक्ष किंवा सदस्य या पदावर कार्यरत असताना इतरत्र पगारी नोकरी करत असल्याचे सिद्ध झाल्यास संबंधितांना राष्ट्रपती पदच्युत करू शकतात.

iv) जर नैतिक अधःपतनाच्या गुन्ह्यात दोषी ठरविले गेले किंवा तुरुंगवासाची शिक्षा झाली तर संबंधितांना राष्ट्रपती पदच्यूत करू शकतात.

**क) राष्ट्रीय मानवीहक्क आयोगाची भूमिका/कार्ये**

१) आयोगाकडे दाखल झालेल्या तक्रारीची दखल घेऊन तपासाचे आदेश देणे. यामध्ये, मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्यास ते करणाऱ्यांची किंवा त्यांना सहाय्य करणाऱ्यांची दखल घेणे तसेच, मानवी हक्कांच्या उल्लंघनास प्रतिबंध करण्याच्या आपल्या कर्तव्याकडे शासकीय कर्मचाऱ्यांने दुर्लक्ष केले आहे अशा दुर्लक्षाची दखल घेणे.

उपरोक्त संदर्भात तक्रार पीडित व्यक्ती स्वतः किंवा तिच्या वतीने इतर कोणीही करू शकते.

२) न्यायालयात मानवी हक्कांच्या उल्लंघनाचे एखादे प्रकरण प्रलंबित असेल तर संबंधित न्यायालयाच्या संमतीने सदर प्रकरणात हस्तक्षेप करणे.

३) राज्य सरकारला पुर्वसूचना देऊन सरकारच्या अखत्यारीत असलेल्या कारागृहाला अथवा ज्या ठिकाणी व्यक्तींना स्थानबद्ध केले आहे किंवा उपचार, संरक्षण अथवा सुधारण्यासाठी दाखल केले आहे तेथील परिस्थिती व संबंधित व्यक्तींच्या स्थितीची पहाणी करून आवश्यकता असल्यास तेथे कराव्या लागणाऱ्या सुधारणा, उपाययोजनाबाबत संबंधित यंत्रणांना, सरकारला सूचना देणे.

४) मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी राज्यघटनेतील किंवा प्रचलित कायद्यातील तरतुदींचे समीक्षण करणे व त्या तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी व त्या जास्तीत जास्त परिणामकारक ठराव्यात यासाठी सूचना करणे.

५) मानवी हक्कांच्या पालनाला प्रतिबंध करणाऱ्या दहशतवादी कृत्याला कारणीभूत असलेल्या घटकांचे व घटनांचे समीक्षण करून आवश्यक त्या उपाययोजना सुचविणे.

६) मानवी हक्कासंबंधीचे करार व त्यावरील आंतरराष्ट्रीय विचारप्रवाहांचा अभ्यास करून त्यांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी उपाययोजना सुचविणे.

७) मानवी हक्कासंबंधीची संशोधने हाती घेणे व त्याला प्रोत्साहन देणे.

८) समाजाच्या विविध घटकात मानवी हक्क साक्षरतेचा प्रसार करणे त्यासाठी प्रसारमाध्यमे, परिसंवाद आणि अन्य माध्यमांचा वापर करणे.

९) मानवी हक्काच्या क्षेत्रात कार्यरत बिगरशासकीय संघटना (एन.जी.ओ.) च्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे.

१०) मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी असलेली व आवश्यक अशी अन्य कामे करणे.

**ड) आयोगाचे अधिकार :**

राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाला आपली कार्ये पार पाडण्यासाठी निश्चितच काही अधिकारांची गरज असते. याचा विचार करून सदर आयोगास पुढील अधिकार प्राप्त आहेत.

१) कोणत्याही व्यक्तीस साक्षीदार म्हणून पाचारण करणे.

२) साक्षीसाठी पाचारण केलेल्या व्यक्तीस शपथपूर्वक साक्ष देण्यास सांगणे.

३) आयोगासमोरील कोणत्याही प्रकरणासंबंधीची कागदपत्रे आयोगासमोर हजर करण्यास सांगणे.

४) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून सार्वजनिक स्वरूपाची कागदपत्रे मागवणे.

५) या आयोगास 'दिवाणी न्यायालय' म्हणून मान्यता असल्याने या आयोगास न्यायालयाचे अधिकार प्राप्त होतात.

**इ) अहवाल :**

राष्ट्रीय मानवी हक्क आयोग आपला 'वार्षिक अहवाल' तसेच आयोगाला आवश्यक वाटणारा आपला 'विशेष अहवाल' केंद्र सरकार व संबंधित राज्य सरकारला सादर करतो. हे अहवाल केंद्र सरकार संसदेपुढे व राज्य सरकार 'राज्यकायदेमंडळा'पुढे ठेवते.

उपरोक्त पद्धतीने भारतात मानवी हक्कांच्या संरक्षण व संवर्धनासाठी, अंमलबजावणीसाठी असणाऱ्या यंत्रणापैकी एक 'राष्ट्रीय मानवी हक्क आयोग' असून वरीलप्रमाणे त्याची रचना व कार्ये आहेत की ज्यायोगे हा आयोग मानवी हक्कांच्या क्षेत्रात कार्य करतो.

**३.३.३ भारतातील 'राष्ट्रीय अनुसूचित जाती' आणि 'अनुसूचित जमाती आयोग' (कार्ये)** (National Scheduled Caste's and Scheduled Tribe's Commision in India)

भारतीय राज्यघटनेतील कलम ३३८ मध्ये अशी तरतूद करण्यात आली की 'अनुसूचित जाती' व 'अनुसूचित जमाती'च्या विकासासाठी एक आयोग स्थापन करण्यात यावा. अनुसूचित जाती व जमातींचे होणारे शोषण व पिळवणूक रोखण्यासाठी तसेच त्यांचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दर्जा सुधारणे आणि त्यांना दिलेल्या घटनात्मक संरक्षण तरतुदींची योग्य व परिणामकारक अंमलबजावणी व्हावी या उद्देशाने या आयोगाची स्थापना करण्यात आली. सुरवातीला हा आयोग 'राष्ट्रीय अनुसूचित जाती व जमाती आयोग' या नावाने कार्यरत झाला. परंतु सन २००३ मध्ये ८९ व्या घटनादुरुस्तीनुसार 'अनुसूचित जाती'करीता स्वतंत्र व 'अनुसूचित जमाती' करीता स्वतंत्र असे दोन आयोग स्थापन करण्याची तरतुद करण्यात आली.

'राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग' व 'राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग' असे दोन स्वतंत्र आयोग असले तरी त्यांची रचना व कार्ये एकसारखीच किंवा समान आहेत. ती पुढीलप्रमाणे जाणून घेता येतील.

**अ) रचना :**

भारतातील 'राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग' व 'राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग' या आयोगांची रचना–

**१) अध्यक्ष व सदस्य** : या आयोगामध्ये एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष आणि तीन सदस्य असतात. यांची नियुक्ती राष्ट्रपती संसदेच्या कायद्यानुसार करतात.

ब) 'राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग' व 'राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग' यांची कार्ये

१) अनुसूचित जाती व जमातींना राज्यघटनेने, कायद्याने व सरकारी आदेशाने दिलेल्या संरक्षण तरतुदींचे अन्वेषण, नियमन व मूल्यमापन करणे.

२) अनुसूचित जाती व जमातींना त्यांच्या हक्कापासून आणि संरक्षक उपाययोजनांपासून वंचित केल्यासंबंधीच्या तक्रारींची चौकशी करणे.

३) अनुसूचित जाती व जमातींच्या सामाजिक–आर्थिक विकासाच्या नियोजन प्रक्रियेमध्ये सहभागी होणे व सल्ला देणे आणि केंद्र व घटकराज्यांच्या अखत्यारीतील विकासाचे मूल्यमापन करणे.

४) अनुसूचित जाती व जमातींच्या संरक्षण तरतुदीविषयीच्या कार्याचा अहवाल दरवर्षी तसेच आयोगाला योग्य वाटेल अशावेळी राष्ट्रपतींना सादर करणे.

५) आयोगाने अहवालात नमूद केलेल्या संरक्षक तरतुदींचा, उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठीच्या उपाययोजनासंबंधी शिफारसी करणे.

६) अनुसूचित जामी व जमाती यांचे संरक्षण, कल्याण, सामाजिक व आर्थिक विकास याकरीता आवश्यक उपाययोजना बाबत व त्यांची अंमलबजावणी संघ व घटक राज्यांनी करावी याबाबत शिफारस करणे.

७) अनुसूचित जाती व जमाती यांचे संरक्षण, कल्याण, विकास आणि अभिवृद्धी यासंबंधात संसदेने केलेल्या कायद्यातील तरतुदींच्या आधिन राहून राष्ट्रपतीनी नियमांद्वारे निश्चित केलेली इतर कर्तव्ये, कार्ये पार पाडणे.

उपरोक्तप्रमाणे भारतात अनुसूचित जाती व जमातींच्या सर्वांगीण विकासासाठी 'राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग' व 'राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग' कार्यरत आहेत.

## ३.४ सारांश

भारतातील प्रत्येक नागरीकाला मानवी हक्क उपभोगता यावेत यासाठी घटनाकारांनी त्यासंबंधीच्या विविध तरतुदी भारतीय राज्यघटनेत सविस्तरपणे केलेल्या आहेत. तसेच या मानवी हक्क विषयी तरतुदींच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठीची यंत्रणाही भारताने कार्यरत केली आहे. याचाच एक भाग म्हणून

'राष्ट्रीय मानवी हक्क आयोग' व 'राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग', 'राष्ट्रीय अनुसुचित जमाती आयोग' भारतात कार्यरत आहेत.

## ३.५ स्वयं-अध्ययन प्रश्न

१) भारताने भारतीय राज्यघटना .......... ला स्विकारली व लागू केली.

अ) १५ ऑगस्ट १९४७ ब) २६ जानेवारी १९५०

क) २६ जानेवारी १९४८ ड) १५ ऑगष्ट १९५०

२) भारतीय राज्यघटनेतील कलम .......... ते कलम ............ मध्ये स्वातंत्र्याच्या हक्कासंबंधी तरतुदी करण्यात आल्या आहेत.

अ) कलम १४ ते १८ ब) कलम ५ ते ९

क) कलम २३ ते २८ ड) कलम १९ ते २२

३) घटनेच्या कलम .......... नुसार अस्पृश्यता नष्ट करण्यात आली.

अ) कलम १७ ब) कलम १६ क) कलम १८ ड) कलम १९

४) भारतीय राज्यघटनेत १९७९ पासून नागरीकांसाठीचे .......... मूलभूत हक्क समाविष्ट आहेत.

अ) सात ब) सहा क) पाच ड) अकरा

५) भारतीय राज्यघटनेतील १६ व्या घटनादुरुस्तीद्वारे .......... स्वातंत्र्य हक्कावर काही बंधने घालण्यात आली.

अ) भाषण व मतप्रदर्शनाचे स्वातंत्र ब) भारतात कोठेही वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य

क) भारतात कोठेही संचार करण्याचे स्वातंत्र्य ड) कोणताही व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य

६) राष्ट्रीय मानवीहक्क आयोगाचे प्रथम अध्यक्ष ................ होते.

अ) न्यायमूर्ती अरुणकुमार मिश्रा ब) जयदिप गोविंद

क) न्यायमूर्ती रंगनाथ मिश्रा ड) विजय सांपला

७) राष्ट्रीय मानवीहक्क आयोगाची स्थापना ............... साली करण्यात आली.

अ) १९९२ ब) १९९३ क) १९९४ ड) १९९५

८) राष्ट्रीय मानवीहक्क आयोगाचे अध्यक्ष ......... असतात.

अ) सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधिशपद भूषविलेली व्यक्ती

ब) उच्च न्यायालयाचे न्यायाधिशपद भूषवलेली व्यक्ती

क) उपराष्ट्रपती ड) मुख्य सचिव

९) ........... व्या घटनादुरुस्तीनुसार, 'अनुसूचित जाती' व 'अनुसूचित जमाती' करीता स्वतंत्र आयोग स्थापन करण्याची तरतुद करण्यात आली.

अ) ४२ व्या ब) ३६ व्या क) ८९ व्या ड) ५६ व्या

१०) 'राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग' आपला वार्षिक अहवाल ....... यांच्याकडे सादर करतात.

अ) पंतप्रधान ब) लोकसभा अध्यक्ष क) राज्यसभा अध्यक्ष ड) राष्ट्रपती

**स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

१) २६ जानेवारी १९५० (ब)

२) कलम १९ ते २२ (ड)

३) कलम १७ (अ)

४) सहा (ब)

५) भाषण व मतप्रदर्शनाचे स्वातंत्र्य (अ)

६) रंगनाथ मिश्रा (क)

७) १९९३ (ब)

८) सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधिशपद भूषवलेली व्यक्ती (अ)

९) ८९ व्या (क)

१०) राष्ट्रपती (ड)

## ३.६ सरावासाठी प्रश्न

१) भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क स्पष्ट करा.

२) राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची रचना लिहा.

३) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोगाची रचना लिहा.

४) राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचे कार्य स्पष्ट करा.

५) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोगाची कार्ये स्पष्ट करा.

## ३.७ संदर्भ

१) प्रा. पी. के. कुलकर्णी : मानवीहक्क व सामाजिक न्याय

२) य. च. म. मु. वि. नाशिक : मानवीहक्क आणि भारतीय राज्यघटना

३) य. च. म. मु. वि. नाशिक : मानवीहक्क आणि अंमलबजावणी यंत्रणा.

४) प्रा. चंद्रकांत खंडागळे : मानवीहक्क

५) शिवाजी विद्यापीठ, दूरशिक्षण केंद्र : मानवीहक्क

६) विकीपिडीया

❑❑❑

# घटक – ४
# भारतातील मानवी हक्कांचे उल्लंघन
# (Violation of Human Rights in India)

**घटक संरचना**


४.१ उद्दिष्टे

४.२ प्रस्तावना

४.३ विषय विवेचन

४.३.१ मानवी तस्करी (Human Trafficking)

४.३.२ प्रतिष्ठेसाठीची हत्या (Honor Killing)

४.३.३ दुर्विहित हत्या वा झुंडबळी (Mob Lynching)

४.४ सारांश

४.५ स्वयं अध्ययना प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी प्रश्न

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## ४.१ उद्दिष्टे (Objectives)

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास –

- मानवी तस्करी अर्थ, कारणे व उपाययोजना स्पष्ट होईल.
- प्रतिष्ठेसाठीची हत्या वा सन्माान हत्याऱ्याची अर्थ, कारणे व उपाययोजनाची माहिती प्राप्त होईल.
- झुंडबळी याचा अर्थ, कारणे व उपाययोजना माहिती प्राप्त होईल.

## ४.२ प्रस्तावना (Introduction)

समाजातील प्रत्येक व्यक्तीला मानव या नात्याने जन्मापासूनच स्वाभाविकपणे वा नैसर्गिक काही हक्क प्राप्त होतात. त्यास मानवी हक्क म्हणतात. मानवी हक्क हे मानवाच्या व्यक्तीमत्त्वाचा अविभाज्य भाग असतात. मानवी हक्कांमध्ये अंतर्भूत होणारे हक्क म्हणजे जीवन जगण्याचा हक्क, अन्न, वस्त्र, निवारा, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, हिंसेपासून मुक्तता, धार्मिक स्वातंत्र्य इत्यादी होत. परंतु हे सर्व मानवी हक्क असले तरी अशी काही कृत्य समाजात घडून येत आहेत की त्यामुळे मानवी हक्काचे उल्लंघन करून समाजात दहशत, हिंसा पसरवली जात आहे.

भारतात मानवी हक्कांचे उल्लंघन करणारे वर्तन हे एक गुन्हेगारी कृत्य आहे. यामध्ये घटक चारमध्ये मानवी हक्कांच्या उल्लंघन करणारे कृत्ये यामध्ये मानवी तस्करी वा दुर्व्यापार प्रतिष्ठेसाठीची हत्या वा सन्मान हत्या आणि दुर्विहित कृत्य वा झुंडबळी या गुन्हेगारी कृत्याची कारणे, विस्तार, स्वरूप आणि त्यावरील उपाययोजना यांचा अभ्यास केला जाणार आहे.

## ४.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

मानवी हक्क बी. ए. भाग-३ मध्ये पेपर नं. १० मध्ये घटक चार - भारतातील मानवी हक्कांचे उल्लंघन' या प्रकरणामध्ये तीन उपविभाग करण्यात आले असून यामध्ये पहिला भाग मानवी तस्करी वा दुर्व्यापार, दुसरा भाग सन्मान हत्या वा प्रतिष्ठेसाठीची हत्या आणि तिसरा भाग दुर्विहित हत्या वा झुंडबळी यांचा समावेश करण्यात आला आहे.

मानवी हक्कांचे उल्लंघन या प्रकरणामध्ये तीन उपविभाग करण्यात आले असून यामध्ये पहिला भाग मानवी तस्करी वा दुर्व्यापार, दुसरा भाग सन्मान हत्या वा प्रतिष्ठेसाठीची हत्या, आणि तिसरा भाग दुर्विहित हत्या वा झुंडबळी यांचा समावेश करण्यात आला आहे.

मानवी हक्कांचे उल्लंघन करणारे कृत्य होऊ नये याची दक्षता वा काळजी घेण्याकरीता संयुक्त राष्ट्रे आणि अन्य काही आंतरराष्ट्रीय संघटनानी तसेच विविध राष्ट्रांनीही मानवी हक्कांच्या उल्लंघनास प्रतिबंध करण्यासाठी विविध तरतुदी वा उपाययोजना केलेल्या आहेत. त्यामुळे बऱ्यापैकी मानवी हक्कास आळा बसण्यास मदत झालेली दिसून येते. परंतु सर्वच देशात कमी जास्त प्रमाणात लोकांच्या मानवी हक्कांवर आक्रमण होताना आढळते. त्यांचे मुलभूत हक्क डावलले जात आहेत. त्यातून मानवी हक्काचे उल्लंघन होऊन समाजात काही वर्तनप्रकार यामध्ये मानवी तस्करी वा दुर्व्यापार सन्मान वा प्रतिष्ठेसाठीची हत्या आणि झुंडबळी वा प्रतिष्ठेसाठीची हत्या असे अनैतिक, बेकायदेशीर, गुन्हेगारी, अमानवी वा अमानुष कृत्य घडून समाजात हिंसा पसरवण्याचे कृत्य केले जात आहे.

### ४.३.१ अ) मानवी तस्करी (Human trafficking)

**प्रस्तावना :** भारतातील मानवी हक्काचे उल्लंघन करणारे हे एक प्रमुख्य गुन्हेगारी कृत्य किंवा वर्तनप्रकार आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर मानवी तस्करी किंवा दुर्व्यापार हा विषय प्राचीन काळापासूनच

कुपरिचित राहिला आहे. विकसित, विकसनशील आणि आखाती देशांमध्ये याचे प्रमाण कमी-अधिक दिसून येते. सामान्यपणे आर्थिकदृष्ट्या गरीब असलेल्या देशांमधून मानवी आयात करून त्या व्यक्तीकडून हवे ते काम करवून घेतले जाते.

प्राचीन काळापासून जगात मानवी व्यक्तींचा व्यापार म्हणजे खरेदी-विक्री केली जात आहे. प्राचीन ग्रीक समाजात गुलामगिरीची प्रथा ही समाजमान्य होती. मानवी गुलामांचा जनावरांप्रमाणेच बाजार भरविला जात होता. आणि त्यामधून मानवी गुलामांची खरेदी-विक्री केली जाई. या मानवी गुलामांवर त्यांना खरेदी करणाऱ्या मालकाचे संपूर्ण नियंत्रण असत. मालक स्वतःच्या मर्जीनुसार गुलामांना हवे तेवढे दिवस स्वतःजवळ ठेवून व नको असेल तेव्हा त्यांना दुसऱ्या मालकास विकून टाकीत. इस्लामी राज्यकर्तेही आपल्या पदरी गुलाम बाळगत, तसेच हे राज्यकर्ते आपल्या गुलामांना इतरांना (सेनापती, इतर राजे) भेट म्हणूनही देत असत. वसाहतवादाच्या काळात युरोपियन राष्ट्रे (इंग्लंड, फ्रान्स, पोर्तुगाल, डेन्मार्क इ.) आपल्या वसाहतीतील व्यक्तींना गुलाम म्हणून खरेदी करीत व आपल्या देशातील किंवा इतर वसाहतीतील उद्योगधंद्यात, चहाकॉफीच्या व निळीच्या मळ्यात मजूर म्हणून कामास जुंपत. उदा. इंग्लंडने आपली वसाहत असलेल्या भारतातून अनेक लोकांना खरेदी करून दुसऱ्या वसाहतीत मजूर म्हणून पाठविले जात होते. २० व्या शतकापासून मानवी हक्काची जाणीव-जागृती होऊन दुसऱ्या महायुद्धानंतर बहुतेक सर्वच राष्ट्रांनी गुलामगिरीची प्रथा व मानवाची खरेदी-विक्री म्हणजेच मानवाचा व्यापार वा तस्करी करण्यास कायद्याने बंदी घातली आहे. त्यामुळे मानवाचा व्यापार करणे हे कृत्य आज गुन्हेगारी कृत्य ठरले असून मानुसकीला काळींबा लावणाऱ्या या प्रकारचे कृत्य करणाऱ्यास निश्चित दंड देण्याची तरतूद केलेली आहे. त्या कृत्यास बेकायदेशीर कृत्य मानले जाऊ लागले. असे जरी असले तरी, जगात सर्वत्र कमी अधिक प्रमाणात मानवी तस्करी होत असल्याचे दिसून येते. हे कृत्य मानवी हक्कांवर गदा आणत आहे. त्या मानवी हक्कांचे उल्लंघन होत आहे.

**मानवी तस्करीचा अर्थ :**

मानवी दुर्व्यापार या मराठी संज्ञकरीता इंग्रजीत Human Trafficking ही संज्ञा वापरली जाते. मानवाचा व्यापार करण्यास कायद्याने बंदी असल्याने हा व्यापार चोरून केला जातो. त्यामुळे Human Trafficking या संज्ञेसाठी मराठीत मानवाचा चोरटा व्यापार किंवा मानवी तस्करी ही संज्ञा देखील वापरता येईल. केंब्रिज डिक्शनरीनुसार मानवाचा दुर्व्यापार म्हणजे लोकांची खरेदी-विक्री करण्याचा किंवा त्यांना देहविक्रीसारखे काम बळजबरीने करावयास लावून त्यातून पैसे कमावण्याचा गुन्हा होय. तसेच ऑक्सफोर्ड डिक्शनरीनुसार मानवी दुर्व्यापार हा लोकांच्या वाहतुकीचा किंवा नियंत्रणाचा आणि त्यांना लैंगिक व्यापारात किंवा बळजबरीच्या कामाच्या इतर प्रकारात जबरदस्तीने काम करावयास लावण्याचा गुन्हा आहे. थोडक्यात, मानवाचा दुर्व्यापार हा व्यक्तीची खरेदी-विक्री करण्याचे एक गुन्हेगारी कृत्य आहे.

**मानवी तस्करीची व्याख्या :**

१) संयुक्त राष्ट्र संघाच्या व्याख्येनुसार एखाद्या व्यक्तीला बलप्रयोग करून, भीती दाखवून, धोक्याने किंवा हिंसक पद्धतीने, तस्करी किंवा बंधक बनवून ठेवण्यास मानवी तस्करी म्हटले जाते.

२) विकीपीडिया वेबसाईट : बळजबरीचे श्रम, लैंगिक गुलामगिरी किंवा व्यापाऱ्यांचा वा इतरांचा व्यापारविषयक लैंगिक फायदा यासारख्या हेतूने मानवाचा व्यापार म्हणजे मानवी दुर्व्यापार होय.

(Human trafficking is the trade of Human for the purpose of forced labour, sexual slavery or commercial sexual exploitation for the traffickers or others)

३) ब्रिटानिका इन्याइक्लोपीडिया : मानवी दुर्व्यापार हा आधुनिक काळातील गुलामगिरीचा प्रकार असून त्यामध्ये श्रम, लैंगिक शोषण किंवा इतरांचा वित्तीय लाभ करून देणाऱ्या क्रिया यासारख्या हेतूने व्यक्तींची बळजबरीने किंवा फसवणुकीद्वारे केली जाणारी बेकायदेशीर वाहतूक अंतर्भूत आहे.

४) नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो (भारत) : मानवी दुर्व्यापार हा गुन्ह्यांचा समुह असून त्यामध्ये वित्तीय लाभासाठी होणारे पुरुष, स्त्रिया व बालके यांचे शोषण अंतर्भूत असून ते शोषण मुलभूत मानवी हक्कांचे उल्लंघन करते.

थोडक्यात मानवी दुर्व्यापारामध्ये पीडित व्यक्तीकडून देहव्यापार, घरगुती काम, गुलामी, त्याच्या मनाविरुद्धचे काम करून घेतले जात होते.

**मानवी तस्करीचे स्वरूप :**

मानवी दुर्व्यापार (तस्करी) ही संकल्पना अधिक सविस्तर होण्याकरीता त्याचे स्वरूप पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येते.

**१) सार्वत्रिकता** (University) :

मानवी तस्करी वा दुर्व्यापार ही सार्वत्रिक वैश्वीक स्वरूपाची घटना आहे. कारण जगातील सर्वच देशांत वा समाजात मानवाचा दुर्व्यापार कमी-अधिक प्रमाणात होताना आढळतो. प्राचीन-अर्वाचीन, पारंपरिक-आधुनिक, विकसित-विकसनशील, ग्रामीण-नागर अशा सर्व प्रकारच्या समाजात हा दुर्व्यापार होत असल्याचे दिसून येते. याठिकाणी साधारणपणे, विकसनशील, अविकसनशील देशांतील व्यक्तींची विकसित देशांत तसेच, ग्रामीण समाजातील व्यक्तींची विकसित देशांत तसेच, ग्रामीण समाजातील व्यक्तींची नागर समाजात नेवून विक्री करण्याचे प्रमाण अधिक आढळते.

**२) मानवी तस्करी गुन्हेगारी कृत्ये** (Criminal act)

मानवी हक्काच्या विरोधात मानवी दुर्व्यापार हे सर्वच देशांत एक गुन्हेगारी कृत्य मानलेले आहे. मानवी हक्काच्या विरोधातील कृत्य आहे. कायद्याने मानवी दुर्व्यापार (तस्करी) मानवाची खरेदी-विक्री करण्यास तो गुन्हा असून अशा कृत्यास कडक शिक्षेची तरतुद करण्यात आली आहे. भारतामध्ये मानवाचा दुर्व्यापार करणे

हा संघटित गुन्हा (Organized Crime) मानला आहे. कारण हा सदरील गुन्हा संघटितपणे व नियोजनबद्ध पद्धतीने केला जातो. मानवाचा दुर्व्यापार करण्यात अनेक लोक गुंतलेले असतात. त्यांची एक साखळी असते. त्यांची एक संघटना वा टोळी असते, त्यांची काही नियमावली व कार्यपद्धती असते, त्यामुळे मानवाचा दुर्व्यापाार हा संघटित गुन्हा ठरतो. कारण हा संघटितपणे गुन्हेगारी कृत्ये करतो.

३) **विविध व्यक्तींचा सहभाग वा साखळी** (Participation of Various Persons) :

मानवी दुर्व्यापार वा तस्करी करण्याकरीता अनेक व्यक्तींचा सहभाग असतो. यामध्ये मानवाच्या खरेदी-विक्रीसाठी व्यक्तींचा पुरवठा करणारे (Suppliers), खरेदी-विक्रीच्या व्यवहारात मध्यस्थी करणारे दलाल (Agents), तसेच व्यक्तीची खरेदी करणारे (Buyers), पुढे खरेदी केलेल्या व्यक्तीच्या सेवेचा उपभोग घेणारे ग्राहक (Consumers) यासारख्या अनेक प्रमुख घटक मानवी दुर्व्यापारात कार्यरत/सक्रिय असतात. पुरवठादार, दलाल, खरेदीदार व ग्राहक या सर्व घटकांची पद्धतशीर साखळी मानवी दुर्व्यापारात तयार झालेली दिसून येते.

४) **बळींची विविधता** (Diversity of Victims)

ज्या व्यक्तींची खरेदी-विक्री या मानवी दुर्व्यापार या गुन्हेगारी कृत्यात होते. त्यांना बळी (Victims) असे म्हणतात. के बळी सर्वसाधारणपणे कोणत्याही देशातील, कोणत्याही वंशाचे वा धर्माचे, जातीचे, कोणत्याही वयोगटातील स्त्री, पुरुष व बालके, वृद्ध असू शकतात. परंतु हे बळी श्रीमंत वा विकसित देशापेक्षा गरीब वा अविकसीत किंवा विकसनशील देशातील असतात. तसेच या मानवी तस्करीमध्ये वृद्धापेक्षा तरूण व बालके यांचा समावेश असतो, तसेच पुरुषापेक्षा स्त्रिया व लहान बालके अधिक असल्याचे आढळते. त्याचप्रमाणे या मानवी दुर्व्यापारास बळी पडल्यामध्ये निर्वासित, अल्पसंख्यांक, निराधार, दिव्यांग, समलिंगी, तृतीयपंथी, राज्यविहीन (Stateless), घरातून पळालेले इत्यादी लोकांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते.

५) **विविध साधनांचा वापर** (Use of Various means)

मानवी दुर्व्यापारास गुंतलेल्या व्यक्ती ह्या बळी वा मानवी तस्करी करण्याकरीता ज्या व्यक्ती मिळविण्याकरीता विविध प्रकारची साधने किंवा मार्ग वापरत असतात. बळींना भीती घलणे, धमकावणे, मारहान करणे, वा करण्याची भीती घालणे, बळजबरी करणे, गोड-गोड बोलून त्या व्यक्तींना जाळ्यात ओढले, अनेक खोटी आमिषे यामध्ये पैसा, नोकरी, इतर सोयी-सुविधा उपलब्ध करून देतो असे सांगणे, तसेच लग्नाचे खोटे आश्वासन देऊन फसविणे, अपहरण करणे, आपण त्यांचे खरे हितचिंतक असल्याचे भासविणे, अडचणींच्यावेळी अधिक व अन्य मदत करून विश्वास संपादणे इत्यादी मार्गानी बळी मिळविले जातात.

६) **विविध हेतू** (Various Purposes)

मानवी तस्करी वा दुर्व्यापार हा विविध उद्दिष्ट्ये वा हेतूने केला जातो. यामध्ये -

१) जबरदस्तीने वेश्याव्यवसायात स्त्रियांची विशेषतः तरुणींची भरती करणे. जबरदस्तीने विवाह करणे किंवा रखेल बनविणे, नाईट क्लबमध्ये नाचगाणे करणे. २) उद्योगधंदे, खाणी, शेती, घरकाम, हॉटेल, मनोरंजन केंद्रे, घरकाम इत्यादीमध्ये वेठबिगारी कामगार म्हणून जबरदस्ती ठेवणे, गुलामी करवून घेणे. ३) काही टोळ्यांमार्फत लोकांना पळवून नेवून जबरदस्तीने भीक मागायला लावणे, त्यांना चोरी करण्यास, गुन्हे करण्यास प्रवृत्त केले जाते. ४) श्रीमंत पेशंटना आरोपणासाठी शारीरिक अवयव (किडणी, हृदय, डोळे, पेशी, बिजांड इत्यादी) पुरविणे. ५) उंटाच्या शर्यती, फुटबॉल अशा खेळांमध्ये बालकांचा वापर करणे, सैन्यात वा दहशतवादी समुहात जबरदस्तीने भरती करणे. अशा विविध हेतूने व्यक्तीना पळवून नेऊन वा काही लालुच दाखवून व्यक्तींचा दुर्व्यापार केला जातो. व्यक्तींचा दुर्व्यापार करून अधिक-अधिक पैसा मिळविणे हा दलालाचा महत्त्वाचा हेतू असतो.

### ७) **मानवी तस्करी मागील कारणे** (Causes)

मानवी दुर्व्यापारास चालना देणारे विविध घटक किंवा कारणे आहेत. यामध्ये सर्वसाधारणपणे गरीबी, दारिद्र्य दूर करण्यासाठी बेकारी कर्जबाजारीपणा, सामाजिक सुरक्षेचा अभाव, जीवनाचा स्तर उंचावण्यासाठी, कुटुंबाचे पालनपोषण करणे. नोकरी प्राप्त करण्याकरीता, असाह्यता, नोकरीतील वा समाजातील असुरक्षितता, नैसर्गिक वा मानवनिर्मित आपत्ती (उदा. सांप्रदायिक दंगल, युद्ध इत्यादी) राजकीय अस्थैर्य इत्यादी समस्यांनी ग्रासलेले लोक हे मानवी दुर्व्यापारास बळी पडतात. या सर्व कारणांमुळे मानवी दुर्व्यापारास कारणीभूत ठरतात. याशिवाय समाजकंटक, गुन्हेगारी व्यक्ती व त्यांच्या टोळ्या, अनैतिक व्यापारी वर्ग इत्यादीची अधिक संपत्ती प्राप्तीची हाव हेही अशा दुर्व्यापाराचे एक महत्त्वाचे कारण आहे. जागतिकीकरणाची प्रक्रिया देखील मानवी दुर्व्यापाराच्या वाढीचे एक महत्त्वपूर्ण कारण बनलेली आहे.

### ८) **मानवी तस्करीत अडकलेल्या व्यक्तींवरील दुष्परिणाम** (Adverse effects on Victims)

मानवी दुर्व्यापारास बळी पडलेल्या व्यक्तींना शारीरिक, मानसिक, आर्थिक व सामाजिक दुष्परिणामास सामोरे जावावे लागते. या जाळ्यात अडकलेल्या व्यक्तींना विविध क्षेत्रात जबरदस्तीने मजूर म्हणून गुरासारखे, जनावरासारखे जीवन व्यतीत करावे लागते. या व्यक्तींना प्रसंगी शारीरिक मारहाणास सामोरे जावे लागते. त्यांच्या मानसिकतेचा आरोग्याचा विचार केला जात नाही. वेश्याव्यवसायासाठी किंवा लैंगिक शोषणासाठी पळवून नेल्या जाणाऱ्या स्त्रियांना व बालकांना अनेक एड्स, क्षय यासारख्या जीवघेण्या गुप्तरोगास सामोरे जावे लागते. या मानवी तस्करीत बळी पडलेल्या बळींना (व्यक्तींना) आपले कुटुंब, आप्तमित्र, गाव, एवढेच नव्हे तर अनेकदा देश इत्यादीपासून दूर जावे लागते. या व्यक्तींना, प्रेम, माया, जिव्हाळा, आपलेपणा, सहानुभूती, सहकार्य इत्यादी वंचित व्हावे लागते. मानसिकदृष्ट्या दुबळेपणास तोंड द्यावे लागते. त्यांना दहशत, एकाकीपणा, भीती, चिंता, नैराश्य अशा मानसिक आजारांना तोड द्यावे लागते. अनेकजण मानसिक आधारापासून वंचित असल्यामुळे हे बळी अनेकवेळा मनोरुग्ण वा वेडे होतात. काहीवेळा ते व्यसनाधिन होतात. बऱ्याचदा कामाच्या ठिकाणी त्यांचे आर्थिक तसेच लैंगिक शोषण होते. अनेकांना वेठबिगारी, बळजबरीची मजुरी, बालमजुरी करावी लागते. तसेच बहुतांशी वेळा मालकवर्ग त्यांना

अल्पवेतनात वा विनावेतन राबवून घेतो. जरी पोलिसांच्या साहाय्याने या मानवी दुर्व्यापारातून त्यांची सुटका होते, परंतु अशा सुटका झालेल्या व्यक्तींचे समाजात पुन्हा योग्य समायोजन होत नाही. समाजात त्यांना अलगता (alienation), वा वेगळेपणा, एकटेपणा जाणवतो. सातत्याने या व्यक्तींकडे साशंकतेने, संशयाने पाहिले जाते. त्यांना भेदभावाची वागणूक दिली जाते. पुन्हा समाजाात एकरूप होण्यास अनेक अडथळे येतात. त्यामुळे ही व्यक्ती अंतर्मुखी बनतो. अशा अनेक गंभीर दुष्परिणाम या बळींवर होतात.

**मानवी तस्करीचे प्रकार :**

संयुक्त राष्ट्रे या आंतरराष्ट्रीय संघटनेने मानवी दुर्व्यापाराचे तीन प्रकार पाडलेले आहेत. यामध्ये अ) लैंगिक तस्करी, ब) श्रम तस्करी आणि क) शारीरिक अवयव काढणे.

तसेच मानवी दुर्व्यापारामागील हेतू विचारात घेऊन मानवी दुर्व्यापाराचे पुढील सहा प्रकार केलेले आहेत.

१) **श्रम तस्करी** (Labour trafficking)

या प्रकारामध्ये अनेक प्रकारचे उद्योगधंदे, खाणकाम, हॉटेल व्यवसाय, शेती, घरकाम, बांधकाम इत्यादी ठिकाणी हक्काचे मजूर मिळावेत म्हणून माानवाची केली जाणारी खरेदी-विक्रीचा समावेश होतो. या प्रकारामध्ये वेठबिगारी, कामगार, गुलामगिरी, बालमजुरी इत्यादीचा समावेश होतो.

२) **लैंगिक तस्करी** (Sex Trafficking)

लैंगिक गरजांच्या पुर्ततेकरीता स्त्रिया, पुरुष वा बालकांची केली जाणारी खरेदी-विक्री या प्रकारात मोडते. अनेक व्यक्ती विशेषतः श्रीमंत पुरुष हे आपल्या लैंगिक गरजांच्या पुर्ततेसाठी स्त्रियांची विशेषतः तरुणींची खरेदी करतात. तसेच वेश्यागृह चालवणारे मालक व मालकीन देखील स्त्रियांबरोबर पुरुष, बालके, तृतीयपंथीय व्यक्तीची खरेदी करतात. तसेच अनेक हॉटेल्स, मोटेल्य, रिसॉर्टस् इत्यादीमध्येही पुरुष ग्राहकांना लैंगिक सुखप्राप्तीसाठी स्त्रियांची खरेदी केली जाते.

३) **बालक तस्करी** (Trafficking of Children)

१८ वर्षाखालील मुलामुलींची होणारी खरेदी-विक्री म्हणजे बालकांचा दुर्व्यापार होय. अनेक उद्देशाने बालकांना पळवून घेऊन त्यांचा दुर्व्यापार केला जातो. यामध्ये लैंगिक संबंध ठेवणे, वेश्याव्यवसाय करावयास लावणे, अश्लील साहित्य व चित्रपटनिर्मिती करणे, घरकाम करणे, जीवावर बेतल अशी जोखिमीची कामे करण्यास प्रौढ व्यक्ती तयार होत नाहीत, अशावेळी या बालकांना कामास लावले जाते. तसेच दहशतवादी व अतिरेकी कृत्ये करणाऱ्या टोळ्याही लढाऊ कार्यकर्ते मिळावेत म्हणून बालकांना खरेदी करतात.

**४) बळजबरीच्या विवाहासाठी तस्करी** (Trafficking for forced marriage)

विवाह करण्याच्या उद्देशाने अविवाहित स्त्रियांची विशेषतः तरूण मुलींची होणारी खरेदी-विक्री या प्रकारात मोडते. विवाहयोग्य मुलींना बळजबरीने पळवून नेवून अथवा काही अमिष दाखवून वा काही दलालांकडून खरेदी करून त्यांच्याशी बळजबरीने विवाह केला जातो.

**५) मनोरंजनासाठीची तस्करी** (Trafficking for recreation)

एक मनोरंजनाचे साधन म्हणून मानवाचा केला जाणारा दुर्व्यापार या प्रकारात मोडते. नाईट क्लबमध्ये किंवा पंचतारांकित हॉटेलमध्ये नृत्य करणे, डान्सबारमध्ये नृत्य करणे. याकरीता तरुण-तरुणींचा दुर्व्यापार केला जातो. बहुतांशी वेळा अशा तरुण-तरुणींना मनोरंजनाच्या नावाने ग्राहकांशी लैंगिक संबंध ठेवण्यास भाग पाडले जाते. तर काही आखाती देशात होणाऱ्या उंटांच्या शर्यतीत वापरण्यासाठीही लहान बालकांची खरेदी-विक्री केली जाते. ही शर्यत म्हणजे मनोरंजनाचा एक विकृत प्रकार म्हणता येईल.

**६) अवयवांसाठी होणारी तस्करी** (Trafficking for Organs)

एका व्यक्तीच्या शरीराचे अवयव काढून घेऊन ते दुसऱ्या व्यक्तीच्या शरीरात बसविणे यास अवयवारोपण (Organ Transplanation) असे म्हणतात. यामध्ये व्यक्तीला फसवून किंवा तिचे अपहरण करून किंवा पैशाचे आमीष दाखवून तिचा हवा असणारा एखादा अवयव काढून घेतात व तो गरजू पेशंटला विकला जातो. अनेकदा अवयव देणाऱ्या व्यक्तीचा जीव जातो. तसेच आर्थिक अडचण असणाऱ्या व्यक्ती या प्रकारच्या जाळ्यात अडकतात. सदरील दुर्व्यापारात अनेकदा वैद्यकीय कर्मचाऱ्यांचाही सहभाग असतो.

**मानवी तस्करींशी संबंधित संयुक्त राष्ट्रांचे तथ्य :**

१) मानवी दुर्व्यापारास वा तस्करीचा शिकार झालेल्या लोकांमध्ये ५१% महिला, २८% मुले आणि २१% पुरुषांचा समावेश आहे.

२) देहव्यापार व्यवसायात ७२% शोषित महिला आढळतात.

३) ओळख पटविण्यात आलेल्या मानवी तस्करांमध्ये ६३% पुरुष आणि ३७% महिलांचा समावेश आहे.

४) ४३% पीडित एखाद्या देशाच्या सीमेमध्ये घरगुती स्तरावर मानवी तस्करीचे बळी ठरलेले असतात.

५) आंतरराष्ट्रीय श्रमिक संघटनेनुसार जागतिक स्तरावर मानवी तस्करीमुळे ४०.३ मिलीयन लोक पीडित आहेत.

६) आंतरराष्ट्रीय श्रमिक संघटनेनुसार जगात जबरदस्तीने करवून घेतलेले श्रम आणि मानवी तस्करीचा ४०.३ मिलीयन लोक पीडीत आहेत.

७) आंतरराष्ट्रीय श्रमिक संघटनेनुसार जगात जबरदस्तीने करवून घेतलेले श्रम आणि मानवी तस्करीचा उद्योग १५० बिलियन डॉलर इतका आहे.

८) भारतातही मानवी तस्करीची संख्या इतर देशांच्या तुलनेत जास्त आहे. एका अंदाजानुसार, भारतात गरीब मुलींना वेश्यावृत्तीत फसविण्यासाठी केवळ ४८ तासांचा अवधी लागतो.

**मानवी तस्करीमुळे होणारे मानवी हक्कांचे उल्लंघन :**

मानवी दुर्व्यापारास बळी पडलेल्या व्यक्तींच्या मानवी हक्कांचे मोठ्या प्रमाणावर उल्लंघन होते, याचे स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते.

**१) मानवी प्रतिष्ठा नष्ट :**

प्रत्येक मानवी व्यक्तीस मानव म्हणून प्रतिष्ठेचे (सन्मानाने) जीवन जगण्याचा हक्क आहे. परंतु मानवी दुर्व्यापारात व्यक्तीचा हा हक्काचे हनन केले आहे. कारण मानवास माणूस न मानता एखाद्या निर्जीव वस्तुप्रमाणे खरेदी-विक्री योग्य अशी वस्तू मानली जाते.

**२) प्रचंड छळ :**

मानवी दुर्व्यापारात व्यक्तीचा (बळीचा) बळजबरीने, फसवणुकीने, खोटी आमिषे दाखवून वा अपहरणाद्वारे तिची खरेदी-विक्री होते. अशा व्यापारास नकार देणाऱ्या वा प्रतिकार करणाऱ्या व्यक्तीस मानहान करणे, जखमी करणे, डांबून ठेवणे, उपासमार करणे, चटके देणे, शिव्या देणे, अपमानास्पदपणे वागविणे, ठार मारण्याची धमकी देणे, भीती घालणे, बलात्कार करणे इत्यादी मार्गांनी छळले जाते. जीविताचा हक्क नष्ट केला जातो.

**३) शोषण :**

मानवी दुर्व्यापारामुळे व्यक्तीचा शोषणाविरुद्धचा हक्कही नष्ट होतो. कारण मानवी दुर्व्यापारात व्यक्तीला विविध हेतूच्या पूर्ततेकरीता व्यापारांकडून किंवा ग्राहकांकडून जनावरासारखे राबवून घेतले जाते. विविध उद्योगात, शेतात, घरात, व्यक्तीला गुलाम बनवून विनावेतनात वा अल्पवेतनात श्रम करावे लागतात. यामध्ये लैंगिक शोषण होते. जोखमीची कामे करावी लागतात. मानवी दुर्व्यापारामुळे बळींचे शारीरिक, आर्थिक व लैंगिक शोषण होते.

**४) वैवाहिक व कौटुंबिक जीवनाचा हक्क नष्ट :**

मानवी दुर्व्यापारात बळी पडलेल्या व्यक्तीचा वैवाहिक व कौटुंबिक जीवनाचा हक्क नष्ट केला जातो. वैवाहिक व कौटुंबिक जीवनापासून वंचित झालेल्या बळींना मानसिक भावनिक कोंडमारा होतो. त्यांना माणूस म्हणून नव्हे तर यंत्रवत जीवन जगणे भाग पडते.

**५) बालकांच्या हक्कांचे उल्लंघन :**

मानवी दुर्व्यापारात बळी पडलेल्या बालकांच्या सर्वच हक्कांचे उल्लंघन होते. त्याचे बालपण हिरावून घेतले जाते. शिक्षण, कौटुंबिक प्रेम, लहानपण या सर्व भावनांपासून त्यांना वंचित राहावे लागते. या मानवी

तस्करीत सापडलेल्या बालकाचे लैंगिक शोषणही मोठ्या प्रमाणात होते. त्यांना मारहान, उपेक्षा अव्हेलना, छळ, शोषण, अवजड श्रम, मायेचा अभाव इत्यादींमुळे अशा बालकांचे जीवन होरपळून जाते.

**६) स्वातंत्र्याच्या हक्कांचे उल्लंघन :**

मानवी दुर्व्यापाराच्या सर्वच प्रकारात व्यक्तीच्या नागरी हक्कांचे विशेषतः स्वातंत्र्याच्या हक्काचे मोठे उल्लंघन होते. यामधील बळीला आचारविचाराचे, अभिव्यक्तीचे, स्वातंत्र्य नसते.

परदेशात मानवी तस्करी केलेल्या व्यक्तीचा पासपोर्ट व व्हिसा काढून घेतला जातो किंवा अनेकदा विना पासपोर्ट व विना व्हिसाच व्यक्तीला विकले जाते.

अशाप्रकारे, मानवी दुर्व्यापारामुळे विविध मानवी हक्कांचे मोठ्या प्रमाणावर उल्लंघन होते.

**मानवी तस्करीला आळा घालण्यासाठी भारतात केलेली उपाययोजना :**

मानवी दुर्व्यापार हे केवळ बेकायदेशीरच कृत्य नसून ते अनैतिक, अमानुष व मानवतेस कलंक लावणारे, मानवी हक्कांचे उल्लंघन करणारे कृत्य होय. या कृतीस आळा घालण्यासाठी भारतात विविध प्रकारच्या उपाययोजना केल्या आहेत.

**१) राज्यघटनेतील तरतुदी :**

भारतीय राज्यघटनेत सर्वच नागरीकांना शोषणाविरुद्धचा मुलभूत हक्क दिलेला आहे.

अ) **कलम २३** नुसार मानवाचा दुर्व्यापार करणे, वेठबिगार प्रथा व सक्तीने श्रम यावर बंदी घातलेली आहे.

ब) **कलम २४** नुसार – १४ वर्षाखालील मुलांना कारखाने, खाणी व इतर धोकादायक कामावर ठेवण्यास बंदी घातलेली आहे. कलम ३९ (५) नुसार स्त्री व पुरुष कामगारांचे आरोग्य व शक्ती आणि बालकांचे कोवळे वय यांचा दुरुपयोग केला जाणार नाही व नागरिकांना आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय व शक्ती यांना न पेलवणारा व्यवसाय करण्यास भाग पाडले जाणार नाही, अशी तरतूद केलेली आहे.

क) **कलम ३९ (६)** नुसार बालकांना निरामय पद्धतीने व प्रतिष्ठापूर्ण वातावरणात आपला विकास करण्यासाठी योग्य त्या संधी व सुविधा द्याव्यात व बालके व युवक यांचे शोषणापासून व नैतिक तसेच भौतिक गरजांच्या बाबतीत होणाऱ्या उपेक्षापासून संरक्षण व्हावे अशी तरतूद केलेली आहे.

राज्यघटनेतील वरील तरतुदी मानवी दुर्व्यापार, वेठबिगारी, सक्तीचे श्रम, बालमजुरी इत्यादीस प्रतिबंध करतात.

**२) भारतीय दंडसंहितेतील** (IPC) **तरतुदी**

अ) **कलम ३६३** नुसार १८ वर्षाखालील मुलीचे अपहरण करणे हा दंडनीय गुन्हा मानले आहे.

ब) **कलम ३६६ (अ)** नुसार एखाद्या स्त्रीचे तिच्या इच्छेविरुद्ध बळजबरीने विवाह करण्याच्या हेतूने किंवा लैंगिक संबंध ठेवण्याच्या हेतूने अपहरण करणे हा देखील गुन्हा ठरविण्यात आला. तसेच कलम ३६३ (ब) नुसार परदेशातून मुलींची आयात करण्यास बंदी घातलेली आहे.

क) **कलम ३७२ व ३७३** नुसार अज्ञान मुलींना वेश्याव्यवसाय करण्यास लावण्याच्या हेतूने त्यांची खरेदी-विक्री करणे हा देखील दंडनीय गुन्हा मानला आहे. अशा गुन्ह्यास १० वर्षे कारावास व अर्थदंड अशी शिक्षा होऊ शकते.

ड) **कलम ४९८** नुसार एखाद्या स्त्रीला अनैतिक संबंधाच्या उद्देशाने फुस लावून पळवून नेने हा गुन्हा मानला असून या गुन्ह्यासाठी २ वर्षे कारावास व अर्थदंड अशी शिक्षा होऊ शकते.

अशाप्रकारे विविध दंडसंहितेतील तरतुदीनुसार प्रतिबंध घालण्यात आले.

**३) विविध कायदे :**

मानवी दुर्व्यापारास आळा घालण्यासाठी विविध कायदे संमत करण्यात आले आहेत. यामध्ये -

अ) स्त्रिया व मुलींच्या अनैतिक व्यापार बंदीचा कायदा १९५६.

ब) वेठबिगार निर्मुलन अधिनियम

क) स्त्रियांचे बीभत्स प्रदर्शन (प्रतिबंध) अधिनियम १९८६

ड) मानवी अवयव व पेशींचे आरोपन अधिनियम १९९४

ई) लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण करणे हा अधिनियम (POCSO)

फ) बालकामगार (प्रतिबंध व नियमन) दुरुस्ती विधेयक २०१६ अन्वये १४ वर्षाखालील बालकांना धोकादायक व्यवसायात काम करण्यास बंदी घालण्यात आली.

**४) इतर तरतुदी**

मानवी दुर्व्यापारास बंदी घालण्याकरीता इतरही काही तरतुदी करण्यात आल्या आहेत. यामध्ये

अ) **अँटी ट्रॅफिकिंग सेल :** या सेलमार्फत मानवी दुर्व्यापारासंबंधीच्या विविध निर्णयांचे संप्रेषण करण्यासाठी व मानवी गुन्हे सोडविण्यासाठी राज्यांनी केलेल्या कारवाईचे पालन करण्यासाठी केंद्र सरकारने केंद्रबिंदू म्हणून हा सेल स्थापन केलेला आहे.

ब) **सल्ला देणे :** मानवी दुर्व्यापाराच्या गुन्ह्याची प्रकरणे सोडविण्याकरीता कायदेशीर यंत्रणेची कार्यक्षमता व उत्तरदायित्व वाढविण्यासाठी सरकारने सर्व घटकराज्ये व केंद्रशासित प्रदेशांना व्यापक सल्ला देण्याची तरतुद केलेली आहे.

क) **अँटी ह्युमन ट्रॅफिकिंग युनिट :** केंद्रीय गृहमंत्रालयाने मानवी दुर्व्यापार थांबविण्यासाठी देशातील २७० जिल्ह्यात असे युनिट स्थापन केलेले आहे.

ड) मानवी दुर्व्यापारास आळा घालण्यासाठी पोलिसांना प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन केले जाते.

इ) **न्यायीक संभाषण** : मानवी दुर्व्यापारासंबंधी संवेदनशील बनविणे व न्यायीक प्रक्रिया सुनिश्चित करणे या उद्देशाने न्यायीक संभाषणाचे आयोजन केले जाते.

फ) **वेब पोर्टल :** फेब्रुवारी २०१४ मध्ये केंद्र शासनाने अँटी ट्रॅफिकिंग वेब पोटल सुरू केले आहे.

ग) **हेल्प लाईन** : तक्रार नोंदविण्यासाठी सरकारने हेल्पलाईन सुरू केली असून तक्रारदार 011-24368638 या दुरध्वनी क्रमांकावर केंव्हाही तक्रार नोंदवू शकतात.

ह) **पूनर्वसन** : मानवी दुर्व्यापारास बळी पडलेल्या व्यक्तीच्या पुनर्वसनासाठी सरकारने काही संस्था/केंद्रे स्थापन केलेली आहेत.

अशाप्रकारे मानवी तस्करी वा दुर्व्यापार रोखण्यासाठी जागतिक पातळीवर अनेक उपाययोजना राबविल्या जात आहेत. मानवी तस्करी ही समस्या जागतिक समस्या आहे. त्याचे मुळ कारण गरीबी हे आहे.

### ४.३.२ ब) प्रतिष्ठेसाठीच्या हत्या (Honour Killing)

**प्रस्तावना :** प्रतिष्ठेसाठीच्या हत्या म्हणजेच घराण्याच्या प्रतिष्ठेच्या रक्षणासाठी होणारी हत्या होय. के कृत्य देखील मानवी हक्कांचे उल्लंघन करणारे एक गुन्हेगारी कृत्य आहे. ही हत्या समुहाच्या प्रतिष्ठेचे/सन्मानाचे रक्षण करण्याच्या हेतूने केली जाते. म्हणून त्या हत्येस प्रतिष्ठेच्या रक्षणासाठी होणारी हत्या (Honour Killing) असे म्हणतात. भारतीय समाजात आंतरजातीय व आंतरधार्मिक विवाह हा आदर्श समजला जातो. एकाच गोत्रामध्ये किंवा कुलामध्ये विवाह करणे हे बंधनकारक आहे. परंतु एखाद्या मुला-मुलीने बर्हिजातीय विवाह वा इतर धर्मातील पुरुष अथवा स्त्रीशी विवाह केल्यास ते कृत्य हे सामाजिक नियमनाच्या, भावनाच्या विरोधातून समजून त्या युवक-युवतींची घृणग्र अशी हत्या केली जाते. शक्यतो अशा घटना या उत्तर भारतातील ग्रामीन भागात सर्वाधिक आढळून येतात. कारण तेथे अजून परंपरागत खाप-पंचायतीचे, जातपंचायतीचे वर्चस्व आढळून येते.

प्राचीन काळापासून अनेक समाजात वा देशात अशी हत्या ही योग्य, कायदेशीर किंवा समाजमान्य मानली जात होती. असे इतिहासात आढळून येते. जसे-रोमन सम्राट ऑगस्टस सिझरने (इ.स. पूर्व ६३ ते इ.स. १४) आपल्या साम्राज्यात व्यभिचारी पत्नीची हत्या करण्याची परवानगी तिच्या पतीस तर अनैतिक लैंगिक वर्तन करणाऱ्या कन्येची हत्या करण्याची परवानगी तिच्या पतीस दिलेली होती.

**प्रतिष्ठेसाठीच्या हत्येचा अर्थ**

इंग्रजीतील honour killing या संज्ञेसाठी मराठीत ''प्रतिष्ठेसाठीची हत्या'' हा प्रतिशब्द आपण वापरत आहोत. Honour म्हणजे प्रतिष्ठा किंवा सन्मान होय, तर killing म्हणजे हत्या किंवा खून वा वध होय. यावरून Honour Killing म्हणजे प्रतिष्ठेच्या रक्षणासाठी होणारी हत्या असा अर्थ होतो.

समुहाच्या प्रतिष्ठेस, सन्मानास बाधा आणणारे कृत्य वा वर्तन सदस्यांनी करू नये अशी अपेक्षा प्रत्येक समुहाची, समुदायाची असते. परंतु काही वेळेस समाजातील काही सदस्यांकडून कळतनकळतपणे समुहाची अप्रतिष्ठा अथवा समुदायाच्या नियमनाविरुद्ध गैरवर्तन केले जाते. त्या वर्तनाची प्रतिकार करण्याकरिता समाजातील काही व्यक्ती, समुह चिडून जाऊन त्या समुहातील गैरवर्तन करणाऱ्या सदस्यांची हत्या करतात. त्या कृतीतून समुहाच्या प्रतिष्ठेचे जतन व रक्षण करणे हा उद्देश असतो. उदा. काही वेळा आपल्यापेक्षा कनिष्ठ जातीतील युवकाशी प्रेमविवाह केला असल्यास किंवा पत्नीचा काही अनैतिक संबंध असल्यास अशा व्यक्तीची प्रतिष्ठेकरीता हत्या केली जाते.

**प्रतिष्ठेसाठीच्या हत्येची व्याख्या :**

१) **जागतिक आरोग्य संघटना** (World Health Organization)

कुटुंबाची प्रतिष्ठा वाचविण्यासाठी स्त्रियांच्या होणाऱ्या हत्या म्हणजे प्रतिष्ठेसाठीची हत्या होय. (Honour Killing is the murders of women to save the family honour).

२) **विकीपिडीया वेबसाईटनुसार :**

प्रतिष्ठेसाठीची हत्या किंवा लज्जेसाठीची हत्या ही एखाद्या कुटुंब सदस्याची होणारी हत्या असून हत्या करणाऱ्या व्यक्तीच्या विश्वासानुसार बळीने कुटुंबास लज्जा आणणारे वा कुटुंबाची अप्रतिष्ठा करणारे कृत्य केलेले आहे. किंवा एखाद्या समुदायाच्या वा धर्माच्या तत्त्वांचे प्रतिष्ठेच्या संस्कृतीसह उल्लंघन केलेले आहे.

३) **ऑक्सफर्ड ॲडव्हान्स लर्नर्स डिक्शनरी :**

प्रतिष्ठेसाठीची हत्या ही एखाद्या नातलगाची, साधारणतः एखाद्या मुलीची किंवा स्त्रीची होणारी हत्या आहे कारण तिने असे काहीतरी केलेले आहे की, ज्यामुळे कुटुंब लज्जित झालेले आहे, असे मानले जाते.

(Honour Killing – the murder of a relative, usually a girl or women, because she has done something that is thought to bring shame on the family.)

प्रतिष्ठेसाठीच्या हत्यांचे स्वरूप :

प्रतिष्ठेसाठीच्या हत्येस सन्मान रक्षणाकरीता केल्या जाणाऱ्या हत्यांचा समावेश होतो. या हत्येचे स्वरूप पुढीलप्रमाणे–

## १) **सार्वत्रिकता** (Universality)

प्रतिष्ठेसाठीच्या हत्या जगात सर्वत्र घडत असल्याने त्या सार्वत्रिक स्वरूपाच्या आहेत. अगदी प्राचीन-अर्वाचीन, प्रगत-अप्रगत, नागर-ग्रामीण, आदिम अशा सर्वच समाजात अशा हत्या होताना दिसतात. लंडन मेट्रोपॉलिटन युनिवर्सिटीद्वारा ''ऑनर किलिंग'' (प्रतिष्ठेसाठीची हत्या वा सन्मान हत्या) याविषयावर आयोजित सेमिनार मध्ये असे तथ्य समोर आले की, खोट्या शान, सन्मान, प्रतिष्ठेच्या नावावर होणाऱ्या हत्या या हिंदूस्थान व्यतिरिक्त आशिया खंडामधील इतर देशामध्येही होतात. यामध्ये इतर मुस्लिम देशाचा देखील समावेश आहे. जगभर झालेल्या अध्ययनानुसार केवळ अशिक्षित, गाववाल्यांच्याकडूनच हे कृत्य घडून येत नाही. तर सुशिक्षित, उच्चशिक्षण घेतलेल्या लोक देखील आपल्या घरान्याच्या मानरक्षा, प्रतिष्ठेकरीता या प्रकारच्या हत्या घडवून आणतात. थोडक्यात प्रतिष्ठेसाठी हत्या या सर्वत्र कमी-अधिक प्रमाणात घडत असतात.

## २) **विस्तार** (Extent)

सन्मान, मानरक्षणाकरीता केलेल्या हत्येंची, व्याप्ती, प्रमाण किंवा विस्तार निश्चितपणे स्पष्ट करणे अवघड आहे. कारण अशा हत्येची आकडेवारी पद्धतशीरपणे गोळा केली जात नाही. तसेच अशा हत्यांची नोंद शक्यतो पोलिसांमध्ये करणे टाळले जाते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या एका रिपोर्टच्या अंदाजानुसार दरवर्षी जगामध्ये जवळजवळ पाच हजार लोक हे ऑनर किलिंग या नावाने मारले जाते. तसेच शासकीय आकडेवारीनुसार भारतामध्ये प्रत्येक वर्षी जवळपास एक हजार (युवक-युवतिया) तरुण-तरुणीची सन्मान, मानरक्षणाकरीता, वा प्रतिष्ठेच्या नावाने जीव गमवावा लागतो. बीबीसी च्या ''वुईमेन्स ॲडव्होकरी ग्रुप्स'' या संस्थेच्या अंदाजानुसार जगात दरवर्षी सुमारे २० हजार स्त्रियांची हत्या होते. एकट्या ब्रिटनमध्ये (UK) २०१० सालात अशा हत्येचे २८२३ गुन्हे पोलिसात नोंदवलेले होते.

## ३) **नियोजनबद्ध गुन्हा** (Planned Crime)

सन्मान हत्या वा प्रतिष्ठेसाठी हत्या हा एक नियोजनबद्ध गुन्हा असतो. कुटुंबाची बदनामी, बेअब्रु वा अप्रतिष्ठा होईल असे गैरवर्तन करणाऱ्या सदस्यांची हत्या इतर सदस्यांकडून बहुधा नियोजनबद्धपणे केली जाते.

बहुतेक प्रकरणात गैरवर्तन करणाऱ्या सदस्यास वा समाजनियमनाविरुद्ध वर्तन करणाऱ्या सदस्यास समजावून सांगितले जाते, न ऐकल्यास पुढे त्या सदस्यास धमकावणे, मारहान करणे, कोंडून ठेवणे, उपाशी ठेवणे इत्यादी मार्गाने त्या व्यक्तीचा छळ केला जातो. परंतु तो सदस्य दुर्वर्तन चालूच ठेवले तर मात्र शेवटी कुटुंबातील इतर सदस्य त्याच्या हत्येचा नियोजनबद्ध हत्येचा कट रचतात.

## ४) **विविधता** (Diversity)

प्रतिस्ठेसाठीच्या हत्यांमध्ये अनेक बाबींची विविधता आढळते. उदा. अशा हत्यांमध्ये द्वेष, राग, चीड, अपमान, बेअब्रु, सुड, शिक्षा इत्यादीसंबंधीच्या भावभावना गुंतलेल्या असतात. तसेच अशा हत्या

कुटुंबाप्रमाणेच कुल (clan), (आप्तसंबंधी (Kinship), जात (Casle), जमात (tribe), वांशिक वा धार्मिक समुदाय (racial or religious community) इत्यादी समुहाची प्रतिष्ठा वाचविण्याच्या हेतूनेही घडतात. अशा प्रकारे, प्रतिष्ठेसाठीच्या हत्यांमध्ये भावभावना, समुहाचा प्रकार, बळीचे लिंग (स्त्री, पुरुष, तृतीयपंथी) व हत्या करणाऱ्या व्यक्ती इत्यादी बाबींची मोठी विविधता आढळते.

**५) विविध पद्धती** (Various Methods)

ह्या हत्येकरीता विविध पद्धतीचा वापर केला जातो. साधारणपणे डोक्यात दगड घालणे, गळा दाबणे, भोसकणे, जाळणे, विष पाजने, फाशी देणे, पाण्यात बुडविने, गोळी घालणे, अपघात घडविणे इत्यादी मार्गानी हत्या केली जाते. किंवा काही वेळा त्रास देऊन सदरील व्यक्तीस आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले जाते.

**प्रतिष्ठा वा सन्मान हत्याची कारणे :**

प्रतिष्ठेच्या हत्येस परस्पर संबंधित असणारे अनेक घटक वा कारणे जबाबदार आहेत. त्यामध्ये, स्त्री, पुरुष, तृतीयपंथी या सर्वांच्या हत्या होतात. त्याच्या हत्येची काही कारणे समान तर काही कारणे वेगवेगळी असल्याचे आढळते. यामध्ये पुढीलप्रमाणे कारणे सांगता येतात.

**अ) समष्टीवादाचा प्रभाव :**

बहुसंख्य समाजात व्यक्तीपेक्षा समष्ठी किंवा समुह हा श्रेष्ठ मानला जातो. त्यातूनच व्यक्तीवाद, व्यक्तीस्वातंत्र्याला नाकारले जाते. त्यामुळे समुहाच्या हितासाठी व्यक्तीच्या हिताचा बळी देणे योग्य व आवश्यक मानले जाते.

**ब) प्रतिष्ठा व लज्जेची संकल्पना :**

मानव समाजात प्रतिष्ठा (honour) व लज्जा (Shame) या दोन संकल्पना उदयास आल्या. काही मानवी संबंध, मानवी वर्तन व सामाजिक स्थिती (Social Situation) ह्या गोष्टी आदर्श, योग्य व चांगल्या मानल्या गेल्या व त्या समाजात उपस्थित असणे हे अभिमानाचे, सन्मानाचे वा प्रतिष्ठेचे लक्षण ठरविले व त्या अनुपस्थित असणे किंवा त्यांच्या विरोधी गोष्ठ समाजात असणे हे लज्जेचे लांछनाचे (कलंकाचे), अप्रतिष्ठेचे वा बेअब्रुचे लक्षण ठरविणे. व्यक्तीच्या वर्तनाने जर समुहाची प्रतिष्ठा खालावली, समुहास कलंक लागला, त्याची बेअब्रु झाली तर तिला दंड/शिक्षा करण्याचा अधिकार समुहास देण्यात आला. हे एक प्रतिष्ठेच्या हत्येचे कारण ठरते.

**क) पित्तृसत्ताक समाजव्यवस्था वा संस्कृती :**

काही थोड्या आदिम जमातींचा अपवाद वगळता जगातील सर्वच समाजात पित्तृसत्ताक (पुरुषप्रधान) समाजव्यवस्था व संस्कृती प्रस्थापित झाली. या समाजव्यवस्थेत नेहमीच स्त्रियांना दुय्यम, कनिष्ठतेची, हिनतेची, वागणूक दिली जाते. तिचे स्वातंत्र्य नाकारले जाते. त्यामुळे स्त्रियांवर अनेक निर्बंध लादले जातात.

स्त्रियांच्या लैंगिक, वैवाहिक, कौटुंबिक जीवनातील निर्बंधाच्या उल्लंघनाविषयी पुरुषप्रधान कुटुंब वा समुह हे अधिक संवेदनशील असतात. त्यामुळे स्त्रियांचे अनैतिक लैंगिक वर्तन वा विवाहपूर्व व विवाहबाह्य संबंध, हे बेअब्रु अप्रतिष्ठेचे मानले जाते. त्यातून त्या स्त्रीला ठार मारले जाते. अशाप्रकारे पितृसत्ताक व्यवस्था ही पतिष्ठेसाठीच्या हत्येची कारणे ठरतात.

**ड) कुटुंबाची किंवा समुहाची अप्रतिष्ठा व बेअब्रु करणारे घटक :**

**१) प्रेमविवाह :** कुटुंबाच्या इच्छेविरुद्ध व्यक्तीने प्रेमविवाह करणे यातून वर वधू दोघांचीही हत्या केली जाते.

**२) विवाहास नकार :** कुटुंबाने निवडलेल्या जोडीदारास विवाह करण्यास नकार देणे, पळून जाणे, असे कृत्य करणाऱ्या तरुणीची प्रामुख्याने व क्वचित प्रकरणात तरुणाचीही हत्या केली जाते.

**३) विवाहविषयक नियमांचे उल्लंघन :** अंतर्विवाहाच्या किंवा बहिर्विवाहाच्या नियमांचे उल्लंघन करणे.

**४) विवाहपूर्व लैंगिक संबंध :** विवाहापूर्वी व्यक्तीने विशेषतः तरुणीने एखाद्या पुरुषाशी लैंगिक संबंध ठेवणे, हे अप्रतिष्ठेचे मानून तिची हत्या केली जाते.

**५) विवाहबाह्य संबंध :** ठेवणाऱ्या पती-पत्नीचे अनैतिक संबंधातूनही हत्या घडून येते.

**६) विनयभंग, कौमार्यभंग व बलात्कार :** या प्रकारचे कृत्य जर घडून आले तर त्यांची हत्या केली जाते.

**७) समलिंगी संबंध :** एखादा व्यक्ती याप्रकारे संबंध ठेवीत असल्यास वा विवाह करू इच्छित असल्यास.

**८) विवाहविच्छेद :** एखाद्या कुटुंबातील विवाहित स्त्री विवाहविच्छेद (घटस्फोट) घेण्याचा हट्ट वा प्रयत्न करीत असेल तर तिची हत्या केली जाते.

९) **पुरुषी सत्तेस आव्हान :** केल्यास त्या स्त्रीची हत्या केली जाते.

**१०) भिन्नलिंगी यासारखे वर्तन :** काही स्त्रीया वा पुरुष करतात. त्यामुळे त्यांच्या कुटुंबाची समाजात अप्रतिष्ठेचे, चेष्टेचा विषय बनतो त्यामुळे हत्या घडून येतात.

**११) सामाजिक नियमनांचे उल्लंघन :** जर समाज सदस्याकडून घडून येत असेल तर त्या व्यक्तीची हत्या केली जाते.

**प्रतिष्ठेसाठीच्या हत्यांमुळे मानवी हक्कांचे होणारे उल्लंघन :**

प्रतिष्ठेसाठीच्या हत्यांमुळे व्यक्तीच्या अनेक मानवी हक्कांचे उल्लंघन होते. अशा हत्या ह्या मानवी प्रतिष्ठा, मानवी हक्क, मानवतावादी विचार, नैतिकतेच्या विरोधी असल्याने असे वर्तन हे दंडनीय गुन्हा मानला जातो. या हत्यांमुळे मानवी हक्कांचे उल्लंघन होते.

१) जीविताच्या हक्कांचे उल्लंघन

२) स्वातंत्र्याच्या हक्काचे उल्लंघन

३) शोषण व छळ न होण्याच्या हक्काचे उल्लंघन

अशाप्रकारे सन्मान हत्या मध्ये बळी पडलेल्या व्यक्तीचा प्रचंड छळ केला जातो. अनेक अघोरी मार्गाने प्रचंड वेदना देऊन त्या व्यक्तीची हत्या केली जाते. हे सर्व कृत्य, वर्तन मानवी हक्कांचे उल्लंघन करीत असते.

**भारतात होणाऱ्या प्रतिष्ठेसाठीच्या हत्या :**

दक्षिण आशियात अशा हत्या लक्षणीय प्रमाणात घडतात. भारतातील अशा हत्यांचे स्वरूप पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**१) विस्तार :**

फार मोठ्या प्रमाणात या प्रकारच्या हत्या घडतात, तथापि त्यांची पद्धतशीर नोंद होत नसल्याने त्यांच्याविषयी विश्वसनीय आकडे उपलब्ध होत नाहीत. नॅशनल क्राईम रेकॉर्डस् ब्युरोच्या २०१५ च्या अहवालात प्रतिष्ठेसाठीच्या हत्येच्या २५१ घटना घडल्याचे आढळून येते. परंतु प्रत्यक्षात त्याचा आकडा अधिक अल्याचे दिसून येते.

**२) प्रमाणभिन्नता :**

भारतात प्रतिष्ठेसाठीच्या हत्यांचे प्रमाण राज्य, जात, वर्ग व विभाग इत्यादीनुसार भिन्न-भिन्न असल्याचे आढळतात. इतर राज्यांच्या तुलनेत उत्तरप्रदेश, राजस्थान, हरियाणा व पंजाब या राज्यात अशा हत्या अधिक प्रमाणात घडतात. नगरापेक्षा ग्रामीण भागात या हत्या अधिक घडतात. विश्वसनीय आकडेवारी उपलब्ध नसल्यामुळे वरील माहिती ही स्थूल वा अंदाजात्मक मांडली जातात.

**३) प्रभावी कारणे :**

भारतात पुढील कारणांमुळे प्रतिष्ठेसाठीच्या हत्या होतात.

१) **आंतरजातील विवाह :** हिंदू परंपरेने निषिद्ध मानले.

२) **सगोत्र विवाह :** एकत्र गोत्र असणारे स्त्री-पुरूष हे परस्परांचे रक्तसंबंधी (रक्ताच्या नात्याचे) मानून त्यांचा विवाह हिंदू परंपरेने निषिद्ध मानला जातो. उत्तर भाारतातील ग्रामीण भागात सगोत्र विवाहामुळे प्रतिष्ठेसाठीच्या हत्या होण्याचे प्रमाण अधिक आढळते.

३) **प्रेमविवाह :** याकारणाने देखील हत्या घडतात.

४) **अनैतिक लैंगिक संबंध :** विवाहबाह्य लैंगिक संबंध हे अनैतिक मानले जातात. असे संबंध जर स्त्री वा पुरुष ठेवीत असेल तर त्या व्यक्तीची हत्या केली जाते.

५) **व्यभिचार :** भारतात व्यभिचार करणाऱ्या व्यक्तीची, विशेषतः स्त्रीची, प्रतिष्ठेसाठी हत्या होताना आढळते. एकनिष्ठता हा आदर्श मानला जातो. त्या आदर्शाचे उल्लंघन करून जेव्हा पत्नी वा पती इतर व्यक्तीशी संबंध प्रस्थापित करीत असेल. तर त्यांची समाजातील व्यक्तींकडून हत्या घडून येते.

६) **पालकांनी ठरविलेल्या विवाहास नकार :** जर तरुणीनी केल्या तिचा बळजबरीने विवाह लावून दिला जातो. त्यास त्या व्यक्तीकडून विरोध केला तर कुटुंबाचा अपमान झाला असे समजून त्या तरुणाची हत्या केली जाते.

**४) विविध समुहाकडून हत्या :**

भारतात केवळ प्रतिष्ठेसाठीची हत्या ही कुटुंब या समुहाकडूनच नव्हे, तर जात, जमात, धार्मिक समुह, पंचायत इत्यादी समुहांकडून वा त्यांच्या आदेशावरून प्रतिष्ठेसाठीच्या हत्या होताना दिसतात. पारंपारिक भारतात जात-पंचायत ह्यछाऽस्तर्एछेन्च्ल्हि होत्या व जातीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सदस्यांना त्या शिक्षा करीत. अनेकदा ही शिक्षा मृत्युदंडाचीही होती.

तसेच उत्तर भारतात या पंचायती खाप पंचायती या नात्याने तर दक्षिणेकडे तामिळनाडू राज्यात कट्टा पंचायती या नावाने आजही टिकून आहेत. पंचायती आंतरजातीय विवाह. सगोत्र विवाह, प्रेमविवाह करणाऱ्या व करू इच्छिनाऱ्या व्यक्तींची हत्या करण्याचे आदेश देतात. कारण त्यांच्या वर्तनाने केवळ त्यांच्या कुटुंबाचीच नव्हे तर संपूर्ण जातीच्या प्रतिष्ठेला धक्का लागतो. अनेकदा या पंचायती अर्थदंड करणे, जातीतून बहिष्कृत करणे (वाळीत टाकणे), समुदायाबाहेर हद्दपार करणे अशीही शिक्षा गैरवर्तन त्या व्यक्तीस वा कुटुंबास करताना दिसतात.

**५) अशिक्षित तसेच शिक्षितांचाही सहभाग :**

सन्मान हत्या ह्या केवळ परंपरागत सरंजामशाही मनोवृत्तीचा प्रभाव असणाऱ्या व अशिक्षित अशा कुटुंबातच नव्हे तर स्वतःला आधुनिक नोकरशाहीवादी मानणाऱ्या व सुशिक्षित अशा कुटुंबातही घडताना दिसतात. भारतात प्रेमविवाह व आंतरजातीय विवाह करणारे तरुण-तरुणी हे तुलनेने उच्चशिक्षित व तथाकथित आधुनिक कुटुंबातील असतात. मात्र त्यांचे पालक हे जात, धर्म, प्रतिष्ठा इत्यादीच्या अहंगडांने पछाडलेले असतात. ते खोट्या प्रतिष्ठेच्या आहारी जाऊन आपल्या मुलामुलींची हत्या करतात.

**भारतात प्रतिष्ठेसाठीच्या हत्यांना आळा घालण्यासाठी केलेली उपाययोजना :**

विविध उपाययोजना या प्रकारच्या हत्यांना आळा घालण्यासाठी केल्या जातात.

१) भारतीय राज्यघटनेने प्रत्येक व्यक्तीच्या जीविताचा हक्क मान्य करून या हक्काचा मुलभूत हक्कात समावेश केलेला आहे. घटनेतील कलम २१ नुसार प्रचलित कायद्याने प्रस्थापित केलेल्या पद्धतीला सोडून व्यक्तीचे जीवित व वैयक्तिक स्वातंत्र्य हिरावून घेतले जाणार नाही अशी तरतुद केलेली आहे. ही तरतुद सर्वच प्रकारच्या बेकायदेशीर हत्यांना आळा घालण्यासाठी उपयुक्त ठरते.

२) भारतीय दंडसंहितेतील कलम ३०२ नुसार एखाद्याची हत्या (खून) करणे हा सर्वात गंभीर गुन्हा मानला जात असून त्यासाठी मृत्युदंड किंवा आजन्म कारावास किंवा अर्थदंड अशा शिक्षेची तरतुद केलेली आहे. कलम ३०६ नुसार पतीने पत्नीचा छळ करून तिला आत्महत्येस प्रवृत्त करणे हा गुन्हा मानला जातो.

३) सामाजिक कायदे – परंपरेने चालत आलेल्या ज्या अनिष्ठ प्रथा व्यक्तीच्या हत्येस कारणीभूत ठरतात. त्या प्रथांचे उच्चाटन केलेले आहे. उदा. १९८७ मध्ये ''सतीप्रथा निर्मुलन कायदा'' अधिक कडक स्वरूपात (१८२९ मध्ये ब्रिटिश शासनाने केलेल्या कायद्यापेक्षा) संपूर्ण देशभर लागू केला आहे. तसेच कलम ३०४–ब नुसार विवाहानुसार ७ वर्षाच्या आत एखाद्या स्त्रीचा जळून वा इतर शारीरिक दुखापतीमुळे वा अनैसर्गिक मृत्यू झाल्यास तो हुंडाबळी मानून त्या जबाबदार व्यक्तींना किमान ७ वर्षे व कमाल आजन्म कारावासाची शिक्षा देण्याची तरतुद केलेली आहे.

या व्यतीरिक्त ''बालविवाहाची व बळजबरीचा विवाह'' तसेच 'जात व धर्म अंतर्विवाहाची सक्ती', 'सगोत्र विवाहास बंदी' इत्यादींना कायद्याने बंदी घातलेली आहे आणि आंतरजातीय, आंतरधार्मिक व सगोत्र विवाह हे कायदेशीर ठरविलेले आहेत. आज कायद्याने जातपंचायत, खापपंचायत, कट्टा पंचायत यांचे शिक्षा करण्याचे अधिकार कायद्याने नष्ट केलेले आहेत. तरीदेखील कायद्यातील अंमलबजावणीचा अभावामुळे आजही सन्मान हत्या होताना दिसतात.

### ४.३.३ क) झुंड बळी वा दुर्विहित हत्या (Mob Lynching)

झुंड बळी म्हणजे Mob Lynching ही संज्ञा Mob म्हणजे जमाव आणि Lynch म्हणजे विनाचौकशी ठार मारणे. या दोन शब्दांपासून बनलेली आहे. या दोन शब्दांच्या अर्थानुसार Mob Lynching म्हणजे विनाचौकशी एखाद्या व्यक्तीची जमावाकडून होणारी हत्या होय. एखाद्या व्यक्तीवर गुन्हा केल्याचा खरा वा खोटा आरोप ठेवून, त्या आरोपाची चौकशी न करताच एखादा जमाव जेव्हा कायदा हातात घेऊन, तिला शिक्षा देण्यासाठी तिची हत्या करतो, तेव्हा अशा हत्येस Mob Lynching म्हटले जाते.

**व्याख्या :**

**१) विकीपिडिया वेबसाईट :** झुंडबळी वा दुर्विहित हत्या ही एखाद्या समुहाने पूर्वनियोजितपणे न्यायालयीन अधिकार क्षेत्राबाहेर केलेली हत्या.

**२) चंद्रकांत खंडागळे :** कायदेभंग केल्याचा संशय असणाऱ्या व्यक्तींना कडक शिक्षा देण्यासाठी, त्यांची एखाद्या जमावाकडून उघडपणे, अनधिकृतपणे व विनाचौकशी केली जाणारी हत्या म्हणजे दुर्विहित हत्या (झुंडबळी) होय.

३) **ब्रिटानिका एन्साइक्लोपीडीया :** झुंडबळी वा दुर्विहित हत्या ही हिंसेचा एक प्रकार असून त्यामध्ये एखादा जमाव हा न्याय देण्याच्या सबबीखाली, गुन्हेगारी आहे असे गृहीत धरलेल्या व्यक्तीस विनाचौकशी मृत्युदंड देतो, पुष्कळदा छळ व शारीरिक विच्छेदन केल्यानंतर मृत्युदंड दिला जातो.

(Lynching is a form of Violence in which a mob, under the pretext of administering justice without trial, executes presumed offender, often after inflicting torture & coporal mutilation.)

४) **चार्ल्सस लिंच :** मॉब लिंचिंग ही संज्ञा ज्याच्या नावावरून रूढ झाली आहे, असे मानले जाते. त्या चार्ल्सस लिंच या व्यक्तीच्या मते, झुंडबळी वा दुर्विहित हत्या ही खाजगी व्यक्तींनी धारण केलेली न्यायालयबाह्य अशी सत्ता आहे.

**झुंडबळी वा दुर्विहित हत्येचे स्वरूप :**

१) **सार्वत्रिकता** (Universality) :

झुंडबळी वा दुर्विहित हत्या जगात सर्वत्र घडतात. तथापि गुन्हेगारीचे प्रमाण जास्त असणाऱ्या देशात विशेषतः ब्राझील, दक्षिण आफ्रिका, इत्यादी देशात अशा हत्या अधिक घडतात. इतर देशात तसेच भारतातही अशा हत्या मोठ्या प्रमाणात घडतात. त्याचे प्रमाण मात्र कमी-अधिक प्रमाणात होतात.

२) **गुन्हेगारी कृत्ये** (Criminal act) :

झुंडबळी हे एक गंभीर असे गुन्हेगारी कृत्य आहे. कारण कोणत्याही देशांत जमावास कायदा हातात घेऊन संशयित गुन्हेगारास वा इतर व्यक्तीस कोणत्याही प्रकारची शिक्षा देण्याचा अधिकार नाही. मात्र समाजातील काही व्यक्ती, एखादा समुह वा जमाव एखाद्यास गुन्हेगार मानून त्याला मृत्यूदंड देतात आणि आपले हे कृत्य योग्य कसे आहे, न्यायाचे आहे, असे मानतात. ज्या व्यक्तीला जमावाकडून वा समुहाकडून जी मृत्युदंडाची शिक्षा देताना संबंधित व्यक्ती खरोखरच गुन्हेगार आहे की नाही याची शहानिशा, चौकशी केली जात नाही. अशा तऱ्हेने गुन्हेगारी कृत्य जाणीवपूर्वक कसे घडते हा एक मानसशास्त्रीय व मनोविश्लेषणशास्त्रीय संशोधनाचा विषय राहिल.

३) **उघडपणे घडणारा गुन्हा** (Crime Committed Openly) :

बहुसंख्य गुन्हे हे चोरून, गुप्तपणे किंवा न कळत घडत असतात. मात्र झुंडबळी हा गुन्हा उघडपणे घडून येतो. संशयित गुन्हेगारास अनेक लोकांच्या डोळ्यासमोर भर रस्त्यावर ठार मारले जाते. तसेच आपले हे कृत्य कसे न्याय्याचे आहे, अभिमानास्पद, शौर्याचे आहे अशी भावना, धारणा जमावाची झालेली असते.

४) **क्रुर व रानटी कृत्य** (Cruel & barbaric act) :

झुंडबळी हे अत्यंत क्रूर व रानटी कृत्य आहे. या कृत्यामध्ये जमाव अत्यंत क्रुरपणे व्यक्तीस मारहान करून ठार मारले जाते. त्यासाठी दगडांनी ठेचणे, लाठ्या-काठ्यांनी बेदम मारणे, लाथा-बुक्क्यांनी बदडणे,

धारदार शस्त्रांनी भोसकणे, अवयव तोडणे, अर्धमेल्या अवस्थेत पेटवून देणे, पाण्यात बुडविणे, उंचावरून ढकलून देणे इत्यादी अमानुष मार्ग अवलंबिले जातात.

५) **पूर्वनियोजित तसेच आकस्मित** (Premeditated as well as sudden)

झुंडबळी हे कृत्य बहुधा पूर्वनियोजित असतात, हत्या कधी, कशी, कोठे करावयाची याचे पद्धतशीरपणे नियोजन केले जाते. थोडक्यात एखाद्याची हत्याकांड घडविण्याचा कट रचला जातो. यासंबंधीचा संदेश व माहिती हत्यास सहभागी होऊ इच्छिणाऱ्या समुहातील सदस्यांना कळविली जाते. आज, यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. काही वेळा आकस्मित ही हत्या केली जाते. उदा. एखादी व्यक्ती गुन्हा करताना पकडली गेली वा गुन्हा करून पळत सुटले त्यावेळेस जमाव प्रक्षुब्ध होऊन कायदा हातात घेतात व त्या व्यक्तीस मारहान करून त्या व्यक्तीची हत्या करतात.

६) **हुकुमशाहीचा विस्तार :**

झुंडबळी ह्या हुकुमशाही प्रवृत्तीचा विस्तार मानला जातो. समाज अशी जमात हत्यामुळे दहशत पसरवली जाते. तसेच आपले कृत्य हे न्याय व कायदा प्रस्थापित करणारे आहे असे मानले जाते. त्यामुळे ते योग्य व समर्थनीय असल्याचे स्वतःच ठरवितो. त्यामुळे समाजातील विवेक, विचारशीलता, संवेदनशीलता, मानवी प्रतिष्ठा मानवतावादी इत्यादी नष्ट करतात.

**झुंडबळी वा दुर्विहित हत्येची कारणे –**

झुंडबळी या कृत्यास विविध कारणे जबाबदार आहेत – ती पुढीलप्रमाणे–

१) वर्णद्वेषाचे धोरण किंवा वंशभेद

२) धर्मांधता

३) संप्रदायवाद

४) जातीवाद

५) गलिच्छ राजकारण इत्यादी घटकांच्या प्रभावाने झुंडबळीसारख्या समाजात घडताना दिसतात. अमेरिका, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड या देशात वर्णद्वेषातून श्वेतवर्णीयांकडून (गौर लोक) अश्वेतवर्णाच्या व्यक्तीच्या (निग्रोच्या) हत्या या वर्णद्वेषाचा धोरणाचा प्रभावामुळे घडलेल्या दिसतात. धर्मभेदामुळे, वंशभेदामुळे ही झांडबळी सारखे गुन्हे समाजात घडून येतात. गलिच्छ राजकारण, राजकीय वैमनस्य, सत्तासंघर्षामुळेही हे गुन्हे घडताना आढळतात.

**झुंडबळी वा दुर्विहित हल्ल्यांमुळे मानवी हक्कांचे होणारे उल्लंघन :**

झुंडबळी या घटनेत कायद्याचे उल्लंघन करून कायदा स्वतःच्या हातात घेतला जातो. त्यामुळे मानवी हक्कांचे मोठ्या प्रमाणावर उल्लंघन होते.

१) जीविताच्या हक्कांचे उल्लंघन

२) वेदनामुक्त मृत्युच्या हक्काचे उल्लंघन

३) निर्दोषत्व सिद्ध करण्याच्या हक्काचे उल्लंघन

४) कणेर शिक्षा न मिळण्याच्या हक्काचे उल्लंघन

**भारतातील झुंडबळी दुर्विहित हत्या :**

जगातील बहुसंख्य देशाप्रमाणेच भारतातही झुंडबळी वा दुर्विहित हत्या घडतात. भारतात होणाऱ्या अशा हत्यांचे स्वरूप पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येते.

**१) विस्तार :**

भारतात जवळपास सर्वच राज्यात दुर्विहित हत्या घडतात. तथापि, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, आसाम, गुजरात, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र या राज्यांचे त्यांचे प्रमाण अधिक असून इतर राज्यांत ते नगण्य स्वरूपाचे आहे. २०१५ पासून केंद्र सरकारच्या 'नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो' ने आकडेवारी प्रसिद्ध केलेल्या नाहीत.

**भारतातील झुंडबळी वा दुर्विहित हत्यांची विविध कारणे –**

**अ) जातीभेद वा जातीयता** ह्यछास्तएस्मिह्

भारतात उच्च जातीकडून कनिष्ठ जातींतील विशेषतः दलित वा अस्पृश्य जातीतील व्यक्तींची हत्या होण्याची अनेक उदाहरणे प्राचीन काळापासून घडत आलेली दिसतात. अलिकडेच २००६ मध्ये महाराष्ट्रातील भंडारा जिल्ह्यातील ''खैरलांजी'' नावाच्या खेड्यात कुणबी जातीच्या लोकांनी एका दलित कुटुंबातील ४ व्यक्तींची निर्घृण हत्या केली. जातीतील उच्च-निच भेदभावामुळे अनेक हत्या होतात.

**२) धर्मांधता :**

२०१४ पासून या कारणाने अनेक झुंडबळी वा दुर्विहित हत्या घडल्याचे दिसून आलेले आहे.

**३) बाल अपहरण :**

लहान मुलांना पळवून नेहले जाते. या अफवेतून देखील झुंडबळीसारख्या हत्या केल्या जातात.

**४) इतर कारणे :**

अनेक संशयावरूनही अशा हत्या घडतात.

**उपाययोजना :**

दुर्विहित हत्यांना प्रतिबंध करण्यासाठी भारतात अद्याप स्वतंत्र कायदा केलेला नाही. इतर सर्वसामान्य कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी केलेल्या तरतुदीच दुर्विहित हत्यांकरीताही लागू केल्या जातात. यामध्ये-

अ) **भारतीय राज्यघटनेने कलम १९ ते २२** अंतर्गत भारतीय नागरिकांना स्वातंत्र्याचा हक्क दिलेला आहे. त्यामध्ये जीविताचे स्वातंत्र्यही अंतर्भुत आहे. कलम २१ नुसार प्रचलित कायद्याने प्रस्थापित केलेल्या पद्धतीला सोडून व्यक्तीचे जीवित व वैयक्तिक स्वातंत्र्य हिरावून घेतले जाणार नाही. अशी तरतूद केलेली आहे.

ब) **भारतीय दंडसंहितेतील कलम ३०२** नुसार सदोष मनुष्यवध करणे हा गंभीर गुन्हा मानला असून अशा गुन्ह्यासाठी जाशी किंवा आजन्म कारावास आणि अर्थदंड अशा शिक्षेची तरतुद केलेली आहे.

क) **क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या कलम ३५७ (अ)** नुसार हत्येस बळी पडलेल्या व्यक्तीस वा तिच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना नुकसान भरपाई देऊन त्यांचे पूनर्वसन करण्याची तरतुद केलेली आहे. त्यासाठी राज्यांनी केंद्राच्या मदतीने एक निधी उभारण्याचीही तरतुद सुचविली आहे.

ड) सर्वोच्च न्यायालयाने २०१८ मध्येच संसदेत झुंडबळी वा दुर्विहित हत्या प्रतिबंधक कायदा करावा असे सुचविलेले आहे. तसेच अशा प्रकारच्या हत्या रोखण्यासाठी केंद्र व राज्य सरकारांनी काही मार्गदर्शक तत्त्वे घालून द्यावीत असेही सुचविले आहे. या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये गुन्हेगारांना कठोर शिक्षा देणे, बळींना वा त्यांच्या कुटुंबियांना योग्य ती नुकसानभरपाई देणे, हत्या करणाऱ्यांच्या मनात भीती निर्माण करणे यासारख्या बाबींचा समावेश करण्यात आला.

इ) सवोच्च न्यायालयाच्या एका खंडपीठाने याचे अध्यक्ष न्यायमूर्ती दिपक मिश्रा व सदस्य न्यायमुर्ती ए. एम. खानविलकर व डी. वाय. चंद्रचुड यांनी झुंडबळी वा दुर्विहित हत्यांच्या संदर्भात पुढील सुचना केलेल्या आहेत.

१) दुर्विहित हत्या रोखण्यासाठी पोलिस अधीक्षक ह्यश्प्ह दर्जाचा एक अधिकारी व अन्य काही नोडल अधिकारी नेमावेत.

२) दुर्विहित हत्येस बळी पडलेल्या व्यक्तींना किंवा त्यांच्या कुटुंबियांना हत्येनंतर तीस दिवसांच्या आत नुकसानभरपाई देण्यात यावी.

३) दुर्विहित हत्येच्या प्रकरणांची चौकशी ''फास्ट ट्रॅक कोर्टामार्फत'' करून सहा महिन्यांच्या आत निकाल घ्यावा.

४) बनावट व्हिडिओ व संदेश पसरविणाऱ्यावरील त्वरीत ''एफआयआर'' दाखल करावा.

५) दुर्विहित हत्येसंबंधीच्या मार्गदर्शक तत्त्वांचे तालन करण्यात कुचराई/दिरंगाई करणाऱ्यावर कडक कारवाई करण्यात यावी.

६) गृहमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीचे गठन करून तिने दुर्विहित हत्यासंबंधीचा अहवाल प्रधानमंत्र्यांना सादर करावा. या प्रकारच्या सुचना देण्यात आल्या. जेणेकरून मानवी हक्कांचे उल्लंघन होऊ नये. तरीदेखील याप्रकारचे कृत्य हे समाजात होत असलेले दिसून येते.

## ४.४ सारांश

घटक चार यामध्ये ''भारतातील मानवी हक्कांचे उल्लंघन'' यामध्ये मानवी दुर्व्यापार वा तस्करी या प्रथम उपविभागात, मानवी दुर्व्यापाराचा अर्थ, व्याख्या, स्वरूत, कारणे हा मानवी तस्करी वा दुर्व्यापार रोखण्याकरीता कोणकोणत्या उपाययोजना केल्या जाऊ शकतात याचा उल्लेख केला. दुसऱ्या उपविभागात सन्मान हत्या वा प्रतिष्ठेसाठीची हत्या याची व्याख्या, अर्थ, स्वरूप, कारणे, उपाययोजना, विस्तार तसेच तिसऱ्या उपविभागात झुंडबळी वा दुर्विहित हत्या यांचा अर्थ व्याख्या, कारणे, स्वरूप, उपाययोजनेचे अध्ययन केले गेले आहे. वरील सर्व मानवी हक्कांचे उल्लंघन केले जाते. यामध्ये प्रचंड छळ, शोषण, वैवाहिक वा कौटुंबिक जीवनाचा हक्क नष्ट, जीविताचा हक्क नष्ट, स्वातंत्र्याच्या हक्कावर गधा, वेदनामुक्त मृत्यूच्या हक्काचे उल्लंघन, कठोर शिक्षा न मिळणाऱ्या हक्काचे उल्लंघन केले जाते.

या सर्व हक्कांचे उल्लंघनास आळा घालण्यासाठी उपाययोजना समावेश केला गेला.

## ४.५ स्वयं अध्ययन प्रश्न

१) मानवी हक्कांचे उल्लंघन करणारे हे एक प्रमुख ............ कृत्य वा वर्तनप्रकार आहे.

२) इंग्रजीतील Human trafficking या संज्ञेसाठी मराठीत ........... ही संज्ञा वापरतात.

३) ............ शतकापासून मानवी हक्कांची जाणीव-जागृती झाली.

४) एखाद्या व्यक्तीला बलप्रयोग करून, भीती दाखवून, धोक्याने किंवा हिंसक पद्धतीने तस्करी किंवा बंधक बनवून ठेवण्यास संयुक्त राष्ट्र संघाने ............. म्हटले गेले.

५) मानवी दुर्व्यापार ही ............... स्वरूपाची घटना आहे.

६) पुरवठादार, दलाल, खरेदीदार व ग्राहक या घटकांची पद्धतशीर साखळी ............ मध्ये तयार झालेली असते.

७) मानवी दुर्व्यापारात गुंतलेल्या व्यक्ती ह्या बळी मिळविण्यासाठी ......... वापरतात.

८) ........... बळी पडलेल्या व्यक्तींना शारीरिक, मानसिक, आर्थिक व सामाजिक दुष्परिणाम भोगावे लागतात.

९) कोणत्या कलमानुसार १८ वर्षाखालील मुलीचे अपहरण करणे हा दंडनीय गुन्हा आहे?

१०) स्त्रिया व मुलींच्या अनैतिक व्यापार बंदीचा कायदा किती साली झाला?

११) प्रतिष्ठेसाठीची हत्या म्हणजे काय?

१२) जागतिक आरोग्य संघटनेनुसार प्रतिष्ठेसाठीची हत्या म्हणजे काय?

१३) प्रतिष्ठेसाठीच्या हत्या हे काय आहे?

१४) 'पुरुषप्रधान व पितृसत्ताक समाजव्यवस्था व संस्कृती' हे कोणत्या हिंसेचे कारण आहे.

१५) झुंडबळी वा दुर्विहित हत्या म्हणजे काय?

१६) जातीभेद वा जातीयता हे कोणत्या गुन्हेचे कारण आहे.

१७) कोणत्या कलमांतर्गत भारतीय नागरिकांना स्वातंत्र्याचा हक्क दिलेला आहे?

## ४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) गुन्हेगारी

२) मानवी दुर्व्यापार

३) २० व्या शतकापासून

४) मानवी दुर्व्यापार

५) सार्वत्रिक

६) मानवी दुर्व्यापार

७) विविध प्रकारची साधने वा मार्ग

८) मानवी दुर्व्यापारास

९) कलम ३६३ नुसार

१०) १९५६ नुसार

११) प्रतिष्ठेच्या रक्षणासाठी होणारी हत्या हे देखील मानवी हक्कांचे उल्लंघन करणारे एक गुन्हेगारी कृत्य आहे.

१२) कुटुंबाची प्रतिष्ठा वाचविण्यासाठी स्त्रियांच्या होणाऱ्या हत्या म्हणजे प्रतिष्ठेसाठीची हत्या होय.

१३) हा एक नियोजनबद्ध गुन्हा असतो.

१४) प्रतिष्ठेसाठीच्या हत्येचे कारण आहे.

१५) दुर्विहित हत्या ही एखाद्या समुहाने पुर्वनियोजितपणे न्यायालयीन अधिकार क्षेत्राबाहेर केलेली हत्या.

१६) झुंडबळी वा दुर्विहित हत्याचे कारण आहे.

१७) कलम १९ ते २२ अंतर्गत

## ४.६ सरावासाठी प्रश्न

खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१) मानवी दुर्व्यापार म्हणजे काय सांगून कारणे व उपाय सांगा.

२) प्रतिष्ठेसाठीची हत्या ही संकल्पना सविस्तर स्पष्ट करा.

३) झुंडबळी वा दुर्विहित हत्या याविषयावर चर्चा करा.

टिपा लिहा.

१) मानवी दुर्व्यापार - कारणे

२) प्रतिष्ठेसाठीची हत्या कारणे व उपाय.

३) झुंडबळी वा दुर्विहित हत्या - कारणे.

४) प्रतिष्ठेसाठी हत्या

५) झुंडबळी उपाय

६) मानवी दुर्व्यापार उपाय.

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

- य. च. म. मु. वि. नाशिक - मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना.

- य. च. म. मु. वि. नाशिक - मानवी हक्क आणि अंमलबजावणी यंत्रणा.

- जी. एल. शर्मा - सामाजिक मुद्दे, रावत पब्लिकेशन्स २०१५.

- प्रा. चंद्रकांत खंडागळे - मानवी हक्क.

- इंटरनेट - उपलब्ध साहित्य.

❑❑❑

# घटक – १
# ग्रामीण समाजशास्त्राची प्रस्तावना
## (Introduction to Rural Sociology)

**घटक संरचना**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ ग्रामीण समाजशास्त्राची व्याख्या व अर्थ

१.२.२ ग्रामीण समाजशास्त्राचे स्वरूप

१.२.३ ग्रामीण समाजशास्त्राचा उदय, व्याप्ती व अभ्यासविषय

१.२.४ भारताच्या संदर्भात ग्रामीण समाजशास्त्राचे महत्त्व

१.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१.४ सारांश

१.५ स्वयं अध्ययना प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी प्रश्न

१.७ चिंतन व कार्य

१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्टे (Objectives)

या अध्ययन घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास

१. ग्रामीण समाजशास्त्राची व्याख्या करता येईल.

२. ग्रामीण समाजशास्त्राचा अभ्यासविषय व व्याप्ती सांगता येईल.

३. ग्रामीण समाजशास्त्राचा अर्थ स्पष्ट होईल.

४. ग्रामीण समाजशास्त्राचे महत्त्व विशद करता येईल.

## १.१ प्रस्तावना (Introduction)

समाजाचा साकल्याने व व्यापकदृष्ट्या अभ्यास करणाऱ्या शास्त्राला समाजशास्त्र असे संबोधले जाते. समाजाच्या अभ्यासाला सुरुवात अगदी फार प्राचीन काळापासून झालेली दिसून येते. परंतु असे असूनही समाजशास्त्र हे अलिकडेच शास्त्र म्हणून उदयास आले आहे. कारण समाजशास्त्राचा अभ्यास वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून शास्त्रीय पद्धतीने करण्याची सुरुवात अलिकडेच सुरू झाली. थोडक्यात १९ व्या शतकात समाजशास्त्राचा शास्त्रीय अभ्यास करण्यास सुरुवात झाली. मानव समाजाचा सर्वांगीण व पद्धतशीर अभ्यास समाजशास्त्रामध्ये केला जाऊ लागला. सर्वप्रथम फ्रेंच तत्त्वज्ञ ऑगस्ट कॉम्पट यांनी समाजशास्त्राला स्वतंत्र विज्ञानाचा दर्जा मिळवून देण्याचा प्रयत्न केला. १९ व्या शतकापासून समाजशास्त्रज्ञ समाजाच्या अभ्यास वैज्ञानिक पद्धतीने करू लागले. समाजविषयक निष्कर्ष वस्तुनिष्ठपणे काढले जाऊ लागले. त्यामुळे समाजाच्या मूलभूत प्रश्नांचा खल करून त्याविषयी समाजशास्त्रज्ञ आपआपली मते मांडू लागलीत.

समाजशास्त्राचे अभ्यासक्षेत्र हे अतिशय विस्तृत असलेमुळे सर्व सामाजिक प्रश्नांचे स्वरूप हे भिन्न असते. त्यामुळे सर्व सामाजिक समस्यांचे बदलते स्वरूप लक्षात घेता सर्व समस्यांचा व्यवस्थित व पद्धतशिर अभ्यास करणे कोणत्याही एका शास्त्राला अशक्य आहे. म्हणूनच या समस्यांच्या स्वरूपावरून त्याचे वेगवेगळे विभाग पाडण्यात आले व हे विभाग अभ्यासाने समृद्ध व संपन्न झालेवर समाजशास्त्राच्या शाखा अस्तित्वात आल्या. या शाखापैकीच ग्रामीण भागातील संबंधाचे अध्ययन करणाऱ्या शाखेस ग्रामीण समाजशास्त्र असे संबोधले जाऊ लागले.

## १.२ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

या अध्ययन घटकात तुम्ही ग्रामीण समाजशास्त्राचे अभ्यासक्षेत्र समजावून घेणार आहात. त्यादृष्टीने या घटकामध्ये चार विभाग पाडण्यात आलेले आहेत. यामध्ये पहिल्या विभागात तुम्ही ग्रामीण समाजशास्त्राचा अर्थ व व्याख्या पहाणार आहात तर दुसऱ्या विभागात ग्रामीण समाजशास्त्राचे स्वरूप समजावून घेणार आहात. तिसऱ्या विभागात ग्रामीण समाजशास्त्राचा उदय, व्याप्ती व अभ्यासविषय समजावून घेणार आहात आणि शेवटच्या विभागात तुम्ही ग्रामीण समाजशास्त्राचे महत्त्व अभ्यासणार आहात.

### १.२.१ ग्रामीण समाजशास्त्राचा अर्थ व व्याख्या

ग्रामीण समाज हा पुर्णतः इतर समाजापेक्षा वेगळा समाज म्हणून ओळखला जातो. कारण ग्रामीण रुढी, परंपरा, जीवनपद्धती, सामाजिक समस्या व सामाजिक संबंध इत्यादीमुळे ग्रामीण समाज हा इतर समाजापेक्षा भिन्न आहे. त्यामुळे ग्रामीण समाजाचा साकल्याने अभ्यास करणे गरजेचे आहे.

ग्रामीण भागातील लोकांवर नैसर्गिक पर्यावरणाचा प्रभाव पडलेला दिसून येतो. नैसर्गिक पर्यावरणाशी या लोकांचा सतत संपर्क येत असल्यामुळे या लोकांच्या जीवनमानावर दूरगामी परिणाम होतो. पर्यायाने त्यांची संस्कृती, जीवनपद्धती, व्यवसाय, धर्मविषयक कल्पना, कुटुंबरचना, सामाजिक संघटन, सामाजिक गतीमत्त्व इत्यादी घटकातील होणारे बदल संस्कृतीमुळे होतात असा त्यांचा समज असतो.

ग्रामीण समाज हा आकाराने लहान असल्यामुळे या समाजात सामाजिक संबंधांचे जाळे दिसून येते. व्यक्तीपरत्वे परस्परसंबंध, त्यांच्या समस्या, सामाजिक समस्या व प्रक्रिया या भिन्न स्वरूपाच्या असतात. थोडक्यात, ग्रामीण पर्यावरणातील समाजजीवनाचा पद्धतशीर व व्यवस्थित केलेला अभ्यास म्हणजे ग्रामीण समाजशास्त्र होय.

विविध लेखकांनी केलेल्या ग्रामीण समाजशास्त्राच्या व्याख्या लक्षात घेणार आहोत. त्यामुळे ग्रामीण समाजशास्त्राचे स्वरूप स्पष्ट होण्यास मदत होईल–

१) **टी. एल. स्मिथ** : ग्रामीण सामाजिक संबंधाचा वैज्ञानिक पद्धतीने केलेल्या अध्ययनात निष्पन्न झालेल्या घटना व मूलभूत तत्त्वे एकत्रित करण्याचे कार्य ग्रामीण समाजशास्त्र करते.

२) **ए. आर. देसाई** : ग्रामीण समाजशास्त्र हे ग्रामीण समाजाचे विज्ञान होय. सर्वसामान्य ग्रामीण समाजरचनेचे व विकासाचे नियम विवक्षित ग्रामीण समाजाचे नियंत्रण करणाऱ्या विशिष्ट कायद्याचा शोध घेण्यास आपणास सहाय्यभूत होतात.

३) **प्रा. गिलेज :** ग्रामसमुदायाच्या परिस्थितीचा व प्रवृत्तीचा शोध घेवून ग्रामविकासाच्या प्रगतीची तत्त्वे निश्चित करण्यासाठी ग्रामसमुदायाचा पद्धतशीर अभ्यास करणारी समाजशास्त्राची शाखा म्हणजे ग्रामीण समाजशास्त्र होय.

४) **प्रा. वॉगट :** देशात शास्त्रीय सुधारणा प्रस्थापित व विकसित करण्याच्या विधायक कार्याचा पाया म्हणून ग्रामीण जीवनाच्या परिस्थितीतील शक्तीचा अभ्यास म्हणजे ग्रामीण समाजशास्त्र होय.

५) **एफ. स्टुअर्ट चॅपिन :** ग्रामीण जीवनाचे समाजशास्त्र म्हणजे ग्रामीण लोकसंख्येचा, गामीण सामाजिक संघटनांचा व ग्रामीण समाजात प्रभावी असणाऱ्या सामाजिक प्रक्रियांचा अभ्यास होय.

ग्रामीण समाजशास्त्राच्या वरील व्याख्या विचारात घेता ''ग्रामीण समाजाचे अध्ययन'' हेच ग्रामीण समाजाचे मुख्य ध्येय आहे. ग्रामीण समाजाचे अध्ययन, ग्रामीण जीवनपद्धती, ग्रामीण समुदायातील लोकांचे परस्पर संबंध, सामाजिक समस्या व सामाजिक संस्थांचे अध्ययन ग्रामीण समाजशास्त्रात केले जाते.

### १.२.२ ग्रामीण समाजशास्त्राचे स्वरूप

ग्रामीण समाजशास्त्र हे ग्रामीण समाजाचे वैज्ञानिक पद्धतीने अध्ययन करणारे सामाजिक विज्ञान होय. वैज्ञानिक प्रगतीमुळे मानवी जीवन सुखी, सुलभ व समाधानी करण्याचा प्रयत्न आजपर्यंत केलेला दिसून येतो. ग्रामीण पर्यावरणातील व्यक्ती व समूहातील संबंधाच्या संदर्भात वैज्ञानिक पद्धतीने मिळविलेले ज्ञान हे म्हणजेच ग्रामीण समाजशास्त्र होय. थोडक्यात, ग्रामीण समाजशास्त्राच्या स्वरूपाचे यथार्थ आकलन होण्यासाठी पुढील मुद्दे विचारात घ्यावे लागतील.

### १) ग्रामीण समाजशास्त्र हे एक विज्ञान आहे–

ग्रामीण समाजशास्त्र हे ग्रामीण समाजाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करते. ही अभ्यासाची पद्धत एक विशेष वैज्ञानिक पद्धती असल्यामुळे, अभ्यास करताना प्रथम त्या विषयांशी संबंधीत घटनांची माहिती व निरीक्षण करून गोळा केली जाते. यालाच तथ्य संकलन असे म्हटले जाते. यानंतर त्या माहितीची संकलन विश्लेषण व वर्गीकरण करून घटना घटनामधील परस्परसंबंधाविषयी अंदाज किंवा तर्क लावला जातो. यालाच अभ्यूपगम असे म्हटले जाते. यानंतर त्या अभ्यूपगमाची प्रचिती होवून त्याची सिद्धता केली जाते. त्यानंतर सिद्ध झालेला अभ्यूपगमाचे सामान्यीकरण करून त्याला सामान्य नियमाचे रूप दिले जाते व शेवटी त्या नियमांचा अगोदरच्या नियमांशी समन्वय साधला जातो. थोडक्यात, प्रत्येक शास्त्र हे त्या विषयाविषयी अभ्यासविषयाला लागू पडणारे नियम शोधून काढून त्याची व्यवस्थित रचना केली जाते.

### २) ग्रामीण समाजशास्त्र हे अनुभवाधिष्ठीत विज्ञान आहे

अनुभवनिरपेक्ष शास्त्र आणि अनुभवाधिष्ठीत शास्त्रे असे शास्त्रांचे वर्गीकरण केले जाते. ज्या शास्त्रातील नियम केवळ बौद्धिक चिंतनातून आलेले असतात व त्याची सत्यता बुद्धिच्या आधारे तपासली जाते, त्यासाठी ज्याला अनुभवाची गरज नसते त्याला अनुभव निरपेक्ष शास्त्र असे म्हटले जाते. याउलट ज्या शास्त्रातील नियम केवळ बौद्धिक चिंतनाद्वारे कधीच समजत नाहीत तर त्यासाठी त्याला प्रत्यक्ष अनुभवाची गरज असते. म्हणून कांही शास्त्रे ही अनुभवाधिष्ठीत असतात. ग्रामीण समाजशास्त्र हे देखिल एक अनुभवाधिष्ठीत शास्त्र आहे. कारण त्यातील नियमांची अंमलबजावणी ग्रामीण समाजातील घटनांच्या अनुभवांच्या आधारे होते.

### ३) ग्रामीण समाजशास्त्र हे तथ्यात्मक किंवा वस्तुनिष्ठ विज्ञान आहे

तथ्यात्मकशास्त्रे व आदर्शात्मक शास्त्रे असेही एक शास्त्रांचे वर्गीकरण केले जाते. जी शास्त्रे आपल्या विषयांचा अभ्यास आदर्शांच्या किंवा मूल्यांच्या संदर्भात करतात त्यांना आदर्शात्मक शास्त्रे म्हणतात. याउलट जी शास्त्रे आपल्या विषयांचा अभ्यास तथ्यांच्या किंवा वस्तुस्थितीच्या संदर्भात करतात त्यांना तथ्यात्मक शास्त्रे म्हणतात. ग्रामीण समाजशास्त्र हे ग्रामीण लोकांच्या वर्तनांचा अभ्यास करते. ग्रामीण लोकांचे सामाजिक वर्णन कसे आहे यादृष्टीने अभ्यास करते.

### ४) गामीण समाजशास्त्राकडे पूर्वकथन क्षमता आहे

कोणत्याही शास्त्रातील नियम हे समाज परिस्थितीत सर्वत्र खरेच ठरतात. त्यामुळे त्या नियमांच्या आधारे अचूक पूर्वकथन करता येणे शक्य होते. थोडक्यात, जी स्थिती उपलब्ध नाही तिच्याविषयी कांहीतरी निवेदन करणे म्हणजे पूर्वकथन होय. याअर्थाने पूर्वकथन हे भविष्यकाळाप्रमाणेच भूतकाळाविषयीचेही असू शकते. ग्रामीण समाजशास्त्रामध्येही नियमांच्या आधारे असे पूर्वकथन करता येणे शक्य होते. थोडक्यात, अशा पूर्वकथनाच्या आधारे ग्रामीण समस्या सोडविणेसाठी व ग्रामीण विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले जातात.

### ५) ग्रामीण समाजशास्त्र ही समाजशास्त्राची एक शाखा आहे

समाजशास्त्राचा उदय हा अलिकडील असल्यामुळे हे एक नवीन विज्ञान आहे. परंतु समाजशास्त्राने अल्पावधीत खूपच प्रगती केलेमुळे त्याचा विकास झालेला दिसून येतो. परंतु ग्रामीण समाजशास्त्र हे समाजशास्त्राची एक शाखा आहे. ग्रामीण समाज हा अखिल मानव समाजाचाच एक अविभाज्य भाग आहे हे लक्षात घेवूनच ग्रामीण समाजाचा अभ्यास केला पाहिजे.

थोडक्यात, ग्रामीण समाजाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणारे ग्रामीण समाजशास्त्र हे अनुभवाधिष्ठीत व तथ्यात्मक विज्ञान असून त्याच्याठिकाणी पुर्वकथन क्षमता आहे आणि ही एक समाजशास्त्राची एक शाखा आहे.

## १.२.३ ग्रामीण समाजशास्त्राचा उदय, व्याप्ती व अभ्यासविषय

### I) ग्रामीण समाजशास्त्राचा उदय

ग्रामीण समाजशास्त्राचा उदय हा जरी अलिकडचा असला तरी एका अर्थाने ग्रामीण समाजाच्या अभ्यासाची सुरुवात प्राचीन काळापासून झाली आहे. प्राचीन विचारवंतानी ग्रामीण समाजासंबंधी चिंतन अगोदरच केलेली आहेत. थोडक्यात ग्रामीण समाजासंबंधीचे विचार हे ग्रामीण समाजाएवढेच जुने आहेत. प्राचीन विचारवंतानी ग्रामीण समाजाची जीवनपद्धती समजून घेवून त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केलेले दिसून येतात. सारोकिन, झिम्मरमन, गाल्विन यासारख्या मतांचा आढावा घेतलेला दिसून येतो. इतकेच नव्हेतर प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक युगाच्या सुरुवातीच्या कालातील विचारवंतानी ग्रामीण समाजातील समस्या सोडविण्याचाही प्रयत्न केला होता म्हणूनच ग्रामीण समाजासंबंधीच्या अभ्यासाची सुरुवात याच अर्थाने प्राचीन आहे.

१९ व्या शतकाच्या माध्यमापासून ग्रामीण समाजविषयक सुसूत्र व व्यवस्थित अभ्यास सुरू झाला. १९ वे शतक म्हणजे भांडवलशाहीच्या साम्राज्याचा काल होय. जगाच्या सर्व भागांतील ग्रामीण समाजरचनेवर व अर्थव्यवस्थेवर भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा पगडा होता. म्हणूज ग्रामीण समाजविकास हे विचारवंताचे लक्ष्य बनले होते. ग्रामीण समाजाची उत्पत्ती व ग्रामीण जीवनाचे स्वरूप यावर विचारवंतानी संशोधन सुरू केले.

१८९० ते १९२० हा अमेरिकेच्या इतिहासातील काळा कालखंड मानला जातो. कारण याच काळात अमेरिकेतील संपूर्ण समाजजीवन उद्धवस्त झाले होते आणि याच काळामध्ये म्हणजे १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात अमेरिका या देशात ग्रामीण समाजाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करण्याची सुरुवात झाली.

### II) ग्रामीण समाजशास्त्राची व्याप्ती

ग्रामीण समाजशास्त्र हे एक नवीन विकसित सामाजिक विज्ञान आहे. या शास्त्राचा उदय विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात झाला असला तरी त्याचा विकास अल्पावधीतच झपाट्याने झाला आहे. म्हणूनच अध्ययन क्षेत्र व अध्ययन विषय याबाबतीत विचारवंतामध्ये मतभेद झालेले दिसून येतात. ग्रामीण

समाजशास्त्राच्या व्याप्तीसंबंधी या शास्त्राच्या विकासात कार्यारत असलेल्या विचारवंतामध्ये वेगवेगळे मतप्रवाह दिसून येतात.

१) ग्रामीण समाजशास्त्र हे स्वतंत्र विज्ञान आहे की, अखिल मानवजातीचे विज्ञान आहे?

२) ग्रामीण समाजशास्त्राने आपले अभ्यासाचे क्षेत्र ग्रामीण जीवनापुरतेच मर्यादित करावे की, ग्रामीण व नागरी जीवनाचा तुलनात्मक अभ्यास करून नागरीकरणाच्या व ग्रामीणीकरणाच्या लोकसंख्येवर होणाऱ्या परिणामांचा विचार करावा?

३) ग्रामीण समाजशास्त्राने ग्रामीण समाजाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करून गामीण समाजाच्या विकासाचे नियम प्रतिपादन करावेत की, ग्रामीण समाजाच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यक्रम सूचवून मार्गदर्शन करावे?

वरील सर्व प्रश्नांचा उहापोह अजूनही सुरू असून त्यामध्ये अनेक विचारवंताचे एकमत होताना दिसून येत नाही. परंतु समाजशास्त्राचा हेतूसंबंधीमात्र विचारवंतामध्ये दुमत आढळून येत नाही. म्हणूनच ग्रामीण समाजशास्त्राची व्याप्ती पाहताना प्रसिद्ध विचारवंतांची मते विचारात घेणे आवश्यक वाटते.

अ) **प्रा. टेलर** यांच्यामते ग्रामीण समाजशास्त्राची व्याप्ती दोन विभागात करता येईल.

१) ग्रामीण समाज हा संपूर्ण व्यवस्थेचा एक अविभाज्य भाग आहे हे लक्षात ठेवूनच त्याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. कारण मानवी स्वभाव, वृत्ती ही सर्व ठिकाणी सारखीच असते. त्यामुळे सामाजिक, उदय, सामाजिक उत्क्रांती, नियंत्रण, परिवर्तन, स्तरीकरण व प्रगती या बाबी इतर ठिकाणी जशा घडून येतात तशाच त्या ग्रामीण भागातही घडून येतात.

२) ग्रामीण समाजशास्त्राचे कांही खास प्रश्न असतात ते सोडविणे अगत्याचे असते. ग्रामवासीयांचे स्तलांतर, धर्मसंस्थेचे उच्चाटन, शिक्षणाच्या अपुऱ्या सोयी, मनोरंजनाचा अभाव यासारख्या प्रश्नांचा विचार होणे आवश्यक आहे. याबरोबरच ग्रामीण धर्म, शिक्षण, शासन व नितीमत्ता याकडे लक्ष देणे गरजेचे असते यातूनच कांही प्रश्न उद्‌भवले आहेत.

ब) **श्री स्मिथ टी. एल.** यांच्या मते ग्रामीण व नागरी समाज यांतील फरक स्पष्ट करणाऱ्या घटकांचा अभ्यास ग्रामीण समाजशास्त्रात होणे गरजेचे आहे. यामध्ये व्यवसाय, समुदायाचा आकार, लोकसंख्येची घनता, पर्यावरण, सामाजिक भेद, सामाजिक स्तरीकरण, सामाजिक गतिशिलता, सामाजिक आंतरक्रिया आणि सामाजिक ऐक्य यासारख्या घटकांचा यामध्ये समावेश होतो.

क) **श्री. हेज ए. डब्ल्यू** यांच्यामते

ग्रामीण समाजशास्त्र ग्रामीण समाजाशी निगडीत असणाऱ्या सर्व सामाजिक घटनांचा अभ्यास करणे यामध्ये सामाजिक संस्थांचा उदय, विकास व ऱ्हास, ग्रामीण शैक्षणिक गरजा व मूल्ये, ग्रामीण व नागर

लोकांचे परस्पर संबंध मजूराचे प्रश्न व ग्राम समुदायातील सामाजिक विषयायोजन इत्यादींचा अभ्यास यामध्ये केला जातो.

ड) **डॉ. ए. आर. देसाई** यांच्या मते

ग्रामीण समाजजीवनाचे शास्त्रीय अध्ययन करणे व त्याचबरोबर ग्रामीण जीवनाच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक पुनर्निर्माणमध्ये देखिल योगदान देणे गरजेचे आहे. ग्रामीण पुननिर्माण आणि सुधारणा कार्यक्रमासाठी उपाययोजना सुचविण्याचे कार्य ग्रामीण समाजशास्त्राने करावे.

इ) **अल्विन बर्टेन्ड** यांच्यामते

ग्रामीण समाजशास्त्राचा अभ्यास म्हणजे ग्रामीण सामाजिक संघटनांचा अभ्यास होय. सामाजिक संघटनेचा अभ्यास म्हणजे व्यक्तीची भूमिका, दर्जा, सामाजिक स्तरीकरण, सामाजिक समूह, सामाजिक नियंत्रण, सामाजिक संघटनांचा अभ्यास होय. सामाजिक संघटनेचा अभ्यास म्हणजे व्यक्तीची भूमिका, दर्जा, सामाजिक, स्तरीकरण, सामाजिक समूह, सामाजिक नियंत्रण, सामाजिक परिवर्तन व सामाजिक विघटन यांचा अभ्यास होय. शेती हाच ग्रामवासियांचा प्रमुख व्यवसाय असल्यामुळे ग्रामीण सामाजिक संघटनेची तीन प्रमुख वैशिष्ट्ये-

१) शेती ह्या प्रमुख आर्थिक क्रियेमुळे ग्रामीण समुदायातील लोकजीवनात शेतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

२) ग्रामीण शेतकरी शेती या व्यवसायामुळे निसर्गाच्या सतत सहवासात, मोकळ्या हवेत व एकप्रकारच्या वेगळ्या भौतिक वातावरणात राहतो.

३) खेड्यातील लोकसंख्या ही मर्यादित स्वरूपाची असल्यामुळे ते एकमेकांच्या प्रत्यक्ष संबंधात असतात. त्यामुळे त्यांच्यात एकप्रकारची भावनिक निकटता निर्माण होते.

म्हणून ग्रामीण सामाजिक संघटनांचा अभ्यास ग्रामीण समाजशास्त्राने केला पाहिजे असे मत व्यक्त केले आहे. म्हणूनच ग्रामीण समाजाचे अध्ययन क्षेत्र अत्यंत व्यापक स्वरूपाचे झाले आहे.

### III) ग्रामीण समाजशास्त्राचा अभ्यासविषय

ग्रामीण समाज हा ग्रामीण समाजशास्त्राचा अभ्यासविषय आहे. ग्रामीण लोकांचे जीवन, त्यांचे परस्परसंबंध, त्यांच्या संस्था, समूह तसेच सामाजिक समस्या यांचा शास्त्रीयदृष्ट्या अभ्यास करून ग्रामीण समाजाच्या विकासाचे नियम शोधून काढण्याचे कार्य ग्रामीण समाजशास्त्राला करावे लागते. म्हणूनच ग्रामीण समाजशास्त्राच्या अभ्यासविषयात खालील बाबींचा अंतर्भाव होतो.

**१) ग्रामीण समुदायाचा अभ्यास :** ग्रामीण समाजशास्त्र हे ग्रामीण समुदायांच्या म्हणजेच पर्यायाने खेड्यांचा सर्वांगीण व पद्धतशीर अभ्यास करते. त्याचदृष्टीने ग्रामीण समुदायाचा अर्थ, वैशिष्ट्ये, ग्रामीण

समुदायात होणारे बदल, ग्रामीण समुदायांची रचना, खेड्यांचे विविध प्रकार यांचा अभ्यास या शास्त्रात केला जातो.

**२) ग्रामीण सामाजिक जीवनाचा अभ्यास :** ग्रामीण जीवनाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व धार्मिक यासारख्या सर्व घटकांचा अभ्यास या शास्त्रामध्ये केला जातो.

**३) ग्रामीण सामाजिक प्रक्रियांचा अभ्यास :** ग्रामीण समाजातील व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समूह व समूह-समूह यांच्यामध्ये घडणाऱ्या सामाजिक प्रक्रियांचा अभ्यासही या शास्त्रात केला जातो. तसेच ग्रामीण समाजातील सहकार्य, स्पर्धा व संघर्ष यासारख्या प्रक्रियांचाही अभ्यास ऊहापोह हे शास्त्र करते.

**४) ग्रामीण आर्थिक जीवनाचा अभ्यास :** शेती हा ग्रामीण समाजाचा मुख्य व्यवसाय आहे. शेतीबरोबरच शेतीपूरक इतर व्यवसायही शेतीवरच अवलंबून असलेले दिसून येतात. त्यामुळेच ग्रामीण अर्थव्यवस्था ही शेतीप्रधान आहे. त्यामुळेच ग्रामीण समाजात जमिनीला खूप महत्त्व असलेले दिसून येते.

**५) ग्रामीण धर्माचा अभ्यास :** ग्रामीण समुदायातील बहुसंख्य लोक अज्ञानी निरक्षर, अंधःश्रद्धा, देवभोळे व रुढीप्रिय आहेत. पर्यायाने ग्रामीण लोकांच्यावर धर्माचा मोठा पगडा असलेला दिसून येतो. धार्मिक विधी व कर्मकांड ते मोठ्या श्रद्धेने पार पाडतात. ग्रामीण लोकांची जीवनपद्धती व वर्तन हे धर्माद्वारे नियंत्रीत होते. पर्यायाने ग्रामीण समाजाचे यथार्थ आकलन होण्यासाठी त्यांच्या धर्मश्रद्धा, धर्माचरण, कर्मकांड व धार्मिक स्थळे आणि ग्रामीण धर्म व इतर सामाजिक संस्था यांच्यातील परस्परसंबंधाचा अभ्यास यामध्ये केला जातो.

६) **ग्रामीण सामाजिक संघटनांचा अभ्यास :** ग्रामीण भागातील सामाजिक संस्था, समूह, सामाजिक स्तरीकरण व्यवस्था यांचा अभ्यास ग्रामीण समाजशास्त्रात केला जातो. त्याचबरोबर विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, शिक्षणसंस्था, धर्मसंस्था यासारख्या सामाजिक संस्था, आप्तसंबंधी समूह, व्यावसायिक समूह, जातीव्यवस्था व वर्गव्यवस्था यासारख्या सामाजिक स्तरीकरण व्यवस्थेचा व राजकीय संस्था व धार्मिक-सांस्कृतिक यंत्रणांचा अभ्यास या शास्त्रात केला जातो.

**७) ग्रामीण सामाजिक समस्येचा अभ्यास :** अज्ञान, दारिद्र्य, बेकारी, अवारोग्य, लोकसंख्यावाढ, रुढीप्रियता, अंधश्रद्धाळूपणा मनोरंजन व शिक्षक सुविधांचा अभाव, संयुक्त कुटुंबाचे विघटन, शहराकडे स्थलांतर, धार्मिक मूल्यांचा ऱ्हास यासारख्या समस्या, कारणे व उपाययोजनांचा अभ्यास या शास्त्रामध्ये केला जातो.

**८) ग्रामीण सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास :** आधुनिकीकरण, नागरीकरण, दळणवळणाची प्रगत साधने, शैक्षणिक व आरोग्य सुविधांचा प्रसार, ग्रामीण पूनर्रचनेचे कार्यक्रम यासारख्या घटकांचा ग्रामीण समाजात परिवर्तन होवू लागले. त्याचबरोबर ग्रामीण परिवर्तनाचे स्वरूप त्याची कारणे व त्यातील अडथळे, परिवर्तनाची दिशा व गती इत्यादी बाबींचा वस्तुनिष्ठ अभ्यास या शास्त्रात केला जातो.

९) **ग्रामीण सामाजिक समस्यांचा अभ्यास :** ग्रामीण समाजामध्ये अनेक प्रकारच्या सामाजिक समस्या पहावयास मिळतात. यामध्ये प्रामुख्याने अज्ञान, बेकारी, दारिद्र्य, अनारोग्य, अंधश्रद्धाळूपणा, मनोरंजन व शिक्षण सुविधांचा अभ्यास, संयुक्त कुटुंबाचे विघटन, धार्मिक मूल्यांचा ऱ्हास यासारख्या समस्या, त्यांची कारणे, परिणाम व त्यावरील उपाय योजना या शास्त्रात भर दिला जातो.

वरील सर्व विषयाचा अभ्यास ग्रामीण समाजशास्त्रज्ञ वैज्ञानिक पद्धतीने व वस्तूनिष्ठ दृष्टिकोनातून केला जातो. वैज्ञानिक प्रगतीमुळे मानवी जीवन जितके सुखी, सुलभ व समाधानी करण्याचा प्रयत्न यामध्ये केलेला दिसून येतो.

## १.२.४ भारताच्या संदर्भात ग्रामीण समाजशास्त्राचे महत्त्व

ग्रामीण समाजशास्त्राच्या अभ्यासविषयावरून एक बाब निश्चित होते की, ग्रामीण समाजाचा सर्वांगीण अभ्यास केवळ ग्रामीण समाजशास्त्रामध्येच केला जातो. पर्यायाने या शास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व काय आहे याची स्वतंत्रपणे ऊहापोह करण्याची गरज नाही. प्रा. लॉरी नेल्सन यांच्यामते, खेड्यात राहणाऱ्या नगर शहरात राहणाऱ्या व्यक्तीला आपला समाज सोडून दुसरा समाज कोणत्या परिस्थितीत राहतो याविषयीची माहिती नसेल तर ती व्यक्ती पुरेशी सुशिक्षित आहे असे म्हणता येणार नाही. भारत हा खेड्यांचा देश असून ७४% जनता ग्रामीण भागात राहते. एवढ्या मोठ्या ग्रामीण समुदायाचा केलेला समाजशास्त्रीय अभ्यास म्हणजे खऱ्या अर्थाने भारतीय समाजाचा अभ्यास होय याचे महत्त्व पुढीलप्रमाणे–

### १) भारत कृषि व ग्रामप्रधान देश आहे.

भारतीय खेड्यांना ५ हजार वर्षांपासूनचा वारसा लाभला आहे. आज भारतात शहरांची संख्या वाढत असली तरी ती वाढलेली लोकसंख्या ग्रामीण भागातून स्थलांतरीत झाली असून त्यामुळे नागरी समुदायसुद्धा ग्रामीण समाजाचाच भाग आहे असे वाटते. पर्यायाने एवढ्या मोठ्या समुदायाचा अभ्यास समाजशास्त्राच्या अध्ययनात होत असल्यामुळे या शास्त्राला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

### २) ग्राम हेच भारतीय संस्कृतीचे मूलकेंद्र आहे

भारतीय संस्कृती ही संपूर्ण जगातील एक प्राचीन संस्कृती आहे. ग्रामीण संस्कृती ही संपूर्ण भारतीय संस्कृतीचे प्रतिरिधीत्व करत आहे. ग्रामीण संस्कृती ही संपूर्ण भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधीत्व करत आहे. पर्यायाने भारतीय समाज आणि संस्कृतीला समजावून घ्यावयाचे असेल तर ग्रामीण समाजाला समजून घेणे आवश्यक आहे. डॉ. एस. सी. दुबे यांनी India Village या प्रसिद्ध ग्रंथात असे म्हणतात की, अनादी काळापासून ग्राम हे भारतीय सामाजिक राजतंत्राचे आधारभूत व महत्त्वपूर्ण केंद्र राहिलेले आहे.

### ३) भारतीय खेड्यांची महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये

सामाजिक व सांस्कृतिक विविधता ही भारतीय खेड्यांची महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये आहेत. भारतीय समाजात धर्म, पंथ, भाषा, जाती व रितीरिवाज यामध्ये विविधता पहावयास मिळते. त्याचबरोबर भारतीय खेड्यात

अजूनही जातीव्यवस्था पहावयास मिळते. पर्यायाने भारतीय खेड्यांना लाभलेली स्थिरता व सातत्य त्यांच्या वैशिष्ठ्यामध्येच पहावयास मिळते.

**४) ग्रामीण पुनर्निर्माणात महत्त्व**

आजच्या काळात सर्वच समाजामध्ये विकासवादी परिवर्तन प्रक्रिया घडवून आणल्या जात आहेत. अगदी साध्या अवस्थेपासून अतिशय संकीर्ण अवस्थेपर्यंत होणाऱ्या बदलाची प्रक्रिया म्हणजे विकासवादी तत्त्व होय. यासाठीच समाज संरचनेची पुनर्रचना करण्याला सर्वच देशात महत्त्व प्राप्त झाले आहे. भारतात ग्रामीण पुनर्निर्माणाचे कार्य मोठ्या प्रमाणात सुरू असून या कार्यक्रमात ग्रामीण समाजशास्त्राला विशेष महत्त्व आहे.

**५) भारतीय योजना आयोगाला सहाय्यक**

भारतीय खेड्यांचा विकास म्हणजेच खऱ्या अर्थाने भारतीय समाजाचा विकास होय. भारतीय समाजाच्या विकासाकरिता योजना तयार करणाऱ्या योजना आयोगाला व त्यातील अधिकाऱ्यांना ग्रामीण समाजाचे ज्ञान देण्याचे काम हे शास्त्र करते. नियोजित विकासाच्या योजना अधिक प्रभावी ठरण्यासाठी व प्रभावीपणे राबविण्यासाठी योजनाकारांना या शास्त्राच्या अभ्यासाचा उपयोग होणे.

**६) पंचायत राज आणि ग्रामीण कल्याण**

ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हापरिषद या त्रिस्तरीय पंचायतराज योजनेचा संबंध ग्रामीण समुदाय व ग्रामीण विकासाशी आहे. पंचायतराज योजनेच्या आधारे ग्रामीण समुदायाचा विकास व्हावा व सत्तेचे विकेंद्रीकरण हा या योजनेचा उद्देश होता. या योजनेमध्ये ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांना अधिक अधिकार देण्यात आले होते.

**७) गैरशासकीय स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्त्यांना उपयोग**

अशा NGO's नी ग्राम विकासासाठी अधिक प्रभावीपणे योगदान दिलेले दिसून येते. यांच्यामार्फत खेड्यातील लोकांमध्ये ग्रामीण विकाससंबंधी जाणीव जागृती निर्माण करण्याचे कार्य देण्यात आले. यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणे व ग्रामीण विकासात अशा संस्थांची भूमिका तपासणे अशा दोन्ही दृष्टीने ग्रामीण समाजशास्त्राचे महत्त्व भारतीय समाजात अधिक वाढलेले दिसून येते.

**८) दुर्बल घटकांचे सामाजिक अध्ययन**

जातीव्यवस्था हे भारतीय ग्रामीण समाजाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. जात, वाणी आणि अस्पृश्यता यामुळे ग्रामीण समाजात विभागला गेला. तसेच अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासलेल्या लोकांची संख्या भारतीय समाजात मोठी आहे. पर्यायाने भारतीय समाजव्यवस्थेवर याचा मोठा परिणाम होत आहे. या सर्व घटकांच्या अभ्यासाच्यादृष्टीने ग्रामीण समाजशास्त्राचे महत्त्व भारतात वाढतच आहे.

थोडक्यात, ग्रामीण समाजशास्त्र उपयुक्ततेच्या दृष्टीने अजूनही ग्रामीण भागातील संशोधन, अध्ययन करून ग्रामीण समाजशास्त्राला भारतीय समाजाच्या दृष्टीने विकसित करण्याचे कार्य हे शास्त्र करते. भारतीय समाजात आज नवीन अर्थव्यवस्था निर्माण होताना दिसत आहे. पर्यायाने याचे वाईट परिणाम ग्रामीण समाजावरच होत आहेत. म्हणूनच ग्रामीण समाजशास्त्राचे महत्त्व भारताच्या दृष्टीने वाढताना दिसून येत आहे.

## १.३ सारांश

ग्रामीण समाजामध्ये बहुसंख्य लोकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय असलेला दिसून येतो. एकूण लोकसंख्येच्या ७४% लोकसंख्या ही ग्रामीण भागातच राहते. पर्यायाने एवढ्या मोठ्या लोकसमूहांचे अध्ययन करण्यासाठी ग्रामीण समाजशास्त्राचे महत्त्व जास्तच अधोरेखित होताना दिसून येते. ग्रामीण समुदाय, त्यांचे सामाजिक जीवन, ग्रामीण सामाजिक संघटना, सामाजिक प्रक्रिया, ग्रामीण आर्थिक व धार्मिक जीवन, ग्रामीण सामाजिक समस्या यासारख्या बाबींचा सविस्तर व पद्धतशीर अभ्यास ग्रामीण समाजशास्त्रात केला जातो. ग्रामीण समाजशास्त्रे हे अनुभवाधिष्ठीत विज्ञान आहे.

आधुनिक काळात ग्रामीण नागर समाजाचा घनिष्ठ संबंध येत असल्याने सामाजिक समायोजनाच्यादृष्टीने ग्रामीण समाजाचा अभ्यास फार उपयुक्त ठरताना दिसून येत आहे. ग्रामीण सामाजिक समस्यांचे निर्मूलन करून ग्रामीण विकास साध्य करण्यासाठी ग्रामीण समाजाचे शास्त्रीय ज्ञान समाजातील विविध क्षेत्रातील लोकांना उपयुक्त ठरत आहे. पर्यायाने ग्रामीण समाजशास्त्र हे भारताच्या अभ्यासाच्यादृष्टीने एक चांगले विज्ञान म्हणून पुढे येत आहे.

## १.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) ग्रामीण समाजशास्त्राची व्याख्या सांगा.

२) ग्रामीण समाजशास्त्रास तथ्यात्मक शास्त्र का म्हणतात?

३) ग्रामीण लोकांचा प्रमुख व्यवसाय कोणता आहे?

४) Indian Village हा प्रसिद्ध ग्रंथ कोणी लिहिला.

५) प्रा. टेलर यांनी ग्रामीण समाजशास्त्राची व्याप्ती किती विभागात विभागली आहे.

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) बर्ट्रांड आणि सहकारी यांच्या मते, ''व्यापक अर्थाने ग्रामीण समाजशास्त्र हे ग्रामीण पर्यावरणातील मानवी संबंधाचा अभ्यास आहे.''

२) ग्रामीण लोकांचे सामाजिक वर्तन प्रत्यक्षात कसे आहे या दृष्टिकोनातून त्यांच्या वर्तनाचा अभ्यास ग्रामीण समाजशास्त्र करते म्हणून त्यास तथ्यात्मक शास्त्र असे म्हणतात.

३) शेती

४) डॉ. एस. सी. दुबे

५) दोन

## १.६ सरावासाठी प्रश्न

अ) १) ग्रामीण समाजशास्त्राची व्याख्या सांगून ग्रामीण समाजशास्त्राचा अभ्यासविषय स्पष्ट करा.

२) ग्रामीण समाजशास्त्राचा उदय व व्याप्ती स्पष्ट करा.

३) भारताच्या संदर्भात ग्रामीण समाजशास्त्राचे महत्त्व स्पष्ट करा.

ब) थोडक्यात उत्तरे लिहा.

१) ग्रामीण समाजशास्त्राचा अर्थ

२) ग्रामीण समाजशास्त्राचे स्वरूप

## १.७ चिंतन आणि कार्य

एखाद्या सामाजिक संशोधन करणाऱ्या व सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थेस भेट देवून तेथील संशोधककाकडून खेड्यातील जीवनाविषयी माहिती गोळा करणाऱ्या साधनांची ओळख करून घ्या. तसेच त्यांच्याकडून तथ्यसंकलन करताना येणाऱ्या अडचणी जाणून घ्या.

## १.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


१) ग्रामीण समाजशास्त्र - प्रा. चंद्रकांत खंडागळे, सौ. मायादेवी खंडागळे, सांगली, २००५.

२) ग्रामीण समाजशास्त्र - डॉ. गुरुनाथ नाडगोंडे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८६.

३) ग्रामीण व नागरी समाजशास्त्र - डॉ. बी. एम. कऱ्हाडे, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, जून २०११.

४) Rural Sociology – A. R. Desai

५) Rural Sociology – Doshi & Jain

६) Rural Sociology – N. Jayapalas – Atalantic Publishers and Distributor, New Delhi, 2002.


❑❑❑

# घटक – २
# भारतीय ग्रामीण समुदाय
## (Indian Rural Community)

**घटक संरचना**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

२.२.१ भारतीय खेड्यांचा अभ्यास

२.२.२ भारतीय खेड्यांचे वर्गीकरण

२.२.३ भारतातील ग्रामीण समुदायाचे बदलते स्वरूप

२.३ सारांश

२.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.५ स्वाध्याय

२.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


## २.० उद्दिष्ट्ये :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास –

- ग्रामीण समुदायाची स्वरूप व वैशिष्ट्ये सांगता येतील.
- खेड्यांचे वर्गीकरण स्पष्ट करता येतील.
- भारतीय ग्रामीण समुदायाचे बदलते स्वरूप स्पष्ट करता येईल.

## २.१ प्रस्तावना :

या घटकात तुम्ही ग्रामीण समुदायाची वैशिष्ट्ये, खेड्यांची वर्गीकरणे व समुदायाचे बदलते स्वरूप अभ्यासणार आहोत. भारतीय ग्रामीण समुदाय हा ग्रामीण समाजशास्त्राच्या अध्ययनातील केंद्रस्थानी असलेली

प्रमुख संकल्पना आहे. त्यामुळे या शास्त्रात भारतीय ग्रामीण समुदायाचा अर्थ, भारतीय खेड्यांचा अभ्यास आणि भारतातील ग्रामीण समुदायाचे बदलते स्वरूप यांचा अभ्यास आवश्यक ठरतो. ग्रामीण समुदाय म्हणजे खेडे होय. प्राचीन काळात मानव अन्नशोधण्यासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी भटकत असे. शेतीचा शोध लागल्यानंतर मात्र त्याची अन्नाची चिंता संपली व तो समूह करून एका ठिकाणी स्थायी स्वरूपाची वसाहत करून स्थिर जीवन जगू लागला. पर्यायाने यातूनच खेड्यांची निर्मिती झाली आणि ग्रामीण समुदाय उदयास आला. जगाच्या विविध भागात वसलेली ही खेडी एकसारखी नसून ती वेगवेगळ्या प्रकारची दिसून येतात. ग्रामीण समाजशास्त्रज्ञांनी विविध निकषांच्या आधारे खेड्यांची वेगवेगळी वर्गीकरणे केलेली दिसून येतात. त्याचबरोबर भारतीय ग्रामीण समुदायामध्ये नवनवीन उपकरणे, सोयीसुविधा यामुळे खेड्यांचा चेहरामोहरा बदलू लागला आहे.

भारतीय खेड्यांचा विचार करता या खेड्यांच्यामध्ये बरीचशी समान लक्षणे दिसून येतात. परंतु या खेड्यातील अंतर्गत रचना व व्यवहार, जीवन व विचारपद्धती यामध्ये तफावत दिसून येते. खेड्यांचा आकार, लोकसंख्या, जमीन मालकीचा प्रकार, श्रेणीरचना यासारख्या घटकामुळे खेड्यांच्यामध्ये तफावत आढळून येते.

## २.२ विषय विवेचन :

विषय विवेचनाच्यादृष्टिने या घटकाचे तीन विभाग पाडलेले आहेत. पहिल्या विभागात भारतीय खेड्यांचा अभ्यासाचा समावेश केला असून दुसऱ्या विभागात प्रथम भौतिक रचनेनुसार केलेले खेड्यांचे केंद्रीत खेडे, विखुरलेले खेडे व रेषात्मक खेडे हे वर्गीकरण स्पष्ट केले जाईल. त्यानंतर वसाहतीची स्थिरता हा निकष विचारात घेऊन केलेले स्थलांतरीत खेडे अंशतः स्थायी खेडे व स्थायी खेडे हे वर्गीकरण स्पष्ट करता येईल आणि तिसऱ्या विभागात भारतीय ग्रामीण समुदायाचे बदलते स्वरूप स्पष्ट केले जाईल.

## २.२.१ भारतीय खेड्यांचा अभ्यास

भारत हा खेड्यांचा देश असून भारतातील आजही ७४% लोकसंख्या खेड्यातच वास्तव्य करते. त्यामुळे भारतीय जीवनाचे खेडे हे प्रमुख केंद्र म्हणून आजही अस्तित्वात असलेले दिसून येते. भारताचा आत्मा राहतो असे यथार्थ वर्णन म. गांधींनी केले होते. देशाचा विकास हा पूर्वतया खेड्यांच्या विकासावरच अवलंबून आहे. ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. सर्व भारतीय खेड्यांचा विचार करता सर्व खेड्यांच्यामध्ये बरीचशी समान लक्षणे आढळून येतात. भारतीय खेड्यांच्या वैशिष्ट्यांचा विचार करण्यापूर्वी कोणत्या लोकसमुदायाला खेडे म्हणावयाचे हे निश्चित करणे आवश्यक आहे. परंतु ज्या लोकसमुदायाला खेडे म्हटले जाते अशा लेकसमुदायाचा आकार सर्व भारतात सारखा आढळून येत नाही. असे असूनही भारतीय खेड्यांचे सर्वसाधारण स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी खेड्यांची व्याख्या पहाणे आवश्यक आहे ती खालीलप्रमाणे–

**व्याख्या :** १) **त्रि. ना. अत्रे** यांच्या मते, ''खेडणे म्हणजे जमीन कसणे व खेडून म्हणजे जमीन कसणारा. तेंव्हा खेडूतांची जी वस्ती ते खेडे. ज्यामध्ये प्रधान धंदा शेती व ज्यामध्ये भरण्याची वस्ती शेतकऱ्याची असते त्या गावाला लोक खेडे किंवा गावढे म्हणतात आणि तद्व्यतिरिक्त गावांना शहर म्हणतात.''

२) **श्री हॅरोल्ड पीक** यांच्या मते, ''एका कुटुंबापेक्षा मोठा असा परस्परसंबंधी अथवा ससंबंधीत अशा व्यक्तींचा समूह ग्रामसमुदायात अंतर्भूत असतो. हा समुदाय एका मोठ्या घरात अथवा सर्वसामान्यपणे जवळजवळ राहतो. अगदी सुरुवातीला समान असलेल्या अशा कृषियोग्य जमिनीची मशागत करतो व उपलब्ध कुरणाची विभागणी करून सभोवतालच्या पडिक जमिनीवर गुरे चारतो. शेजारच्या समुदायांच्या सीमेपर्यंत पसरलेली कृषियोग्य जमीन, पडिक जमीन व कुरण यावर हा समुदाय आपला हक्क सांगतो.''

भारतीय खेडी अस्तित्वात येण्यासाठी भारतातील भौगोलिक परिस्थिती शेती पडिक रान, भरपूर जमीन कारणीभूत ठरते. भारतातील हवामान व प्रादेशिक परिस्थिती लक्षात घेता, शेती या व्यवसायासाठी पाण्याची सोय अत्यावश्यक ठरते.

**भारतीय खेड्यांची वैशिष्ट्ये**

भारतीय खेडी ही भारतातील बहुसंख्य भागावर वसलेली दिसून येतात. भारतीय खेड्यांना स्थिरता व सातत्य जे लाभलेले आहे ते सर्व भारतीय खेड्यांच्या वैशिष्ट्यामध्ये पहावयास मिळते. ती वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे-

१) **अलगता** (Isolation)

भारतीय खेडी ही विखुरलेली आहेत. म्हणजेच भारतीय खेडी ही बाह्य जगापासून अलिप्त असलेली दिसून येतात. थोडक्यात दोन खेड्यामधील अंतरसुद्धा बरेच असलेले पहावयास मिळते. अशा या खेड्यामधील लोक आपला गाव सोडून सहसा दुसऱ्या गावांकडे/खेड्याकडे सहसा जात नव्हते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे दळणवळणाच्या अपुऱ्या सोयी, अज्ञान, अशिक्षीतपणा, अलिप्तता या सारख्या कारणांमुळे ती आपली खेडी सोडत नव्हती. दुष्काळ, रोगराई, सण, उत्सव, यात्रा, लग्न यासारख्या कार्यक्रमासाठीच ते घराबाहेर, पर्यायाने खेड्याबाहेर पडत होती.

२) **आर्थिक स्वयंपूर्णता** (Economical Self – Sufficiency)

आर्थिक स्वयंपुर्णता हा अलगतेचा अपरिहार्य असा परिणाम आहे. म्हणजे खेडी ही इतर जागापासून दूर असल्याने व दळणवळणाची साधने उपलब्ध नसल्याने खेडी ही स्वयंपूर्ण होणे क्रमप्राप्त आहे. समाजाचे अस्तित्व टिकविणे व समाजाच्या मूलभूत गरजा पूर्ण करणे क्रमप्राप्त असल्याने प्रत्येक समाजाला त्या संबंधी विचार करावा लागतो. पर्यायाने असा विचार जो समाज करतो तोच समाज अस्तित्वात राहू शकतो. यातूनच भारतीय खेड्यामध्ये बलुतेदारी व अलुतेदारी पद्धत रूढ झाली. कारण भारतीय खेडी ही शेतीप्रधान असल्यामुळे शेतीवर आधारित जातीप्रथेशी निगडीत बलुता पद्धती अस्तित्वात आली. थोडक्यात यातूनच

भारतीय खेड्यातील लोकांच्या गरजा व उदरनिर्वाहविषयक गरजा भागविण्यासाठी आवश्यक सेवा वस्तूंच्या पुरवठा ज्या त्या खेड्यातच निर्माण केल्या. यामुळेच भारतीय खेड्यांना आर्थिक स्वयंपूर्णता लाभू शकली.

### ३) **स्वायत्तता** Autonomy

भारतीय खेडी अलग व अर्थिकदृष्टीने स्वयंपूर्ण असल्यामुळे आपल्या खेड्यांचा कारभार ती स्वतंत्रपणे पहाणे शक्य होत होते. त्यासाठी खेड्यांनी कारभाराची स्वतंत्र यंत्रणा निर्माण केली होती. अशा स्वयंनियंत्रित यंत्रणेमुळे पंचायत पद्धती उदयास आली. या पंचायतीमुळे या खेड्यांचा गावगाडा यशस्वीपणे चालविला जात होता. पंचायतीमार्फत न्यायदानविषयक कामे, ग्रामसंरक्षण, जमीनमहसूल गोळा करणे, रस्ते, पूल, सार्वजनिक देवालये आणि लोक हिताची कामे या पंचायतीमार्फत पार पाडली जात होती.

### ४) **प्रतिकूल काळामध्येसुद्धा टिकून राहण्याची क्षमता**

भारतीय खेडी टिकून राहण्याचे हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. भारतीय खेड्यावर बाह्य जगताचा, राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक घटकांचा कांहीही परिणाम झालेला दिसून येत नाही. भारतीय संस्कृतीच्या उगमाबरोबर पाश्चिमात्य व युरोपमधील संस्कृतींचा उदय झाला. परंतु काळाच्या ओघात या संस्कृत्या नष्ट झाल्या पण भारतीय संस्कृती टिकून राहिली. याचे कारण म्हणजे भारतीय अर्थव्यवस्था, ग्रामव्यवस्था या स्वयंपूर्ण होत्या. इतकेच नव्हेतर खेड्यातील शासनव्यवस्थाही अतिशय बळकट होती. म्हणूनच हेन्री मेन यांच्या मते, ''भारतीय ग्रामीण संस्था चेतनाहीन नसून त्या जिवंत संस्था आहेत.

### ५) **रूढीचे प्राबल्य व पैशांचा अभाव**

प्राचीन खेड्यातील आर्थिक व्यवहार व आर्थिक उलाढाल ही अतिशय मर्यादित स्वरूपाची होती. पर्यायाने विनिमयाचे साधन म्हणून पैशाचा वापर हा फार कमी प्रमाणात होत होता. कारण जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन व निर्मिती ही खेड्यातच होत होती. शेती हा मुख्य व्यवसाय असल्याने व शेती ही निसर्गावर अवलंबून असल्यामुळे बहुतांश लोकांच्यामध्ये पूजा, अर्चा, सण, समारंभ हे अस्तित्वात असलेले पहावयास मिळतात. इतकेच नव्हे तर खेड्यातील लोकांचा व्यवसाय हा शेती असलेने शेतीसाठी आवश्यक असणारी साधने ही खेड्यातच निर्माण केली जात होती. पर्यायाने त्यांना त्याचा मोबदला हा धान्याच्या रूपाने दिला जात होता.

शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या लोकांना घरगुती कामासाठी आवश्यक असणाऱ्या लोकांना व धार्मिक कार्यासाठी आवश्यक असणाऱ्या लोकांना व धार्मिक कार्यासाठी आवश्यक असणाऱ्या लोकांना वेगवेगळा बलुता दिला जात असे. थोडक्यात, प्राचीन खेड्यात सर्व आर्थिक व्यवहार हे धान्याच्या रूपातच केले जात होते इतकेच नव्हे तर जीवनावश्यक वस्तूंची निर्मिती ही खेड्यातच होत असलेने व सर्वजण हे एकमेकावर अवलंबून असलेने पैशाचा वापर हा त्यांच्यामध्ये अभावानेच आढळत होता.

### ६) संयुक्त कुटुंब पद्धती :

संयुक्त कुटुंब पद्धती हे खेड्यांचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य मानले जाते. कारण शेती हा प्रमुख व्यवसाय असल्याने शेतीसाठी आवश्यक असणारा मजूर वर्ग हा कुटुंबामध्येच उपलब्ध होत होता. पर्यायाने कुटुंबाचा आकार हा अतिशय मोठा होता. त्याचबरोबर शेतीचे विभाजन न होणेही फायदेशीर होते. म्हणूनच खेड्यातील कुटुंबामध्ये दोन ते तीन पिढ्यांचे लोक एकत्र राहत होते.

### ७) सामाजिक गतीशिलतेचा अभाव :

ग्रामीण खेड्यांच्यामध्ये सामाजिक गतीशिलतेचा अभाव असलेला दिसून येतो. कारण व्यक्तीचा सामाजिक दर्जा/स्तर हा जन्माने प्राप्त होत होता तो स्वकर्तृत्वाने बदलता येत नसे. व्यक्तीची एका सामाजिक दर्जाकडून दुसऱ्या सामाजिक दर्जाकडे जाण्याची क्रिया म्हणजे सामाजिक गतीशीलता होय. थोडक्यात व्यक्तीला आपला परंपरागत दर्जा बदलता येत नव्हता. यातूनच ग्रामीण जीवनात एक प्रकारची स्थितीशीलता निर्माण झालेली पहावयास मिळते.

थोडक्यात, भारतीय खेडी ही काळाच्या ओघात नष्ट न होण्याचे कारण म्हणजे त्यांची असणारी स्वतःची वैशिष्ट्ये म्हणता येईल. भारतीय खेड्यावर राजकीय, सांस्कृतिक वावटळ जरी आली तरी खेडी टिकून राहण्याचे कारण म्हणजे त्यांची वैशिष्ट्ये होत.

## २.२.२ भारतीय खेड्यांचे वर्गीकरण (Classification of Indian Villages)

मानव उदरनिर्वाहासाठी सतत धडपडत होता. जोपर्यंत मानवाला उदरनिर्वाहाचे साधन मानवाला साध्य होत नव्हते तोपर्यंत मानव हा धडपड करतच होता. मानवाच्या अशा सततच्या प्रयत्नामुळे त्याने उदरनिर्वाहाची साधने शोधून काढली. यातूनच त्याच्या आयुष्याला एक प्रकारची स्थिरता प्राप्त झाली. मानवाची जसजशी प्रगती होवू लागली तसतसे त्याचे उदरनिर्वाहाचे साधन निश्चित होवू लागले. शेती व पशुपालन या आर्थिक क्रियांनी मानवाला स्थिरता प्राप्त झाली व त्यांची भ्रमंती थांबली. यातूनच खेड्यांची निर्मिती झाली. थोडक्यात मानवी संस्कृतीच्या विकासातील खेडे हा एक अतिशय महत्त्वाचा टप्पा आहे. मानवाच्या भटक्या व अस्थिर जीवनाला या खेड्यांच्यामुळे एक स्थिरता प्राप्त झाली. मानव वस्ती करून राहू लागला व उदरनिर्वाहासाठी शेती करू लागला. थोडक्यात त्याला भूप्रदेशाच्या भौगोलिक परिस्थितीप्रमाणे खेड्यांच्या रचनेत, आकारात व प्रकारात फरक दिसून येतो.

जगाच्या भूभागावर जरी खेडी अस्तित्वात आली तरी सर्वच खेड्यांच्यामध्ये समानता दिसून येत नाही. सर्वच जगात शहरांपेक्षा खेड्यांची संख्या जास्त असल्यामुळे सर्व खेडी ही एकसारखी दिसून येत नाहीत. खेड्यांची रचना, आकार व जमिनीवरील मालकी हक्क, जीवनपद्धती इ. अनेक बाबतीत भिन्नता पहावयास मिळते. वरील विविध निकषांच्या किंवा कसाट्यांच्या आधारे खेड्यांच्या विविध प्रकारांचा अभ्यास करता येईल.

अ) **भौतिक रचना :**

भटक्या जीवनापासून ते खेड्याच्या स्थिर जीवनापर्यंत जी स्थित्यंतरे घडून आली त्यावरून खेड्यांचे विविध प्रकार पडतात. खेडी ही समुदायाचा आत्मा आहेत. अशा खेड्यांना स्वतःचा एक निश्चित भूप्रदेश असतो. त्याला अनुसरूनच खेड्यांचे केंद्रित खेडे, विखुरलेले खेडे व रेषात्मक खेडे असे तीन प्रकारात वर्गीकरण केलेले दिसून येते.

**I) केंद्रित खेडे :** (Concentrated Village)

खेडेगावातील सर्व वस्ती एकेठिकाणी असत नाही. तरीसुद्धा बऱ्याच खेड्यामध्ये लोकवस्ती ही खेड्यांच्या मध्यभागी एकत्रित राहत असलेली दिसून येते. यालाच केंद्रित खेडे किंवा गावकुस असे संबोधले जाते. यामुळे गावाचा विकास संरक्षण व संवर्धन करणे त्या खेड्यांना सहज शक्य होते. कांही खेड्यामध्ये अशा खेड्यांना संरक्षणाच्यादृष्टीने तटबंधी बांधलेली पहावयास मिळते.

**केंद्रित खेड्यांची वैशिष्ट्ये :**

**१) दोन भागात विभागणी :** केंद्रित खेड्याची दोन भागामध्ये विभागणी झालेली दिसून येते. यामध्ये ज्याठिकाणी लोक राहतात तो एक भाग व दुसऱ्या ठिकाणी शेती करतात त्याला शिवार असे म्हणतात हा दुसरा भाग होय. पहिल्या भागात गावाच्या सभोवती तटबंदी असते व चारही दिशांना प्रवेशकमानी असतात तर दुसऱ्या भागामध्ये त्यांची शेती ही विस्तृत असलेने त्यांची सिमा दुसऱ्या गावातील शिवारापर्यंत पसरलेली असते. त्यामुळे दोन गावांच्या सिमा निश्चित कुठे संपतात ते सहजासहजी सांगता येत नाही.

**२) जातीच्या आधारे घरांची विभागणी :** केंद्रित खेड्यातील घरे ही जातीच्या आधारावर विभागलेली असतात. महार, मांग व चांभार या व्यतिरिक्त बाकीच्या सर्व जातींची वस्ती ही गावठाणात असते. तर इतर लोक जाती, व्यवसाय याप्रमाणे विभागलेले असतात. म्हणजेच एकाच जातीचे व व्यवसायाचे लोक एकत्र वस्ती करून राहत असतात. उदा. कुंभारगल्ली, धनगरवस्ती इ. त्याचप्रमाणे प्रत्येक जातीचे पाणवठे, स्मशानभूमी, मंदिरे ही वेगवेगळी असतात.

**३) वाड्या :** बहुतेक सर्वच खेड्यांना वाड्या असतात. गावठाणावरील वस्तीशिवाय गावापासून दूर शिवारात ज्यावेळेस १०-१२ घरांचा समूह आढळून येतो त्याला वाड्या असे म्हटले जाते. अशा वाड्यांना कुळाचे नांव, जातीचे नाव दिलेले दिसून येते. उदा. वाघवाडी, शिंदेवाडी, रामोशी वाडी इ.

**४) दळणवळण :** केंद्रित खेड्यामध्ये जा-ये करण्यासाठी अंतर्गत व बहिर्गत रस्त्यांची योजना केलेली असते. तसेच अंतर्गत संपर्कासाठी विविध तऱ्हेचे रस्ते किंवा बोळ, गल्ली यांची निर्मिती केलेली असते. खेड्यातील सर्व वस्तीस्थानांशी संपर्क करण्यासाठी रस्त्यांची निर्मिती केलेली असते. इतकेच नव्हेतर एका गावाहून दुसऱ्या गावासाठी जाणेस मुख्य रस्ता असतो. गुजरात, म्हैसूर, ओरिसा याठिकाणी अशा प्रकारची खेडी आढळून येतात.

**II) विखुरलेली खेडी** (Scattered Village)

अशा खेड्यातील लोक हे एका ठिकाणी वस्ती करून राहत नाहीत तर त्यांच्या वस्तीस्थानाचे ठिकाण निश्चित नसते. थोडक्यात, अशा खेड्यातील घरे ही विखुरलेली असतात. लोक आपआपल्या शिवारातच वाड्या/वस्त्या करून राहत असतात. स्वाभाविकपणे अशा वस्त्यामुळे त्यांच्यात एक अलगपणा जाणवत असतो. हिमालय, मध्यप्रदेश, ओरिसा, मणीपूर, मिझोराम या राज्यामध्ये अशा प्रकारची खेडी पहावयास मिळतात.

**विखुरलेल्या खेड्यांची वैशिष्ट्ये**

**१) भूप्रदेश :** अशा प्रकारच्या खेड्यामध्ये दोन प्रकारचे भूप्रदेश असतात. गावठाण व शिवार यामध्ये भूप्रदेशाचे विभाजन होते. कारण लोक आपल्या स्वतःच्या मालकीच्या शेतातच वस्ती करून राहत असतात. त्यामुळे त्यांच्यात मनुष्यवस्ती व शेतजमीन अशी स्वतंत्र नसते.

**२) पृथक खेड्यात रस्त्यांना स्थान नसते :** अशा विखुरलेल्या खेड्यामध्ये दोन घरांना/वस्त्यांना जोडणारी पायवाट असते. अशा अनेक पायवाटा एकत्र येवून मिळतात व त्यातूनच एक मोठा रस्ता शेजारच्या खेड्याकडे पोहचत असतो.

**३) घरांचा समूह :** विखुरलेल्या खेड्यांच्यात ४ + ५ घरांचा समूह आढळून येतो. त्यावेळी ती घरे त्यांच्या त्यांच्या आप्तसंबंधीचीच असतात. वडिलांच्यापासून विभक्त झालेली मुले आपल्या वाटणीला आलेल्या जमिनीवरच आपले स्वतःचे स्वतंत्र घर बांधून राहतात.

**४) आत्मीयता व सहकार्याचा अभाव :** अशा खेड्यातील घरे ही एकमेकापासून विखुरलेली असल्यामुळे त्यांच्यात आत्मीयतेचे प्रमाण व सहकार्याची भावना कमी दिसून येते. पर्यायाने अशा खेड्यातून स्थानिक कारभार व सामूहिक जीवनाच्या विकासास फारसा वार राहत नाही.

**III) रेषात्मक खेडे :** (Liner Village)

अशा प्रकारच्या खेड्यामध्ये रस्त्याच्या दोन्ही बाजूस व्यक्तींच्या पसंतीप्रमाणे ओळीने घरे बांधलेली पहावयास मिळतात. त्यांनाच रेषात्मक खेडे असे म्हणतात. अशा खेड्यांना गुंफलेली खेडी असेही म्हटले जाते. अशा खेड्यांमध्ये आढळणारा रस्ता हा रेषाकार दिशेने कांही कि.मी.पर्यंत गेलेला असतो. महाराष्ट्रातील कोकण भागात अशा प्रकारची खेडी पहावयास मिळतात. अशा प्रकारच्या खेड्यामध्ये अंतर्गत व्यवहारासाठी वेगळे रस्ते दिसून येत नाहीत. रेषाकार दिशेने कित्येक मैल पसरलेल्या या रस्त्यावर खेडी वसलेली असल्याने हाच रस्ता सर्व खेड्यांचा मुख्य रस्ता असतो.

**IV) वर्तुळाकार खेडे :** (Circular Village)

अशा प्रकारची खेडी ही फक्त इस्त्रायलमध्येच पहावयास मिळतात. कारण अशा प्रकारची खेडी अतिशय नियोजनपूर्वक पद्धतीने बनवावी लागतात. अशा प्रकारची खेडी इस्त्राईलमध्ये बनवायची होती. परंतु

त्या खेड्यातील दोषामुळे अशा प्रकारची खेडी बनवणे बंद केले यामध्ये सर्वांना उपयुक्त असणारी सेवागृहे एके ठिकाणी वसवली गेली. उदा. दवाखाना, सहकारी दुकाने, शाळा इ. त्यानंतर त्याच्या भोवती वर्तुळाकार रस्ता व रस्त्याच्या कडेने घरे वसलेली असतात. यानंतर दुग्धकेंद्रे, कुकुट्टपालन केंद्रे व इतर केंद्रे बांधलेली असतात. यानंतर प्रत्येक घराच्यामागे त्यांचे शेत असते. असे शिवार त्या खेड्यांच्या सिमा जिथे संपतात तेथपर्यंत त्यांचे शिवार असते परंतु अशा खेड्यामध्ये जमिनीचा आकार मध्यभागी रुंद व सिमेकडे अरुंद होत जातो. त्यामुळे अशा जमिनीचा बराचसा भाग हा निरुपयोगी ठरतो. १९१७ मध्ये इस्त्रायलमध्ये नहालाल हे खेडे अशा प्रकारचे बनवलेले दिसून येते.

**ब) वसाहतीची रचना**

भटक्या जीवनापासून ते खेड्याच्या स्थिर जीवनापर्यंत झालेल्या विविध स्थित्यंतरांच्या प्रकारावरून खेड्यांचे तीन प्रकार पडलेले दिसून येतात.

**I) स्थलांतरित खेडे** (Migratory Villages) : अशा खेड्यांच्यामध्ये लोक कायम वस्ती करून राहत नाहीत. कारण त्यांचे एके ठिकाणी राहणे हे त्यांना मिळणाऱ्या खाद्य संकलनावरच अवलंबून असते. एखाद्या ठिकाणी जोपर्यंत खाद्यपदार्थ उपलब्ध होतात तोपर्यंत तेथे लोक राहत असतात. खाद्यसंकल्पना साठा संपल्यानंतर ही खेडी उठत असतात व ज्या ठिकाणी या खाद्यसंकल्पनाचा साठा उपलब्ध आहे अशा ठिकाणी ते वसाहत करून राहत असतात. जगाच्या भूभागावर आढळून येणाऱ्या आदिम जमातींचा यामध्ये समावेश होतो. पिग्मी, पनियन, येनाडी, कादर, बैगा, खडिया या जमातींचा समावेश अशा प्रकारच्या खेड्यामध्ये होतो.

**II) अंशताः स्थायी खेडी** (Semi-Permanant Villages) : या प्रकारच्या खेड्यामध्ये लोक कांहीच वर्षे वस्ती करून राहत असतात. कारण शेती व पशुपालन ही त्यांची उदरनिर्वाहाची साधने असतात. पर्यायाने त्यांच्या जीवनाला थोड्याफार प्रमाणात स्थिरता प्राप्त झालेली असते. अशी स्थिरता ह दीर्घकालीन किंवा कायम स्वरूपाची नसते. कारण यांची शेती करण्याची पद्धत ही पूर्णपणे अवैज्ञानिक स्वरूपाची असते. पर्यायाने यामुळे शेतीतून निघणारे उत्पन्न हे अतिशय कमी प्रमाणात मिळत असते. स्थानांतरित शेती हा प्रकार प्रामुख्याने आदिम समाजामध्ये पहावयास मिळतो. यालाच सम शेती असेही म्हटले जाते. म्हणजेच यामध्ये डोंगरावर जाऊन झाडे तोडली जातात. तोडलेल्या झाडांच्या फांद्या, पाने व डोंगराच्या उतारावर आणून कडक उन्हात वाळवली जातात. त्यानंतर त्या खाली आणून त्यांना आग लावली जाते व ही आग सर्वत्र पसरवली जाते व या राखेमध्ये बिया फेकल्या जातात. यातून निघणारे उत्पन्नही अतिशय कमी निघते. साहजिकच या प्रकारच्या शेतीतून जोपर्यंत धान्य उत्पादित होवू शकते तोपर्यंत हे लोक त्याठिकाणी वास्तव्य करतात. त्यानंतर ते दुसरी जागा शोधतात व तेथे वस्ती करतात. परिणामी अंशतः स्थायी खेडी अस्तित्वात येतात.

**III) स्थायी खेडी** (Permanent Village) **:** अशा प्रकारच्या खेड्यामध्ये लोक वर्षानुवर्षे वस्ते करून राहत असतात. येथे लोकांचे वास्तव्य हे स्थिर स्वरूपाचे असते. अशा प्रकारच्या खेड्यातील लोक शेतीकरताना नवनवीन पद्धतींचा अवलंब करतात. याचबरोबर या खेड्यातील लोकांचे शेजारील खेड्यातील

लोकांशी सामाजिक संबंध प्रस्थापित होतात. अशा खेड्यांच्यामधून खेड्यांचा कारभार पहाण्यासाठी त्या खेड्याची स्वतंत्र अशी व्यवस्था असते. अशा प्रकारच्या खेड्यांची रचना जरी भिन्न भिन्न असली तरी अशा खेड्यातील लोकांची वस्ती ही स्थिर स्वरूपाची असते. अशा प्रकारची खेडी ही भारत, अमेरिका, जर्मनी, इंग्लंड येथे पहावयास मिळते.

अशा प्रकारच्या खेड्यामध्ये लोकांचा प्रमुख व्यवसाय हा शेती असतो. शेतीवर मालकी हक्क प्रस्थापित झालेले असतात. आणि ते वंशपरंपरेने संक्रमित होत असतात. प्रामुख्याने अशा खेड्यातील लोकांचे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवन हे स्थिर असते. त्यामुळे लोकांना प्रगती करण्यास भरपूर वाव मिळतो.

**क) जमिनीवरील मालकी** (Owenership on land) **:**

या कसोटीच्या आधेरे जमीनदारी खेडे, रयतवारी खेडे, सहकारी खेडे व सामुदायिक खेडे असे चार प्रकार पडतात. ते खालीलप्रमाणे–

**१) जमीनदारी खेडे :** ज्या खेड्यातील जमिनीवर कांही मोजक्या जमीनदारांची मालकी असते अशा खेड्यांना जमिनदारी खेडे म्हटले जाते. अशा खेड्यामध्ये जमिनदार स्वतः जमीन/शेती करत नाहीत तर ते कुळांकडून कसून घेतात. कांही खेड्यामध्ये अशी कुळे पोटकुळे ठेवतात व त्यांच्याकडून जमीन कसून घेतात. कुळे जमीन कसून उत्पन्न काढतात व त्यातील कांही हिस्सा हा जमीनदारास देतात यालाच खंड असे म्हटले जाते.

अशा खेड्यांच्यामध्ये प्रामुख्याने जमीनदार व कुळे असे दोन वर्ग पहावयास मिळतात. यामध्ये जमीनदाराचा जमिनीवर मालकी हक्क असून तो कुळांना कधीही रद्द करू शकतो. पर्यायाने जमिनीची मालकी जमिनदाराकडे असल्यामुळे तो आपले वर्चस्व दाखवतो. त्यामुळे वर्चस्व, स्थानिक कारभार यासारख्या सत्ता त्याच्या हाती असतात.

**२) रयतवारी खेडे :** ज्या खेड्यातील जमिनीवर प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांची मालकी असते अशा खेड्यांना रयतवारी खेडे असे म्हटले जाते. अशा खेड्यांच्यामध्ये शेतकरी स्वतःच शेतसारा सरकारकडे जमा करत असतात. अशा प्रकारची खेडी महाराष्ट्र, तामिळनाडू, गुजरात व कर्नाटक यासारख्या राज्यात मोठ्या प्रमाणात दिसून येतात.

अशा प्रकारच्या खेड्यामध्ये शेतकरी, शेतमजूर व कारागीर असे वर्ग पहावयास मिळतात, अशा खेड्यामध्ये शेती करणाऱ्या जमिनीवर व्यक्तीगत मालकी असते. पर्यायाने संपूर्ण सत्ता ही प्रशासकीय यंत्रणेमार्फत राबवली जाते. म्हणून अशा खेड्यातील सामाजिक व सांस्कृतिक जीवन हे सुखसमृद्धीने भरलेले दिसून येते.

**३) सहकारी खेडे :** अशा खेड्यातील जमीनीवर संपूर्ण खेड्याची किंवा सहकारी तत्त्वावर उभारलेल्या मंडळाची मालकी असते. त्यासच सहकारी खेडे असे म्हटले जाते. इस्त्राईल व जर्मनीमध्ये अशा प्रकारची खेडी पहावयास मिळतात.

अशा खेड्यातील जमिनीवर मंडळाची मालकी असते जमीनीची मशागत ही सहकारी तत्त्वानुसार चालते. अशा खेड्यामध्ये शेतकऱ्याने फक्त जमिन कसावयाची असते. जमिन कसण्याचा हक्क हा वंशपरंपरेने चालत आलेला असतो व तशाच तो पुढेही चालू राहतो, पर्यायाने शेतीतून मिळणारे उत्पन्न व नफा हा समान तत्त्वावर वाटप केला जातो.

**४) सामुदायिक खेडे :** ज्या खेड्यामध्ये जमिनीची व संपूर्ण मालमत्ता ही संपूर्ण खेड्यांच्या मालकीची असते, म्हणजेच मालकी हक्क हा खेड्यांचा असतो त्यासच सामुदायिक खेडे असे म्हटले जाते. सोव्हिएत रशिया, चीन व इस्त्रायलमध्ये अशा प्रकारची खेडी पहावयास मिळतात.

अशा प्रकारच्या खेड्यामध्ये कोणत्याही मालमत्तेवर कोणत्याही एका व्यक्तीची मालकी नसते पर्यायाने खेड्यांच्या गरजा भागविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या समित्या तयार केल्या जातात. यांच्यामार्फत खेड्यातील संपूर्ण लोकांच्या वैयक्तिक व सामाजिक गरजा भागविल्या जातात. त्यामुळेच व्यक्तीला आपोआपच वैयक्तिक, आर्थिक व सामाजिक सुरक्षितता प्राप्त होत असते.

### २.३.३ भारतातील ग्रामीण समुदायाचे बदलते स्वरूप

ब्रिटिशांच्या आगमनापासून महाराष्ट्राच्या ग्रामसंस्थेतही बरेच बदल होत आले. आर्थिक व्यवहारांत बलुतेदारी जवळजवळ मोडकळीस आली आहे. आज ग्रामीण समाजाच्या परिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये प्रत्येक समुदाय वेगवेगळ्या व्यवसायात कामधंद्यात नोकरी आणि व्यवसायात आपली भूमिका पार पाडत असताना दिसत आहे. पारंपारिक बलुतेदारी व्यवस्था आज मोडत चालली असली, तरी पूर्वीचे जातिव्यवस्थेतील धंदे ज्या त्या जातींच्याच हातात फार कमी प्रमाणात आहेत. गावांचा शहरांशी संबंध वाढल्याने, गावांत साखर कारखाने इत्यादींची भरभराट झाल्याने तसेच विकास-गट, नवीन ग्रामपंचायती व निवडणुका यांमुळे गावांचे आर्थिक व सामाजिक जीवन आमूलाग्र बदलले आहे. जातिपंचायतींचा प्रभाव कमी झाला आहे. अस्पृश्य लोकांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वामुळे तसेच अनेक अस्पृश्यांनी बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे खूप जागृती झाली आहे. अजून गावाचे ऐक्य धार्मिक सणांच्या वेळी दिसून येते. जातीजातींतील उच्चनीचतेच्या भावना कमी झाल्या आहेत व आपापसांतील सामाजिक संबंध सुधारत आहेत. दळणवळण व शिक्षणाचा प्रसार वाढल्याने तसेच नवे नेतृत्व पुढे येत असल्याने ग्रामसंस्थेच्या अलगपणाच्या जुन्या कल्पना बदलत चालल्या आहेत.

कारखानदारीची वाढ झाल्याने तसेच शेतीवर अवलंबून असणारांची संख्या वाढल्याने शहरांकडे धाव वाढली आहे. विशेषतः ज्या अस्पृश्य लोकांना आपला सामाजिक दर्जा सुधारून घ्यावयाचा आहे, त्यांना शहरात येऊन राहणे सोयीचे वाटते. शेतीची तंत्रे सुधारल्याने शेतकरी अधिक प्रगत स्थितीत आहे. एकत्र कुटुंबसंस्थेच्या जागी केंद्र कुटुंबांचा प्रादुर्भाव होत आहे. जातिसंस्थेतील स्थित्यंतरांचा सर्वांत मूलभूत परिणाम

ग्रामसंस्थेवर होत आहे. ग्राम हा सांस्कृतिक दृष्ट्या स्वतंत्र घटक राहील, की प्रादेशिक संस्कृतीचा घटक बनेल हे आत्ताच सांगणे कठीण आहे. ग्रामीण समुदाय आणि नागरी समाज हे समाजव्यवस्थेचे विरुद्ध टोकाचे दोन नमुने आहेत. ग्रामीण समुदाय हा मुख्यत्वे शेती आणि तत्संबंधीच्या जोडधंद्यांशी अधिक निगडित असतो, तर नागरी समाज हा बिगरशेती उत्पादनाशी व सेवाभावी व्यवसायांशी अधिक निगडित असतो. ग्रामीण समुदाय हा आकाराने लहान असतो; त्याचप्रमाणे भाषा, संस्कृती, परंपरा या दृष्टींनी एकजिनसी, प्राथमिक स्वरूपाच्या व्यवसायात गुंतलेला, बाह्यसंपर्कापासून अलिप्त आणि बाहेरील लोकांना आत घेण्यापेक्षा गावातील लोकांना बाहेर पाठविणारा असा असतो. ग्रामीण समुदायात व्यवसाय आनुवंशिक बनण्याची शक्यता अधिक असते, यामुळे स्तरीकरणही आनुवंशिक बनते. यामुळे कुटुंबाचे व कुटुंबप्रमुखाचे महत्त्व अधिक असते. याउलट नागरी समाज हा आकाराने मोठा आणि भाषा, संस्कृती, परंपरा या दृष्टींनी बहुजिनसी असतो. प्रत्येक व्यवसाय तेथे मोठ्या प्रमाणावर चालतो; कारण त्या व्यवसायाचा फायदा त्या त्या नगरात राहणाऱ्या लोकांकरिताच नव्हे, तर दूरवर पसरलेल्या लोकांनाही व्हावयाचा असतो. काही व्यवसाय असे असतात, की त्यांचे उत्पादन हे जागतिक बाजारपेठांकरिता होत असते. नागरी उत्पादन व्यवसायांत आधुनिक काळात यंत्रतंत्रांचा वापर अधिक होऊ लागला आहे. उद्योगव्यवसायांचा वाढता आवाका, यंत्रतंत्रांचा वापर आणि गुणानुक्रमाने मिळणारे काम व सामाजिक स्थान यांनी कुटुंबाला दुय्यम स्थान प्राप्त झाले. व्यवसाय कौटुंबिक राहिला नाही. त्यामुळे व्यावसायिक हितसंबंध आणि कौटुंबिक हितसंबंध यांची फारकत झाली आहे. अर्थव्यवस्थेत कुटुंबाऐवजी व्यक्तीला महत्त्व प्राप्त झाले आहे. आर्थिक हितसंबंधांवरून राजकीय हितसंबंधांचे स्वरूप ठरत असल्याने शासकीय वा राजकीय व्यवस्थेतही कुटुंबाला विशेष स्थान राहिलेले नाही. सर्व हितसंबंध अशा रीतीने नागरी समाजात कुटुंबनिरपेक्ष बनत चालले आहेत. यामुळे व्यक्तींची सामाजिक गतिशीलताही वाढली आहे. कुटुंबावरून व्यक्तीचे सामाजिक स्थान न ठरता व्यक्तीवरून कुटुंबाचे स्थान ठरते. यामुळे एकत्र कुटुंबपद्धतीचे विघटन होत चालले आहे.

ग्रामीण समुदायाचे पूर्वीचे प्रादेशिक स्वरूप आता कमी होत चालले आहे. सामूहिक संरक्षणाची आवश्यकता कमी झाल्याने, दळणवळणाची यांत्रिक साधने उपलब्ध असल्याने व वीज, पाणीपुरवठा, रस्ते यांची सोय असल्यामुळे मुख्य गावठाण सोडून आपल्या शेतावर जाऊन राहण्याची प्रवृत्ती वाढत आहे. शेती–उत्पादन हे बहुधा ग्रामीण रहिवाशांच्या उपभोगापेक्षा बाजारपेठांकरिता होत असल्याने शेतकऱ्यांचा शहरांशी व शहरी बाजारपेठांशी अधिकाधिक संबंध येत असून गावकऱ्यांशी असलेला पूर्वीचा संबंध नष्ट होत चालला आहे. गावकऱ्यांचे सामाजिक संबंध हल्ली पूर्वीसारखे वारंवार येत नसल्याने व त्यांचे संबंध अपरिहार्य राहिले नसल्याने, गावकऱ्यांत पूर्वीची एकात्मता राहिलेली नाही. शेतीबरोबर इतर अनेक जोडधंदे निघाले आहेत. या निमित्ताने तसेच व्यापाराकरिता व शासकीय व्यवस्थेच्या निमित्ताने गावात अनेक नागरी रहिवाशांचा प्रवेश झाला आहे. त्या गावाबद्दल अगर गावाच्या परंपरेबद्दल आत्मीयता नसलेल्या लोकांचा प्रवेश गावात होत असल्यामुळे व गावातील लोक शहरांतून आपल्याबरोबर शहरी संस्कृतीचे संस्कार आणीत असल्यामुळे गावातील पूर्वीचा सांस्कृतिक एकजिनसीपणा नष्ट होत आहे. गावातील शेतीनिष्ठ संस्कृती लोप पावत असून, त्या जागी उद्योगधंद्याची व्यापारी संस्कृती उदयास येत आहे.

पूर्वीचे प्रभेदन व स्तरीकरण यांनाही पूर्वीसारखे आनुवंशिक स्थान राहिले नाही; परंतु भारतात मात्र जातिव्यवस्थेमुळे अजूनही घरांची मांडणी जातीवरच आधारलेली दिसते. याचे कारण आज तरी आर्थिक किंवा व्यावसायिक नसून धार्मिकच आहे.

पूर्वीच्या सामाजिक संस्थाही आज मोडत चालल्या आहेत. अर्थव्यवस्था व शासनव्यवस्था यांची ताबेदारी आता विशिष्ट कुटुंबाकडे राहिलेली नाही. शिक्षण सर्वांना खुले केल्यामुळे आणि त्या शिक्षणाच्या आधारे परंपरा सोडून कोणताही व्यवसाय पतकरण्याची मुभा सर्वांना असल्याने पूर्वीची स्तरीकरणाची चाकोरी सैल होऊन गतिशीलता वाढलेली आहे. परिणामतः भारतातील ग्रामीण समुदायात जुन्या पारंपरिक ग्रामसंस्थेचे स्वरूप झपाट्याने बदलत चालले आहे.

परिवर्तन हा समाजाचा परंपरागत नियम आहे. समाजामध्ये सातत्याने परिवर्तन होतं असते. अशामुळे वेळे बरोबर समाजामध्ये बदल तीव्र अथवा मंदगतीने सुरू असतात. भारताचे सद्यकालीन स्वरूप स्वातंत्र्योत्तर कालखंड यापेक्षा पुर्णपणे भिन्न स्वरूपाचे आहे. आज भारतीय समाजामध्ये दीर्घ प्रमाणामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये परिवर्तने घडून येत आहे. सद्यकालीन परिस्थितीमध्ये औद्योगिक आरती सामाजिक सामाजिक संस्थेत विचार कला संस्कृती धर्म आदी सर्व बाबींमध्ये परिवर्तन घडून येताना दिसत आहे. या परिणामाच्या प्राप्ती मध्ये ग्रामीण समाजामध्ये तात्विक परिवर्तने अलेले सुद्धा आलेले दिसते. परिवर्तने प्रकारची अव्यक्त आहे. या सर्व परिवर्तनाचा समावेश ग्रामीण समाजातील आणि आंतरिक पक्षांमध्ये होताना दिसतो. सुधारणांमध्ये आंदोलने, सामाजिक कायदा आणि नियम त्याचबरोबर सामाजिक विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण समाजामध्ये तीव्र गतीने परिवर्तन होताना दिसून येते. या सर्व घटकांनी ग्रामीण सभ्यतेला आणि संस्कृतीला प्रभावित केले आहे ज्याद्वारे ग्रामीण समाजामध्ये सातत्याने परिवर्तने घडून येत आहेत. आज ग्रामीण समाजामध्ये विभिन्न प्रकारे सामाजिक परिवर्तन होताना दिसते ते काही परिवर्तनाचा समावेश करत असताना आपण पुढील बाबींचा आढावा घेऊ.

**१) कार्य आणि भूमिकेमध्ये परिवर्तन:**

भारतीय समाजामध्ये व्यक्तीच्या जन्मानुसार आणि त्याच्या जातीनुसार त्याचा सामाजिक दर्जा निश्चित केला जात होता. व्यक्तीचा जन्मजात होईल त्यानुसार रस्त्याला समाजात मान्यता असे त्यानुसारच त्याच्यावर कार्याच्या जबाबदारी असा त्यामुळे भारतीय समाजामध्ये जन्माधारित जातीची व्यवसाय आणि व्यक्तीचा दर्जा निश्चित केला जाई. ब्राह्मण, क्षत्रिय, शुद्र, वैश्य, आणि शूद्र यांचा दर्जा जातीनुसार असे परंतु आज या स्थितीमध्ये तीव्र गतीने परिवर्तन होताना दिसत आहे. आज ग्रामीण समुदाय मध्ये व्यक्तीच्या जन्माधारित आणि जाती आधारित दर्जा ऐवजी त्यांनी प्राप्त केलेल्या अर्जित स्तराला किंवा त्यांनी मिळवलेल्या पदाला मान्यता देण्यात येऊ लागली आहे. अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या पददलित असणाऱ्या व्यक्तींनाही त्यांच्या योग्यतेप्रमाणे समाजाने स्वीकृत केलेले आहे यामध्ये अनेक समाज घटकांचा उल्लेख करता येईल. उदाहरणात. डॉक्टर, इंजिनिअर, लोकसेवक, आय. ए. एस. अधिकारी, पोलीस अधिकारी, राजकारणी अशा अनेक पदांचा समावेश करावा लागेल. थोडक्यात आज ग्रामीण समुदाय मध्ये व्यक्तीचे कार्य व त्याचा दर्जा

त्याचबरोबर त्याची योग्यता याला विशेष स्थान प्राप्त झाले आहे. जातीआधारित देणाऱ्या दर्जाचे महत्व कमी झाले आहे.

**२) जातीय श्रेष्ठतेचे महत्व कमी**

भारत असा एकमेव देश आहे ज्या देशांमध्ये अनेक जाती समूहांचे वास्तव्य आहे. भारतामध्ये प्रत्येक जाती अंती स्व समाजामध्ये स्वतःच्या जातीविषयी विशिष्ट प्रकारचा अभिमान असल्याचे दिसून येते. स्वतःची संस्कृती परंपरा धर्म श्रेष्ठ आहे असे एक समूह दुसऱ्या समूहास आपण इतर राहू श्रेष्ठ आहे अशा प्रकारची भावना आज कमी होताना दिसून येते असे असले तरी याला अपवाद आहेत. मैत्री असे असले तरी आज भारतीय संविधानिक मूल्यांच्या आचरण संपूर्ण देशभर होताना दिसून येते. आज संविधानिक मार्गाने देशातील प्रत्येक व्यक्तीला व्यक्ती स्वातंत्र्य मिळाले असल्याने जातीचे श्रेष्ठत्व कमी झाल्याचे दिसून येते. अशा प्रकारची महत्वपूर्ण परिवर्तने ग्रामीण समाजामध्ये होताना दिसून येतात.

**३) स्वयंपूर्णतेचा रास:**

प्राचीन कालखंडामध्ये भारतीय समाज हा स्वायत्त आणि स्वयंपूर्ण होता. ग्रामीण जनसंख्या ही शेती आधारित होती परंतु वाढती महागाई, लोकसंख्येतील वाढ, औद्योगिकीकरण आणि नागरीकरणाच्या परिणाम यामुळें शेती हा मुख्य व्यवसाय असूनही ग्रामीण समाजामध्ये स्वयंपूर्णता आली नाही.

**४) एकतेची भावना कमी:**

सामाजिक एकजिनसीपणा हे ग्रामीण समुद्राचे महत्त्वपूर्ण असे वैशिष्ट्य आहे. व्यक्ती समुदायामध्ये परस्पर आपुलकीचे आणि जवळचे संबंध असणे हा ग्रामीण समाजातील अविभाज्य घटत आहे परंतु बदलत्या परिस्थितीमध्ये ग्रामीण समुदायाच्या परिवर्तनात संपूर्ण गावाच्या हिताकडे लक्ष न देता व्यक्तिकेंद्री दृष्टिकोन रुजला जात असून सामुदायिक तिच्या भावनेमध्ये दुरावा आल्याचे दिसून येते आहे. परिणामी समूहाच्या हिताकडे लक्ष न देता वैयक्तिक हित साधण्याचा प्रयत्न केला जातो.

**५) नेतृत्वात परिवर्तन:**

ग्रामीण क्षेत्रामध्ये पंचायत राज्याची स्थापना मतदार करणाऱ्यांना स्वातंत्र्य तसेच आर्थिक परिवर्तन नवीन नेतृत्वाला प्रोत्साहन देत असल्याने पारंपारिक नेतृत्व जे व्यक्तीच्या जातीय आधारित होते त्याचे महत्त्व कमी होताना दिसत आहे आज घराणेशाही ने राजकारणात प्रवेश करण्याचे प्रमाण काही प्रमाणात कमी झाल्याचे दिसून येते.

**६. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा प्रभाव:**

आज ग्रामीण समाजामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञानाची स्वागत होताना दिसून येते ग्रामीण भागामध्ये टेलिफोन, टीव्ही, मोबाईल, इंटरनेट या माध्यमानी आपले स्थान मिळवले आहे. असे असले तरी गावात

राहणारे शेतकरी स्वतःला शेतकरीच मानतात शेतीशी शेतकऱ्याच्या जिव्हाळ्याचे संबंध असताना दिसून येतात.

**७. बाजारपेठा आणि उपभोक्तावादी संस्कृतीचा उगम**

आज बाजारपेठा व्यापक स्वरूपात वाढल्या आहेत. सर्व वस्तूंची गरज या बाजारपेठेमध्ये पूर्ण होत आहे त्याचे कारण म्हणजे दळणवळणाची सुविधा वाढलेली आहे. त्यामुळे उपभोक्तावादी संस्कृतीचा उगम झाला आहे. आज ग्रामीण भागामध्ये मोठे व्यापारी, जमीनदार, छोटे अधिकारी, त्याचबरोबर राजकीय कार्यकर्ते या नव्या वर्गाचा उगम झाला आहे त्यामुळे गावातील बाजारपेठ एक नवीन अर्थव्यवस्था म्हणून उदयास येत आहे.

**८) शेतीचे व्यापारीकरण:**

बाजार पेठ तसेच अर्थव्यवस्था उगम पावत असल्यामुळे त्याचबरोबर उपभोक्तावादी संस्कृती आपली मुळेघट्ट करू लागली आहे. शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीला फाटा देऊन नगदी पिकांच्या वर जोर दिला आहे. अशा प्रकारच्या शेतीमध्ये जास्तीत जास्त गुंतवणूक करावी लागते. भारतीय कृषी ही मान्सून आधारित असल्यामुळे कित्येकदा शेतकऱ्यावरती अस्मानी संकट येते अशा संकटातून उभे न राहता आल्यामुळे अनेक शेतकरी आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात. परंतु उपभोक्तावादी संस्कृती मुळे शेतकऱ्याच्या व्यक्तिवादी धोरणाला प्रोत्साहन मिळाले असून नगदी पिकांच्या उत्पन्नावर विशेष जोर दिला जात आहे.

**९) ७३ वी घटना दुरुस्ती:**

७३ व्या घटना दुरुस्तीनुसार पंचायत राज यांना संविधानिक दर्जा मिळाला आहे या घटनादुरुस्तीनुसार महिलांना ३३ टक्के आरक्षण प्रदान करण्यात आले आहे. हा ग्रामीण सामाजिक जीवनातील क्रांतिकारी पाऊल आहे. ग्रामीण भारतीय महिलांना या चौकटीबाहेर पडायचे असल्यास राजकीय हक्क प्राप्त असणे अतिशय महत्त्वपूर्ण अशी बाब आहे यामुळे महिला राजकीय दृष्ट्या स्वावलंबी बनतील. शिक्षणामुळे समाजातील मागास वर्गातील लोकांमध्ये जागृकता निर्माण झालेली आहे. दळणवळणाची माध्यमे त्यास गुरु व प्रसार माध्यमे यामध्ये टीव्ही रेडिओ चित्रपट यांनी व्यक्तीचे सबलीकरण त्याचबरोबर शैक्षणिक प्रसाराच्या लागतील प्रबोधन घडवून आणलेले आहे.

**१०) महिलांचा दर्जा:**

भारतीय समाज हा पुरुष प्रधान समाज आहे भारतीय समाजामध्ये स्त्रियांचा दर्जा नेहमीच नगण्य ठरला आहे. भारतीय समाजातील स्त्रीला संपत्तीमध्ये पूर्वी अधिकार दिला नव्हता त्याचबरोबर तिला कोणत्याही प्रकारची निर्णय स्वातंत्र्य दिले नव्हते त्याबाबत सर्व अधिकार पुरुषाला होते. परंतु सद्यकालीन ग्रामीण समुदायांमध्ये महिलांना आरक्षण, उच्च न्यायालय द्वारा संपत्ती मध्ये हक्क प्रदान करण्यात आले आहेत, संविधानिक मार्गाने स्त्रियांच्या हीतात्यासाठी अधिकार प्राप्त झाले आहेत. यामध्ये राजकीय, सामाजिक,

सांस्कृतिक, आर्थिक सर्व दृष्टिकोनातून परिवर्तन झालेले आहे. या प्रकारे आपण पाहू शकतो की ग्रामीण समुदायांमध्ये सामाजिक आणि आर्थिक संरचनेमध्ये परिवर्तने होताना दिसून येत आहेत.

**११) संयुक्त परिवाराचे विघटन:**

सुरुवातीच्या कालखंडामध्ये भारतीय समाजामध्ये संयुक्त कुटुंबाचे प्राबल्य होते यामध्ये परिवारातील सदस्यांची संख्या मोठे होते सर्व कुटुंबातील सदस्य आपापसात प्रेमभावाने आणि सलोख्याने राहत होते. कुटुंबाची सर्व सदस्यांचे आपसात आत्मीयतेचे संबंध होते परंतु अलीकडील काळात सामाजिक परिवर्तनामुळे संयुक्त कुटुंबातील परिवाराचे विघटन होताना दिसून येते. औद्योगीकरण आणि नागरीकरण वाढत्या सुविधा याचा प्रयोग संयुक्त कुटुंबावर झाल्यामुळे त्याचबरोबर साक्षरता वाढल्यामुळे विविध कारणानिमित्त परिवाराचे विघटन होताना दिसते.

**१२) गुन्ह्यांमध्ये वाढ:**

वाढत्या लोकसंख्येचा परिणाम शहरे तसेच भारत देशातील विविध खेडे यांनी प्रभावित होत आहेत. वाढत्या लोकसंख्येच्या अभावी बेरोजगारी गरिबी यांचे प्रमाण वाढताना दिसून येते. या सर्व कारणांमुळे ग्रामीण भागामध्ये गुन्ह्यांच्या प्रमाणामध्ये वाढ होते आहे. गुन्ह्याचे प्रमाण कमी करण्यासाठी सुधारणावादी तसेच विकासात्मक अनेक प्रयोग शासनाकडून राबवले जात आहेत तरीसुद्धा अपराधाचे प्रमाण कमी आलेले दिसून येत नाही. परिणाम आणि आज ग्रामीण लोकसंख्या शहरी भागात वास्तव्य करण्यासाठी प्राथमिकता देत आहे. वरील परिस्थितीची समस्या जाणून घेतात असे दिसून येते की शासकीय तसेच प्रशासकीय कल्याणकारी सुविधा मर्यादित असून त्याचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत मिळताना दिसून येत नाही.

## २.३ सारांश :

मानवाची भ्रमंती अवस्था संपल्यानंतरच खऱ्या अर्थाने स्थिर जीवनाला सुरुवात झाली. पर्यायाने मानव वस्ती करून एकेठिकाणी राहू लागला यातूनच खेड्यांची निर्मिती झाली. शेती व्यवसायाने मानवाचा उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडविला आणि मानवी संस्कृतीच्या विकासाला चालना दिली. यातील पहिला व महत्त्वाचा टप्पा म्हणून खेड्यांचा उदय लक्षात घ्यावा लागेल. खेड्यांच्या उदयाची कारणे जरी समान असली तरी खेड्यांचा आकार, रचना व सामाजिक जीवनमान, मालकी हक्क यासारख्या घटकांच्या बाबतीत असमानता दिसून येते. म्हणूनच भौतिक व अभौतिक दृष्टिकोनातून विचार करता खेड्यांचे विविध प्रकार पहावयास मिळतात.

## २.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१) ग्रामीण समुदायाचा ............ हा मुख्य व्यवसाय असतो.

अ) पशुपालन   ब) उद्योग   क) कृषि   ड) अन्नसंकलन

२) ग्रामीण समुदायात ............. संबंधाचे वर्चस्व असते.

अ) प्राथमिक ब) दुय्यम क) औपचारिक ड) करारात्मक

३) ................ आर्थिक क्रिया करणाऱ्या आदिम जमातीत स्थलांतरीत खेडी आढळतात.

अ) उद्योग ब) शेती क) पशुपालन ड) अन्नसंकलन

४) स्थानांतरित शेती करणाऱ्या आदिम जमातीत ................ प्रकारचे खेडे आढळते.

अ) स्थायी ब) स्थलांतरित क) अंशतः ड) केंद्रित

५) जगात .......... प्रकारची खेडी मोठ्या प्रमाणावर आहेत.

अ) विखुरलेली ब) रेषात्मक क) केंद्रित ड) वर्तुळाकार

६) ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार महिलांना ............. टक्के आरक्षण प्रदान करण्यात आले आहे.

अ) २० ब) ३० क) ३३ ड) ३२

## २.५ स्वाध्याय

अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे

१) ग्रामीण समुदायाची व्याख्या सांगून वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) भौतिक रचनेनुसार पडणारे खेड्यांचे प्रकार विशद करा.

३) वसाहतीची स्थिरता या आधारे खेड्यांचे वर्गीकरण स्पष्ट करा.

४) जमिनीची मालकी या आधारे खेड्यांचे प्रकार स्पष्ट करा.

५) ग्रामीण समुदायाचे बदलते स्वरूप स्पष्ट करा.

ब) टिपा लिहा.

१) ग्रामीण समुदाय

२) ग्रामीण समुदायाची वैशिष्ट्ये

३) केंद्रीत खेडे

४) विखुरलेले खेडे

५) स्थलांतरित खेडे

६) अंशतः स्थायी खेडे

७) स्थायी खेडे

## २.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) क २) अ ३) ड ४) क ५) क ६) क

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


- ✻ प्रा. डॉ. गुरुनाथ नाडगोंडे - ग्रामीण समाजशास्त्र, कौन्टिनेटल प्रकाशन, पुणे, १९८६.
- ✻ प्रा. चंद्रकांत खंडागळे - ग्रामीण समाजशास्त्र, प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली, २००५.
- ✻ चुनखडे-पाटील - ग्रामीण समाजशास्त्र
- ✻ A. R. Desai – Rural Sociology in India
- ✻ A. E. Punit – Social Systems in Rural India – Sterling Publishers Pvt. Ltd., New Delhi, 1978
- ✻ N. Jaypalan – Rural Sociology – Atalantic Publishers and Distributer, New Delhi, 2002.
- ✻ Altekar, A. S. Village Communities in Western India, Bombay, 1927.
- ✻ Baden-Powell, B. H.The Indian Village Community, London, 1896.
- ✻ Chiva, I. Rural Communities : Problems, Methods and Types of Research UNESCO, 1958.
- ✻ Desai, A. R. Ed. Rural Sociology in India, Bombay, 1961.
- ✻ Dube, S. C. Indian Village, London, 1959.
- ✻ Dube, S.C. India's Changing Villages, London, 1963.
- ✻ Loomis, Charles; Beagle, Rural Sociology, The Strategy of Change, Englewood-Cliffs, 1964.
- ✻ Maine, Sir Henry, Village Communities in the East and West, London, 1972.
- ✻ Malaviya, H. D. Village Panchayats in India, New Delhi, 1956.
- ✻ Marnott, Mukim, Ed. Village India, Chicago, 1960.
- ✻ Majumdar, D. N. Caste and Communication in an Indian Village, Bombay, 1962
- ✻ Orestein, Henry, Gaon : Conflict and Cohesion in an Indian Village, Princeton, 1965.
- ✻ Redfield, Robert, Peasant Society and Culture, Chicago, 1956.


❑❑❑

# घटक – ३
# ग्रामीण समाजातील सामाजिक संस्था
## (Social Institutions in Rural Society)

**घटक संरचना**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ विवाह, कुटुंब आणि नातेसंबंध संस्था

  ३.२.२ जात आणि बलुतेदारी

  ३.२.३ राजकीय जीवन : रचना व बदल

३.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

३.४ सारांश

३.५ स्वयं अध्ययना प्रश्नांची उत्तरे

३.६ चिंतन व कार्य

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


### ३.० उद्दिष्टे (Objectives)

- सामाजिक संस्थेचा अर्थ सांगता येईल.
- विवाह, कुटुंब व नातेसंबंध या संकल्पना स्पष्ट होतील.
- जात आणि बलुतेदारी पद्धत समजावून घेता येईल.
- ग्रामीण समाजातील रचना आणि त्यामध्ये झालेले परिवर्तन लक्षात येईल.

### ३.१ प्रस्तावना (Introduction)

ग्रामीण समाजाचा अभ्यासातील महत्त्वाचा भाग म्हणून ग्रामीण सामाजिक संस्थेचा उल्लेख करता येतो. कारण कोणत्याही समाजाचा आधारभूत घटक त्या समाजातील सामाजिक संस्थांच असतात. सामाजिक

संस्था या सार्वत्रिक व परिवर्तनीय असतात. प्रत्येक व्यक्तीच्या गरजा पूर्ण करण्याचे कार्य समाजातील सामाजिक संस्था करित असतात. म्हणून ग्रामीण समाजाचा अभ्यास करताना या समाजातील सामाजिक संस्थांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. या तिसऱ्या घटकात आपण ग्रामीण समाजातील महत्त्वपूर्ण संस्थांचा अभ्यास करणार आहोत.

प्रत्येक संस्थेचे कार्य, स्वरूप ठरलेले असले तरी प्रत्येक संस्थेचे कार्य काटेकोरपणे वेगळे सांगता येत नाही तर समाजातील सर्व संस्था परस्परांचा सहकार्यातूनच आपापल्या संस्थेचे कार्य पार पाडीत असतात. सर्वसामान्यपणे समाजात व्यक्तीचा समूहाला संस्था असे संबोधले जाते. उदा. मोर्चातील जनसमूह कर्मचाऱ्यांची संघटना इ. समाजशास्त्रात संस्था हा शब्द व्यक्तीचा गट या अर्थाने वापरला जात नाही तर नियमांचा समुच्चय किंवा स्वीकृत कार्य पद्धती या अर्थाने वापरला जातो.

समाजशास्त्रीय दृष्ट्या 'सामाजिक संस्था' या संकल्पनेचा अर्थ लक्षात येण्यासाठी विविध विचारवंतांनी केलेल्या व्याख्यांचा विचार करणे आवश्यक आहे.

**सामाजिक संस्थेच्या व्याख्या– (Defination)**

**१) किंग्जले डेव्हिस–**

'एक किंवा अधिक कार्याच्या भोवती रचल्या गेलेल्या परस्परसंबंधित अशा लोकरूढी, लोकनीती व कायदा यांचा संबंध म्हणजे संस्था होय.'

**२) बोगार्डस्–**

'प्रामुख्याने सुव्यवस्थित कार्यप्रणालीचा माध्यमातून लोकांचा आवश्यक गरजांची पूर्तता करण्यासाठी संघटित केलेली समाजाची संरचना म्हणजेच सामाजिक संस्था होय.'

**३) ग्रीन–**

'संस्था ही चालीरीती आणि रूढी यांचे एकत्र स्वरुपात केलेले संघटना आहे. त्याद्वारे अनेक सामाजिक गरजांची पूर्तता होते .

प्रत्येक समाजाच्या गरजा सारख्याच आहेत. संस्था म्हणजे विशिष्ट प्रकारच्या मार्गांनी आपली ध्येयपूर्ती करणाऱ्या नियमांचा समुच्चय होय.

## ३.२ विषय– विवेचन (Presentation of Subject Matter)

या अध्ययन घटकात तुम्ही ग्रामीण समाजातील सामाजिक संस्था समजावून घेणार आहात. त्यादृष्टीने या घटकाचे चार विभाग पाडण्यात आले आहेत. पहिल्या विभागात तुम्ही ग्रामीण सामाजिक संस्थेचा संस्थेच्या काही व्याख्या अभ्यासणार आहोत. दुसऱ्या विभागात विवाह, कुटुंब आणि नातेसंबंध व्यवस्था ही संकल्पना समजावून घेणार आहोत. तिसऱ्या विभागात ग्रामीण समाजातील जात आणि बलुतेदारी व्यवस्था

समजावून घेणार आहात. तर शेवटच्या चौथ्या विभागात ग्रामीण समाजातील रचना आणि त्यामध्ये झालेले परिवर्तन अभ्यासणार आहात.

### ३.२.१ विवाह कुटुंब आणि नातेसंबंध संस्था

अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा प्रमाणेच काम प्रवृत्ती हीदेखील मानवाची मूलभूत गरज आहे. मानवप्राण्याबरोबरच मानवेत्तर प्राणी देखील या कामइच्छांची पूर्तता करतात. मानवेत्तर प्राण्यांच्या कामइच्छा पूर्ततेमागे सामाजिक, सांस्कृतिक आधार नसतो केवळ जैविक आधार असतो. परंतु मानवाच्या कामइच्छेच्या पूर्ततेचा आधार अंशतः जैविक तर अंशतः सामाजिक आणि सांस्कृतिक असतो. अन्य गरजांप्रमाणे कामवासनेची मूलभूत गरज भागविणे हे सुद्धा आवश्यक आहे. हे आज सर्वच समाजाला पटलेले आहे. आणि या गरजा पूर्ततेतूनच विवाह, कुटुंब व नातेसंबंधाला जन्म दिला आहे.

मानवाची कामतृप्तीची गरज खालील तीन प्रकारे पूर्ण केली जाते–

(१) हस्तमैथुन

(२) समलिंगी संभोग

(३) विषमलिंगी संभोग

वरील तिन्ही प्रकारात भिन्नलिंगी व्यक्ती जेव्हा लैंगिक संबंधद्वारे कामतृप्ती करून घेतात तेव्हा त्यांच्या या संबंधातून प्रजोत्पत्ती होण्याची शक्यता असते. समाजसात त्यासाठी ते आवश्यकही असते. वरील तीन प्रकारे कामपूर्तीची गरज भागविता येण्याची शक्यता असली तरी पहिल्या दोन प्रकारातून प्रजोत्पादनाची शक्यता नसल्यामुळे व समाजाला नवीन प्रजेची आवश्यकता असल्यामुळे समाज केवळ विषमलिंगी कामप्रवृत्तीलाच पाठिंबा देत असले तरी विवाहाचे प्रतिमान दिवसेंदिवस बदलत चालले आहेत शिवाय जर काहींना समलैंगिक व्यक्तीबद्दल आकर्षण असेल तर तसे संबंध ठेवण्याचा नैसर्गिक हक्क (मानवी हक्क) त्यांना प्राप्त होतो त्यामुळे ते समलैंगिक संबंध ठेवू शकतात.

काही समाजात विवाहपूर्व व विवाहबाह्य संबंध ठेवत असतात. परंतु असे संबंध मर्यादित असतात कारण अशा संबंधाना समाज व कायदा मान्यता देत नाही. कामइच्छांची पूर्तता स्वस्थ जीवन जगण्यासाठी तसेच सामान्य स्वरुपात जिवंत राहण्यासाठी सुद्धा आवश्यक मानले जाते. कामइच्छांची पूर्तता कोणत्या प्रकारे केली जावी हे समाज आणि संस्कृतीद्वारे निश्चित होत असते. विवाहाचा उद्देश केवळ कामवासनांची पूर्तता करणे एवढाच नाही तर सामाजिक, सांस्कृतिक उद्देशांची पूर्तता करणे हा सुद्धा उद्देश असतो. विवाह केवळ स्त्री–पुरुषांनाच एकत्र बांधत नाही तर त्यांच्या बरोबर दोन कुटुंबांना एकत्र जोडण्याचे, त्यांचाच सोयरीक निर्माण करण्याचे कार्यही विवाहाद्वारे होत असते.

विषयवासना किंवा कामवासना ही व्यक्तीची शारीरिक गरज आहे. कामतृप्ती करून घेण्याचा प्रयत्न सर्वच लोक करून घेत असले तरी ते तृप्त करून घेण्याचे प्रमाण सर्वच लोकांमध्ये सारखे असते असं नाही. काही लोकांमध्ये अत्यंत कमी प्रमाणात तर काही विलक्षण वैयक्तीक असतात. तर काही लोकांमध्ये

विषयवासना अत्यंत कमी प्रमाणात आढळते. अशा स्थितीत मानवाच्या विषय वासनेच्या तृप्तीवर नियंत्रण ठेवणे समाजाला आवश्यक असते. लोकांचे वैयक्तीक वर्तन ही सामाजिक व नैतिक बाब आहे असे समाज मानतो. व्यक्तीचे लैंगिक वर्तन योग्य असावे यासाठी समाजाचे जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू असतात. अशाप्रकारे समाजमान्य व योग्य कामसंबंधाचा प्रकार म्हणजेच विवाह संस्था होय.

**विवाहाच्या व्याख्या (Definition of Marriage)**

१) **गिलिन** - स्त्री पुरुष यांच्यात लैंगिक संबंध प्रस्थापित करण्याचा समाजमान्य मार्ग म्हणजे विवाह होय.

२) **डॉ. एडवर्ड वेस्टमार्क** -विवाह म्हणजे एका किंवा अनेक पुरुषांचा एका किंवा अनेक स्त्रियांशी असलेला संबंध होय. या संबंधात प्रथा किंवा कायद्याने मान्यता दिलेली असते. तसेच यात अंतर्भूत होणाऱ्या दोन्ही पक्षांविषयी तसेच त्यांच्यापासून जन्मास येणाऱ्या मुलांबाबत काही अधिकार आणि कर्तव्यांचा समावेश होतो.

३) **बोगार्डस्** - विवाह हे कौटुंबिक जीवनामध्ये स्त्री आणि पुरुषांना प्रवेश मिळवून देणारी एक संस्था आहे.

वरील व्याख्यान वरून स्त्री-पुरुषातील संबंधावर नियंत्रण ठेवणे हे विवाहसंस्थेचे कार्य आहे. म्हणूनच सर्व समाजात विवाहसंस्थेचे अस्तित्व दिसून येते.

**विवाहाचा उद्देश- (Aims of marriage)**

विवाहातूनच कुटुंबाची निर्मिती होत असते. विवाह न करता स्त्री-पुरुषांना पती-पत्नी म्हणून आपल्या भूमिका पार पाडता येत नाहीत. परंतु केवळ लैंगिक संबंधांना सामाजिक मान्यता देणे हाच विवाहाचा एकमेव उद्देश नाही तर याबरोबरच-

१) कामइच्छांची पूर्तता करून काम इच्छांच्या प्रक्रियांना नियंत्रित करणे

२) कुटुंबाची निर्मिती करून नातेदारी संबंधाचा विस्तार करणे

३) वैध अपत्यप्राप्ती करून समाजाची निरंतरता कायम राखणे

४) मूल्यांचे संगोपन व त्यांचे सामाजिकरण करणे

५) स्त्री-पुरुषांचे आर्थिक सहकार्य निर्माण करणे

६) शारीरिक व मानसिक स्वास्थ्य प्रदान करणे

७) माता-पिता आणि अपत्य यांच्यात नवीन अधिकार व दायित्वाची भावना निर्माण करणे

८) संस्कृतीचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरण करणे

९) धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक उद्देशांची पूर्तता करणे व

१०) सामाजिक सुरक्षा प्रदान करणे इत्यादी विवाहाचे उद्देश आहेत.

**विवाहाचे निवासविषयक नियम (Rules of Residence in marriage)**

ग्रामीण जीवनातील विवाह ही अनिवार्य बाब असली तरी कोणी-कोणाशी विवाह करावे किंवा करू नयेत या संबंधीचे निषेध नियम प्रत्येक समाजात दिसून येतात. असे नियम प्राचीन काळापासूनच प्रथा, परंपरा, रूढी, रीती-रिवाज इत्यादी स्वरूपात प्रचलित असतात. जसे अगदी जवळचे किंवा रक्तसंबंधित स्त्री-पुरुषांनी शरीरसंबंध ठेवू नयेत तसेच एका कुटुंबातील रक्तसंबंधित स्त्री-पुरुषात विवाह संबंध प्रस्थापित होत नाही. म्हणजेच विवाहासाठी दुसऱ्या कुटुंबातील सदस्यांची निवड करावी लागेल. विवाहनंतर पती-पत्नी म्हणून एकत्र राहण्यासाठी दोघेपैकी कोणाला तरी विशेषतः स्त्रियांना आपले मूळचे निवासस्थान सोडून जोडीदारासोबत कायम निवासासाठी रहावे लागेल. म्हणजेच विवाहानंतर किमान एकाला आपले निवासस्थान बदल बदलणे गरजेचे ठरते.

नवविवाहित दाम्पत्यांनी विवाहानंतर पती-पत्नी म्हणून एकत्र कुठे निवास करावे या संदर्भात समाजाद्वारेच निर्माण करण्यात येणाऱ्या आकृतीसंबंधांनाच 'विवाहाचे निवासविषयक नियम' असे म्हणता येईल. या निवासविषयक नियमांच्या आधारावर कुटुंबाचे प्रकार, वंशपरंपरा, वारसाहक्क पद्धती, मालमत्ता व संपत्तीचा उत्तराधिकारी इत्यादी बाबींचा उलगडा होतो. यासाठीच विवाहसंस्थेचे अध्ययन करताना वरील सर्व बाबींच्या अध्ययनाला महत्त्व प्राप्त झाले आहे. ग्रामीण, आदिवासी, नागरी अशा कोणत्याही समुदायातील विवाहविषयक नियमांच्या उपलब्ध अध्ययनावरून त्याचे काही प्रकार पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) पितृस्थानीय निवास नियम :**

विवाहानंतर पत्नी आपल्या पतीसोबत पतीच्या आई-वडीलाच्या घरी रहावयास जाते असा पितृस्थानीय निवास नियमाचा अर्थ आहे. विवाहानंतर नवविवाहित जोडीदारांनी पतीच्या कुटुंबात राहणे या नियमालाच 'पितृस्थानीय निवास नियम' असे संबोधले जाते. जगातील बहुतेक समाजामध्ये याच नियमाच्या आधारे निवासस्थान ठरत असते. हिंदू, मुस्लीम तसेच अनेक आदिवासी समाजात जमातीमध्ये सुद्धा याच नियमाने नवदाम्पत्यांचे निवासस्थान ठरत असते. त्याच आधारावर पितृसत्ताक कुटुंब, पितृवंशीय कुलपरंपरा, पुरुषप्रधान संस्कृती इत्यादींचे प्रचलन आपल्यास दिसून येते. त्याचे मुख्य कारण पितृस्थानीय निवास नियम हेच आहे.

**२) मातृस्थानीय निवास नियम :**

वरील नियमांच्या अगदी विरोधी म्हणजेच विवाहानंतर पती हा पत्नीच्या सोबत तिच्या आई वडीलाच्या निवासस्थानी रहावयास जाणे हा मातृस्थानीय निवास नियमाचा अर्थ आहे. मातृसत्ताक कुटुंब पद्धती असलेल्या समाजात हाच नियम प्रचलित असतो. मातृसत्ताक कुटुंब पद्धती, मातृवंशीय परंपरा, स्त्रीप्रधान संस्कृती यांच्या विकासासाठी मातृस्थानीय निवास नियमाचे महत्वपूर्ण योगदान आहे. भारतात मलबार भागातील खासी, गारो, नायर या जमातींमध्ये मातृस्थानिय निवास नियम प्रचलित असल्याचे दिसून येते. काही अभ्यासक या प्रकारालाच 'पत्नीस्थानीय निवास नियम' या नावाने सुद्धा संबोधतात.

### ३) नवस्थानिय निवास नियम :

पितृस्थानिय व मातृस्थानीय निवास नियमापेक्षा हा एक वेगळा प्रकार आहे. जेव्हा नवविवाहित दाम्पत्य विवाहानंतर पतीच्या पक्षातील कुटुंबासोबत अथवा पत्नीच्या पक्षातील कुटुंबासोबत न राहता आपले स्वतंत्र असे नवीन घर बनवून त्यात निवास करतात त्या नियमालाच नवस्थानीय निवास नियम असे म्हणतात. नवविवाहितांनी बनविलेले निवासस्थान आई-वडीलाच्या निवासस्थानाजवळ अथवा त्यांच्यापासून दूर स्वतंत्र सुद्धा राहू शकते. नवस्थानीय कुटुंबात व्यक्तिवादाची आधुनिक भावना अधिक प्रबळ असते. इतर कौटुंबिक सदस्यांपासून स्वतंत्र एकांत जीवन जगण्याची भावना ही केंद्रीभूत असते. कुटुंब विघटनाच्या परिणामातून आधुनिक समाजात नवस्थानीय निवासी कुटुंबाचे प्रमाण वाढले आहे.

### ४) द्विस्थानीय निवास नियम :

विवाहानंतर नवविवाहितांना निवासासाठी पतीकडील अथवा पत्नीकडील कुटुंबाची निवड करण्याचे स्वातंत्र्य मिळते. अशा निवास नियमांना द्विस्थानीय निवास नियम असे म्हणतात. काही समाजामध्ये तर नवविवाहित पती-पत्नी आपापल्या जन्मदात्या कुटुंबातच राहतात. लक्षद्वीप, केरळ, अशांती आदिवासी जमातींमध्ये असे नियम दिसून येतात. पती रात्री आपल्या पत्नीच्या घरी जातो आणि दिवस उजाडताच आपल्या जन्मदात्या कुटुंबात परत जातो.

### ५) मामास्थानीय निवास नियम :

नवविवाहित दाम्यत्यांनी विवाहानंतर पतीच्या आईच्या भावाकडे म्हणजेच पतीच्या मामाच्या निवासस्थानी जाऊन राहणे म्हणजेच मामास्थानीय निवास होय. मातृवंशीय समाजात हा नियम प्रचलित असून कुटुंबाची संपत्ती व मालमत्ता कुटुंबप्रमुख असणाऱ्या स्त्रीच्या मालकीची असते. मातृवंशीय नियम परंपरेनुसार मामा अर्थात आईचा भाऊ हा मालमत्तेचा संरक्षक मानला जातो. त्याच्याकडे जाऊन वास्तव्य करणे हे भाचाच्या अधिकाराची बाब मानली जाते. ट्रिबियांडा द्वीपातील आदिवासी जमातीमध्ये ही प्रथा प्रचलित आहे. भारतामध्ये मातृवंशीय कुटुंब पद्धती असलेल्या जमातीमध्ये मामास्थानीय निवास नियमांचे पालन केल्याचे दिसून येते. मरडॉक यांच्या अध्ययनानुसार आठ आदिवासी जमातीत या मामास्थानीय निवास नियमाचे पालन होत असल्याचे दिसून आले.

## विवाहसंस्थेतील आधुनिक परिवर्तन (Recent changes in marriage Institution)

परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. समाजात सतत परिवर्तन होत असताना आपणास पहावयास मिळते. आज तर विज्ञानानी फार मोठी प्रगती केली आहे. मागील हजारो वर्षात जेवढे परिवर्तन झाले नसले तरी ते केवळ मागील पन्नास वर्षात झाले आहे. आज जुन्या परंपरा लुप्त होऊन नवीन परंपरा निर्माण होत आहेत. याला ग्रामीण भागातील विवाहसंस्था सुद्धा अपवाद राहील राहिलेली नाही. येथे आपण विवाहसंस्थेतील होणाऱ्या आधुनिक परिवर्तनाच्या संदर्भात विचार करू.

**१) विवाहसंस्थेत वैयक्तिक विचारांना प्राधान्य :**

विवाहात आज धार्मिक बाबींपेक्षा दिवसेंदिवस वैयक्तिक बाबींचे महत्त्व वाढत चालले आहे. विवाहाचे वय झाल्यानंतरही एखादी व्यक्ती विवाह करीत नसेल तर त्या व्यक्तीकडे वाईट व शंकास्पद नजरेने पाहिले जात होते. अशा व्यक्तींना समाजात सन्मानजनक स्थान मिळत नव्हता. त्याला समाजात तुच्छतेने पाहिले जात होते. परंतु आज परिस्थिती बदलली आहे. आता विवाहाला वैयक्तिक बाब म्हणून पाहिल्या जावू लागले आहे.

**२) विवाहाच्या संस्कारात्मक स्वरूपात परिवर्तन :**

आधुनिक काळात विवाहाला धार्मिक संस्कार मानण्याऐवजी सामाजिक करार मानल्या जावू लागले एक आहे. आधुनिक समाजातील औद्योगिकीकरण, नागरीकरण व पाश्चिमात्यीकरणामुळे आधुनिक काळात विवाहाच्या धार्मिक व संस्कारात्मक स्वरूपाचे महत्त्व कमी होवून त्या जागी कराराचे स्वरूप समोर आले आहे. आता विवाहातील धार्मिक बाजू कमकुवत होत चालली आहे.

**३) विवाहाची अनिवार्यता कमी झाली :**

पूर्वी विवाह ही अनिवार्य बाब मानली जात होती. प्रत्येक व्यक्तीचा विवाह झालाच पाहिजे. एखादी अविवाहित व्यक्ती मृत पावली तर तिचे दफनविधी करण्यापूर्वी तिचा विवाह लावून दिला जात होता. आता बऱ्याच युवक-युवतीं विवाहाला आपल्या स्वातंत्र्यावरील आघात आहे असे मानतात. स्त्रियांचे उच्च शिक्षण प्राप्त करणे, आर्थिक दृष्टीने स्वावलंबी बनणे, तसेच लोकसंख्या नियंत्रणाच्या दृष्टीने विवाहाच्या अनिवार्यतेवर विशेष जोर दिल्या जात नाही. अलीकडे तर शिक्षित नोकरी करणाऱ्या स्त्रिया अपेक्षेप्रमाणे विवाह जोडीदार मिळाला नाही तर आजीवन अविवाहित राहणे पसंत करताना दिसतात.

**४) विवाहाच्या उद्देशामध्ये अंतर:**

बहुतांश समाजामध्ये विवाहाच्या एका उद्देशाच्या स्वरूपात धार्मिक कार्याच्या संपादनास महत्त्व दिले जाते. हिंदु समाजामध्ये तर विवाहाचा प्रथम उद्देश धार्मिक कार्याची पूर्तता करणे हेच मानले जाते. परंतु आज रतिसुख अथवा लैंगिक गरजांची पूर्तता आणि अपत्यप्राप्ती हेच विवाहाचे प्रमुख उद्देश म्हणून महत्त्व वाढत आहे. विवाह विधीतील धार्मिकतेचा भाग कमी होवून भौतिक रोषणाई या बाबींचे महत्त्व वाढले आहे.

**५) विवाहवयातील वाढ :**

आज हळूहळू विवाहइच्छुक युवक-युवतीतील विवाहाचे वय वाढत चालले आहे. शिक्षणाच्या प्रसाराबरोबरच बालविवाहप्रथेचे जवळपास उच्चाटन झाले आहे. अलीकडे उच्च शिक्षणप्राप्त युवक-युवती आर्थिकदृष्ट्या स्वतःच्या पायावर उभे झाल्याशिवाय लग्नाचा विचार करीत नाही. शिक्षणाचे वाढते महत्त्व व वेळेवर हुंड्याची सामग्री संकलित न झाल्यामुळे विशेषतः सामान्य मुलीच्या विवाहवयात सुद्धा वाढ झाली आहे. आज संस्थांमध्ये सुद्धा मंद गतीने ह, कुटुंब, जाती व अ वत स्वरूप आज सर्वसामान्य लोकांची उशिरा लग्न करण्याची प्रवृत्ती वाढीस लागली आहे.

**६) वैवाहिक अधिकारातील समानता :**

आधुनिक काळात स्त्री-पुरुषांना विवाहाच्या क्षेत्रात समान अधिकार प्राप्त झाले आहेत. पूर्वी हिंदू समाजात बहुपत्नी विवाहाचे प्रचलन होते. एक पुरुष एकापेक्षा जास्त स्त्रियांशी लैंगिक संबंध ठेवू शकत होता. परंतु आज कायद्याद्वारे एकविवाहालाच अनिवार्य करण्यात आले आहे. आज कोणतीही हिंदू व्यक्ती एक पत्नी हयात असताना दुसरीसोबत विवाह करू शकत नाही. त्याचबरोबर घटस्फोट घेताना सुद्धा पती-पत्नी दोघांनाही समान अधिकार प्राप्त झाला आहे.

**७) हुंडाप्रथेमध्ये वाढ :**

आजच्या भौतिकवादी परिस्थितीत व्यक्तीच्या मानसन्मान व प्रतिष्ठेचा प्रमुख आधार धन किंवा संपत्ती हाच आहे. शेवटी विवाहसमयी आपल्या मुलाच्या विवाहात वधूपक्षाकडून अधिक धन, अथवा वस्तूंच्या स्वरूपात मागणी करू लागले आहेत. स्वतः सुशिक्षित मुलेसुद्धा विवाहाच्या वेळी आपल्याला जास्तीत जास्त हुंडा मिळावा अशी अपेक्षा करू लागले आहेत.

**८) जीवनसाथी निवडण्याचे स्वातंत्र्य :**

परंपरेने चालत आलेल्या विवाहसंस्थेत विवाह हा दोन कुटुंबात होत होता, दोन व्यक्तींमध्ये नाही. परंतु आज मात्र विवाह ही दोन व्यक्तींची बाब राहिली आहे. पूर्वी आई-वडील व वडिलधाऱ्या मंडळी आपल्या मुला-मुलींचे विवाह घडवून आणण्यात पुढाकार घेत, तेच मुला-मुलींसाठी जीवनसाथी निवडत त्यासाठी मुला-मुलींच्या पसंतीची विशेष संमती घेतली जात नव्हती. परंतु आज उशिरा होणारे लग्न शिक्षणाचे वाढते प्रमाण तसेच युवक-युवतींना एकत्र येण्याच्या, भेटण्याच्या संधीमुळे मुले-मुली स्वतःच जीवनसाथीचौ निवड करू इच्छितात. आधुनिक परिस्थितीत तर युवक-युवती स्वतःच जीवनसाथीची निवड करून नंतर आई-वडिलाची संमती मिळविण्याचा प्रयत्न करतात.

**९) विवाहसंबंधीच्या निषेध नियमात अंतर :**

विवाहसंबंधीच्या निषेध नियमांना पूर्वीसारखे आज महत्त्व दिले जात नाही. उदा. आज हिंदु समाजात गोत्राच्या बाहेर विवाह करणे तेवढे बंधनकारक राहिले नाही. कायद्याच्या दृष्टीने सगोत्र व सप्रवर विवाह आज निषिद्ध मान जात नाही. तसेच आज विवाहासाठी आपल्याच जातीतील जोडीदाराची निवड करावी असेही बंधन राहिले नाही.

**१०) प्रेमविवाहाचे वाढते प्रमाण :**

वर्तमान परिस्थितीत युवक-युवतींना एक दुसऱ्याच्या संपर्कात येण्याच्या संधी वाढल्यामुळे त्यांच्यात प्रेमसंबंध प्रस्थापित करण्याच्या संधीही वाढल्या आहेत. त्याचाच परिणाम म्हणून प्रेमविवाहाचे प्रमाण सुद्धा वाढले आहे. असे विवाह हे नागरी क्षेत्रातील सुशिक्षित लोकांचे वैशिष्ट्य मानल्या जात होते. पण आज त्यांच्यापुरतेच ते सीमित राहिले नाही तर ग्रामीण भागातील युवक-युवतींमध्ये सुद्धा प्रेमविवाह वाढीला लागल्याचे अनुभवास येते.

**११) आंतरजातीय विवाह :**

जेथे जीवनसाथी निवडण्याचे स्वातंत्र्य स्वतः युवक-युवतींना आहेत, ज्यांच्यामध्ये प्रेमसंबंधावर आधारित विवाह होवू लागले आहेत, तेथे जाती-उपजाती विवाहाच्या संदर्भात अडसर ठरत नाहीत. भारतासारख्या जातीवर आधारित समाजव्यवस्थेत आंतरजातीय विवाहाची संख्या दिन-प्रतिदिन वाढतच आहे. जातीव्यवस्था मोडीत काढण्यास आंतरजातीय विवाहाचे वाढते प्रमाण हा सकारात्मक परिवर्तनाचा भाग म्हणावा लागेल.

**१२) विधवा पुनर्विवाहाचे वाढते प्रमाण :**

काही वर्षांपूर्वी विधवांच्या पुनर्विवाहाला समाजाची अनुभूती नव्हती. विधवांचे पुनर्विवाह अनुचित मानले जात होते. असा विवाह करणाऱ्या व्यक्तीला लोक निंदेला सामोरे जावे लागत होते. परंतु आज लोकांचे विचार विधवांच्या पुनर्विवाहास अनुकूल आहेत. विधवांचे पुनर्विवाह मोठ्या प्रमाणात होत आहेत. पूर्वी स्त्रीच्या चारित्र्याला काचेच्या भांड्याची उपमा दिली जात होती की ज्याला तडा गेल्यास ते फेकायचेच होईल. परंतु आज त्या दृष्टिकोनात बदल होत आहे. स्त्रीचे चारित्र्य तडा न जाणारे म्हणून त्याकडे पाहिले जात आहे.

**१३) पत्नीच्या स्थितीमध्ये परिवर्तन :**

वर्तमान स्थितीत विवाह आणि घटस्फोटाचा क्षेत्रात जे अधिकार पतीला आहेत ते सर्व अधिकार पत्नीला सुद्धा प्राप्त झाले आहेत. काही काळापूर्वी पतीच्या तुलनेत पत्नीची सामाजिक स्थिती बरीच निम्न दर्जाची होती. परंतु आज कायद्याच्या समानतेमुळे दोघांच्याही स्थितीमध्ये समानता येत आहे. आज स्त्रियांची स्थिती 'रांधा, वाढा आणि उष्टी काढा' अशी दासीच्या स्वरूपात राहिली नाही. आज स्त्री ही पतीच्या खांद्याला खांदा मिळवून सोबत चालणारी सहचारिणी बनली आहे.

**१४) जीवनसाथीच्या निवडप्रक्रियेतील बदल :**

आई-वडील मुला-मुलींच्या जीवनसाथी निवडण्याच्या प्रक्रियेत कालपर्यंत शोधमोहिमा राबविण्यात परेशान असत. परंतु आज वर्तमानपत्रांतून वधू-वर पसंतीची जाहिरात देण्याची प्रवृत्ती वाढली आहे. आजही भारतात जाहिरातींच्या माध्यमातून विवाह जुळविल्याची संख्या कमी असली तरी त्यात वाढ होत आहे. वधू-वर परिचय मेळाव्यांचे आयोजन प्रत्येक समाजात होवू लागले. एवढेच नव्हे तर सामुहिक विवाह मेळाव्यातूनही विवाह होवू लागले आहेत.

**१५) विवाहविधी व प्रथेतील परिवर्तन :**

आज विवाहासंबंधित विधी व परंपरागत प्रथा-परंपरांच्या बाबतीत लोक उदासीन आहेत. या रूढी-परंपरा व विधी अनावश्यक आहेत असे लोक समजायला लागले आहेत. आता विवाहाचे सरळीकरण होवू लागले आहे. आता तर एका दिवसात अथवा काही तासातच विवाह संपन्न होवू लागले आहेत. आता तर

शहरात मोठमोठ्या हॉटेलात व मंगल कार्यालयात विवाहविधी विवाह समारंभ होवू लागला. त्यात विवाहविधींचे संक्षिप्तीकरण व सरळीकरणाची प्रवृत्ती दिसून येते.

वरील सर्व बाबींवरून असे स्पष्ट दिसते की, औद्योगिकीकरण, नागरीकरण, पाश्चिमात्यीकरण, जागतिकीकरण, शिक्षणाचा व्यापक प्रसार, स्त्री-आंदोलन, विवाहसंबंधी कायदे, धर्माचे घटते प्राबल्य, प्रेमविवाहाचे वाढते प्रमाण इत्यादी कारणांमुळे विवाहसंस्थेचे परंपरागत स्वरूप बदलत आहे. त्यात अनेक बाबतीत परिवर्तन घडून येत आहे.

**कुटुंब संस्था Family Institution**

कुटुंब ही सर्वच मानव समाजात आढळणारी मूलभूत अशी सामाजिक संस्था आहे. कुटुंब व्यक्तीच्या आणि समाजाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण कार्य पार पाडते. म्हणून त्याला सर्व समाजात अनन्यसाधारण महत्त्व आहे. ग्रामीण समाजात तर कुटुंबास इतर कोणत्याही संस्था पेक्षा अधिक महत्त्व प्राप्त झालेले आहे. ग्रामीण सामाजिक जीवनाचा आधारभूत घटक कुटुंब असून ग्रामीण व्यक्ती, संस्था व समूह आणि संपूर्ण समाज यावर कुटुंबाचा प्रभाव पडलेला आहे. म्हणून ग्रामीण समाजाचा अभ्यास करताना ग्रामीण कुटुंबाचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

**कुटुंबाची व्याख्या**

१. मॅकायव्हर व पेज यांच्या मते प्रजोत्पादन व बालसंवर्धन करण्यासाठी पुरेसा लहान व कायम स्वरूपाच्या लैंगिक संबंधावर आधारलेला असा समूह म्हणजे कुटुंब होय.

२. डॉ. डी. एन. मुजुमदार यांच्या मते एकाच घरात राहणाऱ्या, एकमेकाशी रक्तसंबधित असणाऱ्या व स्थान, हित व परस्परांविषयीच्या कर्तव्याची जाणीव याबद्दल जागरूक असणाऱ्या व्यक्तींच्या समूहाला कुटुंब म्हणतात.

३. किंबॉल यंग यांच्या मते, ज्या समूहात एक किंवा अधिक पुरुष आपल्या एक किंवा अधिक स्त्रिया व आपल्या अगर दत्तक घेतलेल्या मुलांसहित मुले लहान असेतोपर्यंत तरी एकाच घरी राहातात अशा सामाजिक समूहाला कुटुंब म्हणतात.

वरील व्याख्येवरून कुटुंब संस्थेची काही महत्वाची वैशिष्ट्ये खालील प्रमाणे सांगता येतील

**ग्रामीण कुटुंबाची वैशिष्ट्ये:**

**१. संयुक्त कुटुंब**

कुटुंबातील सदस्यांच्या संख्येच्या आधारे कुटुंबाचे केंद्र कुटुंब आणि संयुक्त कुटुंब असे दोन प्रकार पडतात. ज्या कुटुंबात दोन पिढ्याचे सदस्य एकत्र राहतात अशा कुटुंबास केंद्र कुटुंब असे म्हणतात. याउलट ज्या कुटुंबात तीन पिढ्यापेक्षा जास्त पिढ्याचे सदस्य एकत्र राहतात त्यास संयुक्त कुटुंब असे म्हणतात.

भारतीय ग्रामीण कुटुंब हे संयुक्त प्रकारचे कुटुंब आहे त्यामध्ये दोन पेक्षा अधिक पिढ्याचे सदस्य एकत्र राहतात त्या सर्वांची मालमत्ता, निवासस्थान, भोजन व्यवस्था एकत्रित स्वरुपाची असते. उत्पादन साधनावर सर्वांची समान मालकी असते. त्यातून मिळणाऱ्या मोबदल्याचा ते सामायिक उपभोग घेतात. सर्व सदस्य संपत्ती, उत्पन्न, अधिकार व कर्तव्य यांनी परस्परांशी जोडलेले असतात.

**२. पितृसत्ताक कुटुंब**

कुटुंबाचे पितृसत्ताक व मातृसत्ताक असे दोन प्रकार पडतात. भारतीय कुटुंब हे पितृसत्ताक प्रकारची आहे. त्यामध्ये कुटुंबातील औपचारिक सत्ता पित्याच्या हाती असते. मुले आपल्या नावापुढे पित्याचे नाव लावतात. कुटुंबातील सत्ता आणि संपत्ती पित्याकडून पुत्राकडे वारसाहक्काने येते. विवाहानंतर मुली वडीलाचे घर सोडुन पतीच्या घरी रहावयास जातात. मुले मात्र विवाहानंतरही पित्याच्याच कुटुंबात जमेल तितके दिवस राहतात आणि नाही जमल्यास वेगळे होऊन केंद्र कुटुंब (विभक्त कुटुंब) स्थापन करतात. पितृसत्ताक कुटुंब पद्धतीमध्ये पुरुषाच्या तुलनेत स्त्रियांना सर्वच बाबतीत दुय्यम स्थान दिले जाते.

**३. कुटुंबप्रमुखाचे वर्चस्व :**

ग्रामीण कुटुंब पितृसत्ताक असल्याने कुटबप्रमुख पुरुष (पिता किंवा जेष्ठ भाऊ) असतो. त्याच्या हाती कुटुंबातील सर्व अधिकार एकवटलेले असतात. कुटुंबातील सर्व जबाबदाऱ्या तोच पूर्ण करीत असतो. कुटुंबाच्या मालमत्तेचा विश्वस्त म्हणून तिची देखरेख करणे, कुटुंबसदस्यांमध्ये कामाचे वाटप करणे, त्यांचे विवाह पार पाडणे, त्यांच्या शिक्षणाची व आरोग्याची काळजी घेणे, त्यांच्या वर्तनावर देखरेख ठेवणे, त्यांच्या अडीअडचणी सोडविणे इ. बाबतचे सर्व अधिकार कुटुंबप्रमुखाकडे असतात आणि इतर सदस्य त्याच्या आज्ञा पाळीत असतात. त्यामुळे कुटुंबप्रमुखाची एकाधिकारशाही प्रस्थापित झालेली असते. एकंदरीत कुटुंबप्रमुख हा कुटुंबाचा नेता, सूत्रधार, पालक, मार्गदर्शक व नियंत्रक असतो. त्याच्या तुलनेत इतर सदस्यांचे स्थान व अधिकार दुय्यम असतात.

**४. प्रामुख्याने शेती हाच मुख्य व्यवसाय:**

ग्रामीण कुटुंबाची उभारणी शेती व्यवसायाच्या आधारे झालेली आहे. वैदिक काळापासून ग्रामीण भारतात शेती हाच लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. शेती हेच उपजीविकेचे साधन असल्यामुळे कुटुंबातील सर्व सदस्य या एकाच व्यवसायात गुंतलेले असतात. शेतीच्या सर्व कामांचे विभाजन केलेले असते. कुटुंबातील कर्ता पुरुष सर्व सदस्यांना कामे ठरवून देतो. या समान व्यवसायामुळे सर्वजण सतत एकमेकांच्या सानिध्यात राहत असतात. आणि सर्वांच्या मालकीच्या जमिनीवर सर्वजण काम करीत असतात. सर्वांच्या व्यक्तीमत्वाची जडण घडण या व्यवसायाने होत असते.

**५. सामुहिक भावना:**

परस्पराविषयी प्रेम, आत्मियता, सहकार्य व कर्तव्य भावना या गोष्टी सर्वच प्रकारच्या कुटुंबात आढळतात. परंतु ग्रामीण कुटुंबात या गोष्टी अधिक तीव्र स्वरुपात आढळतात. निवासस्थान, भोजनव्यवस्था,

मालमत्ता, व्यवसाय इ. गोष्टी सामाईक असल्याने ग्रामीण कुटुंबातील सर्व सदस्य दररोज एकमेकांच्या घनिष्ट संपर्कात असतात. त्यामुळे. त्यांच्यात परस्परांविषयी आत्यंतिक प्रेम, जिव्हाळा आत्मियता व सहकार्य निर्माण होते. प्रत्येक जण स्वहितापेक्षा कुटुंबहिताला अधिक प्राधान्य देतो. कुटुंबाप्रती आपली कर्तव्ये मोठ्या निष्ठेने पार पाडतो. प्रत्येक सदस्य कुटुंबाशी पूर्णपणे तादात्म्य पावलेला असतो. या सर्व गोष्टींमुळे ग्रामीण कुटुंबा मध्ये सामूहिक भावना दिसून येते.

### ६. नियंत्रण व्यवस्था:

ग्रामीण कुटुंबात शिस्त मोठ्या प्रमाणावर आढळते. शहरा सारखे खेड्यात व्यक्तीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी विविध केंद्रे उपलब्ध नसतात. त्यामुळे व्यक्तीच्या अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण, मनोरंजन इ. सर्व गरजांची पूर्तता कुटुंबामार्फतच होते. त्यामुळे व्यक्ती पूर्णपणे कुटुंबावरच अवलंबून राहते. यामुळे कुटुंबातील सदस्य शिस्तीचे पालन करीत असलेले दिसून येतात कुटुंब प्रमुख किंवा कुटुंबातील वयस्कर व्यक्तींचे कुटुंबावर नियंत्रण असते त्यांच्या आज्ञा सर्वजण पाळतात.

### ७. सामूहिक धार्मिक व सांस्कृतिक जीवन

ग्रामीण समाजाचा शेती हा प्रमुख व्यवसाय असल्यामुळे सर्वांना एकत्र राहण्याची संधी प्राप्त झालेली असते. व्यावसायिक भिन्नता नसल्यामुळे सर्व कुटुंबियांच्या दिनक्रमात समानता आढळून येते. म्हणूनच कोणत्याही कौटुंबिक कार्यक्रमात सर्वांचा सहभाग आढळून येतो.

### ८. कुटुंबाभिमान

ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्तीला आपल्या कुटुंबाचा अभिमान वाटत असतो. कारण कुटुंबातच व्यक्तीच्या सर्व गरजा पूर्ण होऊन व्यक्तीला संरक्षण मिळत असते. तिच्या अशा आकांक्षांची पूर्तता करण्यामध्ये कुटुंबाचा वाटा महत्त्वाचा असतो. ग्रामीण भागामध्ये व्यक्तीची ओळख कुटुंबाच्या नावाने होत असते. कुटुंबाचा दर्जा व्यक्तीला मिळत असतो. व्यक्तीच्या वर्तनाला कुटुंबालाच जबाबदार धरले जाते.

### ९. सापेक्षतः स्थिर कुटुंब

ग्रामीण भागातील कुटुंब अधिक स्थिर असल्याचे दिसून येते. कुटुंबाचे उद्दिष्ट सफल करण्यासाठी सर्वजण सामुहिकपणे झटत असतात. शिवाय ग्रामीण कुटुंबातील सदस्य संख्या अधिक असल्याने एखाद्या सदस्यांच्या मृत्यूने, आजारपणाने किंवा वार्धक्यामुळे कुटुंब सहसा कोलमडून पडत नाहीत. कुटुंबावरील संकटाचा सामना सर्वजण मिळून करतात म्हणून ग्रामीण कुटुंब कोणताही आघात सहन करू शकते त्यामुळे ते स्थिर राहू शकते.

**ग्रामीण कुटुंबाची कार्ये**

ग्रामीण कुटुंब विविध कार्ये पार पाडीत आहे ते खालील प्रमाणे-

**१. जैविक कार्ये –**

व्यक्तीची कामतृप्ती, प्रजोत्पादन व बालसंगोपन ही जैविक कार्य कुटुंब पार पाडते. समाज सातत्याच्या दृष्टीने ही कार्य अत्यंत महत्त्वाची आहेत. कामवासनेची तृप्ती ही फक्त विवाहाद्वारे व कुटुंबातच झाली पाहिजे आणि त्यातून जन्मलेल्या मुलांचे पालन-पोषण कुटुंबातच झाले पाहिजे यावर ग्रामीण कुटुंब भर देते.

**२. मानसिक कार्ये –**

ग्रामीण कुटुंब व्यक्तीला मानसिक सुख समाधान व सुरक्षितता मिळवून देण्याचे कार्यही पार पडते. व्यक्तीच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, मनोरंजन इत्यादी गरजांची पूर्तता करून कुटुंब व्यक्तीला आर्थिक विवंचनेतून मुक्त करते. अपंगत्व, आजारपणा, वार्धक्य अशा असाहाय्य अवस्थेत कुटुंब व्यक्तीची आत्मीयतेने काळजी घेते. त्यामुळे व्यक्तीला मानसिक व शारीरिक आधार मिळतो. कुटुंबांमध्ये व्यक्तीला निस्सीम प्रेमाची अनुभूती येते. त्यामुळे व्यक्ती चिंता, काळजी, भीती, असुरक्षितता यापासून मुक्त राहू शकते. अशा पद्धतीने कुटुंबांमध्ये व्यक्तीला मानसिक सुख शांती मिळते.

**३. सामाजिक कार्ये –**

व्यक्तीचे समाजीकरण करणे, तिच्या वर्तनाचे नियंत्रण करणे आणि तिला सामाजिक संरक्षण मिळवून देणे इ. सामाजिक कार्ये ग्रामीण कुटुंब पार पाडते. ग्रामीण कुटुंबातील वृध्द व प्रौढ व्यक्ती मुलांवर सुसंस्कार करतात. त्यांच्या वर्तनाला योग्य ते वळण लावतात. समाजाचे आदर्श, मूल्ये, रीतिरिवाज मुलांच्या मनावर बिंबवतात. मुलांना शिस्तीचे व आज्ञापालनाचे धडे देतात. परिणामी मुलांचे समाजीकरण योग्य पध्दतीने होते. ग्रामीण संयुक्त कुटुंबात व्यक्तीवर प्रेम, सहकार्य, आत्मियता, कर्तव्यनिष्ठा इ. गुणांचे संस्कार होतात. त्यामुळे त्यांच्यात आदर्श नागरीकत्वाचे गुण विकसित होतात. ग्रामीण कुटुंब व्यक्तीच्या सर्व क्षेत्रातील वर्तनावर देखरेख ठेवते. तिच्याकडून सामाजिक नियमनांचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घेते. तसे घडल्यास व्यक्तीला शिक्षाही करते. त्यामुळे सामाजिक नियंत्रणाचे कार्य कुटुंबाकडून होत असते. अशाप्रकारे ग्रामीण कुटुंब  सामाजिक कार्ये पार पाडते.

**४. शैक्षणिक कार्ये :**

आपल्या सदस्यांना विविध प्रकारचे शिक्षण देण्याचे कार्यही ग्रामीण कुटुंब करते. कुटुंबाचा जो पिढ्यानपिढ्या चालत आलेला व्यवसाय असतो त्याचे धडे मुलांना लहानपणापासून कुटुंबातच मिळतात. म्हणजे व्यावसायिक शिक्षण देण्याचे कार्य हे कुटुंब करते. तसेच संस्कृतीच्या विविध अंगाचे ज्ञानही सदस्यांना सर्वप्रथम कुटुंबातच मिळते. समाजात कसे वागावे याचेही प्राथमिक धडे कुटुंबातच मिळतात. त्यामुळे ग्रामीण कुटुंब म्हणजे शिक्षणाची शाळात असते.

**५. धार्मिक कार्ये :**

ग्रामीण कुटुंब धार्मिक कार्ये उदाहरणार्थ देवदेवतांची पूजा, होमहवन, प्रार्थना, व्रतवैकल्ये, सणसमारंभ इ. मोठ्या उत्साहाने पार पाडली जातात. त्यामध्ये सर्व सदस्य सहभागी होऊन आपापली कर्तव्ये निष्ठेने पार पाडतात. कुलाचार, कुलप्रथा, धार्मिक परंपरा इ. चे पालन ग्रामीण कुटुंब श्रध्दापूर्वक करते. धर्मप्रणीत विविध संस्कार (उदा. गर्भाधान, उपनयन, विवाह, अंतेष्टी, श्राध्द इ.) मुलांवर करण्याचे कार्यही कुटुंब करते. कुलदेवतेची पूजा, पितृपूजा, ग्रामदेवतेची पूजा, निसर्गशक्तींची पूजा अशी कर्मकांडाची मालिका ग्रामीण कुटुंबात सतत चालू असते. म्हणजेच ग्रामीण कुटुंब धार्मिक क्रियांचे यथासांग पालन करुन व्यक्तींना धार्मिक शिक्षण देत असते.

**६. आर्थिक कार्ये :**

कुटुंबातील सदस्यांच्या भौतिक गरजा भागविण्यासाठी ग्रामीण कुटुंब कांही आर्थिक क्रिया पार पाडते. बहुतेक कुटुंबांचा शेती व्यवसाय असून त्यामध्ये सर्व सदस्य राबतात. कुटुंबाद्वारे सदस्यांत कामाचे वाटप केले जाते. कुटुंबाच्या मालमत्तेचा सर्वांना उपभोग घेता येईल अशी व्यवस्था करते. मालमत्तेचा वारसा ठरविणे, तिचे संरक्षण करणे ही कार्येही ग्रामीण कुटुंब पार पाडते. औद्योगिक क्रांतीपूर्व काळात ग्रामीण कुटुंब आर्थिक क्षेत्रातील एक स्वयंपूर्ण घटक होते. उत्पादन, वितरण, उपभोग या तीनही प्रक्रिया कुटुंबात होत असत. आज कुटुंबाची ही आर्थिक स्वयंपूर्णता संपली असली तरी ग्रामीण कुटंबाचे आर्थिक महत्त्व बऱ्याच प्रमाणात टिकून आहे.

**७. मनोरंजनात्मक कार्ये :**

ग्रामीण संयुक्त कुटुंबात वेगवेगळ्या वृत्ती व प्रवृत्तीच्या, वयाच्या, अनुभवाच्या व्यक्ती असतात. त्या सर्वांच्या एकत्र येण्याने कुटुंबात मनोरंजनाचे कार्य घडत असते. मुलांचे कोडकौतुक, त्यांच्या बाललीला, गप्पागोष्टी, थट्टामस्करी, हास्यविनोद, आजी आजोबांच्या गोष्टी इ. घटनांमुळे कुटुंबात व्यक्तीचे मनोरंजन होते. शिवाय ग्रामीण कुटुंबात साजरे होणारे कुलाचार, पूजाअर्चा, सणसमारंभ, बारसे, विवाह, डोहाळे जेवण इ. धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमामुळेही सदस्यांचे निकोप मनोरंजन होते. शहरी व्यक्तीला मात्र आज मनोरंजनासाठी बाजारु व गल्लाभरु साधनांवर अवलंबून रहावे लागते. त्यातून अनेक विकृती निर्माण होतात. ग्रामीण कुटुंबातील मनोरंजन मात्र तुलनेने स्वस्त व निकोप असते.

**ग्रामीण समाजात कुटुंबाचे महत्व (Significance of Family in rural Society)**

समाजस्थैर्यासाठी विवाहाद्वारे कुटुंबाची निर्मिती ग्रामीण भागात करण्यात आली. मानवाची प्राथमिक अवस्था ही मूलत:च आदिवासी व्यवस्थेतील आहे. डोंगर कपाऱ्यात समूह करून राहणाऱ्या मानवाने कुटुंबाला आकार आणून सपाट भूप्रदेशावर त्याला स्थिर केले. स्थिर झालेला समाज पुन्हा विस्कळीत होणार नाही याची दक्षता घेण्यात आली. सामाजिक नियमने तयार केली गेली व या सामाजिक नियमनांत आधीच निर्माण केलेल्या कुटुंबाला बंदिस्त करण्यात आले. व्यक्ती आणि समाजाचे अस्तित्व समाजावर निर्धारित

झाल्यामुळे कुटुंबाला अवास्तव महत्व प्राप्त झाले. कुटुंब कशा प्रकारचे असावे, ते किती मोठे असावे, कुटुंबात कुटुंबप्रमुखाचे स्थान कोणाला द्यावे, कोणी कोणाचे संरक्षणत करावे आणि त्याचबरोबर कुटुंबाचे अधिष्ठान कशावर अवलंबून राहू शकते यावर साधक बाधक विचार होऊन त्याला कायमचे स्थिर केले. तेव्हा ग्रामीण समाजात कुटुंबाला कोणकोणत्या गोष्टींमुळे महत्व प्राप्त झालेले आहे ते आपल्याला पुढील मुद्यांवरून दिसून येते.

**१) प्रजोत्पादन :**

समाज सातत्यासाठी प्रजोत्पादनाची अत्यंत आवश्यकता असते. अपत्य संभवासाठी स्त्री-पुरुषांना लैंगिक संबंध ठेवावे लागतात. यासाठी समाजमान्यताची आवश्यकता असते म्हणून त्यांना विवाह करावा लागतो. विवाहाद्वारे सदस्यांची वाढ करणे समाजमान्य असल्याने आपोआपच कुटुंबाची निर्मिती होते. कारण पती-पत्नीचा एकत्र सहवास म्हणजे कुटुंब निर्माण करून जेव्हा प्रजोत्पादन होते तेव्हा समाज त्या नवीन सदस्यांचा औरस संतती म्हणून स्वीकार करीत असतो. ग्रामीण कुटुंब या औरसत्वाला अत्यंत काटेकोर आणि प्रामाणिकपणे जपण्याचा प्रयत्न करीत असते.

**२) कामवासनापूर्ती :**

ग्रामीण समाजामध्ये कुटुंबाच्या काम पूर्ततेला एक विशिष्ट प्रकारचा अर्थ व महत्व आहे. कुटुंबाद्वारे विवाह करूनच कोणत्याही स्त्री पुरुषाला परस्परांची कामवासना पूर्ण करण्यास परवानगी असते. ग्रामीण व्यक्ती कामवासनापूर्तीच्या बाबतीत धर्माचा आधार घेत असल्यामुळे अमर्यादित लैंगिक संबंधाना मर्यादा पडतात तसेच मुलांचे लग्न अगदी लहान वयातच केली जातात.

**३) मुलांचे संगोपन :**

ग्रामीण समाजातील कुटुंबामध्ये कोणत्याही स्त्री-पुरुषांना स्वतःच्या अपत्याची काळजी घेण्याची खूपच गरज नसते. घरातील इतर वयोवृध्द लोक मुलांची काळजी घेत असतात. वृध्द व्यक्तींच्या ज्ञान आणि अनुभवाचा लाभ मुलांना होत असतो. बालपणीच लग्न होऊन मातृत्व आलेल्या स्त्रीला मुलांच्या संगोपनाची कला अवगत नसते. त्यामुळे घरातील अनुभवी स्त्रिया अशा नवजात अर्भकाची काळजी घेत असतात. म्हणजेच ग्रामीण कुटुंब हे मुलांच्या संगोपनाचे एक मुख्य केंद्रस्थान असते.

**४) समाजीकरण :**

ग्रामीण कुटुंब हे व्यक्तीच्या सामाजीकरणामध्ये महत्वाची भूमिका पार पाडते. समाजामध्ये जीवन जगत असताना कसे वर्तन ठेवून जीवन जगायचे याचे महत्वाचे मार्गदर्शन येथील कुटुंब करीत असते. वडीलधाऱ्या व्यक्तींच्या चांगल्या वाईट वर्तनाचे अनुकरण मुले करीत असतात. त्यामुळे प्रत्येक जण चांगल्याच वर्तनाचा स्वीकार करीत असतो. वाईट वर्तन करणाऱ्यांचा येथे अपमान होत असतो. आई वडील तसेच घरातील इतर मंडळी मुलांना योग्य वर्तनाची दिशा देत असतात. समाजाच्या चालीरीती, नीतिमत्ता इत्यादी चांगल्या गोष्टींची

पूर्तता करुन देण्यात ग्रामीण कुटुंब महत्वाची भूमिका पार पाडते. इतर कोणतीही सामाजिक संस्था व्यक्तीचे सुयोग्य सामाजीकरण करु शकत नसल्यामुळे कुटुंबालाच महत्वाचे स्थान प्राप्त झालेले असते.

**५) मानसिक विकास :**

मुलांच्या मानसिक विकास आणि सुरक्षिततेसाठी माता, पिता आणि कुटुंबातील इतर व्यक्ती सतत प्रयत्नशील असतात. तसेच वृध्द व्यक्तींना सुध्दा मानसिक संरक्षण देण्याचा प्रयत्न कुटुंबातील इतर सदस्य करीत असतात. त्यामुळेच ग्रामीण कुटुंबातील सदस्यांत परस्परांसाठी प्रेम, सहकार्य, त्याग व प्रसंगी संकटसमयी संरक्षण करण्याची वृत्ती असल्याने येथे एक प्रकारचे मानसिक समाधान लाभत असते. कोणत्याही प्रसंगी मानसिक संतुलन बिघडणार नाही याची कुटुंब काळजी घेत असल्यामुळे ग्रामीण समाजात समाज विघटनाच्या प्रक्रिया कमी प्रमाणात घडून येत असतात.

**६) आर्थिक सुरक्षितता :**

कोणत्याही समाजात आर्थिक सुरक्षितता मिळवून देण्याचे कार्य कुटुंबच करीत असते. ग्रामीण कुटुंबात श्रमाचे विभाजन विशेषतः स्त्री पुरुषांत झालेले असते. स्त्री घरातील कामात एकरूप झालेली असते तर पुरुष द्रव्यार्जनासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या आर्थिक क्रिया करीत असतो. ग्रामीण समाजात कुटुंब हे आर्थिक उत्पादनाचे केंद्र असते. ग्रामीण कुटुंब शेतीसारख्या व्यवसायाद्वारे आपल्या सदस्यांचा उदरनिर्वाह करीत असते. दळण-कांडण, कपडे धुणे, भांडी घासणे, कपडे शिवणे इत्यादी कामे कुटुंबातच केली जात असल्यामुळे आर्थिक बचत होण्यास मदत होत असते.

सारांश, ग्रामीण कुटुंब हे चांगल्या गुणांच्या विकासात महत्वाची भूमिका पार पाडत असते. कुटुंबातील सदस्यात आपलेपणाची भावना असते. निष्ठा, त्याग, आत्मीयता, प्रेम, जिव्हाळा, आज्ञापालन इत्यादी प्रकारच्या शाश्वत अशा मूल्यांची जोपासना करण्यात कुटुंबासारखी दुसरी अन्यत्र कोठेही व्यवस्था नाही. त्यामुळेच ग्रामीण कुटुंबाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे.

**ग्रामीण कुटुंबातील परिवर्तन**

औद्यागिक क्रांतीनंतर मानव समाजाबरोबरच मानवाच्या कुटुंबसंस्थेतही परिवर्तन घडून आले आहे. औद्योगिकीकरण, नागरीकरण, दळणवळणाची प्रगत साधने, स्त्री शिक्षण व स्त्रियांचे वाढते आर्थिक स्वावलंबन, शैक्षणिक व आरोग्यविषयक सुविधांचा विस्तार, लोकशाही व्यवस्था, विविध सामाजिक कायदे, ग्रामीण विकास कार्यक्रम इ. घटकांचा प्रभाव पडून ग्रामीण कुटुंबाच्या रचनेत व कार्यात परिवर्तन घडून येत आहे. या परिवर्तनाचे स्वरुप पुढीलप्रमाणे-

**अ) कुटुंबाच्या रचनेतील परिवर्तन :**

**१) कुटुंबाच्या आकारातील परिवर्तन :**

पारंपारिक ग्रामीण संयुक्त कुटुंबात दोनपेक्षा अधिक पिढ्यांचे लोक एकत्र राहत असल्याने त्याचा आकार खूपच मोठा होता. आधुनिक काळात औद्योगिकीकरण व नागरिकरणाचा प्रभाव पडून संयुक्त कुटुंबाचे विघटन होऊ लागले आणि विभक्त किंवा केंद्र कुटुंब पध्दती ग्रामीण समाजातही वाढत आहे. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे शेतीशिवाय इतर अनेक व्यवसाय उपलब्ध होऊ लागले. वाढती लोकसंख्या शेती व्यवसायात सामावली जाऊ शकत नसल्याने खेड्यातील बेकार तरुण शहरातील उद्योगधंद्याकडे रोजगारासाठी स्थलांतर करु लागले. तसेच खेड्यातील नविन सुशिक्षित पिढी नोकरीधंद्याच्या निमित्ताने शहरात येऊन वेगळे केंद्र कुटुंब स्थापन करु लागली.

**२) कुटुंबप्रमुखाच्या एकाधिकारशाहीचा ऱ्हास:**

कायद्यामुळे मुलामुलींना अनेक अधिकार प्राप्त झालेले आहेत. शिवाय शिक्षणप्रसारामुळे समता, स्वातंत्र्य, व्यक्तिवाद इ. मूल्यांचा प्रभाव पडून व्यक्तिगत इच्छाआकांक्षा प्रबळ ठरत आहेत. कुटुंबप्रमुखाची एकाधिकारशाही नकोशी वाटत आहे त्यामुळे आधुनिक काळात ग्रामीण कुटुंबप्रमुखाच्या एकाधिकारशाहीचा ऱ्हास होत आहे.

खेड्यातील स्त्रियाही शिक्षण घेऊन नोकरी धंदा करू लागल्याने त्यांचे आर्थिक स्वावलंबन वाढून त्यांचा दर्जाही उंचावू लागला आहे. परिणामी कुटुंबप्रमुख पुरुषास सुशिक्षित पत्नी व प्रौढ मुले यांचे मत विचारात घेणे भाग पडू लागले आहे. शिक्षण, विवाह, व्यवसाय इ. बाबतचे निर्णय घेताना प्रौढ मुलामुलींच्या आवडीनिवडीचा प्रभाव कुटुंबप्रमुखावर पडू लागला आहे. त्यामुळे त्याच्या एकाधिकाराचा हळूहळू ऱ्हास होत आहे.

**३) कुटुंबविषयक दृष्टिकोनात परिवर्तन :**

पारंपारिक ग्रामीण कुटुंब समष्टीवादी होते. व्यक्तीच्या हितापेक्षा कुटुंबाच्या हितास अधिक प्राधान्य दिले जाई. आज मात्र समष्टीवादाऐवजी व्यक्तीवादाचा प्रभाव वाढत असून कुटुंबाच्या हितापेक्षा व्यक्ती हितास अधिक प्राधान्य दिले जाऊ लागले आहे. आजच्या औद्योगिक समाजात व्यक्तीला स्वकर्तृत्वाने सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा मिळवता येऊ लागल्याने व्यक्ती कुटुंबापेक्षा स्वतःचाच अधिक विचार करु लागली आहे. त्यामुळे स्वतःच्या इच्छाआकांक्षा पूर्तीच्या मार्गात अडथळा ठरणारी कौटुंबिक बंधने व्यक्ती हळूहळू झुगारून देऊ लागली आहे. अशाप्रकारे कुटुंबाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत चालला आहे.

**४) आप्तसंबंधास कमी महत्व :**

पारंपारिक संयुक्त कुटुंबात आप्तसंबंधास विशेष महत्व दिले जाई. या कुटुंबात आजी-आजोबा, आई-वडील, काका-काकू, सख्खे व चुलत बहिण-भाऊ, नातू-पणतू व इतर नातेवाईक असत व त्या सर्वांना व्यक्ती मान देई. त्यांच्याविषयीची आपली कर्तव्ये आत्मियतेने पार पाडी, आज मात्र व्यक्तिवादाच्या

प्रभावामुळे अशा नातेवाईकांना फारसे महत्व दिले जात नाही. एवढेच नव्हे तर आईवडिल व बहिणभाऊ या अतिजवळच्या नातेवाईकांकडेही दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. कुटुंब व नातेवाईक यांच्या मदतीशिवाय व्यक्तीला आपले हित साधणे बऱ्याच प्रमाणात शक्य होत आहे. परिणामी कौटुंबिक व आप्तसंबंधास कमी महत्व दिले जाऊ लागले आहे.

**५) सामूहिक जीवनाला तडे :**

पारंपारिक संयुक्त कुटुंबात सर्व सदस्य एकत्र निवास करीत, एकत्र भोजन घेत. एकाच व्यवसायात गुंतलेले असत. त्यामुळे त्यांना परस्परांचा नित्य व घनिष्ठ सहवास लाभे. त्यातूनच त्यांच्यात परस्परांविषयी प्रेम, आत्मियता, सहकार्यभावना, कर्तव्यनिष्ठा मोठ्या प्रमाणावर निर्माण होई आणि सामूहिक जीवन आकारास येई. आज मात्र कुटुंबातील सदस्य वेगवेगळे व्यवसाय करू लागले. परिणामी गरजेनुसार त्यांची निवास व भोजनव्यवस्था वेगळी होऊ लागली आहे. साहजिकच परस्परांविषयीचे प्रेम, सहकार्य व कर्तव्यनिष्ठा ही कमी होऊ लागली आहे. त्यामुळे सामूहिक जीवनाला तडे जात आहेत.

**६) स्त्रियांच्या दर्जात व कार्यक्षेत्रात परिवर्तन :**

पारंपारिक ग्रामीण संयुक्त कुटुंब पितृसत्ताक असल्याने पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे स्थान व दर्जा कनिष्ठ होता. स्त्रियांचे कार्यक्षेत्र 'चूल व मूल' एवढ्यापुरतेच मर्यादित होते. आज मात्र ग्रामीण भागातही स्त्रीशिक्षणाचा हळूहळू प्रसार होऊ लागल्याने शिकलेल्या स्त्रिया नोकरीधंद्याच्या निमित्ताने घराबाहेर पडू लागल्या आहेत. भारतातील पंचायत राज्य पध्दतीत स्त्रियांना राखीव जागा ठेवल्याने त्यांचा राजकारणातील सहभाग हळूहळू वाढत आहे. त्यामुळे स्त्रियांच्यात जागृती येत आहे. त्यांच्या दर्जात व भूमिकेत बदल होत आहे. सुशिक्षित जागृत स्त्री संयुक्त कुटुंबाची जाचक बंधने नाकारू लागली आहे. याचा परिणाम कुटुंबातील अधिकार श्रेणी रचनेवर पडू लागला आहे.

**ब) कुटुंबाच्या कार्यातील परिवर्तन :**

ग्रामीण कुटुंब त्याची अनेक पारंपारिक कार्ये आजही पार पाडीत आहे. पण त्याच्या कार्याच्या पुढीलप्रमाणे बदल होत आहे.

**१) प्रजोत्पादन व बालसंगोपन यातील परिवर्तन :**

प्रजोत्पादन व बालसंगोपन ही कुटुंबाची परंपरागत कार्ये ग्रामीण कुटुंब आजही पार पाडीत आहे. तथापि या संदर्भात कांही लक्षणीय बदल होत आहेत. पूर्वी गरोदर स्त्रीची काळजी कुटुंबच घेई आणि प्रसूतीही कुटुंबातच होई. तथापि आज ग्रामीण भागातही आरोग्यकेंद्रे व प्रसूतीगृहे उपलब्ध झाल्याने या कार्यात वैद्यकीय तज्ज्ञांची मदत व सल्ला घेतला जातो. बालसंगोपनाचे कार्य आजही कुटुंबच करते. पण खेड्यातही बालवाड्या, अंगणवाड्या, शाळा इ. निघाल्याने मातापिता मुलांना त्यामध्ये पाठवून आपापल्या उद्योगास जातात. मुलांच्या निकोप वाढीसाठी वैद्यकीय सल्ला व उपचार घेतात. म्हणजे प्रजोत्पादन व बालसंगोपन कार्यात ग्रामीण कुटुंबही इतर संस्थांची मदत घेऊ लागले आहे.

**२) आर्थिक कार्यातील परिवर्तन :**

पारंपारिक ग्रामीण कुटुंब स्वयंपूर्ण असा आर्थिक घटक होते. उत्पादन, वितरण व उपभोग या तीनही आर्थिक क्रिया कुटुंबात चालत. औद्योगिकीकरणामुळे खेड्यातील कुटिरोद्योग व हस्तव्यवसाय मोडकळीस आले. त्यामुळे कुटुंबातील उत्पादन बंद पडले. उत्पादन व वितरण ही कार्ये हळूहळू कुटुंबाकडून इतर संस्थांकडे हस्तांतरीत झाली. धान्य दळणे, कापड विणणे, कपडे शिवणे इ. कार्ये पार पाडण्यासाठी कुटुंबाबाहेर वेगळी केंद्रे उदयास आली आहेत. त्यामुळे उत्पादक कार्याचा कुटुंबावरील बोजा कमी होत आहे.

**३) शैक्षणिक कार्यातील परिवर्तन :**

परंपरागत ग्रामीण कुटुंब व्यक्तीला व्यावसायिक, धार्मिक व सामाजिक जीवन याचे शिक्षण देत असे. आधुनिक काळात मात्र व्यावसायिक व इतरही प्रकारचे शिक्षण व प्रशिक्षण देणाऱ्या संस्था ग्रामीण भागातही सुरु झाल्याने कुटुंबाचे शिक्षण देणारे केंद्र म्हणून असलेले महत्व कमी झाले आहे. आधुनिक शिक्षण देणे हे ग्रामीण कुटुंबाच्या क्षमतेबाहेरचेही आहे. तथापि सामाजिक जीवनाचे शिक्षण देण्याचे कार्य ग्रामीण कुटुंब आजही पार पाडते. मुलांना आधुनिक शिक्षण उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी मात्र प्रामुख्याने कुटुंबच पार पाडताना दिसते.

**४) सामाजिक नियंत्रणातील परिवर्तन :**

पारंपारिक ग्रामीण कुटुंब सामाजिक नियंत्रणाचे एक प्रभावी साधन होते. आपल्या सदस्याच्या सर्व क्षेत्रातील वर्तनाचे ते प्रभावीपणे नियमन व नियंत्रण करीत असे. कुटुंबाची शिस्त, आज्ञा, कुलाचार व्यक्ती निमूटपणे पाळीत असे. तथापि आज व्यक्तिवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, भौतिक सुखाची लालसा, ग्रामीण रीतीरिवाज व सामाजिक मूल्यांचा होत असलेला न्हास इ. चा प्रभाव पडून कुटुंबाचे सामाजिक नियंत्रणाचे साधन म्हणून असलेले महत्व हळूहळू कमी होत आहे. कुटुंबातील कलह, हेवेदावे, मालमत्तेबाबतचे तंटे इ. चे प्रमाण वाढत आहे. व्यक्तिव्यक्तीतील संबंध हळूहळू औपचारिक व करारात्मक बनत आहेत. त्यामुळे सामाजिक नियंत्रणाच्या दृष्टीने कुटुंबाऐवजी पोलीस, कायदा, न्यायालय, तुरंग इ. साधनाना अधिक महत्व येऊ लागले आहे.

**५) मनोरंजनातील परिवर्तन :**

दूरदर्शन, आकाशवाणी, टेपरेकॉर्डर, व्हिडीओ, वाचनालये, क्रीडामंडळे अशी आधुनिक मनोरंजनाची साधने लोकप्रिय ठरत आहेत. त्यामुळे कुटुंबात साजरे होणाऱ्या परंपरागत कार्यक्रमाबद्दलची आवड हळूहळू कमी होत चालली आहे. अशाप्रकारे ग्रामीण कुटुंबाच्या रचनेत व कार्यात परिवर्तन होत आहे.

**नातेसंबंध (Kinship)**

सर्व मानवी समूहांत आप्त-समूहांची संख्या सर्वाधिक असते. एकंदर मानवी जीवनच नातेसंबंधांत गुरफटलेले असते. पारंपरिक व सरल समाजात नातेसंबंधांचे व आप्तसमूहांचे महत्त्व जास्त असते. व्यक्तीचे सामाजीकरण व त्याच्या वागणुकीवर नियंत्रण ठेवण्याचे कार्य प्रमुख्याने आप्त-समूहात/ नातेसमूहात केले जाते.

कुटुंब हा सर्वव्यापी व सर्वांत महत्त्वाचा नातेसमूह आहे. मानवाचे प्राथमिक नातेसंबंध कुटुंबात पाहावयास मिळतात. इतर आप्तांशी व पर्यायाने समाजातील इतर व्यक्तींशी परस्परसंबंध ठेवण्याविषयीचे शिक्षण कुटुंबातच देण्यात येते. माता, पिता, पती, पत्नी, पुत्र, पुत्री, ज्येष्ठ व कनिष्ठ बंधू, भगिनी या सर्वांचे परस्परसंबंध हे प्राथमिक नातेसंबंध होय. हे नातेसंबंध सर्वसाधारणतः सर्व समाजात सारखे असतात. सामाजिक व आर्थिक जबाबदाऱ्या आणि हक्क, ममता, भावनिक संबंध, लैंगिक संबंध, अधिसत्ता, मालमत्ताविषयक नियम व वंशानुक्रमाचे नियम इ. महत्त्वाच्या सामाजिक प्रमाणांची सुरुवात कुटुंबातील या नातेसंबंधांपासूनच होते.

सर्व समाजात वेगवेगळ्या प्रकारचे समूह वा गट आढळून येतात. काही गट दीर्घकाळासाठी तर काही गट अल्पकाळासाठी निर्माण झालेले असतात. काही गट प्राथमिक स्वरूपाचे तर काही गट दुय्यम स्वरूपाचे असतात. यांमध्ये काही गटाचा आकार लहान तर काही गट आकाराने मोठे असतात. या सर्व समूहांपैकी कुटुंब हा असा समूह आहे की, ज्याचा समावेश प्राथमिक व लहान गटात होतो. लहान गटाची सदस्य संख्या कमी असते. कुटुंबाची सदस्य संख्या कमी असल्यामुळे त्याला प्राथमिक गट म्हणून संबोधिले जाते. त्याचप्रमाणे कुटुंब ही एक सामाजिक संस्था सुध्दा आहे. ही सामाजिक संस्था भारतीय समाजाचे एक अविभाज्य घटक आहे.

ग्रामीण समाज हा कुटुंबसंस्थेचा पायाभूत आधार समजला जातो. अनेक प्रकारच्या घटनांमुळे नागरी समुदायाच्या कुटुंबाच्या रचनेत व कार्यात फरक पडला आहे. परंतु ग्रामीण समाज कुटुंबाच्या परिवर्तनाला पोषक नसल्याने ग्रामीण कुटुंब हे स्थिर राहिले आहे. ज्याप्रमाणे नागरी कुटुंबाच्या रचनेत व कार्यात फरक पडला त्याचप्रमाणे ग्रामीण कुटुंबाच्या रचनेत व कार्यात फारसा फरक पडलेला दिसून येत नाही. याचे कारण कुटुंबाची स्वत:ची रचनाच अशी आहे की येथे सर्व सदस्य एकमेकांचे रक्तसंबंधित असतात. येथे केंद्र कुटुंब असो किंवा संयुक्त कुटुंब असो. प्रत्येक कुटुंबात रक्तसंबंधीय व्यक्तींचा समावेश झालेला असतो. कुटुंबामध्ये आई, वडील आणि त्यांची मुली, मुले, नातवंड वगैरे एकमेकांचे रक्ताचे जवळचे नातेवाईक असतात. फक्त पत्नीच रक्त संबंधीस व्यक्ती नसते. आप्तसंबंध हे रक्त आणि वैवाहिक संबंधाच्या नात्यांतून निर्माण होत असतात. बिल्स व हॉयजर यांच्या मते, आप्तसंबंधाच्या बंधनांनी एकत्रित झालेल्या सदस्यांचा सामाजिक समूह म्हणजे कुटुंब त्याचप्रमाणे डॉ. राल्फ म्हणतात की, कुटुंब हा आप्त संबंधावर आधारलेला आणि मुलभूत व सार्वत्रिक स्वरुपाचा समूह आहे. कुटुंबामध्ये पुरुष व त्याची पत्नी आणि त्याच्या संमिलनातून निर्माण झालेल्या वा दत्तक घेतलेल्या मुलांचा समावेश झालेला असतो. अर्थात, ग्रामीण कुटुंब हे संपूर्णतः

रक्तसंबंधीय समूह आहे. विवाहसुध्दा जातीतच होत असल्याने येथे वर्णसंकराचे प्रमाण नसल्यासारखेच जमा आहे. कुटुंबात बाहेरून आलेली विवाहित स्त्री वगळता बाकींचे सर्व सदस्य रक्त संबंधीय असतात. पत्नीचा सुध्दा तिच्या पतीचा अपवाद वगळता तिचा व तिच्या मुलांचा संबंध हा रक्तसंबंधाचाच असतो.

**३.२.२ जात आणि बलुतेदारी**

ग्रामीण समाजात प्रत्येक व्यक्तीचा सामाजिक दर्जा हा सामाजिक स्तरीकरणासाठी आवश्यक घटक समजला जातो. व्यक्तीला दोन प्रकारचे दर्जे मिळालेले असतात. पहिला दर्जा व्यक्तीला जन्माने प्राप्त होतो तर दुसरा दर्जा हा अर्जित दर्जा असतो. यानुसार समाजात दोन वर्ग पडतात. बंदिस्त स्तरीकरण किंवा 'बंदिस्त वर्ग (Closed class) हा वर्ग व्यक्तीच्या जन्मजात दर्जास अनुसरून पडलेला आहे. तर दुसरा वर्ग 'मुक्त स्तरीकरण किंवा मुक्त वर्ग' (Open class) हा आहे. हा वर्ग व्यक्तीचा अर्जित दर्जा विचारात घेऊन निर्माण केलेला आहे. बंदिस्त वर्ग म्हणजेच समाजामध्ये आढळून येणारी जातिव्यवस्था, मुक्त वर्ग व्यवस्था म्हणजे समाजातील लोकांनी मिळविलेल्या आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक दर्जा म्हणूनच ग्रामीण समाजातील स्तरीकरण व्यवस्थेमध्ये जातीव्यवस्था आणि वर्गव्यवस्था यांचा समावेश होतो.

**अर्थ व व्याख्या**

इंग्रजीमध्ये जातीला Caste म्हणतात. Caste हा इंग्रजी शब्द पोर्तुगीज 'Casta' या शब्दापासून झाला आहे. **Caste** या शब्दाची व्युत्पत्ती 'Casta' या लॅटिन शब्दातून झाली. वंशाची शुध्दता असा त्याचा अर्थ होतो.

खालील व्याख्यांवरून जातीची संकल्पना स्पष्ट करणे अधिक सुलभ होईल.

१) सर हर्बर्ट रिस्ले यांच्या मते एकच सामान्य नाव धारण केलेल्या, विवक्षित मानवी अगर दैवी अशा काल्पनिक मूळ पूर्वजापासून आपल्या संतान परंपरेला सुरुवात होते असे मानणाऱ्या पिढीजात व्यवसाय करणाऱ्या व जे आपले मत व्यक्त करण्यास समर्थ आहेत अशा लोकांकडून तो एक एकजिनसी समुदाय आहे अशी मान्यता पावलेल्या कुटुंबाचा समुच्चय म्हणजे जात होय.

२) मुजुमदार व मदन यांच्या मते, जात हा एक बंदिस्त वर्ग आहे.

३) प्रा. कुलेंच्या मतानुसार, संपूर्णत: आनुवंशिकतेवर आधारलेल्या वर्गास जाती म्हणतात.

**जातीचे स्वरुप** (Nature of Caste)

सांप्रतच्या जाती व्यवस्थेचे मूळ हे वर्णव्यवस्थेत आहे. जातीव्यवस्था ही वर्णव्यवस्थेनंतर अस्तित्त्वात आली आहे. पूर्वी ऋग्वेदकाळात तर वैश्य आणि क्षूद्र या या दोन वर्णांचा उल्लेख सुध्दा आढळून येत नाही; पुढे काही काळानंतर धर्मसूत्रात आणि स्मृतिग्रंथात मात्र अनेक जातींचा उल्लेख करण्यात आलेला आहे. याचाच अर्थ असा की, जातीचा उगम हा ऋग्वेद काळात झाला नसून पुढे तो धर्मसुत्र व स्मृतिग्रंथ निर्मितीच्या कालखंडात झालेला आहे. भारतीय समाजाच्या प्रदीर्घ कालखंडात कमालीची उलथापालथ घडून

आलेली आहे. या अशा परिस्थितीत नक्कीच भिन्न वर्णीय लोकांनी मोठ्या प्रमाणात अनुलोम व प्रतिलोम विवाह केले असायला पाहिजे. धर्मग्रंथातून आनुवंशिकतेचे जे समर्थन केले जाते ते उघडपणे जातीच्या संदर्भाने केलेले आहे असे दिसून येते. या धर्मग्रंथात जेव्हाही वर्णव्यवस्थेचा उल्लेख केला जातो तेव्हा प्रत्येक वेळी जन्माने वर्ण ठरत नाही असेच नमूद केले जाते. याचाच अर्थ असा की वर्णव्यवस्था ही मुक्त व्यवस्था होती, परंतु नंतर निर्माण झालेली जातिव्यवस्था मात्र बंदिस्त व्यवस्था म्हणून भारतीय समाजापुढे उभी राहिली. जातीला जन्माचा तर वर्णाला कर्माचा आधार आहे. त्यामुळे या दोन्हींमध्ये हाच खरा फरक आहे.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, क्षुद्र हे चार वर्ण त्याकाळामध्ये होते. प्रत्येक वर्णाकडे त्यांचे स्वतःचे काम सोपविण्यात आले होते. ब्राह्मण वर्णाकडे अध्ययन, अध्यापन, पौरोहित्य, न्यायदान, धर्मनिर्णय, राजाच्या मंत्रिमंडळातील सल्लागार इत्यादी कामे सोपविण्यात आली होती. राजे, सरदार आणि सैनिक यांना क्षत्रिय समजले जात असे. वैश्य वर्णाकडे कृषी आणि व्यापार ही खाती सुपूर्त करण्यात आलेली होती. शुद्र वर्णाकडे मात्र या तीन वर्णीय लोकांची सेवा करावी असा आदेश होता. पुढे चारही वर्णांचे रुपांतर जातीत झाले. या नव्याने निर्माण झालेल्या लोकांचे व्यावसायिक गट निर्माण झाले. नव्या नव्या व्यवसायामुळे जातींची संख्या वाढत गेली. व्यवसायावरून त्या त्या गटाला व्यावसायिक नाव दिले गेले. जाती-जातीत अनेक गोष्टींबाबत भेद निर्माण झाले. या भेदाचे स्वरूप श्रेष्ठ-कनिष्ठ असे ठरले गेले. काळानुसार जातींची संख्या वाढत गेली. देशाच्या कोणत्याही तालुक्याचे सर्वेक्षण केले तर येथे किमान सत्तर-पंच्याहत्तर जाती आढळून येतात. प्रत्येक जातीला स्वतःचा काहीतरी व्यवसाय आहे. तसेच एका प्रदेशातील जात दुसऱ्या प्रदेशात दिसून येत नाही. जातीचे स्वरूप हे त्या प्रदेशात असलेली उत्पादनाची साधने व उपलब्ध असलेली अवजारे यावर अवलंबून असते. दुसऱ्या प्रदेशात उत्पादनाच्या साधनात व त्यानुसार निर्माण झालेल्या श्रमविभाजनात फरक असतो. काही ठिकाणी काही जातींच्या बाबतीत असा फरक दिसून येत नसला तरी भाषा भिन्नतेमुळे दोन्ही प्रदेशात एकच काम करणाऱ्या एकाच जातीची दोन वेगवेगळी नावे आढळून येतात. महाराष्ट्रातील मांग जात ही ज्या प्रकारची कामे करते तीच कामे कर्नाटक व आंध्र प्रदेशात मादिग नावाची जात करते. या दोन्ही जातीच्या इतिहासामध्ये व देवदेवतांमध्येकाही फरक नाही; परंतु नावात मात्र फरक दिसून येतो. हा प्रकार सगळ्याच प्रदेशातील सगळ्याच जातींच्या संदर्भात दिसून येतो. तसेच काही ठिकाणी एकाच जातीच्या वाट्याला आलेल्या एकूण कामाच्या स्वरुपातही फरक असतो.

प्रत्येक जातीला जे स्थान मिळते ते स्वतंत्र स्वरुपाचे नसून त्यात निर्माण झालेली असते. कोणत्या जातीच्या नंतर कोणती जात हा सामाजिक दर्जा त्या त्या प्रदेशात व्यवसायानुरुप निश्चित झालेला दिसून येतो. बलुते आणि अलुते असे गावगाड्यातील जातीचे स्वरूप असल्यामुळे कोणी कोणता व्यवसाय करायचा नि त्या व्यवसायात इतर जातींना प्रवेश द्यायचा की नाही असे ठरलेले दिसून येते. जातीनुरुप व्यवसाय निश्चित झालेला असल्याने स्वतःचा व्यवसाय सोडून इतर जातींचा व्यवसाय करण्यास बंदी घालण्यात आलेली आहे. सामाजिक व्यवहार हे प्रत्येक जातीत घडून येत असले तरी त्या व्यवहाराचे स्वरुपसुध्दा जातीनिहाय निश्चित झालेले असते. व्यक्तीचा जन्म ज्या जाती व्यवसायात झाला तोच व्यवसाय तिने आयुष्यभर करावा असा समाजाचा आदेश असल्याने व्यक्तीचे सामाजिक स्थान जन्म तत्त्वाधारावर निश्चित करण्यात आले.

**जातिव्यवस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये :**

डॉ. घुर्ये यांनी जातिव्यवस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे दिली आहेत.

**१. समाजाची खंडात्मक विभागणी :**

व्यक्तीची जात जन्माने ठरते व ती तिला केव्हाही बदलता येत नाही. जातीनेच व्यक्तीचा दर्जा व कार्य निर्धारित होते. प्रत्येक जातीचे स्वरूप इतर जातींपेक्षा वेगळे राहावे यासाठी जातीच्या खानपान, विवाह, आर्थिक व्यवहार, व्यवसाय इत्यादींविषयक नियमांचे पालन जातिसदस्यास बंधनकारक असते. याबाबतची आचार परंपरा तो निष्ठेने पाळतो की नाही हे पाहण्यासाठी प्रत्येक जातीची जात-पंचायत असते. त्यामुळे व्यक्तीवर समुदायाचे अधिक नियंत्रण असण्यापेक्षा, जातिपंचायतीचे नियंत्रण असे. त्यामुळे विशाल समुदाय निष्ठा रुजण्यापेक्षा संकुचित जातिनिष्ठा बळावत गेल्या व अनेक जाती-उपजातींत भारतीय समाजाचे विभाजन झाले.

**२. उच्चनीचतेची क्रमवारी किंवा सोपान परंपरा :**

निरनिराळ्या जातींना विशिष्ट दर्जा मिळून त्यांच्यात श्रेष्ठ-कनिष्ठतेची उतरंड किंवा सोपान परंपरा ठरलेली आहे. ब्राह्मण जातीस सर्व जातींत श्रेष्ठ दर्जा दिलेला असून ब्राह्मणानंतर क्षत्रिय, क्षत्रियानंतर वैश्य, वैश्यानंतर शूद्र असा क्रम ठरलेला आहे. अर्थात, या चार जातींचा क्रम निश्चित झाला असला तरी पुन्हा चार जातीत ज्या असंख्य जाती अंतर्भूत आहेत त्यांच्यात श्रेष्ठ कनिष्ठत्वाबाबत मात्र निश्चितता नसल्याने काही उपजाती एकमेकांपेक्षा आपणास श्रेष्ठ समजतात. उदा. कुणबी, सोनार; असे असले तरी एकूण सोपान परंपरा ही कायम स्वरूपाची असून ती न बदलणारी आहे.

**३. खानपान व सामाजिक संबंधविषयक निर्बंध :**

प्रत्येक जातीय गटात खानपानविषयक व इतर जातींशी संबंध याविषयी विस्तृत नियम जातिसंस्थेने घालून दिलेले आहेत. आपल्यापेक्षा कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातीकडून कोणते अन्न घ्यावे यांबाबत विस्तृत नियम आहेत. उच्च जातीचे निम्न जातीच्या घरी जेवण करत नसत. शिधा म्हटले जाणारे कच्चे अन्न, फळे वगैरे आपल्या घरी घेऊन जाई. यात प्रदेश बदलाबरोबर थोडाफार बदल होत असे. त्याचप्रमाणे सामाजिक संबंधाबाबतदेखील कोणाला स्पर्श करावा किंवा करू नये याचीही नियमावली असे. विशेषतः हे नियम अस्पृश्यांपासून स्पृश्यांचे मोठेपण, पावित्र्य जपण्यासाठी वापरले जात होते. महाराष्ट्रात अस्पृश्यांच्या सावलीचा देखील स्पृश्यांना विटाळ होई तर केरळात नायर या कनिष्ठ जातींनी नंबुद्री ब्राह्मणाला स्पर्श करणे सामाजिक गुन्हा होता.

**४. सामाजिक व धार्मिक अपात्रता व विशेषाधिकार :**

पवित्र अपवित्रतेची भावना जातिव्यवस्थेत एकजीव झालेली होती. त्यामुळे उच्च जातींना विशेष सामाजिक व धार्मिक अधिकार प्राप्त झाले होते. जातीच्या अधिक्रमी रचनेनुसार श्रेष्ठ ब्राह्मणांना श्रेष्ठ अधिकार प्राप्त झाले होते. त्या खालोखाल इतर जातींना अधिकार दिले गेले होते. पण तथाकथित कनिष्ठ जातींना

अपवित्र लेखून त्यांना सामाजिक व धार्मिक क्षेत्रात असे अधिकार दिले गेले नव्हते. त्यांना सर्वसाधारण हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले होते. त्यांना गावाबाहेर राहावे लागे. त्यांना मंदिर तर सोडाच पण गावातील उच्चवर्णीयांची वस्ती, रस्ते हे त्यांच्या सावलीनेदेखील विटाळले जाणार नाहीत याची खबरदारी घेतली होती. सार्वजनिक विहिरी, पाणवठा या ठिकाणी अस्पृश्यांना मज्जाव असे. कित्येकदा जातीच्या विहिरी असत. कनिष्ठ जातीच्या लोकांची कपडे, वाहने, घरे कशी असावीत याबद्दल कडक निर्बंध होते. वेदांचे अध्ययन अध्यापन ब्राह्मणापुरतेच मर्यादित होते. वेदोक्त धार्मिक संस्काराचा हक्क केवळ ब्राह्मणांना होता तर इतरांना पुराणोक्त पद्धतीने धार्मिक कृत्ये करावी लागत.

**५. व्यवसाय स्वातंत्र्याचा अभाव :**

प्रत्येक जातीचा निर्धारित व्यवसाय असे. तो सोडून इतर व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य जातीच्या सदस्याला अजिबात नव्हते. सुताराच्या मुलाने सुतारकाम करावे तर सोनाराच्या मुलाने सोनाराचेच. श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या कल्पनेने व्यवसायांची देखील विभागणी केली होती. पवित्र समजले जाणारे अध्ययन, अध्यापन, पौरोहित्य वगैरे व्यवसाय ब्राह्मणाकडे तर हलके, घाणेरडे वाटणारे व्यवसाय शूद्रांकडे होते. मात्र सैनिकी पेशा, व्यापार याबाबत व्यवसाय निवडीची बंधने शिथिल झालेली आढळून येतात. या व्यवसायावरून जातींना नावे पडत. एवढेच नव्हे तर आपल्या व्यवसायाचे कौशल्य आपल्याच जातीपुरते गुप्त व मर्यादित ठेवण्यासाठी व आपली सुरक्षितता जपण्यासाठी इतर जातींच्या लोकांना या व्यवसायात येऊ दिले जात नसे.

**६. अंतर्विवाहाची सक्ती :**

प्रत्येक जातीस अंतर्विवाहाचा नियम कठोरपणे लागू होता. त्याचे उल्लंघन केल्यास जातपंचायती जबर शासन करीत. एखाद्या जातीच्या पोटजातीदेखील अंतर्विवाह समूह बनत व सदस्यांना काटेकोरपणे अंतर्विवाहाचा नियम पाळावयास लावीत. यामुळे जातिसंस्था व तिची वैशिष्ट्ये वर्षांनुवर्षे टिकून राहण्यास मदत झाली. त्यामुळेच अंतर्विवाहाचा नियम हा जातिव्यवस्थेचा मूलभूत पाया बनला.

डॉ. घुर्ये यांनी भारतीय समाजव्यवस्थेचा अभ्यास करून वरीलप्रमाणे जातिव्यवस्थेची वैशिष्ट्ये विस्तृतपणे विशद केली आहेत.

**जातिव्यवस्थेचा ग्रामीण समाजावरील प्रभाव :**

ग्रामीण समाजजीवनाच्या सर्व अंगावर जातिव्यवस्थेचा प्रचंड प्रभाव पडलेला दिसतो ग्रामीण व्यक्ती, समूह, संस्था व जीवनपध्दती यांच्या जडणघडणीत जातिव्यवस्थेने निर्णायक व महत्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे.

**अ) आर्थिक जीवनावरील प्रभाव :**

ग्रामीण समाजातील उत्पादन, वितरण, उपभोग इ. आर्थिक प्रक्रियांवर जातीचा प्रभाव पडलेला आढळतो.

**१) उत्पादन पध्दती :** परंपरागत ग्रामीण समाजात जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू व सेवा यांच्या उत्पादन कार्याचे वाटप जातीच्या आधारे केले गेले. शेती हा मुख्य व्यवसाय प्रामुख्याने उच्च जातींच्या हाती होता व आजही आहे. तर बिगरशेती व्यवसाय हे कनिष्ठ जाती करीत असत. सुतार, लोहार, चांभार, महार, मांग, न्हावी, परीट, कोळी, कुंभार, सोनार, गुरव, चौगुला इ. १२ बलुतेदार आणि साळी, माळी, तेली, तांबोळी, धनगर, कोष्टी, कासार, डवरी, डोंबारी, कोल्हाटी इ. १८ अलुतेदार आपापल्या जातीचे व्यवसाय करुन शेतकऱ्यांच्या शेतीविषयक व प्रापंचिक गरजांची पूर्तता करीत आणि त्याच्या मोबदल्यात शेतकरी सुगीच्या वेळी त्यांना धान्य देऊन त्यांच्या निर्वाहाची सोय करीत. अशाप्रकारे खेड्यातील सर्व जाती आपापले व्यवसाय करुन परस्परांच्या गरजा भागवित. या पध्दतीलाच बलुता – अलुता पध्दती म्हणतात. जातीवर आधारलेल्या या बलुता – अलुता पध्दतीने खेड्यांची कार्यविभाजनाची गरज भागविली व खेड्यांना आर्थिक स्वयंपूर्णता मिळवून दिली. अशाप्रकारे ग्रामीण उत्पादन पध्दती जातीवर आधारलेली होती, आज राज्यघटनेने सर्व जातींना व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य दिल्याने जातीचेच व्यवसाय करण्याची सक्ती राहिलेली नाही. तसेच औद्योगिकीकरण, नागरीकरण, शिक्षणप्रसार इ. घटकांच्या प्रभावामुळे बलुतापध्दती कोलमडून पडली आहे. तरीही बहुसंख्य गरीब व अडाणी बलुतेदार अलुतेदार जाती आपला परंपरागत व्यवसाय करताना दिसतात. जात आणि उत्पादन पध्दती किंवा व्यवसाय यांच्यातील संबंध पूर्णपणे संपलेला नाही.

**२) उपभोगाची पध्दती :** ग्रामीण समाजातील उपभोगाच्या पध्दतीवरही जातीचा प्रभाव पडलेला दिसतो. व्यक्तीने काय खावे, कोणाबरोबर खावे, कोणाच्या हातचे अन्नपाणी ग्रहण करावे, तिची वेशभूषा, केशभूषा, दागदागिने कसे असावेत, तिने गावात कोठे व कशापध्दतीचे घर बांधावे इ. बाबतचे जातीचे नियम होते. तसेच वेगवेगळ्या जातीसाठी वेगवेगळे पाणवठे होते. उच जातींच्या पाणवठ्यावर कनिष्ठ जातींना पाणी भरण्यास मनाई असे. अशाप्रकारे उपभोगासंबंधीचे जातीचे नियम होते व ते व्यक्तीला पाळावेच लागत. आज हे नियम बऱ्याच प्रमाणात शिथील असले तरी ते पूर्णपणे संपुष्टात आलेले नाहीत. कनिष्ठ जातींच्या हातचे अन्नपाणी घेणे उच्च जातीचे लोक अद्यापही कमीपणाचे मानतात. त्यामुळेच खेड्यात कनिष्ठ जातीच्या व्यक्तीचे हॉटेल आजही दिसत नाही. उच्चशिक्षित व सधन बनलेल्या अस्पृश्य व्यक्तीला खेड्यात उच्च जातीच्या वसाहतीत घर बांधता येत नाही किंवा भाड्याने मिळत नाही.

**३) राहणीमानाचा दर्जा :** खेड्यातील लोकांचे राहणीमान व जात यांच्यामध्येही जवळचा संबंध दिसते एकंदरीत ग्रामीण राहणीमान निम्न दर्जाचे असले तरी त्यामध्ये जातीपरत्वे भिन्नता दिसते. खेड्यातील शेती, व्यापार, उद्योग हे उच जातीच्या हाती असल्याने त्यांचे राहणीमान वरच्या दर्जाचे आहे. तर कनिष्ठ जातींना विशेषतः अस्पृश्य जातींना उत्पन्नाचे निश्चित साधन नसल्याने त्यांच्यात प्रचंड दारिद्र्य आहे. त्यामुळे त्यांचे राहणीमान खूपच निकृष्ट दर्जाचे आहे. बहुसंख्य कनिष्ठ जाती निर्वाहासाठी उच्च जातीवरच अवलंबून आहेत.

**४) कर्जबाजारीपणा :** ग्रामीण समाजात जात व कर्जबाजारीपणा यांचाही घनिष्ट संबंध आहे. कांही उच जाती पूर्वापारपणे सावकारीचा धंदा करतात. तर कांह जाती विशेषतः कनिष्ठ जाती पिढ्यानपिढ्या ह्या सावकारांच्या कर्जात बुडालेल्या आहेत. प्रचंड दारिद्र्यामुळे या जातींना गरजापूर्तीसाठी सावकारांकडून प्रचंड व्याज दराने कर्ज घ्यावे लागते आणि हे सावकार कर्जफेडीच्या नावाखाली त्यांना विनामोबदल्यात वा अल्प

मोबदल्यात गुलामासारखे राबवून घेतात. डॉ. नेहरूंच्या मते कर्जबाजारीपणा हा कांही जातींचा स्थायीभाव बनलेला आहे.

**ब) सामाजिक जीवनावरील प्रभाव :**

**१) सामाजिक दर्जा :** परंपरागत ग्रामीण समाजात अर्पित दर्जाला महत्व होते. जन्मावरुन जात व जातीवरुन व्यक्तीचा दर्जा ठरत असे आणि त्यामध्ये तिला बदल करता येत नसे. मूर्ख व कर्तृत्वशून्य ब्राह्मणाचा दर्जा उच्च तर विद्वान व कर्तृत्ववान शूद्र व्यक्तीचा दर्जा कनिष्ठ मानला जाई. आज अर्पित दर्जाऐवजी अर्जित दर्जाला महत्व प्राप्त होत आहे. सत्ता, संपत्ती, उच्च शिक्षण इ. च्या आधारे कोणत्याही जातीधर्माच्या व्यक्तीला आपला दर्जा उंचावण्याची संधी उपलब्ध होत आहे. तरीही खेड्यात अद्यापही जात व दर्जा यातील संबंध पूर्णपणे संपलेला नाही, उच जातीतील साधारण व्यक्तीस जो मानसन्मान व प्रतिष्ठा मिळते ती कनिष्ठ जातीतील असाधारण कर्तृत्व गाजविणाऱ्या व्यक्तीला मिळत नाही. शिक्षण, सत्ता, संपत्ती मिळविली तरीही कनिष्ठ जातीतील व्यक्तीचे कनिष्ठत्व संपत नाही. तिच्या कनिष्ठ जातीचा उल्लेख आवर्जून होतच राहतो.

**२) सामाजिक संपर्काचे क्षेत्र :** ग्रामीण व्यक्तीच्या सामाजिक संपर्काचे क्षेत्रही जातीद्वारेच निर्धारित होत असे. ग्रामीण व्यक्ती प्रामुख्याने आपल्या जातीतील व्यक्तीशीच घनिष्ठ, घरोब्याचे संबंध प्रस्थापित करताना दिसतात. परजातीतील विशेषतः आपल्यापेक्षा कनिष्ठ जातीतील व्यक्तीशी शारीरिक व सामाजिक संपर्क प्रस्थापित करण्यास जातीव्यवस्थेने मनाई केलेली होती. आज हा निर्बंध शिथील झाला असला तरीही खेड्यातील उच्च जाती कनिष्ठ जातींशी घनिष्ठ सामाजिक संपर्क ठेवणे कमीपणाचे, अप्रतिष्ठेचे मानतात.

**३) सामाजिक नियंत्रण :** ग्रामीण व्यक्तीच्या वर्तनाचे नियंत्रण जातीद्वारे प्रभावीपणे होत असे. पूर्वी बहुतेक जातीच्या जातीपंचायती होत्या आणि त्या आपल्या सदस्यांना जाती नियमांचे पालन करावयास लावीत. जातीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यास त्या पंचायती शिक्षाही करीत. आज या पंचायती इतिहासजमा झाल्या असल्यातरीही खेड्यात व्यक्तीला 'स्व' जातीच्या विरोधात जाऊन वागणे व जगणे कठीण जाते.

**४) विवाहसंबंध :** व्यक्तीच्या विवाहसंबंधावरही जातीचा प्रभाव होता. जात हा अंतर्विवाही समूह असून तो व्यक्तीला जातीबाहेरील व्यक्तीशी विवाहसंबंध जोडण्यास कठोरपणे मनाई करत असे. पोटजातीतही अंतर्विवाहाचा नियम पाळला जात असे. आज आंतरजातीय विवाह कायदेशीर ठरविला असला तरीही खेड्यात अद्यापही परजातीतील व्यक्तीशी विवाह करणे मानहानीकारक व घराण्याची बेअब्रु करणारे कृत्य मानले जाते. त्यामुळे ग्रामीण लोक जात- अंतर्विवाहाचेच पालन कसोशीने करतात.

**क) शैक्षणिक जीवनावरील प्रभाव :**

**१) शिक्षणाचा अधिकार :** परंपरागत ग्रामीण समाजात शिक्षणाचा अधिकार केवळ उच्चजातीनाच होता. अध्ययन व अध्यापन हे ब्राह्मणांचे कार्य मानल्याने शिक्षण क्षेत्रात त्यांची मक्तेदारी निर्माण झाली होती. स्त्रीशूद्रांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता.

**२) शैक्षणिक मागासलेपण :** आज शिक्षणाचा अधिकार सर्व जातींना मिळाला आहे. ग्रामीण समाजात शिक्षण प्रसार करण्यासाठी विविध योजना राबविल्या जात आहेत. तरीही दारिद्र्य व प्रेरणांचा अभाव यामुळे कनिष्ठ जाती शैक्षणिक योजनांचा पुरेसा फायदा घेऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांचे शैक्षणिक मागासलेपण संपलेले नाही.

**३) व्यावसायिक शिक्षण :** परंपरागत समाजात व्यावसायिक शिक्षण व जातींचा प्रत्यक्ष संबंध होता. व्यक्तीला आपल्या जातीचाच व्यवसाय करावा लागे व त्या व्यवसायाचे शिक्षण कुटुंबात वडिलधाऱ्यांच्या हाताखाली मुलांना लहानपणापासूनच दिले जाई. आज ग्रामीण भागातही व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या शिक्षणसंस्था निघाल्या असल्या तरीही सुतार, लोहार, चांभार, न्हावी, परीट इ. जातीची मुले आपल्या व्यवसायाचे शिक्षण कुटुंबातच घेताना दिसतात.

**ड) धार्मिक जीवनावरील प्रभाव :**

**१) जातीधर्म :** जातिव्यवस्थेला हिंदूधर्माचा आधार दिला गेला. जातिव्यवस्था ही ईश्वरनिर्मित आहे. त्यामुळे जातीचे नियम पाळणे हे व्यक्तीचे परमकर्तव्य ठरते असे तत्वज्ञान लोकांच्या मनावर बिंबविले. यालाच 'जातीधर्म' म्हटले गेले. 'जातीधर्मपालन' हे धार्मिक जीवनाचे महत्वाचे अंग बनले.

**२) धार्मिक कार्यातील सहभाग :** व्यक्तीचा धार्मिक कार्यातील सहभाग हा देखील जातीव्यवस्थेवर आधारलेला होता. खेड्यात वेगवेगळ्या जातीची वेगवेगळी दैवते व देवालये आहेत. उच जातीच्या देवालयात कनिष्ठ जातींना प्रवेश दिला जात नाही. तसेच तेथे होणाऱ्या पूजाअर्चा, प्रार्थना, भजन, किर्तन इ. कार्यात कनिष्ठ जातींना सहभागी होता येत नाही. धार्मिक कार्याचे पौरोहित्य हे उच्च जातीकडे विशेषतः ब्राह्मणाकडेच असते.

**३) धार्मिक शिक्षण :** धार्मिक शिक्षण ही जातिव्यवस्थेच्या प्रभावाखाली होते. धार्मिक विधी व कर्मकांडाचे ज्ञान मिळविणे, वेदासारख्या धर्मग्रंथांचे पठण करणे, वेदमंत्र उचारणे व ऐकणे इ. बाबतचे अधिकार केवळ ब्राह्मण व क्षत्रिय यांनाच दिले गेले. कनिष्ठ जातीसाठी पुराणोक्त मंत्र वापरले जात.

**ई) राजकीय जीवनावरील प्रभाव :**

प्राचीन काळापासून ग्रामीण राजकीय जीवनावर जातिव्यवस्थेचा प्रभाव असून तो दिवसेंदिवस वाढत चालला आहे.

**१) प्रशासन :** प्राचीन व मध्ययुगीन काळात ग्राम प्रशासन चालविण्यासाठी ज्या ग्रामपंचायती होत्या यांच्यावर जातिव्यवस्थेचा प्रभाव होता. या पंचायतीचे सदस्य व ग्रामीणी नावाचा ग्रामप्रमुख हे उच्च जातीचेच असत. गाव कारभाराबाबतचे सर्व निर्णय तेच घेत. कनिष्ठ जातींना पंचायतीमध्ये व निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत कोणतेही स्थान नव्हते. त्यांना केवळ आज्ञापालनाचे कर्तव्य बजावावे लागे.

**२) न्यायदान :** परंपरागत समाजातील न्यायदान प्रक्रियेवरही जातीचा प्रभाव होता. एकाच गुन्ह्यासाठी वेगवेगळ्या जातींसाठी वेगवेगळ्या शिक्षेची तरतूद केलेली होती. उदा. चोरी करणारी व्यक्ती उच्च जातीची

असल्यास तिला सौम्य शिक्षा होई, मात्र ती कनिष्ठ जातीची असल्यास तिला गंभीर शिक्षा होई. जातीपंचायतीनाही न्यायदानाचे अधिकार होते. एकाच जातीतील लोकांचे भांडणतंटे हे जातीपंचायतीपुढे मांडले जात. या पंचायती न्यायनिवाडा करून गुन्हेगारास शिक्षाही देत असत.

**३) जातीय राजकारण :** स्वातंत्र्यानंतर स्वीकारलेल्या लोकशाही राजव्यवस्थेत राजकीय पक्ष निवडणुका, प्रचार, मतदान या गोष्टी अनिवार्य आहेत. निवडणुकीच्या राजकारणात जातीला निर्णायक महत्व प्राप्त झाले आहे. निवडणुकीचे उमेदवार ठरविताना, मतदान करताना, मंत्रिमंडळ बनविताना, खातेवाटप करताना जातीचा प्रचंड प्रभाव पडत आहे. केवळ आपल्या जातीचा आहे एवढ्यावरुन लोक नालायक व कर्तृत्वशून्य उमेदवारास मत व पाठिंबा देत आहेत. स्वार्थी राजकारणी मंडळी सत्ता संपादण्यासाठी व टिकविण्यासाठी आपापल्या जातीचे संघ वाढवित आहेत. त्यामुळे जातिवाद फोफावत चालला आहे. ज्या राज्यात वा प्रदेशात जी 'जात' प्रभावशाली आहे तेथील राजकारण त्या जातीच्या प्रभावाखाली गेलेले दिसते. उदा. महाराष्ट्रात मराठा, आंध्रप्रदेशात रेड्डी, पंजाब व हरियाणात जाट या जाती प्रभावशाली असून तेथील राजकारणात त्यांचे वर्चस्व आढळते. ग्रामीण विकासासाठी अस्तित्वात आलेल्या पंचायत राज्यपध्दतीतील जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या प्रातिनिधिक संस्था देखील जातीय राजकारणाचे अड्डे बनलेल्या आहेत. ग्रामीण भागातील उच्च जातींनी त्यांच्यावर कब्जा केला असून कनिष्ठ जातींना 'आरक्षण' देऊनही त्यांच्या प्रतिनिधींचा अपेक्षित प्रभाव पडत नाही. अशाप्रकारे ग्रामीण राजकीय जीवन पूर्णतः जातीच्या प्रभावाखाली गेले आहे. लोकशाहीच्या विकासावरोवर जातिव्यवस्था, जातियता व जातिभेद संपेल अशी जी अपेक्षा केली होती ती फोल ठरली आहे.

**४) ग्रामीण नेतृत्व :** पारंपारिक ग्रामीण नेतृत्व हे जातिसंस्थेच्या प्रभावाखाली होते. आजच्या लोकशाही व्यवस्थेतील ग्रामीण नेतृत्वही जातिप्रथा, जातिवाद यावर पोसले जात आहे. बहुसंख्य ग्रामीण नेते हे गावाचे नेतृत्व न करता आपापल्या जातीचे नेतृत्व करताना दिसतात. त्यामुळे ग्रामीण भागात जातिवाद, जातीय तेढ व ताणतणाव वाढत चालला असून त्यामुळे ग्रामीण राजकीय जीवन कमालीचे प्रदूषित बनलेले आहे,

अशाप्रकारे ग्रामीण आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व राजकीय जीवनावर जातिव्यवस्थेचा प्रभाव दिसून येतो.

## जातीचे बदलते स्वरुप (Changing Nature of Caste System)

सद्यस्थितीत जाती व्यवस्थेत बदल घडून आल्याने प्रत्येक जातीची भूमिका बदलली आहे. तसेच यानंतर भविष्यात सुध्दा जातीची भूमिका यांचा नेमका अंदाज करणे कठीण असले तरी भारतीय समाजातून जातीव्यवस्था कधी नष्ट होणार नाही हे ही तेवढेच सत्य आहे. याउलट विविध प्रकारच्या अध्ययनातून हे स्पष्ट झाले की, जातीव्यवस्थेत अनुकूलनात्मक बदल होत आहे. अशा प्रकारच्या अनुकूलनात्मक बदलामुळे जातीव्यवस्था नष्ट होण्याऐवजी सातत्याने महत्त्वपूर्ण भूमिका बजावित आहे. आज जाती व व्यवसायाचा संबंध उरलेला नाही व्यक्तीने आपल्या जातीचाच व्यवसाय करावा हे बंधन त्याच्यावर राहिलेले नाही. व्यक्ती तिच्या आवडीप्रमाणे कोणताही व्यवसाय करायला स्वतंत्र आहे. जातीच्या सदस्यांना जो प्रदत्त दर्जा मिळत

होता तो शेवटपर्यंत कायम राहत असे. आज व्यक्तीचा दर्जा गुण कौशल्ये व आर्थिक प्राप्तीच्या आधारे ठरतो, त्यास अर्जित दर्जा म्हणतात, परंतु जाती परिघात जीवन घालविणाऱ्यांचा दर्जा जातीच्या आधारे ठरत आहे. जातीच्या सदस्यांनी आपल्या जातीतच विवाह करावा असे बंधन होते. परंतु सांप्रत काळात हे बंधन राहिलेले नाही. आंतरजातीय तसेच सर्व प्रकारच्या आंतर विवाहांना शासनाने मान्यता दिली आहे. तसेच खानपानासंबंधीचे निर्बंध राहिलेले नाहीत. स्पर्शबंदी, पाणी पिण्यास बंदी, मंदिर प्रवेश बंदी या कल्पना कालबाह्य ठरलेल्या आहेत. त्याचप्रमाणे जातीपंचायती संपुष्टात आल्या आहेत. जाती पंचांनी दिलेला निर्णय व दंड कालबाह्य ठरला आहे. असे असले तरी जातीव्यवस्था संपलेली नाही. अजूनही व्यक्ती स्वतःचा विवाह ठरवितांना आपल्या जातीला प्राधान्य देते. तसेच निवडणुकीत उमेदवारांची निवड, मतदान तसेच सत्तेतील पदांचे वितरण करताना जात प्रभावी असल्याचे लक्षात येते. त्याचप्रमाणे आर्थिक जीवनातही जातीचा प्रभाव विसरता येत नाही. डॉ. श्रीनिवास जातीच्या संदर्भात आपले मत व्यक्त करताना म्हणतात की, आधुनिक साधनांमुळे जाती प्रबळ होत असून जाती संघटना व्यापक स्तरावर बांधली जात आहे.

बहुतांशी जीवनक्षेत्रात व्यक्तीचा परिचय जाती आणि वर्गाच्या आधारे होऊ लागला आहे, तसेच जातीव्यवस्थेमध्ये अनुकूलनात्मक बदल होत आहे. त्याचप्रमाणे जातीभेदाची तीव्रता कमी झाली आहे. अजूनही काही प्रमाणात जातीभेद केलेला आढळून येतो. जातीने वर्गाची काही वैशिष्ट्ये स्वीकारली असली तरी या दोन व्यवस्थेत लक्षणीय अंतर आहे.

**बलुतेदार पद्धती**

प्राचीन भारतीय खेडी आर्थिक दृष्टीने स्वयंपूर्ण होती. दळणवळणाच्या साधनांच्या अभावाने खेडी ही इतर जगापासून पूर्णपणे तुटलेली होती. त्यामुळे आर्थिक स्वयंपूर्णता ही त्या काळची गरजच होती. म्हणूनच खेडयातील लोकांच्या निर्वाहविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी खेड्यांनी स्वतंत्र अशी आर्थिक यंत्रणा उभी केली होती. शेती हा मुख्य व्यवसाय असल्याने या आर्थिक यंत्रणेचे केंद्र शेतीच होते. त्यामुळे शेती हा व्यवसाय व्यवस्थित पार पाडण्याकरिता ज्या ज्या लोकांच्या सेवा घेणे आवश्यक होते, त्या त्या लोकांच्या सेवेचा मोबदला पारंपरिक पद्धती प्रमाणे दिला जाई. या पद्धतीलाच बलुतेदारी पद्धती असे म्हणतात. जातिप्रथेतील श्रमविभाजनाची व व्यवसायविभाजनाची व्यवस्था यातून बलुतेदारी पद्धतीची सुरुवात झाली. कारण प्रत्येक जात पारंपरिक व्यवसाय करीत असल्याने परस्परावलंबनाची परिस्थिती आपोआपच निर्माण झाली. त्यामुळे सर्व जातींना आपल्या निर्वाहविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी एकमेकांची मदत घेणे अपरिहार्यच होते. या सेवांचा मोबदला परंपरागत रीतीनुसार दिला जाई. बिगर शेती उद्योगधंदेसुद्धा शेतीला पूरकच होते. त्यामुळे बिगरशेती व्यावसायिकांनी खेडे सोडून जाऊ नये, यासाठी शेतकऱ्यांनी हंगामाप्रमाणे या बिगरशेती व्यावसायिकांना वर्षातून एकदा किंवा दोनदा पूर्व नियोजित धान्य द्यावे, अशी पद्धती पडली. ही बलुतापद्धती होय.

**बलुतापद्धतीची व्याख्या**

१) त्रि. ना. अत्रे यांनी 'गावगाडा' या ग्रंथात बलुता पध्दतीचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे. 'कुणब्याने गाव वसविले आणि काळी उचलली खरी, तथापि त्याचा धंदा पार पाडण्याला व प्रपंचाची अनेक कामे चालण्याला त्याला अडाण्यांच्या जातिपरत्वे धंद्याची गरज होती. म्हणून कुणब्याने आपल्याबरोबरच गावात अडाणी आणले. त्यात पहिल्याने 'कारु' आले व नंतर 'नारु' आले. ज्यांचे व्यवसाय शेतकऱ्याला – कुणब्याला जास्त महत्वाचे होते, त्यांना कारु म्हणत व ज्या व्यावसायिकांच्या सेवेवाचून कुणब्यांचे नडत नाही, त्यांना 'नारु' असे म्हणत. कारुला बलुतेदार किंवा बलुत्या व 'नारुला' अलुतेदार किंवा अलुत्या असे संबोधले जाई. या बलुत्या अलुत्यांना कुणब्याकडून त्यांनी केलेल्या सेवांचा मोबदला धान्याच्या रुपात दिला जाई.

२) ऑस्कर लेविस : या पध्दतीत एकाच खेड्यातील प्रत्येक जातीने दुसऱ्या जातीतील कुटुंबासांठी निश्चित स्वरुपाच्या प्रमाणभूत सेवा प्रदान कराव्यात अशी अपेक्षा असते. उदा. एखादा सुतार अवजारे दुरुस्त करतो, न्हावी केस कापतो परंतु ते या सेवा अत्यावश्यकपणे प्रत्येकास प्रदान करीत नाहीत. प्रत्येकजण अशा विशिष्ट कुटुंबासाठी किंवा कुटुंबांच्या समुहासाठी काम करतो, ज्यांच्याशी तो वंशपरंपरेने बांधलेला असतो.

३) ईश्वरन: जजमानी पध्दती ही अशी व्यवस्था आहे जिच्यामध्ये संपूर्ण सामुदायिक जीवनात प्रत्येक जातीस एक भूमिका पार पाडावी लागते. या भूमिकेत आर्थिक, सामाजिक व नैतिक कार्य समाविष्ट असतात.

**बलुतेदारांची कामे:**

परंपरागत बलुतेदारांची कामे व त्यांची समाजातील स्थाने पुढीलप्रमाणे

**१) महार :** महार हा पाटील-पटवारी यांना मदत करणारा प्रमुख बलुतेदार होय. त्यांना जी कामे करावी लागत त्यासाठी विशेष अशा अभ्यासाची किंवा कौशल्याची गरज नसे. महारांनी कोणती कामे करावीत याबद्दल खास नियम नव्हता. सांगेल त्याची व पडेल ती कामे करावीत अशी त्यांची स्थिती होता.

त्यांची काही कामे सरकारी स्वरूपाची होती. कागदपत्रे परगावी पोहोचविणे, गावात सरकारी कर्मचाऱ्यांची वस्ती असल्यास त्यांची देखभाल पाहणे, सरकारी कर्मचाऱ्यांच्या जनावरांची निगा राखणे, पट्टीसाठी संबंधित व्यक्तींना चावडीवर बोलावून घेणे, पिकांची पाहणी करणे, दवंडी पिटवून महत्त्वाच्या घटना लोकांना सांगणे, पहारा ठेवणे, गावाच्या शिवेसंबंधी माहिती लक्षात ठेवणे, मेलेली जनावरे ओढणे इत्यादी. अशी कामे करणारा तो पाडेवार महार म्हणून ओळखला जाई. घरची कामे करणाऱ्या महाराला 'राबता महार' किंवा 'घर महार' असे म्हणत. शेतकऱ्यांचे औत नेणे, गुरांचे गोठे साफ करणे, संदेश पोहोचविणे, यांखेरीज सण, यात्रा या वेळेस गावची झाडलोट व साफसफाई करणे, प्रत्येक घरात आंब्याच्या पानाची तोरणे बांधणे. होळीसाठी गोवऱ्या गोळा करणे. शेतकऱ्यांच्या घरची लाकडे फोडून देणे इत्यादी कामे त्यास करावी लागत.

**२) मांग :** हा देखील शेतीला उपयुक्त ठरणारा बलुतेदार, पण तो सर्वत्र आढळतोच असे नाही. शेतकऱ्यास लागणारे दोरखंड, जनावरांची मुसकी, दोऱ्या, दावी, कासरे, गोफणथैली, नाडा, सोडदोरे इत्यादी करून पुरविण्याची कामे तो करतो. त्याचबरोबर खाटा, पाळणे विणून देण्याचेही काम तो करतो. मांग व महार यांच्यात उच्च-नीचतेची भावना तीव्रतेने वास करीत असते. मांग मेलेल्या जनावरांचे मांस खात नाहीत म्हणून ते स्वत ला महारांपेक्षा उच्च समजतात.

**३) चांभार :** सर्वच गावांत चांभार हा बलुतेदार आढळतो असे नाही. मोट शिवणे, मोटेला ठिगळ लावणे, गोफणीला टवळे लावणे, जुना जोडा दुरुस्त करणे, चाबूक साधणे, पेरणीच्या वेळी वादी, आसूड, सापत्या करून देणे वगैरे कामे तो बलुत्यात करतो. पण नवीन मोटा करून देणे, जोडे करणे, चाबूक करणे यासाठी तो रोख पैसे घेतो. महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रमाणात चांभारांना बलुते दिले जाते. विवाह समारंभात मशाल धरण्याचे काम तो करतो. त्यासाठी त्याला पागोटे व खण दिला जातो.

**४) लोहार :** हा शेतीला उपयुक्त असणारा आणखी एक महत्त्वाचा बलुतेदार. लोहार आपली जागा बाजाराच्या गावात निवडतो. त्यामुळे आजूबाजूच्या गावांतील शेतकऱ्यांचीही कामे त्याला मिळतात. त्याच्या कामासाठी गरज पडेल तर एक गडी द्यावा लागतो. लोखंड, कोळसा, गोवऱ्या याही गोष्टी द्याव्या लागतात. नांगराचा फाळ, कुळवाचे वसू, मोटेचे कडे, लहान कुऱ्हाड, कुदळ, खुरपे, विळा, उलथने, विळी वगैरे बनविण्याची, दुरुस्तीची कामे तो करतो. चाकावर धाव चढविणे, नवीन लोखंडी मोटा तयार करणे यासाठी तो वेगळी मजुरी घेतो. लोहारदेखील सुताराप्रमाणे आपल्याला उच्च समजतो. इतरांकडून तो कोरडा शिधा स्वीकारतो, शिजविलेले अन्न स्वीकारत नाही. लग्नसमारंभात त्यास शेलापागोटे द्यावे लागते.

**५) सुतार :** हा इतर बलुतेदारांत सर्वांत श्रेष्ठ समजला जातो किंवा स्वतःस तसे समजतो. त्यामुळे त्याला इतर बलुतेदार पाटील म्हणतात. तो इतर बलुतेदारांशी अंतर ठेवून राहतो. पाटील, ब्राह्मण, तलाठी, गुजर या उच्च गणल्या जाणाऱ्यांशी तो संबंध ठेवतो.

शेतीच्या अवजारांची दुरुस्ती करणे, कुऱ्हाडी, खोरी, कुदळी यासाठी लाकडी दांडे तयार करून देणे, विहिरीवर मोटवण बसविणे, मोटेची चाके तयार करून देणे, डुबे, मोगरी, फावडी यांसारखी शेतकऱ्याच्या उपयोगाची साधने तयार करणे, लोहार व सोनार यांच्या ऐरणीचे खंड बनविणे, कुंभाराच्या चाकांचे तळ बनवून देणे, चांभाराची फरांडी तयार करणे वगैरे कामे सुतार करतो. नवीन औत व अवजारे तयार करण्यासाठी त्यास लाकूड पुरवावे लागते. काही वेळेला सुताराच्या मदतीसाठी एखादा गडी द्यावा लागतो. सुतारास द्यावयाचे बलुते औताच्या प्रमाणात ठरलेले असते. सणासुदीच्या दिवशी कोरडा शिधा देण्याची पद्धत असते. लग्नाच्या वेळी सुताराला शिधा व पागोटे अगर दक्षिणा दिली जाते.

**६) न्हावी :** दाढी करणे, केस कापणे हे याचे काम. न्हाव्याला द्यायचे 'बलुते' कुटुंबातील पुरुषाच्या संख्येवर ठरते. या जातीकडून जावळ काढणे, क्षौर करणे, वरातीपुढे दिवा धरणे, विवाहसंबंधात संदेश देणे, लग्नात आहेर जाहीर करणे, जेवणाच्या पंक्तीत वाटप करणे वगैरे कामे केली जातात. त्या बदल्यात कामाप्रमाणे खण, नारळ, कपडे वगैर दिले जाते

**७) परीट :** प्रापंचिक उपयोगाची कामे परीट करतो. घरोघरचे कपडे धुऊन देणे हे त्याचे काम असते. यासाठी त्याला बलुत्याबरोबरच रोज एक भाकरी दिली जात असे.

**८) कुंभार :** कुंभाराची स्वतंत्र वस्ती असते. तिला कुंभारवाडा असे म्हटले जाते. घरी लागणारे राजण, मडकी, लहान गाडगी, पणत्या कुंभार तयार करीत असतो. विटा, कौले यासारख्या वस्तू तो धान्याच्या अगर रोखीच्या मोबदल्यात तयार करून देतो. बेदराच्या (बैल पोळा) सणाला मातीचे बैल, अक्षयतृतीयेस कळसा केळी, दसऱ्यास घट, संक्रांतीस सुगडी इत्यादी वस्तू तो बलुत्यातच पुरवीत असतो.

**९) कोळी :** कोळी हा प्रापंचिक उपयोगाचा बलुतेदार आहे. विदर्भात यास 'धिवर' किंवा 'भूमक' म्हणतात. गावचावडीचे सारवण, गावचावडी स्वच्छ करणे, चावडीत पाणी भरून ठेवणे, सरकारी अधिकाऱ्याचे जेवण वाढणे, भांडी स्वच्छ ठेवणे, परटाकडून कपडे धुऊन आणणे इत्यादी कामे तो करतो. काही ठिकाणी पाणी भरण्याचे काम करतो. याखेरीज खाण्याचा चुना विकण्याचा धंदा तो करतो. लग्नप्रसंगी पाणी भरतो. त्या बदल्यात कोळ्याला जेवण दिले जाते.

**१०) सोनार :** पूर्वी सरकारी सारा नाण्यात द्यावा लागे. त्या वेळी नाण्याची पारख करण्यासाठी सोनाराची गरज भासे. त्याबद्दल त्यास गाव बलुता देई. लग्नकार्यात नवीन देव तयार करणे, मुलांचे कान टोचणे, मुलीचे नाक टोचणे, दागिन्यास उजाळा देणे इत्यादी कामांबद्दल सोनार मोबदला घेतात. गावोगाव हिंडून सोन्याचे दागिने करून देण्याचे काम ते करीत.

**११) गुरव :** हा गावातील देवळाची झाडलोट व पूजा करतो. सणाच्या दिवशी पत्रावळी पुरविण्याचेही काम तो करतो. देवळात आयोजित केलेल्या कथा-कीर्तनास लोकांना बोलाविणे, कीर्तनात व भजनात मृदुंग वाजविणे ही कामे तो करतो. याबद्दल त्यास ओवाळणी मिळते. याशिवाय शेतकऱ्यांकडून धान्याच्या रूपात काही उत्पन्न मिळत असे. देवापुढील नैवेद्य, यात्रांचे उत्पन्न, फेडलेल्या नवसाचे उत्पन्न इत्यादींवर त्याचाच हक्क असतो.

**१२) ग्रामजोशी :** ग्रामदेवतेची पूजा करणे, पंचांग सांगणे, लग्न लावणे, शास्त्रशुद्धरित्या अंत्यविधी करणे, ज्योतिष पाहणे, गावकऱ्यांची पत्रे लिहिणे इत्यादी कामे तो करतो. ग्रामजोशी बहुधा ब्राह्मण जातीचा असतो. शेतकऱ्यांकडून त्याला उत्पन्नाच्या एक टक्का धान्य मिळते.

**अठरा अलुतेदार:**

शेतकऱ्याच्या दृष्टीने विशेष उपयोगाची कामे व्यावसायिकांना वा कारागिराना बलुतेदार असे म्हटले जात असे. बलुतेदाराच्या कामाशिवाय आणखीही काही कामे शेतकऱ्यासाठी आवश्यक असत. ही कामे बलुते

दाराच्या कामांइतकी महत्त्वाची नसली तरी गावकऱ्याच्या इतर गरजा भागविण्याच्या दृष्टीने उपयुक्त समजली जात. अशा प्रकारे थोडी कमी उपयुक्त असलेली कामे करणाऱ्या व्यावसायिकांना 'अलुतेदार' किंवा 'नारू' असे म्हटले जाई.

ग्रामीण समाजातील परंपरागत अलुतेदाराची संख्या अठरा इतकी होती. या अलुते दारामध्ये तेली, तांबोळी, साळी, सणगर, शिंपी, माळी, गोंधळी, डवरी, कलावत, भाट, पडशी, भोई, मुलाणी, गोसावी, वाजंत्री, तराळ, कासार, रामोशी याचा समावेश होतो. अलुतेदारांची गावकऱ्यांना रोजच्या व्यवहारात गरज भासत नव्हती. पण त्यांना काही उपयुक्त सेवा पुरविण्याचे कार्य अलुतेदार करीत असत. त्यामुळे ग्रामीण समाजात त्यांनाही महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. या ठिकाणी हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, वर दिलेली बलुतेदार व अलुतेदार यांची ही विभागणी अगदी काटेकोर नसून काही भागांत व गावांमध्ये त्या त्या ठिकाणच्या वेगवेगळ्या संदर्भानुसार ही विभागणी बदलत असते. सोनार, मुलाणी यासारख्या जातींचा काही ठिकाणी बलुतेदारांमध्ये तर काही ठिकाणी अलुतेदारांमध्ये समावेश केलेला आढळतो.

**बलुतेदारी/जजमानी पध्दतीची वैशिष्ट्ये (Characteristics of Jajmani System) :**

परंपरागत भारतीय समाजजीवन जातिव्यवस्थेवर आधारीत होते. हजारो परीटाकडून वर्षांपासून जातिसंस्था अविरतपणे कार्यशील असल्याचे दिसून येते. म्हणूनच आर्थिक, सामाजिक, राजकीय जीवनात व व्यक्ति जीवनात जाती प्रभावीत होत्या. भारतीय ग्रामीण समाजातील आर्थिक जीवन हे जातीच्या पायावरच उभे होते. बलुतेदारी पध्दती ही त्याचीच निर्मिती होती. या पध्दतीमध्ये बलुतेदाराने इतर जातींतील लोकांची काही सेवा प्रामाणिकपणे करावी व या सेवेप्रीत्यर्थ इतर जातींनी बलुतेदारांच्या उपजीविकेची व्यवस्था करावी असा संकेत होता, यामुळेच या बलुतेदारी पध्दतीत समाजातील भिन्न भिन्न समूहांत सामाजिक संबंध निर्माण झाले होते. म्हणूनच बलुतेदारी पध्दती म्हणजे पारंपरिक भारतीय समाजाचे एक आगळे वेगळे वैशिष्ट्य होते.

**१) वंशपरंपरागत पद्धती :** जन्माने जात ठरते व जातीने व्यक्तीचा व्यवसाय निश्चित होतो. या प्रथेप्रमाणे प्रत्येक जातीचा स्वतंत्र व्यवसाय होता. हा व्यवसाय परंपरागतपणे जन्म व जात यांवरच चालत आला व तसाच तो पुढेही टिकून राहिला. प्रत्येक व्यक्तीने आपल्या जातीने ठरवून दिलेलाच व्यवसाय केला पाहिजे असा दंडक होता. त्यामुळे वंशपरंपरागत ववडिलार्जित धंदा हाच व्यक्तीच्या वाट्याला येत असे. बलुतेदारी पद्धतीत ही वंशपरंपरागत व्यवस्था होती.

विशिष्ट कुटुंबाची सेवा करण्याचे अधिकार पिढयानपिढ्या चालत येतात, एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ते अधिकार अभावितपणे हस्तांतरित होतात. किंबहुना दुसऱ्या पिढीचा तो अलिखित असा अधिकारच असे. ऑस्कर लेविस म्हणतात त्याप्रमाणे बलुत्याच्या अधिकाराने एक व्यक्ती काही कुटुंबांशी संबंधित राहते. हे अधिकार मालमत्तेप्रमाणे पित्याकडून मुलाला मिळतात.

हे बलुतेदाराचे अधिकार पित्याच्या पश्चात वेगळे वेगळे राहणाऱ्या मुलां मध्ये वाटलेही जातात. इतकेच नव्हे तर डॉ. रेड्डी म्हणतात त्याप्रमाणे पित्याला एकच मुलगी वारस असेल तर पित्याच्या पश्चात मुलीचा पती

या बलुतेदारी अधिकाराचा वारस ठरतो. यावरून हे स्पष्ट होते की, बलुतेदारी पद्धतीत वंश परंपरागत व्यवस्था आढळते.

**२) कायम स्वरूपाचे संबंध :** बलुतेदारी पद्धतीत बलुतेदार व विशिष्ट कुटुंब यांचे संबंध कायम स्वरूपाचे असतात. हे संबंध सर्वमान्य असल्याने या संबंधांचे स्वरूप स्थिर होते. बलुतेदार व विशिष्ट कुटुंब यांच्यातील संबंध कोणीही तोडू शकत नव्हता. बलुतेदाराच्या दृष्टिकोणातून हे संबंध त्याच्या उदरनिर्वाहाशी संबंधित होते. आपल्या उपजीविकेकरता त्याला या विशिष्ट कुटुंबावरच अवलंबून राहावे लागत होते. त्यामुळे हे परंपरेने चालत आलेले संबंध तोडणे त्याला परवडण्यासारखे नव्हते. बलुतेदार आपल्या गैरहजेरीत एखादा बदली देऊन त्या कुटुंबाची व्यवस्था करीत असे. त्याचबरोबर त्या विशिष्ट कुटुंबालाही बलुतेदाराशी असलेले संबंध तडकाफडकी तोडता येत नव्हते. अगदीच नाइलाज झाल्यास बलुतेदार बदलला जाई. पण जातिपंचायतीच्या नियमाप्रमाणे बलुरेदार बदलणे हे उचित समजले जात नसे.

**३) साहचर्यावर आधारित असे संबंध :** बलुतेदारी पद्धतीत सर्व जातींना एकत्र येण्याची संधी मिळे. भारतीय समाजात व्यावसायिक गटावरून अनेक जाती निर्माण झाल्या. सामाजिक आचरण, श्रद्धा इत्यादी बाबतीत या सर्व जातींत भेद जरूर होते. पण या सामाजिक स्तरीकरणात सर्व जातींना एकत्र आणण्याचा दुवा म्हणजे बलुतेदारी पद्धती होती. श्री. ऑस्कर लेविस म्हणतात त्याप्रमाणे, एक जातिसमूहाने दुसऱ्या जातिकुटुंबाची सेवा करावी ही अपेक्षा बलुतेदारी पद्धतीत होती. या अपेक्षेप्रमाणेच भिन्नभिन्न गटातील, जातीतील कुटुंबे एकमेकांवर अवलंबून होती. वंशपरंपरागत व्यावसायिक व्यवस्थेनुसार सर्व जातींत साहचर्य निर्माण होणे अपरिहार्य होते. सेवा करणे व सेवा घेणे हे या पद्धतीचे मुख्य होते. सोनार, लोहार, सुतार, मांग, महार इत्यादी सर्व बलुतेदार विशिष्ट कुटुंबाची सेवा करीत असत व त्याच्या मोबदल्यात त्यांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था होत असे. यामुळे सर्व जाती एकत्रआल्या. श्रेष्ठ–कनिष्ठ जाती बलुतेदारी पद्धतीने एका सूत्रात बांधल्या होत्या. श्रेष्ठकनिष्ठत्वाच्या भूमिकेतून शक्य असणाऱ्या जातीय तणावाला यामुळे आळा बसला होता. प्रत्येक व्यक्तीला आपल्या नित्य गरजापूर्तीसाठी समाजावर अवलंबून राहावे लागते ही जाणीव या पद्धतीने सदैव ताजी ठेवली होती. म्हणूनच सर्व जातींचे साहचर्य या पद्धतीने साधले होते; याचे एक प्रातिनिधिक उदाहरण म्हणून डॉ. श्रीनिवास यांनी अभ्यासलेल्या म्हैसूर राज्यातील रामपुरा खेड्याचे देता येईल. शेतकरी कुटुंबातील लग्नासारख्या समारंभप्रसंगी खेड्यातील सर्व जातींचे सहकार्य मिळत असे. ब्राह्मण हा पुजारी असतो. सुतार मंडप उभा करतो. सोनार दागिने तयार करून देतो. कुंभार मडकी पुरवितो. वर–वधूंच्यासाठी परीट कपडे स्वच्छ करून देतो. वर–वधूंच्या मनगटांवर दोरा बांधण्यासाठी धनगर लोकर पुरवितो. न्हावी वराची हजामत करतो. बुरूड टोपल्या देतो. चांभार पादत्राणे बनवून देतो.

**४) व्यावसायिक स्पर्धेचा अभाव :** व्यावसायिक स्पर्धेचा अभाव व त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला मिळालेले संरक्षण हे बलुतेदाराचे वैशिष्ट्यच होते. वंशपरंपरागत व्यवसाय प्रत्येक जातीचे असल्याने व्यावसायिक स्पर्धांना मुळीच वाव नव्हता. एकाच व्यवसायातील बलुतेदारांची संख्या एखाद्या गावात जास्त असल्यास गावातील कुटुंबाची वाटणी या बलुतेदारांत करण्याची पद्धती होती. असे बलुतेदारांचे अधिकार पित्याकडून मुलाकडे हस्तांतरित होत असत. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला एकप्रकारचे आर्थिक संरक्षण मिळत असे.

कुटुंबातील मुलाबाळांनी कोणता व्यवसाय करावयाचा यासंबंधीची चिंता नव्हती. विशिष्ट कुटुंबाच्या सेवेप्रीत्यर्थ बलुतेदारांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था होत असे.

**५) आर्थिक संरक्षण :** बलुतेदारी पद्धतीत व्यक्तीला मिळणाऱ्या आर्थिक संरक्षणाचाच केवळ विचार होता असे नव्हे; तर व्यक्तीच्या सामाजिक संरक्षणाचीही कल्पना अभिप्रेत होती. बलुतेदाराला त्याच्या आयुष्यातील महत्त्वाच्या वेळी व संकटप्रसंगी त्याचे यजमान-कुटुंब सर्वतोपरी साहाय्य करीत असे. त्यामुळे बलुतेदाराच्या महत्त्वाच्या समस्या यजमान कुंटुंबाच्या मदतीने सुटत असत. साहजिकच आर्थिक व सामाजिक संरक्षण मिळाल्याने बलुतेदाराला मानसिक शांती व समाधान मिळत असे. समाजाला योग्य अशी कार्ये प्रत्येकाने करावयाची ही जाणीव त्यात असल्याने मालक व नोकर असे नाते बलुतेदार व विशिष्ट कुटुंब यामध्ये नव्हते. त्यांचे संबंध कौटुंबिक स्वरूपाचे होते. म्हणूनच बलुतेदारी पद्धतीत दोघांचेही समाधानाचे स्थान होते. वर उल्लेखिलेले बलुतेदारी पद्धतीचे वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्म काळाच्या ओघात बदलू लागले. या पद्धतीमुळे ज्या जातींना उच्च व मानाचे स्थान मिळाले होते त्या जाती आपले स्थान टिकवून धरण्याच्या प्रयत्नास लागल्या. स्वतःच्या स्वार्थासाठी या पद्धतीचा वापर होऊ लागला. त्यामुळे या पद्धतीचा समाजावर घोर परिणाम झाला. त्यामुळे काही काळ समाजाला पोषक ठरलेली ही पद्धती कालांतराने समाजाला घातक ठरली.

**बलुता पध्दतीचे गुण किंवा फायदे**

**१) आर्थिक स्वयंपूर्णता :** बलुता पध्दतीमुळे खेड्यांना आर्थिक स्वयंपूर्णता लाभली. खेड्याच्या सर्व गरजांची पूर्तता खेड्यातच होऊ लागली. शेतकरी धान्योत्पादन करुन सर्वांच्या निर्वाहाची सोय करी. तर बलुतेदार- अलुतेदार बिगरशेती व्यवसाय करुन इतर गरजांची पूर्तता करीत. त्यामुळे खेड्यांना बाह्य जगावर अवलंबून रहावे लागत नसे.

**२) सामाजिक ऐक्यास उपयुक्त :** बलुता पध्दती खेड्यात सामाजिक ऐक्य निर्माण करण्यास उपयुक्त ठरली. जातीच्या आधारे लोक वेगवेगळ्या गटात विभागले गेले होते. तरीही त्या सर्व गटांना बलुता पध्दतीने एका सूत्रात बांधले, वेगवेगळ्या जातींमध्ये परस्परावलंबन निर्माण केले. सर्व जाती आपापले व्यवसाय करून एकमेकांच्या गरजा भागवित असल्याने त्यांच्यात सहकार्य भावना, अवलंबन भावना वाढीस लागली. त्यामुळे जातीच्या आधारे आजच्या सारखे जातीय ताणतणाव उद्भवले नाहीत. बलुता-पध्दतीमुळे सर्व श्रेष्ठ कनिष्ठ जातींना एकत्र येण्याची संधी मिळाल्याने ऐक्यभावना निर्माण होऊन ती दीर्घकाळ जोपासली गेली.

**३) व्यवसायाची निश्चिती :** बलुता पध्दतीमुळे व्यक्तीला व्यवसायाची निश्चिती मिळाली. जन्माने जात व जातीवरुन व्यवसाय ठरत असल्याने कोणता व्यवसाय करावा याची चिंता नसे. त्यामुळे व्यक्ती निश्चिंत असे. आजच्या सारखे व्यवसाय शोधत फिरण्याची पाळी व्यक्तीवर येत नसे.

**४) व्यावसायिक शिक्षणाची सोय :** बलुता पध्दतीमुळे व्यक्तीला व्यावसायिक शिक्षण कुटुंबातच मिळण्याची सोय झाली. जातीचाच व्यवसाय करावयाचा असल्याने मुले लहानपणापासूनच कुटुंबात

वडिलधाऱ्या मंडळींच्या हाताखाली व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करीत असत. त्यासाठी आजच्या सारखा शिक्षण प्रशिक्षणावर खर्च करावा लागत नसे.

**५) आर्थिक संरक्षण :** बलुता पध्दतीत व्यक्तीला आर्थिक संरक्षण मिळत असे. जातीचाच व्यवसाय करण्याचे बंधन असल्याने समाजात व्यावसायिक स्पर्धा नव्हती. एकाच व्यवसायातील बलुतेदारांची संख्या गावात जास्त असल्यास गावातील शेतकरी कुटुंबांची वाटणी बलुतेदारांमध्ये केली जाई आणि आपल्या वाट्याच्या कुटुंबांची सेवा करुन बलुते मिळविले जाई. तसेच बलुत्याचे अधिकार बापाकडून मुलांकडे वंशपरंपरेने संक्रमीत होत असत. त्यामुळे व्यक्तीला आर्थिक संरक्षण प्राप्त होई. यजमान शेतकरी कुटुंब आपल्या बलुतेदारास केवळ धान्यच देत नसे तर गरजेनुसार घर बांधण्यासाठी दगड माती, लाकूडफाटा, सरपण, एखादे दुभते जनावर, त्यासाठी चारा, सणावारास भोजन, पोषाख, मुलाबाळांच्या विवाहप्रसंगी आजारपणात मदत इ. गोष्टी पुरवित असे.

**६) सामाजिक संरक्षण :** बलुता पध्दतीत व्यक्तीस सामाजिक संरक्षणही मिळत असे. यजमान कुटुंब व बलुतेदार हे परस्परांच्या सुखदुःखात सहभागी होत. संकटकाळात एकमेकांच्या मदतीसाठी धावून जात. यजमान कुटुंबात जर बारसे, मुंज, डोहाळे जेवण, विवाह, देवकार्य असेल तर बलुतेदारास भोजन, पोषाख, भेटवस्तू देऊन त्याचा मानसन्मान केला जाई. बलुतेदाराची कोणतीही अडचण यजमान शेतकऱ्याच्या सल्ल्याने सोडविली जाई. बलुतेदारास कोणी त्रास देत असेल तर यजमान बलुतेदाराच्या बाजूने उभा राही, त्याला धीर देई. अशाप्रकारे बलुतापध्दतीमुळे व्यक्तीस सामाजिक संरक्षणही मिळत असे.

**बलुतापध्दतीचे दोष किंवा तोटे**

वरीलप्रमाणे बलुता पध्दती व्यक्ती व समुदायाच्या दृष्टीने फायदेशीर असली तरी कालांतराने तिच्यात कांही दोष व अपप्रवृत्ती उदयास आल्या. त्यामुळे ती तोट्याची ठरली. बलुता पध्दतीचे प्रमुख दोष किंवा तोटे पुढीलप्रमाणे :

**१) व्यक्तिस्वातंत्र्यास मारक :** बलुता पध्दती व्यक्तिस्वातंत्र्यास मारक ठरली. व्यक्तीचा व्यवसाय जातीवरुन ठरत असल्याने तिला आपल्या आवडीप्रमाणे व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य नव्हते. बलुता पध्दती जातीसंस्थेवर आधारलेली असल्याने बलुतेदारांना जातीचे निर्बंध लागत. यजमान कुटुंबाकडून पुरेसे बलुते मिळत नसले किंवा कांही त्रास होत असला तरीही बलुतेदारास यजमान कुटुंबाची सेवा करीत रहावे लागे. त्याला यजमान बदलता येत नसे. रूढी परंपरा व जाती पंचायतीचे निर्बंध यांच्या दडपणाखालीच व्यक्तीला वावरावे लागे, जगावे लागे, स्वतंत्र जीवन जगता येत नसे. त्यामुळे एखादा नवा उद्योग धंदा सुरू करावा, आपल्या अंगच्या कलागुणांचा विकास करावा अशी प्रेरणा व्यक्तीला मिळू शकली नाही.

**२) आर्थिक विकासास मारक :** बलुता पध्दती ही व्यक्तिविकासाप्रमाणेच आर्थिक विकासासही मारक ठरली. आर्थिक विकासासाठी समाजात स्पर्धात्मक वातावरण असावे लागते. बलुता पध्दतीत व्यक्तीला जातीचाच व्यवसाय करावा लागत असल्याने समाजात व्यावसायिक स्पर्धा निर्माण होऊ शकली नाही. अशी स्पर्धा नसल्याने व्यक्तीला आर्थिक संरक्षण मिळाले हे जरी खरे असले तरी स्पर्धा नसल्याने विशिष्ट जातीची

मक्तेदारी निर्माण झाली. बलुतेदार आपले व्यवसाय परंपरागत तंत्रानेच करु लागले. आपल्या व्यवसायात सुधारणा करण्याची त्यांना प्रेरणा मिळाली नाही व गरजही भासली नाही. विशिष्ट व्यवसाय विशिष्ट पध्दतीनेच बलुतेदार जाती पिढ्यानपिढ्या करीत आल्या. परिणामी ग्रामीण आर्थिक विकासास चालना मिळू शकली नाही.

**३) अपुरे उत्पन्न :** बलुता पध्दतीत बलुतेदारांना वर्षभर रोजगार उपलब्ध होत नसे. कारण शेती व्यवसाय हा हंगामी असल्याने केवळ हंगामातच शेताशी संबंधित असणाऱ्या बलुतेदारांना यजमान शेतकऱ्याकडे काम मिळत असे. तर मूलभूत गरजा भागविणाऱ्या बलुतेदारांनाही वर्षातून कांही ठराविक दिवसच काम मिळत असे. ऊर्वरीत दिवसात त्यांना रोजगार मिळण्याची खात्री नसे. परिणामी बलुतेदारांचे वार्षिक उत्पन्न अत्यंत तुटपुंजे असे. एखाद्या वर्षी चांगले पिकपाणी न आल्यास वर्षभर यजमानाची सेवा करुनही पूर्वनिर्धारीत बलुत यजमान देऊ शकत नसे. त्यामुळे बलुतेदारांना निर्वाह चालविणे अवघड होई. अशा स्थितीत त्यांना सावकाराकडून भरमसाठ व्याजदराने कर्ज घ्यावे लागे.

**४) शोषणाची व्यवस्था :** बलुता पध्दती ही यजमान शेतकरी व बलुतेदार जाती यांच्यातील साहचर्यावर व सहकार्यावर आधारलेली होती. कालांतराने मात्र बलुता पध्दतीत शेतकऱ्यांचे वर्चस्व निर्माण झाले. बलुतेदार हे निर्वाहासाठी पूर्णपणे शेतकऱ्यांवर अवलंबून होते व बहुसंख्य शेतकरी उच्च जातीचे असल्याने त्यांचे सामाजिक स्थान व दर्जा उच्च होता. या दोन गोष्टींचा शेतकऱ्यांनी गैरफायदा घेतला व आपल्यावर आश्रित असलेल्या कनिष्ठ बलुतेदार जातींचे शोषण सुरु केले. त्यांना अल्प मोबदल्यात किंवा विना मोबदल्यात गुलामासारखे राबवून घेण्यास सुरुवात केली. परिणामी उच्च जातींची विनातक्रार सेवा करणे हे बलुतेदारांचे आद्य कर्तव्य ठरले तर बलुतेदारांकडून सेवा घेणे हा उच्च जातींचा अधिकार मानला गेला. त्यामुळे उच्च जाती ह्या शोषक तर बलुतेदार जाती शोषित बनल्या आणि बलुता पध्दती ही शोषणाची व्यवस्था बनली.

**५) अनिष्ट प्रथांना बळकटी :** बलुता पध्दतीमुळे ग्रामीण समाजातील कांही अनिष्ट प्रथा व परंपरा अधिकच बळकट झाल्या. जातीचे व्यवसायासंबंधीचे निर्बंध व श्रेष्ठ– कनिष्ठत्वाची भावना अधिक भक्कम बनली. बलुतेदारांचे व्यवसाय केवळ कनिष्ठच नव्हे तर तुच्छ व अपवित्र मानण्याची प्रवृत्ती वाढीस लागली. महार, मांग, चांभार, ढोर इ. अस्पृश्य बलुतेदारांना वेठीस धरून राबविण्याची प्रथा सुरु झाली. त्यांच्यावर अन्याय, अत्याचार करणे हे उच्च जातींना वावगे वाटेनासे झाले. परिणामी उच्च जातीविषयी अस्पृश्य जातींच्या मनात कटुतेची भावना निर्माण झाली आणि जातीय तेढ निर्माण होण्यास मदत झाली.

**बलुतापध्दतीतील परिवर्तन**

प्राचीन काळापासून भारतीय समाजात बलुता पध्दतीने महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली. परंपरागत कृषी अर्थव्यवस्थेशी ही पध्दती सुसंगत ठरली. तथापि आधुनिक काळात मात्र बलुता पध्दती अनेक कारणांमुळे मोडकळीस आली आहे. ब्रिटिश राजवटीत भारतीय समाजात औद्योगिकीकरण, नागरीकरण या प्रक्रिया सुरू झाल्या. तसेच भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा उदय झाला. त्यामुळे वस्तूविनिमय पध्दतीच्या जागी मुद्राप्रधान

व्यवस्था आली. शिक्षण प्रसारास सुरुवात झाली. सामाजिक व राजकीय सुधारणांच्या चळवळी सुरू झाल्या. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या सर्व प्रक्रियांची गती दिवसेंदिवस वाढतच गेली. त्यामुळे बलुता पध्दतीवर आघात होऊन ती आज कोलमडून पडली आहे. तिच्यामध्ये आमूलाग्र परिवर्तन घडून आले आहे. या परिवर्तनाचे स्वरुप पुढील प्रमाणे :

**१) व्यवसाय स्वातंत्र्य :** बलुता पध्दतीत व्यवसाय स्वातंत्र्याचा अभाव होता. व्यक्तीला स्वजातीचा व्यवसाय करणे बंधनकारक होते. इतर जातीचा व्यवसाय करणाऱ्यास जातीपंचायती शिक्षा करीत. आज मात्र भारतीय राज्यघटनेने सर्वांनाच व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य दिल्याने कोणत्याही जातीची व्यक्ती आवश्यक ती पात्रता धारण करून आपल्या आवडीचा व्यवसाय निवडू शकते. जातीचाच व्यवसाय करण्याची सक्ती आज राहिली नाही.

**२) रोख मोबदला :** आज जातीचाच व्यवसाय करण्याची सक्ती राहिली नसली तरी खेड्यात अनेक बलुतेदार आपल्या जातीचा व्यवसाय करताना दिसतात. तथापि मुद्राप्रधान अर्थव्यवस्थेचा प्रभाव वाढल्याने ते श्रमाचा मोबदला धान्याऐवजी पैशात घेण्यावर भर देत आहेत.

**३) व्यवसायांचे आधुनिकीकरण :** आज अनेक बलुतेदारांच्या परंपरागत व्यवसायांचे मोठ्या प्रमाणावर आधुनिकीकरण झाले आहे. त्यामुळे त्या व्यवसायाद्वारे पैसा व प्रतिष्ठाही मिळवता येऊ लागली आहे. त्यामुळे सुतार, लोहार, चांभार, न्हावी, परीट असे बलुतेदार खेड्यात राहून बलुत्यात सेवा देण्याऐवजी शहरात जाऊन आपापले व्यवसाय आधुनिक पध्दतीने करु लागले आहेत. उदा. खेड्यातील सुतार शहरात येऊन फर्निचर बनवितो, परीट लाँड्री काढतो, न्हावी सलून काढतो, शिंपी टेलरिंगचे दुकान काढतो. त्यामुळे त्यांना कामाचा रोख मोबदला मिळतो. आज पैशाला प्रचंड महत्त्व आल्याने उच्चजाती देखील कनिष्ठ जातीचे व्यवसाय करु लागल्या आहेत.

**४) सामाजिक जागृती :** आज कनिष्ठ बलुतेदार जातीतही शिक्षण प्रसार झाल्याने त्यांच्यात वैचारिक व सामाजिक जागृती घडून आली आहे. सुशिक्षित तरुणांना बलुता पध्दती ही गुलामगिरी वाटत आहे. जातीवर आधारलेली उच्चनीचता त्यांना मान्य नाही. त्यामुळे उच्च जातीची सेवा करणे हे त्यांना आपले कर्तव्य वाटत नाही. त्यामुळे त्यांनी बलुतापध्दतीकडे पाठ फिरविली असून आधुनिक अर्थव्यवस्थेत उपलब्ध झालेल्या नवनविन व्यवसायांचा ते स्वीकार करु इच्छितात. अशाप्रकारे बलुतेदार जातीत झालेल्या जागृतीमुळे बलुतापध्दतीचे अधिष्ठान किंवा पाया उखडला गेला. त्यामुळे ती कोलमडून पडली.

**५) शेतीचे आधुनिकीकरण :** परंपरागत समाजात शेती व्यवसाय केंद्रस्थानी ठेवून बलुतापध्दतीची उभारणी केली होती. तथापि त्यावेळी शेती व्यवसायातील उत्पादनतंत्रे व साधने मागासलेली होती. त्यामुळे परंपरागत पध्दतीने आपले व्यवसाय करणारे सुतार, लोहार, चांभार, मांग इ. बलुतेदार उपयुक्त ठरत होते. आज मात्र शेतीचे आधुनिकीकरण होऊ लागले आहे. नवनवीन व प्रगत उत्पादन तंत्रे व अवजारे उदयास आली आहेत. त्यांची निर्मिती व दुरुस्ती करणे हे परंपरागत बलुतेदारांना शक्य नाही. ट्रॅक्टर, डिझेल इंजिन, विजेचे पंप, पाईप लाईन व कूपनलिकांचे साहित्य इ. ची निर्मिती व दुरुस्तीसाठी कारखाना पध्दती व

प्रशिक्षित तंत्रज्ञांची गरज भासते. त्यामुळे साहजिकच पारंपारिक बलुतेदार आधुनिक शेती व्यवसायाबाहेर फ़ेकले गेले आहेत. थोडक्यात जेथे शेतीचे आधुनिकीकरण झाले आहे तेथे बलुता पध्दतीचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

**बलुतापध्दतीतील परिवर्तनाची कारणे**

**१) औद्योगिकीकरण :** ब्रिटिश राजवटीत सुरू झालेल्या औद्योगिकीकरणाची गती स्वातंत्र्यानंतर वाढत गेली. मोठमोठे उद्योगधंदे निघाले. उद्योगधंद्यात कामगार भरती ही व्यक्तीच्या जातीऐवजी गुणकौशल्याच्या आधारे होऊ लागली. त्यामुळे बलुतेदार बलुत्याचा त्याग करुन उद्योगधंद्यात कामगार म्हणून भरती होऊ लागले. त्यामुळे बलुता पध्दतीस परिवर्तन घडून आले.

**२) नागरीकरण :** औद्योगिकीकरणाबरोबरच नागरीकरणाचीही गती वाढली. शहरे ही उद्योग, व्यापार, शिक्षण यांची केंद्रे बनली. शहरात बाजारपेठा, बँका, शिक्षणसंस्था, शासकीय-निमशासकीय कार्यालये इ. मोठ्या प्रमाणावर निघाली. म्हणजेच शहरात रोजगाराच्या नवनवीस संधी विपुल प्रमाणात उपलब्ध झाल्या. महत्वाचे म्हणजे शहरातील ह्या रोजगारात किंवा व्यवसायात अधिक मानसन्मान, प्रतिष्ठा, वेतन व सोयी सुविधा मिळू लागल्या. त्यामुळे खेड्यातील बलुतेदार-अलुतेदार शहरी व्यवसायाकडे आकर्षित झाले. परिणामी बलुत्याचा त्याग करुन शहराकडे ते नविन व्यवसायाच्या शोधार्थ स्थलांतर करू लागले. शहरात जातीचाच व्यवसाय करण्याचे बंधन नसल्याने त्यांना नवे व्यवसाय मिळविण्यात रुढी परंपरांचा अडथळा येईनासा झाला. कांही बलुतेदार शहरात येऊनही आपल्या जातीचा व्यवसाय बलुत्याऐवजी रोख मोबदल्यात करु लागले. अशाप्रकारे नागरीकरणामुळे बलुता पध्दतीवर मोठा आघात झाला.

**३) दळणवळणाची प्रगत साधने :** पूर्वी दळणवळणाची प्रगत व पुरेशी साधने नसल्याने खेड्यांचा बाहेरील जगाशी फारसा संपर्क येत नव्हता. ग्रामीण व्यक्तीला तिची इच्छा असो वा नसो जातीचाच व्यवसाय बलुत्यात करीत खेड्यातच जीवन कंठावे लागे. खेडे सोडून तिला बाहेर जाता येत नसे व नवा व्यवसायही करता येत नसे. म्हणजेच भौगोलिक व व्यावसायिक गतिशीलतेस वाव नसल्याने बलुता पध्दती व्यक्तीला स्वीकारावीच लागे. आधुनिक काळात दळणवळणाची प्रगत साधने अस्तित्वात आल्याने खेड्यांचा बाह्य जगाशी नित्य व घनिष्ठ संपर्क येऊ लागला. वृत्तपत्रे, मासिके, आकाशवाणी, दूरदर्शन या साधनांमुळे नवीन ज्ञान, विचार, कल्पना, मूल्ये यांची ओळख बलुतेदार जातींना होऊ लागली. त्यामुळे जातिप्रथा व बलुतापध्दती अन्यायकारक आहेत याची जाणीव त्यांना झाली. परिणामी त्यांचा त्याग करुन खेड्याबाहेर ते स्थलांतर करु लागले. मोटार, रेल्वे इ. वाहतूक साधनांमुळे हे स्थलांतर सुलभ व शक्य झाले. दळणवळणाच्या प्रगत साधनांमुळे भौगोलिक व व्यावसायिक गतिशीलतेस चालना मिळाली. परिणामी बलुता पध्दती कोलमडून पडली.

**४) शिक्षण प्रसार :** ब्रिटिश राजवटीत स्त्री व शूद्रासह सर्वांना शिक्षण खुले झाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर खेड्यापाड्यातही शिक्षणसंस्था सुरू झाल्या. बलुतेदार - अलुतेदारांची मुले शिकू लागली. शिक्षणामुळे त्यांना समता, बंधुत्व, न्याय, मानवता या मूल्यांची ओळख होऊ लागली. त्यामुळे त्यांची अस्मिता जागृत

झाली. जातिव्यवस्था व बलुतापध्दती त्यांना अन्यायकारक व गुलामगिरीसारखी वाटू लागली. त्यामुळे शिक्षण घेऊन अधिक सन्मानाचे व्यवसाय मिळविण्याचे प्रयत्न त्यांनी सुरु केले. राखीव जागांच्या तरतुदीमुळे त्यांचे हे प्रयत्न यशस्वी होऊ लागले.

**५) सुधारणा चळवळ :** ब्रिटिश राजवटीत म. फुले, राजर्षि शाहू, डॉ. आंबेडकर, महर्षि शिंदे इ. समाजसुधारकांनी कनिष्ठ जातींच्या उध्दाराच्या चळवळी सुरु केल्या. त्यामुळे त्यांना आपल्या न्याय्य हक्कांची जाणीव झाली. त्या हक्कांच्या प्राप्तीसाठी त्यांनी संस्था व संघटना स्थापन करुन चळवळी सुरू केल्या. त्यामुळे बलुतेदार - अलुतेदार जातींच्या ठिकाणी आत्मतेज, आत्मविश्वास, लढाऊ वृत्ती निर्माण झाली. परिणामी बलुता पध्दतीचे जोखड त्यांना झुगारून देणे शक्य झाले.

**६) लोकसंख्या वाढ :** भारतातील वाढत्या लोकसंख्येचा भार शेती व्यवसायावर पडत गेला. शेती व्यवसायात सर्वांनाच रोजगार मिळेनासा झाला. बलुतेदारांची संख्या ही वाढल्याने त्यांनाही बलुता पध्दतीत रोजगार मिळणे अवघड झाले. त्यामुळे बेकार झालेले बलुतेदार- अलुतेदार नव्या रोजगाराच्या शोधार्थ गावाबाहेर पडू लागले. परिणामी बलुता पध्दतीचा ऱ्हास होणे अपरिहार्य ठरले.

**७) लोकशाही व्यवस्था :** स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने लोकशाही राज्यपध्दती स्वीकारली. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता या मूल्यांवर आधारलेली समाजव्यवस्था उभारण्यासाठी आवश्यक असणाऱ्या तरतुदी राज्यघटनेत केल्या. सर्व भारतीयांना समान लेखून, धर्मभेद, जातिभेद, लिंगभेद, अस्पृश्यतापालन, वेठबिगार प्रथा इ. अनिष्ट प्रथांचे कायद्याने उच्चाटन केले. तसेच सर्व भारतीयांना व्यवसाय स्वातंत्र्य व देशात कोठेही भ्रमण करण्याचे व वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य राज्यघटनेने दिले. त्यामुळे बलुतेदारांना परंपरागत व्यवसायाचा त्याग करुन हव्या त्या ठिकाणी जाऊन हवा तो व्यवसाय करणे शक्य झाले. अशाप्रकारे बलुतापध्दतीतील सक्ती, जबरदस्ती व उच्चनीचता कायद्याने संपुष्टात आणल्याने तिचे अधिष्ठान कोसळले.

**८) मुद्राप्रधान अर्थव्यवस्थेचा प्रभाव :** आधुनिक काळात मुद्राप्रधान अर्थव्यवस्थेचा प्रभाव सर्वत्र वाढत चालला आहे. उत्पादीत माल बाजारपेठेत विकून जास्तीत जास्त नफा मिळविणे हे या अर्थव्यवस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्यामुळे केवळ पोटासाठी बलुत्यात राबणे हे बलुतेदारांना नकोसे वाटणे स्वाभाविक आहे. म्हणून आपल्या आवडीचा व्यवसाय करुन पैसा कमावणे व आपली आर्थिक प्रगती साधणे हे त्यांचेही उद्दिष्ट बनले आहे.

### ३.२.३ राजकीय जीवन: रचना व बदल

समाजाच्या सर्वच क्षेत्रात राजकारण आढळून येते. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात नि प्रत्येक ठिकाणी राजकारणाशिवाय व्यक्ती जगूच शकत नाही. राजकारण हा शब्दच मुळामध्ये सर्वस्पर्शी व सर्वव्यापक बनला आहे. राजकारण हे आपल्या दैनंदिन जीवनाचे अंग बनले आहे. प्राचीन काळी भारतीय खेडी जशी आर्थिकदृष्टीने स्वयंपूर्ण होती तशीच राजकीय दृष्टीने ही स्वायत्त होती. प्राचीन खेड्यांचे संपन्न व बलशाली असे जे चित्र दिसते त्याचे कारण म्हणजे ग्रामपंचायतींनी खेड्यांना दिलेले स्थैर्य आहे. ग्रामपंचायती खेड्यांचा

कारभार समर्थरीत्या चालवीत असत. विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे दळणवळणाच्या साधनाअभावी तत्कालीन राज्यसत्ता खेडेगावांच्या कारभारात हस्तक्षेप करीत नसे. खेड्यातील शेतसारा गोळा करण्यापुरतीच राज्यसत्ता खेड्यांशी संबंध ठेवीत असे. म्हणूनच खेड्यांना स्वयंशासनाची जबाबदारी पत्करावी लागली. ग्रामपंचायतीचा उदय या परिस्थितीतूनच झाला. ग्रामपंचायतीची खेड्याची शासनव्यवस्था कालांतराने इतकी रूढ झाली की, आर्थिक, सामाजिक व राजकीय जीवनाचे केंद्रस्थान म्हणून खेड्यांना महत्त्व लाभले.

**रचना:**

प्राचीन ग्रामपंचायती खेड्याचा सर्व कारभार स्वतंत्रपणे पाहत असत. सर्व कारभारविषयक पंचायतीचे मत हे अंतिम मानले जाई. सदस्यांच्या पात्रतेसाठी वेळोवेळी केले गेलेले नियम पंचायतच ठरवीत असे. ग्रामपंचायतीची संपूर्ण घटना व नियमावली ग्रामपंचायतच करीत असे. ग्रामपंचायतीच्या परंपरागत अधिकारात वा कार्यपद्धतीत मध्यवर्ती राज्यसत्तेकडून ढवळाढवळ होत नसे. दक्षिण व उत्तर भारतातील प्राचीन खोदकामावरून हे स्पष्ट होते की, मध्यवर्ती शासन फक्त ग्रामपंचायतीवर नियंत्रण ठेवीत असे. पण त्यांच्या दैनंदिन कारभारात कधीच हस्तक्षेप करीत नसे. पंचायतीतील सदस्यांच्या गैरवर्तणुकीबद्दल त्यांचे सदस्वत्व रद्द करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीचा होता. चोल राजाच्या काळातील (इ. स. ९०० ते १३००) पुराव्यावरून हे स्पष्ट होते की ग्रामपंचायती स्वायत्त होत्या. मराठा काळातील काही पुरावे असे उपलब्ध आहेत की, श्री शिवाजी महाराज, श्री राजाराम महाराज व श्री शाहू महाराज अशाच दाव्यांचा विचार करीत असत की, जे दावे राज्यांच्याकडे पंचायतीमार्फत आलेले असत. पंचायतीने निर्णय न घेतलेले दावे पुन्हा पंचायतीकडे पाठविल्याचे पुरावे सापडतात. म्हणूनच प्राचीन ग्रामपंचायतीच्या स्वायत्ततेबद्दल डॉ. राधाकुमुद मुकर्जी म्हणतात,  राज्य सरकार व स्थानिक सरकार हे दोन घटक एकमेकांपासून अलिप्त व काही अंशी स्वतंत्र परंतु राष्ट्रीय व सामूहिक जीवन व कार्ये यांची स्वावलंबी केंद्रे म्हणून काम करीत असत.

**खेड्याचा राज्यकारभार :**

प्राचीन ग्रामपंचायती खेड्याचा सर्वकष राज्यकारभार अत्यंत नेटकेपणाने पाहत असत. द. भारतातील काही पुराव्यांवरून हे स्पष्ट होते की जमीनसारा गोळा करण्यापासून कितीतरी ग्रामोपयोगी कार्ये ग्रामपंचायती पार पाडीत असत. शेतसायाची रक्कम निश्चित करणे व शेतसारा गोळा करून राजसत्तेच्या गंगाजळीत भरणे हे ग्रामपंचायतीचे प्रमुख कार्य होते. खेड्याचे संरक्षण करणे व खेड्यात कायदा व सुव्यवस्था राखणे. तसेच गावातील तंटेबखेडे सोडवणे हे ग्रामपंचायतीचे सर्वांत महत्त्वाचे कार्य होते. तंट्याचे मूळ शोधून काढून न्याय निःपक्षपातीपणाने देण्याचे अवघड काम ग्रामपंचायतीने केल्याचे पुरावे आहेत.

सार्वजनिक कल्याण हे ध्येय ठरवून ग्रामपंचायतींचा कारभार चोख, स्वच्छ व नेटका करण्याची दक्षता प्राचीन ग्रामपंचायतींनी घेतली होती. शुक्रनीतिसारमध्ये असा उल्लेख आहे की खेड्यातील एखाद्या ग्रामसेवका संबंधी जर राजाकडे लोकांच्या सतत तक्रारी येऊ लागल्या तर राजाने ग्रामसेवकाची बाजू न घेता प्रजेची बाजू घेतली पाहिजे. जवाहरलाल नेहरूंनी ग्रामपंचायतीच्या चोख कारभाराचे दर्शन त्यांच्या Discovery of India वा पुस्तकात केले आहे. ते म्हणतात, पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करताना जात, कुटुंब, वर्ण याचा

विचार न करता काम, चारित्र्य व गुण यांनाच महत्त्व दिले जात होते. कारण ब्राह्मणाची योग्य वृत्ती वर्णातून किंवा पूर्वजापासून निर्माण होत नाही. प्राचीन ग्रामपंचायतींच्या निःस्पृह, स्वच्छ व समर्थ कारभारामुळेच भारतीय खेडी अनेक आपत्तींत तरली. भारतीय खेडयाची परिपूर्ण स्वयंशासनाची पद्धती पाहून अफगाण व मुस्लिम राज्यकर्त्यांनी भारतीयांच्या परंपरा व रूढींत कोणतीच ढवळाढवळ केली नाही. गियासुद्दीन तुघलकाने तर प्रयागत कायद्यात (Customary law) हस्तक्षेप करू नये अशी आज्ञा आपल्या अधिकाऱ्यांना दिली होती. ग्रामीण समाजाची शक्ती व प्रेरणा ग्रामपंचायतीत सामावलेली होती. म्हणून वैदिक कालापासू ते ब्रिटिश आमदानीपर्यंत कित्येक राजे आले व गेले पण खेडयांचे स्वायत्त व संघटित जीवन कायम राहिले.

**प्राचीन ग्रामपंचायतींच्या विघटन :**

भारतीय समाजजीवन उद्ध्वस्त होण्यास अकराव्या शतकातील मुस्लिम आक्रमण हे प्रमुख कारण आहे. मुस्लिम आक्रमकांनी अराजकता, अनागोंदी कारभार, मूर्तिभंजन व लुटालूट यांना ऊत आणला. सोळाव्या शतकात मुस्लिम आक्रमक भारतात स्थिर होऊ लागल्याबरोबर प्राचीन भारतीय समाज जीवनाचे सुखद चित्र बदलू लागले. सम्राट अकबराचा काल सोडला तर कोणत्याही मुस्लिम राजाची दृष्टी विधायक नव्हती. प्राचीन भारताचे संपन्न, स्वायत्त व स्वयंपूर्ण जीवन पूर्णतया विसकटून टाकण्याची विध्वंसक दृष्टी त्यांची होती. आपले पाय भारतात पक्के रोवले जाताच मुस्लिम राज्यकर्त्यांनी जहागिरी पद्धती सुरू केली व जमीनसारा गोळा करण्याची जबाबदारी मालगुजारांच्यावर टाकली. ग्रामपंचायतीचे कारभारविषयक हक्क व अधिकार काढून घेऊन, गावकारभार स्थानिक जमीनदार व नियुक्त केलेल्या सरकारी पदाधिकाऱ्यांच्याकडे देण्यात आले. साहजिकच विधायक दृष्टी नसलेल्या व भारतीय समाज-जीवनाबद्दल प्रेम नसलेल्या मुस्लिम राज्यकर्त्यांनी लोकांना पिळून काढलेच, पण त्याचबरोबर स्वावलंबी ग्रामसंस्था खिळखिळया करून टाकल्या. छत्रपती शिवाजी महाराजांनीच ग्रामसंस्थेचे हे दुर्दैवी दिवस संपवले. अष्टप्रधान मंडळाची स्थापना करून घटनात्मक राजवटीची सुरुवात छत्रपतींनी केली. पण नंतरच्या मुसलमान अमदानीत प्राचीन स्वयंशासित संस्थांची शान संपली व एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत प्राचीन ग्रामसंस्था नामशेष झाल्या. मुस्लिम राज्यकर्त्यांच्या काळात सुरू झालेल्या ग्रामसंस्थांच्या विघटनाला ब्रिटिश राज्यकर्त्यांनी जाणीवपूर्वक प्रोत्साहन दिले.

मुसलमानी अमदानीत ग्रामपंचायतींना राजसत्तेचे प्रोत्साहन न मिळाल्याने ग्रामपंचायती स्थितिशील व निष्क्रिय होत गेल्या. राजसत्तेने निर्माण केलेल्या प्रतिकूल परिस्थितीमुळे ग्रामपंचायती या काळात कोणतीच प्रगती करू शकल्या नाहीत. पण प्राचीन ग्रामपंचायतीच्या खऱ्या विघटनाला ब्रिटिशांनी विलक्षण वेग दिला. ब्रिटिशांनी स्वीकारलेल्या धोरणाचा विपरीत परिणाम ग्रामपंचायतीवर झाला, ज्या ग्रामपंचायतींनी भारतीयांना स्थैर्य, स्वाभिमान, एकजिनसीपणा व आत्मविश्वास दिला होता त्या ग्रामपंचायती निष्प्राण करणे भारतीय समाजजीवनाच्या दृष्टिकोणातून योग्य नसले तरी ब्रिटिशांना आपले पाय या भूमीत घट्ट रोवण्या करिता आवश्यक वाटले. ग्रामपंचायतीची भारतीय मनावरची पकड सैल करण्या साठीच ब्रिटिशांनी जाणीवपूर्वक पाउले उचलली. त्यामुळे प्राचीन ग्रामपंचायती ११ व्या शतकातील वादळात जरी टिकून राहिल्या तरी एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत ब्रिटिशांनी नियोजनपूर्वक ग्रामपंचायतींचा विनाश घडवून आणला.

**ग्रामीण राजकीय परिवर्तन:**

**१. राजकीय जागृती :** ब्रिटिश राज्यकर्त्यांनी सत्तेच्या केंद्रिकरणाचे धोरण स्वीकारून परंपरागत ग्रामपंचायतीचे अधिकार काढून घेतले. त्यामुळे खेड्यांची पूर्वीची राजकीय स्वायत्तता नष्ट झाली. आणि ग्रामीण राजकीय जीवनात पोकळी निर्माण झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकशाही राज्यव्यवस्था स्वीकारल्याने ग्रामीण लोकांचाही राजकारण, राजकीय पक्ष, निवडणुका, मतदान इत्यादींशी संबंध येऊ लागला. त्यामुळे त्यांच्यात राजकीय जागृती निर्माण होऊन त्यांचा राजकीय सहभाग वाढू लागला.

**२. सत्ताप्राप्ती :** स्वातंत्र्यानंतर लोकशाही विकेंद्रिकरणाच्या तत्त्वाचा स्वीकार करून ग्रामीण भागात पंचायत राज्यपद्धती सुरू झाली. गावस्तरावर ग्रामपंचायत, गटस्तरावर पंचायत समिती व जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद या तीन प्रातिनिधिक संस्था स्थापन केल्या. त्यामुळे ग्रामीण लोकांना राजकीय सत्ता प्राप्त झाली आहे. पंचायत राज्यामुळे त्यांना राजकारणाचे व लोकशाहीचे धडे मिळू लागले आहेत.

**३. नेतृत्वात बदल :** आज ग्रामीण नेतृत्वातही बदल झाला आहे. पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे, इनामदार, जहागिरदार अशा पारंपारिक नेतृत्वाच्या जागी सुशिक्षित तरुण व लोकशाही पद्धतीचे नेतृत्व आले आहे. मात्र हे नवे नेतृत्व जातीवाद, पैसा, दहशतवाद इत्यादीवर पोसले जात आहे. खेड्याच्या विकासाकडे दुर्लक्ष करून हे नेतृत्व गटातटाचे स्वार्थी राजकारण करू लागल्याने ग्रामीण भागातील पूर्वीचे ऐक्य व शांतता भंगली असून जातीय ताणतणाव वाढला आहे. राखीव जागांच्या धोरणामुळे अनुसूचित जाती, जमाती व स्त्रियांना राजकीय सत्तेत वाटा मिळू लागला आहे. मात्र त्यांचा फारसा प्रभाव अद्याप निर्माण झालेला नाही.

## **३.३ सारांश** (Let us sum up )

या अध्ययन घटकात तुम्ही विवाह, कुटुंब आणि नातेसंबंध जात आणि बलुतेदारी राजकीय जीवन:रचना व बदल संस्थाचा अभ्यास केलेला आहे. सर्वप्रथम विवाहाचा व्याख्या, विवाहाचा उद्देश, विवाहाचे निवासविषयक नियम आणि विवाहसंस्थेतील आधुनिक परिवर्तन याचा अभ्यास केला. त्यानंतर ग्रामीण समाजातील कुटुंब संस्थेचा अभ्यास केला. यामध्ये कुटुंबाची व्याख्या ग्रामीण कुटुंब संस्थेची काही महत्वाची वैशिष्ट्ये पाहिली जसे-१. संयुक्त कुटुंब २. पितृसत्ताक कुटुंब ३. कुटुंबप्रमुखाचे वर्चस्व ४. प्रामुख्याने शेती हाच मुख्य व्यवसाय ५. सामुहिक भावना ६. नियंत्रण व्यवस्था ७. सामूहिक धार्मिक व सांस्कृतिक जीवन ८. कुटुंबाभिमान ९. सापेक्षतः स्थिर कुटुंब इ. तसेच ग्रामीण कुटुंबाची कार्य, ग्रामीण समाजात कुटुंबाचे महत्व, ग्रामीण कुटुंबातील परिवर्तन यामध्ये अ) कुटुंबाच्या रचनेतील परिवर्तन ब) कुटुंबाच्या कार्यातील परिवर्तन याचा आढावा घेतला. आणि यानंतर नातेसंबंध, जातिसंस्था किंवा जातीव्यवस्था, जातीची संकल्पना, जातीचे स्वरुप, जातिव्यवस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये, जातिव्यवस्थेचा ग्रामीण समाजावरील प्रभाव यामध्ये अ) आर्थिक जीवनावरील प्रभाव ब) सामाजिक जीवनावरील प्रभाव क) शैक्षणिक जीवनावरील प्रभाव ड) धार्मिक जीवनावरील प्रभाव ई) राजकीय जीवनावरील प्रभाव तसेच जातीचे बदलते स्वरुप याचा अभ्यास केला. नंतर बलुतेदार पद्धती, बलुतापद्धतीची व्याख्या, बारा

बलुतेदारांची कामे आणि अठरा अलुतेदारनच काम याचा आढावा घेतला. नंतर जजमानी पध्दतीची वैशिष्ट्ये, बलुता पध्दतीचे गुण आणि दोष, बलुतापध्दतीतील परिवर्तन, बलुतापध्दतीतील परिवर्तनाची कारणे आणि शेवटी ग्रामीण राजकीय जीवन: रचना व बदल समजावून घेतले आहे.

## ३.४ स्वयं अध्यानासाठी प्रश्न (Check Your Progress)

* **एका वाक्यात उत्तरे द्या**

 १. विवाहाची व्याख्या द्या

 २. विवाहाचे कोणतेही दोन उद्देश सांगा

 ३. कुटुंबाची व्याख्या द्या

 ४. नातेसंबंध म्हणजे काय

 ५. जातीव्यवस्थेचे कोणतेही दोन वैशिट्य सांगा

 ६. जजमानी पद्धत म्हणजे काय

## ३.५ स्वयंअध्यान पप्रश्नाची उत्तरे (Answer to cheek your progress)

१) गिलिन - स्त्री पुरुष यांच्यात लैंगिक संबंध प्रस्थापित करण्याचा समाजमान्य मार्ग म्हणजे विवाह होय.

२) माता-पिता आणि अपत्य यांच्यात नवीन अधिकार व दायित्वाची भावना निर्माण करणे, संस्कृतीचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरण करणे, धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक उद्देशांची पूर्तता करणे, सामाजिक सुरक्षा प्रदान करणे इत्यादी विवाहाचे उद्देश आहेत.

३) मॅकायव्हर व पेज यांच्या मते प्रजोत्पादन व बालसंवर्धन करण्यासाठी पुरेसा लहान व कायम स्वरूपाच्या लैंगिक संबंधावर आधारलेला असा समूह म्हणजे कुटुंब होय.

४) कुटुंब हा सर्वव्यापी व सर्वांत महत्त्वाचा नातेसमूह आहे. मानवाचे प्राथमिक नातेसंबंध कुटुंबात पाहावयास मिळतात. इतर आप्तांशी व पर्यायाने समाजातील इतर व्यक्तींशी परस्परसंबंध ठेवण्याविषयीचे शिक्षण कुटुंबातच देण्यात येते. माता, पिता, पती, पत्नी, पुत्र, पुत्री, ज्येष्ठ व कनिष्ठ बंधू, भगिनी या सर्वांचे परस्परसंबंध हे प्राथमिक नातेसंबंध होय.

५) समाजाची खंडात्मक विभागणी, उच्चनीचतेची क्रमवारी किंवा सोपान परंपरा ही जातीव्यवस्थेचे वैशिट्य आहेत

६) शेती हा व्यवसाय व्यवस्थित पार पाडण्याकरिता ज्या ज्या लोकांच्या सेवा घेणे आवश्यक होते, त्या त्या लोकांच्या सेवेचा मोबदला पारंपरिक पद्धती प्रमाणे दिला जाई. या पद्धतीलाच बलुतेदारी पद्धती असे म्हणतात.

## ३.६ चिंतन व कार्य (Reflection and Action)

- तुमच्या जवळच्या खेड्याला भेट द्या आणि तेथील कुटुंबसंस्थेतहोत असलेले परिवर्तन समजावून घ्या व त्याची नोंद करा.
- खेड्याला भेट देऊन तेथील जातीव्यवस्थेची नोंद करा.
- एकाद्या खेड्यातील राजकीय व्यवस्थेचा अभ्यास करा

## ३.७ संदर्भसूची


१. समाजशास्त्र मूलभूत संकल्पना : डॉ. बी. एम. कऱ्हाडे, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

२. ग्रामीण समाजशास्त्र : प्रा. चंद्रकांत खंडागळे, प्रकाशक – सौ. मायादेवी खंडागळे, सांगली

३. ग्रामीण समाजशास्त्र : प्रा. डॉ. गुरुनाथ द. नाडगोंडे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर, पुणे

४. ग्रामीण समाजशास्त्र : प्रा. शेख जहारा ए. आर, प्रा. जोंधळे इश्वर एन., आनंद प्रकाशन, औरंगाबाद.

५. ग्रामीण समाजशास्त्र: प्रा. ए. वाय. कोंडेकर , प्रा. पी. व्ही. चांदोरकर, फडके प्रकाशन, कोल्हापूर


❑❑❑

# घटक – ४
# भारतीय कृषक समाजातील बदल
## (Changing Indian Agrarian Society)

**घटक संरचना**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

४.२.१ ग्रामीण सहकारी संस्था आणि उद्योग

४.२.२ बाजारपेठा, जमीनधारणा आणि हरीत क्रांती

४.२.३ शेतीविषयक (कृषक) समस्या (Agrarian Issues)

४.३ सारांश

४.४ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठीचे प्रश्न

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्टे :–

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास;

१) ग्रामीण सहकारी संस्था आणि ग्रामीण उद्योग समजून घेता येईल.

२) बाजारपेठा, जीमण सुधारणा आणि हरीतक्रांती समजून घेता येइल.

३) शेती विषयक समस्या समजून घेता येईल.

## ४.१ प्रस्तावना:–

शेती (कृषी) हा भारतीय ग्रामीण समाजाचा मुख्य व्यवसाय आहे. प्राचीन काळापासून हा व्यवसाय चालत आलेला आहे. संयुक्त कुटंब, जाती प्रथेवर आधारलेली बलुता पध्दती व ग्रामपंचायती या तीन संस्थामुळे पारंपारिक भारतीय ग्रामीण समाजास आर्थिक स्वंयपूर्ण व राजकीय स्वायत्तता लाभलेली होती.

त्यामुळे ग्रामीण जीवन साधे पण सुख समाधानाचे होते. मोगल राजवटीपर्यंत ही स्थिती टिकून होती. ब्रिटिश राजवटीत मात्र परंपरागत ग्रामीण जीवनाचे व शेती व्यवसायाचे विघटन सुरू झाले. कारण ब्रिटिश सत्तेने शेतीच्या विकासाकडे फारसे लक्ष दिले नाही. परिणामी, शेती व्यवसायात व त्यावर आधारित ग्रामीण जीवनात अनेक गंभीर प्रश्न व समस्या निर्माण झाले आहेत.

## ४.२ विषय विवेचन:–

ग्रामीण सहकारी संस्था आणि ग्रामीण उद्योग त्याचबरोबर बाजारपेठ, जमीणसुधारणा तसेच हरीत–क्रांती आणि शेती विषयक समस्या समजून घेण्याच्या दृष्टीकोनातून तीन मुद्याच्या आधारे ग्रामीण समाशास्त्राचे सदर माहितीच्या आधारे दिर्घ स्वरूपात विवेचन केलेले आहे. यामध्ये प्रत्येक मुद्याचे व्याख्या, कारणे वैशिष्टे त्याचबरोबर परीणाम याची चर्चा केलेली आहे.

### ४.२.१ ग्रामीण सहकारी संस्था (Rural Co-operatives) आणि ग्रामीण उद्योग

आधुनिक काळात सहकारी संस्था ही लोकांच्या विशेषत: दुर्बल लोकांच्या आणि एकंदर समाजाच्या आर्थिक तसेच सामाजिक व नैतिक विकासाचे प्रभावी साधन मानले जाते. त्यामुळे मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रात सहकारी संस्था स्थापन केल्या जात आहेत. सहकारी संस्थांचा प्रचार व प्रसार करण्यास शासनातर्फे प्रोत्साहन, मार्गदर्शन व मदत पुरविली जात आहे. त्यामुळे सहकार ही एक चळवळ बनली आहे. आज सहकारी चळवळी लोण जगातील सर्वच समाजात पोहचले आहे. भारतीय समाजदेखील याला अपवाद नाही. भारतात सहकारी चळवळीस ग्रामीण पुनर्रचनेचे किंवा ग्रामीण विकासाचे एक साधन मागून उत्पादन, वितरण, उपभोग पतपुरवठा ग्रहबांधणी इ. विविध क्षेत्रात सहकारी संस्था स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

**सहकाराचा अर्थ:**

**१) व्युत्पत्तीशास्त्रीय अर्थ:–** Co-operation हा इंग्रजी शब्द लॅटीन भाषेतील Co म्हणजे सह आणि 'Operate' म्हणजे काम करणे या दोन शब्दांपासून बनला असून त्याचा अर्थ एकमेकांसह किंवा एकमेकांच्या मदतीने काम करण्याची म्हणजे सहकार्य करण्याची प्रवृत्ती ही मानवाची सहजप्रवृत्ती आहे. मुंग्या, मधमाशा, हत्ती, हरिण इ. मानवेतर प्राण्यांतही सहकार ही प्रवृत्ती आढळते.

**२) समाजशास्त्रीय अर्थ:–** समाजशास्त्रीयदृष्ट्या सहकार ही एक सामाजिक प्रक्रिया किंवा सामाजिक आंतरक्रिया आहे मेरील व एल्डरेज यांच्या मते ‘सहकार हा सामाजिक आंतरक्रियेचा असा प्रकार आहे की ज्यामध्ये दोन किंवा अधिक व्यक्ती समान उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी एकत्रितपणे कार्य कतात. मानवाच्या परस्पर सहकार्यातूनच समाजाची निर्मिती झाली असून सहकारामुळेच समाजाचे अस्तित्व व सातत्य टिकून राहिलेले आहे. यासंदर्भात बोगार्डस म्हणतो की, ‘‘समाजाची निर्मिती हा सहकारचा परिणाम आहे.’’ क्रॅापटकिन म्हणतो की, सहकाराशिवाय मानवसमाज एका पिढीपेक्षा अधिक काळ टिकला नसता.

**३) अर्थशास्त्रीय अर्थ:–** आर्थिकददृष्ट्या सहकार हा एक व्यावसायिक संघटनेचा प्रकार किंवा उद्योग संस्था (Enterprise) आहे आर्थिकद्दष्ट्या दुर्बल असणारे अनेक लोक आपले समान गरजांच्या पूर्तीसाठी

समानतेच्या भूमिकेतून स्वच्छेने एकत्र येऊन एक व्यवसाय संघटना किंवा संस्था स्थापन करतात. तिलाच सहकारी संस्था असे म्हणतात. आपल्या सभासदांच्या आर्थिक हितसंबधाचे संरक्षण व संवर्धन करण्याचे कार्य ही संस्था करीत असते. सहकारी संस्थेचा अर्थ अधिक स्पष्ट होण्यासाठी तिच्या काही व्याख्या अभ्यासणे गरजेचे असते.

**सहकारी संस्थेची व्याख्या:–**

**१) लेखक:–** वैयक्तिक प्रयत्नाने आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी स्थापना केलेल्या व लोकशाही पध्दतीने चालविलेल्या कायदेशीर संघटनेस किंवा संस्थेस सहकारी संस्था असे म्हणतात.

**२) एच कॅलव्हर्ट:–** मानवी भूमिकेतून लोकांनी स्वच्छेने एकत्र येऊन आपल्या आर्थिक हितसंबंधाच्या उन्नतीसाठी समानतेच्या तत्त्वावर स्थापना केलेली संघटना म्हणजे सहकारी संस्था होय. (As a from of organisation where in persons voluntarily associate together as human beings on basis of equality for the promotion of economic interests of themsewes.)

**३) प्रा. पॉल लॅम्बर्ट:–** स्वत:च्या उपयोगासाठी व्यक्तींच्या समुहाने स्थापना केलेली आणि दिग्दर्शित केलेली, लोकशाही नियमानुसार चालविलेली आणि आपल्या सभासदांच्या व एकूण समुदायाच्या सेवेसाठी स्थापन झालेली व्यवहार संस्था म्हणजे सहकारी संस्था होय. (A co-operative is an enterprise formed and directed by an association of users applying within itself the rules of democrachy and directly intended to serue both its own members and community as a whole)

या व्याख्येनुसार सहकारी संस्था ही स्वत:साठी उपयोग करून घेणाऱ्या व्यक्तीची व्यवसाय संघटना असून तिचा कारभार लोकशाही पध्दतीने चालत असातो. ही संस्था आपल्या सभासदांच्या तसेच समाजाच्या सेवेसाठी कार्य करीत असते.

**४) आतंरराष्ट्रीय श्रम सघंटना:–** सामान्यतः मर्यादित साधनसामग्री असलेल्या व्यक्तीने स्वच्छेने एकत्र येऊन आपली समान उद्दिष्टे साध्य करण्यासाठी लोकशाही पध्दतीने व्यवसाय संघटनेचे नियंत्रण करण्यासाठी स्थापन झालेल्या संस्थेस सहकारी संस्था म्हणतात. या सहकारी संस्थेच्या भागभांडवलात संबंधित व्यक्तीचा न्याय हिस्सा असतो. आणि संस्थेच्या नफ्यातोट्यात ते न्याय प्रमाणात सहभागी झालेले असतात.

**५) लोकशाही पध्दतीची संघटना:–** सहकारी संस्था ही लोकशाही पध्दतीवर आधारलेली संघटना असते म्हणजे तिचा कारभार लोकशाही पध्दतीने चालविला जातो. सभासदाने पुरविलेले भाग भांडवल, त्याची जात, धर्म लिंग इ. बाबी विचारात न घेता प्रत्येकास एकच मत देण्याचा अधिकार असतो. सभासद आपल्यामधून काहींची संचालक म्हणून मतदानाद्वारे निवड करतात. निवडून आलेले संचालक आपल्यातील एकाची अध्यक्ष व एकाची उपाध्यक्ष म्हणून निवड करतात. संचालकांनी घेतलेल्या निर्णयास अंमलबजावणी पागारी व्यवस्थापकाकडून केली जाते. अशाप्रकारे, सहकारी संस्थेचा कारभार लोकशाही पध्दतीने चालत असतो.

**६) समतेवर आधारलेली संस्था:–** सहकारी संस्था ही समतेच्या तत्वावर आधारलेली असते. कारण तिच्या सर्व सभासदांचा दर्जा, अधिकार व कर्तव्येही समानच असतात सर्वांना समानतेने वागविले जाते. सर्वांना समान संधी उपलब्ध करून दिली जाते. सभासदांचे भाग भांडवल, सामाजिक प्रतिष्ठा, राजकीय विचारसरणी, जात, धर्म, लिंग इ. बाबी वेगवेगळ्या असल्या तरी सर्वांना समान मानून समान सेवा दिली जाते. थोडक्यात, सभासदांमध्ये कृत्रिम भेदभाव न करता सर्वांना समान लेखले जाते.

**७) विधायक स्पर्धा:–** समाजात विविध प्रकारच्या सहाकारी संस्था स्थापना झाल्यास व त्यांनी विविध वस्तू व सेवांचे उत्पादन व वितरण सुरू केल्यास समाजात विधायक स्पर्धा निर्माण होते. भांडवलशाही अर्थव्यस्थेत मात्र गळेकापू स्पर्धा निर्माण होते. ती समाज हितास पोषक ठरते. भांडवलशाहीतील अनिष्ट स्पर्धा टाळण्यासाठीच सहकारी संस्था स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

**८) समाज शिक्षणाचे साधन:–** सहकारी संस्था ही शिक्षणप्रसाराचे महत्वाचे साधन मानले जाते. सहकारी संस्था आपल्या सभासदांचे प्रबोधन करते. त्यांच्यात जागृती घडवून आणते. स्वावलंबन, परस्पर सहकार्य, सेवाभाव आत्मसन्मान, सामाजिक बांधिलकी, निष्ठा, जबाबदारीची जाणीव, कर्तव्यतत्परता इ. मुल्ये सभासदांच्या मनावर बिंबविण्याचे कार्य सहकारी संस्था करतात. थोडक्यात, सहकारी संस्था ह्या समाज जीवनास आवश्यक असणारे शिक्षण देणाऱ्या पाठशाळा असतात.

**९) सामाजिक परिवर्तनाचे साधन:–** सहकारी संस्था ही एक उद्योगसंस्था असली तरी मूलतः ती सामाजिक परिवर्तनाचे साधन मानली जाते. सहकारामुळे समाजातील दुर्बल घटकांना सबळ घटकांच्या बरोबरीने सामाजिक दर्जा व प्रतिष्ठा मिळविता येते. श्रीमतांकडून गरिबांचे होणार सबळ घटकांच्या बरोबरीने सामाजिक दर्जा व प्रतिष्ठा मिळवता येते. लोकांच्या स्वार्थी वृत्तीवर अंकुश ठेवता येतो. आत्मविश्वास स्वावलंबन, कर्तव्यतत्परता, सामाजिक बांधिलकी, सेवाभावी वृत्ती, समता, स्वांतत्र्य, बंधुत्व, सामाजिक न्याय, इ. सद्गुणांची समाजात जोपासना करता येते. आर्थिक व्यवहारास सामाजिक व नैतिक अधिष्ठान देता येते, साधनसूचिता पाळता येते.

**१०) ग्रामीण उद्योग:–** (Rural Industry)

भारतातील ग्रामीण वा कृषक समाजाचे बदलते स्वरूप समजावून घेताना ग्रामोद्योगांचा म्हणजेच ग्रामीण उद्योगधंदांचा अभ्यास करावा लागतो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग्रामीण समाजातील दारिद्र्य व बेरोजगारी यांसारख्या समस्या सोडविण्यासाठी शासनाने ग्रामीण क्षेत्रात उद्योगधंदे उभारण्यासाठी अनेक योजना व उपक्रम सुरू केले. ग्रामीण भागातील लोकांना उद्योग उभारण्यासाठी कर्जपुरवठा करणे, उद्योग उभारण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधा (वीज, पाणी, जमीन वाहतूक) इ. निर्माण करणे. ग्रामीण उद्योगांसाठी आवश्यक असणारे पायाभूत असणारे कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देणे, ग्रामीण उद्योगांसाठी व्यावसायिक शिक्षणसंस्था सुरू करणे इत्यादी उपक्रम सुरू व्हावे म्हणून तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणसंस्था सुरू केल्या. या उद्योगधंदांचा प्रभाव पडून ग्रामीण कृषक समाजात अपेक्षित परिवर्तन घडून येण्यास चालना मिळाली.

येथे थोडक्यात समजावून घेणार आहोत. त्यासाठी प्रथम ग्रामोद्योगाचा अर्थ, व्याख्या वैशिष्ट्ये व प्रकार संक्षिप्त स्वरूपात समाजावून घेऊया.

**ग्रामोद्योगाचा अर्थ व व्याख्या:-**

ग्रामोद्योग हा मराठी 'ग्राम व उद्योग' दोन शब्दापासून बनलेला आहे ग्राम म्हणजे 'खेडे (Village) व उद्योग म्हणजे वस्तू उत्पादनाची क्रिया होय. यावरून ग्रामोद्योग म्हणजे ग्रामीण भागातील वा खेड्यातील वस्तू उत्पादनाची क्रिया होय, असा शब्दशः अर्थ होतो. तथापि, आर्थिक वा औद्योगिक दृष्ट्या ग्रामोद्योग या संज्ञेस निश्चित असा अर्थ आहे. हा अर्थ समजण्यासाठी ग्रामोद्योगाच्या काही व्याख्या पाहू.

**१) लेखक:-** स्थानिक स्तरावर उपलब्ध असणारा कच्चा माल, श्रमशक्ती व अल्प भांडवल यांचा उपभोग करून घेतले जाणारे उत्पादन म्हणजे ग्रामोद्योग होय. (Rural industry is one in which production is made by rural people in rural areas by unitlizing locally available raw materials, labour force and small capital.)

**२) खादी व ग्रामोद्योग आयोग:-** ग्रामोद्योग २० हजारापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या खेड्यातील उद्योग असून ज्यामध्ये प्रत्येक कामगारामागे केलेली गुंतवणूक ही रु.१००० पेक्षा कमी असते. (Industry in rural where population is less than 20000 and in which fixed capital investment per head of worker is less than Rs.1000/-)

**३) भारत सरकार:-** ग्रामोद्योग २० हजार किंवा त्यापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या खेड्यातील वा गावातील उद्योग असून त्यामधील गुंतवणूक ही रु. ३ कोटीपेक्षा कमी असते (Industry at village or town with population 20,000 or below and investment of less than R.S 3. Crores.)

**ग्रामोद्योगाची वैशिष्ट्ये :-**

१) ग्रामीण क्षेत्रातील उद्योग:- ग्रामीण उद्योग हा ग्रामीण क्षेत्रात म्हणजे खेड्यात वा गावात उभारलेला उद्योग असून तो ग्रामीण लोकांद्वारे चालविला जातो.

**२) अल्प गुंतवणूक:-** बाजारपेठ ही आर्थिक कार्याच्या विशेषीकरणाद्वारे वस्तू सेवांचा विनिमय करण्यास भाग पाडणारी औपचारिक व्यवस्था असून ती संकीर्ण समाजाचे वैशिष्टय आहे आणि तिचे संस्थात्मक स्वरूप सामाजिक नियमनांच्याद्वारे नियमित केले जाते (Market system The formalized system of exchange of goods and services necessitaed by the specialization of economic functions)

**३) अल्प गुंतवणूक:-** ग्रामीण उद्योगात केली जाणारी गुंतवणूक ही अल्प प्रमाणातील असते. अर्थात ही गुतंवणूक नेमकी किती रक्कमेची असावी याबाबत निश्चितता नाही. खादी व ग्रामीणउद्योग आयोगाच्या व्याख्येत दर कामगारामागे रु. १०००/- पेक्षा कमी असावी असे म्हंटले आहे.

**४) स्थानिक गोष्टींना प्राधान्य:–** ग्रामीण उद्योगात वापरला जाणारा कच्चा माल, श्रमशक्ती भांडवल इत्यादी गोष्टी ह्या प्रामुख्याने स्थानिक पातळीवर उपलब्ध होणाऱ्या असतात. किंबहुना त्यांनाच प्राध्यान्य दिलेले असते. त्यामुळे कच्चा मालाच्या वाहतुकीसाठी व तसेच कामगारांच्या निवास व अन्य सुविधासाठी विशेष खर्च करावा लागत नाही.

**५) परंपरागत तंत्र व कौशल्ये:–** ग्रामोद्योगात मुख्यत्वेकरून परंपरागत तंत्रज्ञान व कौशल्य वापरण्यावर भर दिला जातो अर्थात, अलिकडील काळात काही ग्रामोद्योगात प्रगत तंत्रज्ञान व कौशल्ये वापरली जाऊ लागली आहेत व ती अतिमहागडी नसतात.

**६) रोजगारनिर्मितीची क्षमता:–** ग्रामोद्योगामध्ये रोजगार निर्मितीची क्षमता मोठ्या प्रमाणावर असते भारतात आजही सुमारे ६५ टक्के लोकसंख्या ग्रामीण वास्तव करीत असून या लोकसंख्येस एकट्या शेतीक्षेत्रात रोजगार मिळणे शक्य नाही. त्यामुळे रोजगार पुरविण्याच्या दृष्टीने ग्रामोद्योगास महत्व प्राप्त होते.

**ग्रामोद्योगाचे प्रकार:–** ग्रामोद्योगात असंख्य उद्योगांचा समावेश होतो त्यामुळे त्याचे प्रकार पाडले.

**१) कृषी आधारित उद्योग** (Agro Based Industries):- कृषी उत्पादनांचा (अन्नधान्य, फळे भाजीपाला इ.) कच्चा माल म्हणून वापर केला जाणाऱ्या उद्योगांना कृषी आधारित उद्योग म्हणतात. यामध्ये कापूस पिंजणे, सूत कातणे, विणकाम, कागदनिर्मिती, गूळ व साखर बनविणे, तंबाखू उत्पादने, फळप्रक्रिया करणे इत्यादी उद्योगांचा समावेश होतो.

**२) वन आधारित उदयोग** (Forest Based Industries):- वनातून जंगलातून मिळणाऱ्या उत्पादनांचा कच्चा माल म्हणून वापर केला जाणाऱ्या उद्योगांना वन आधारित उद्योग म्हणतात. यामध्ये लाकूड कटाई, फर्निचर निर्मिती, वनौषध निर्मिती, लाखेच्या वस्तू बनविणे, मध सकंलन, मद्यनिर्मिती, केरसुण्या झाडू बनविणे.

**३) खाण उद्योग:–** खाणीतून मिळणाऱ्या विविध खनिजांपासून विविध वस्तू बनविणे म्हणजे खाण उद्योग होय. त्यामध्ये लोहकाम (लोखंडी वस्तू बनविणे), गलाईकाम (सोन गाळणे), दगडापासून खडी व वाळू (क्रॅश सँड) बनविणे, काचेच्या वस्तू बनविणे.

**४) कुटिरउद्योग:–** (Cottage Industries) उद्योजकाने वा उत्पादक व्यक्तीने प्रामुख्याने आपल्या कुटंब सदस्यांच्या मदतीने आपल्या घरातच वस्तुंचे उत्पादन करणे म्हणजे कुटिरोद्योग होय. यामध्ये चटई टोपल्या बनविणे मातीची मडकी इ. अल्प वस्तू बनविणे (कुंभारकाम) हातमाग, रेशमी वस्त्र निर्मिती, विटा व कौले बनविणे, चामड्याच्या वस्तू (पादत्राणे इतर बनविणे चर्मोद्योग) खेळाचे साहित्य बनविणे क्रिकेट बॅट व स्टंप हॉकी, स्टिक टेनिस वेगवेगळे चेंडू इ.

**५) पशुपालन:–** आज पशुपालन हा पारंपारिक व्यवसाय आर्थिक क्रिया एखाद्या उद्योगाच्या स्वरूपात केला जाऊ लागला आहे. त्यामुळे त्याचा ग्रामोद्योगात समावेश करता येईल. यामध्ये गाई म्हशी तसेच शेळ्या मेंढ्या पाळणे कुक्कुट पालन, वराहपालन, मधुमक्षिकापालन, रेशमी किड्यांची पैदास, मत्स्योत्पादन,

मासे पैदास इत्यादीचा समावेश होतो. दूध व दुग्धजन्य पदार्थाची निर्मिती डेअरी इंडस्ट्री व बंदिस्त शेळीपालन देखील महत्वाचे ग्रामोद्योगाचे आहेत.

**ग्रामद्योगाचे ग्रामीण कृषक समाजावरील परिणाम (प्रभाव)**

**१) रोजगार वृध्दी:–** ग्रामाद्योगांच्या स्थापनेमुळे ग्रामीण भागात रोजगार वृध्दी वाढ होण्यास मोठी चालना मिळालेली आहे. पूर्वी शेती हाच ग्रामीण लोकांचा प्रमुख व्यवसाय होता व बहुसंख्याक लोक प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे याच व्यवसायात गुंतलेले होते. वाढत्या लोकसंख्येचा भार शेतीवर पडून शेती व्यवसायात अर्धबेकारी, हंगामी बेकारी छुपी बेकारी इत्यादींचे प्रमाण मोठे होते. ग्रामोद्योगामुळे ग्रामीण लोकांना विविध प्रकारचे बिगरशेती व्यवसाय उपलब्ध झाल्याने शेतीवरील भार कमी होऊन बेकारीचे प्रमाण कमी होण्यास मदत झालेली आहे. यातून ग्रामीण व नागर या दोन्ही क्षेत्रांमध्ये अनेक समस्या निर्माण होतात. जर ग्रामोद्योगांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढविली तर ग्रामीण लोकांना आपल्या क्षेत्रातच रोजगार उपलब्ध होईल व परिणामी, नागरी क्षेत्रांकडे स्थलांतर करण्याची प्रवृत्ती कमी होईल.

**२) उत्पन्नात वाढ:–** ग्रामीण उद्योगांमुळे ग्रामीण कुटुंबाचे उत्पन्न वाढविण्यासाठी मदत झालेली आहे. भारतातील बहुसंख्य शेती क्षेत्र हे कोरडवाहू आहे. ते लहरी मान्सूनच्या पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे कधी अनावृष्टी तर कधी अतिवृष्टी यामुळे पीक बुडण्याचा धोका सतत असतो. त्यामुळे शेती व्यवसायातून दरवर्षी निश्चित उत्पन्न मिळण्याची खात्री नसते. त्यामुळे ग्रामीण भागात दारिद्र्य मोठ्या प्रमाणावर आढळते. ग्रामोद्योगांमुळे अनेक लोकांना दरमहा निश्चित उत्पन्न वेतन देणारा रोजगार उपलब्ध होऊ लागला आहे. परिणामी अशा कुटुंबाचे दारिद्र्य घटण्यास मदत झालेली आहे.

**३) पायाभूत सुविधांचा विकास:–** ग्रामोद्योगामुळे ग्रामीण भागात रस्ते, वीज पाणी वाहतूक साधने, संप्रेषण साधने, बँका, बाजारपेठा इत्यादी पायाभूत सुविधांचा विस्तार व विकास होण्यास मोठी चालना मिळाली आहे. परिणामी ग्रामीण भागात नागरी सेवासुविधा उपलब्ध होऊन त्यांचा पारंपारिक चेहरा बदलत चालला आहे.

**४) कृषी विकासास चालना:–** ग्रामीण उद्योगधंदामुळे कृषी क्षेत्राचा विकास होण्यासही मदत झालेली आहे. ग्रामीण उद्योगास, विशेषत: कृषी आधारित उद्योगास लागणारा कच्चा माल विचारवंत होऊन शेतकऱ्यांनी आपल्या पीक प्रतिमानात (Crop Pattern) बदल केलेला आहे. आपल्या शेजारील उद्योगांची गरज ओळखून शेतकरी विविध पिके विशेषत: नगदी पिके, ऊस, कापूस, फळे, फुले, भाजीपाला तेलबिया इ. घेऊ लागले आहेत. त्यासाठी आधुनिक खते, बी-बियाणे जलसिंचन सुविधा, सुधारीत लागवड पध्दती इत्यादींचा वापर करू लागले आहेत. परिणाम म्हणून कृषी विकासाला चालना मिळाली आहे.

**५) शैक्षणिक सुविधा:–** ग्रामोद्योगास लागणारे आवश्यक ते कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावे म्हणून शासनाने ग्रामीण भागात तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन केल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण युवक-युवतींना असे शिक्षण घेऊन आपले करिअर विकसित करण्यास संधी उपलब्ध होऊ लागल्या आहेत. आज ग्रामीण भागात औपचारिक शिक्षण संस्था बरोबरच औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI)

पॉलिटेक्निक व अभियांत्रिकी महाविद्यालये, कृषी विद्यालये इत्यादी व्यवसाय शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्थेचे जाळे विणले जात आहे.

**६) बलुता पध्दतीचे विघटन:–** ग्रामोद्योगांच्या स्थापनेमुळे ग्रामीण भागातील बलुता पध्दतीचे विघटन घडून आलेले आहे. पारंपारिक बलुतेदार कारागीर हे बालवयात काम करीत असत. आज अशा बलुतेदार कुंटुबातील नवीन पिढी ही शासकीय सवलतींचा व प्रोत्साहनाचा फायदा घेऊन आपले परंपरागत व्यवसाय आधुनिक पध्दतीने करू लागली आहे. त्यातील अनेकांनी व्यावसायिक शिक्षण घेऊन ग्रामोद्योगात निश्चित वेतन देणारी नोकरी पत्करलेली आहे.

### ४.२.२ **बाजारपेठा, जमीण धारणा आणि हरीतक्रांती** (Markets, Landreform & Green Revolution)

ग्रामीण कृषक समाजाचे पारंपारिक स्वरूप बदलण्यामध्ये बाजारपेठांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरलेली आहे. त्यांची ही भूमिका आपण समजावून घेणार आहोत. तत्पूर्वी बाजारपेठेचा अर्थ, व्याख्या, वैशिष्टे व प्रकार इत्यादींची थोडक्यात ओळख करून घेऊ या.

**बाजारपेठेचा अर्थ व व्याख्या:–**

व्यवहारात बाजारपेठ ही संज्ञा वस्तू व सेवांची खेरेदी–विक्री जेथे होते त्या ठिकाणासाठी वा क्षेत्रासाठी वापरली जाते. Market हा इंग्रजी शब्द लॅटीन भाषेतील Marcatus या शब्दापासून तयार झाला असून त्याचा अर्थ 'जेथे' व्यापाराचे आयोजन केले होते. पण हा अर्थ संकुचित आहे. शास्त्रीय चर्चेत बाजारपेठ ही संज्ञा याहून अधिक व्यापक अर्थाने वापरली जाते.

बाजारपेठ ही मानवी गरजपूर्तीसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू व सेवांच्या खरेदी विक्रीचे केवळ ठिकाण व क्षेत्र नसून ती वस्तू सेवांची किंमत निर्धारित करणारी तसेच खरेदीवर व विक्रेते यांच्यातील आंतरक्रियांची एक व्यवस्थासुध्दा आहे. (Market is not only the place or area of Selling and buying of goods and services which are necessary for satisfying the human needs, it is also system of interaction between sellers and buyers as well as determining the price of goods and services.)

**विल्यम स्कॉट:–** बाजारपेठ ही आर्थिक कार्याच्या विशेषीकरणाद्वारे वस्तू व सेवांचा विनिमय करण्यास भाग पाडणारी औपचारिक व्यवस्था असून ती संकीर्ण समाजाचे वैशिष्ट्य आहे. आणि तिचे संस्थापक स्वरूप सामाजिक नियमांच्याद्वारे नियमित केले जाते. (Market system : The fromalized system of exchange of goods and services necessitated by the specialization of economic functions characteristic of complex societies and regulated by institutionalized social norms.)

**विल्यम जे. स्टॅनटॉन:–** बाजारपेठ ही व्यापारविषक कृतींच्या आंतरक्रियांची समग्र व्यवस्था असून ती संकीर्ण समाजाचे वैशिष्ट आहे आणि तिचे संस्थात्मक स्वरूप सामाजिक नियमनांच्याद्वारे नियमित केले जाते.

**बाजारपेठांची वैशिष्टये:–**

**१) सामाजिक संस्था:–** ''एक वा अनेक कार्याभोवती गुंफलेल्या सामाजिक नियमांचा संच म्हणजे सामाजिक संस्था होय.'' या अर्थाने विचार करता बाजारपेठ ही एक सामाजिक संस्था ठरते. कारण ती मानवी गरजपूर्तीसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू व सेवांची खरेदी–विक्री करणे या कार्याभोवती अनेक सामाजिक नियमने गुंफलेली असतात. या रचनेस बाजारपेठ म्हणतात.

**२) सार्वत्रिक संस्था:–** बाजारपेठ ही प्राचीन तसेच अर्वाचीन, प्रगत तसेच, अप्रगत साध्या तसेच संकीर्ण समाजात आढळते. त्यामुळेच ती सार्वत्रिक स्वरूपाची संस्था ठरते.

**३) दोन घटक:–** खरेदीदार व विक्रेते हे बाजारपेठेतील दोन प्रमुख घटक असून त्यांच्यात नियमितपणे आंतरक्रिया होत असतात. ऑनलाईन खरेदी–विक्रीत अप्रत्यक्ष आंतरक्रिया असते कारण खरेदीदार व विक्रेते यांच्यात भौतिक सान्निध्य असते.

**४) मनाचे मीलन:–** बाजारपेठ निर्माण होण्यासाठी खरेदीदार व विक्रेते या दोन घटकांचे मनोमीलन होणे आवश्यक असते. या मनोमीलनातून वस्तू व सेवांची किंमत निश्चित होत असते आल्फ्रेड मार्शल म्हणतात की निर्दोष बाजारपेठेत एका वस्तूला एकच (समान) किंमत देण्याची प्रवृत्ती असते. ग्राहक व विक्रेत्याच्या मुक्त व घनिष्ठ संबंधातून वस्तू व सेवांची किंमत समान होत असते.

**५) विविध घटकांचा प्रभाव:–** मुक्त बाजारपेठेतील खरेदी–विक्रीच्या व्यवहारावर विविध घटकांचा प्रभाव पडत असतो. मागणी व पुरवठा, किंमत ग्राहक व विक्रेत्याकडे असणारी बाजारपेठेची माहिती, योग्य किंमतीवरील कायदेशीर नियंत्रण व नियमने इत्यादी घटक प्रभाव टाकणारे असते.

**६) प्रत्याभारण:–** बाजारपेठेत प्रत्याभरण माहिती (Feedback Information) महत्त्वाची असते. ही माहिती ग्राहकांचा पूर्व खरेदी विषयीचा अनुभव दर्शवित असते. जर ग्राहकांच्या अपेक्षांची पूर्तता होत असेल तर विक्रेत्यास पुन्हा पुन्हा ऑडर्स मिळतात. पण ग्राहकांच्या अपेक्षांची पूर्तता न झाल्यास ग्राहक प्रतिस्पर्धी वस्तूच्या खरेदीकडे वळू शकतात.

**बाजारपेठेची वर्गीकरणे:–**

विविध निकषांच्या आधारे बाजारपेठेची विविध वर्गीकरणे करण्यात येतात.

**अ) स्थान:–**

बाजारपेठेचे स्थान या निकषाधारे बाजारपेठेचे चार प्रकार पडतात

**१) स्थानिक बाजारपेठ:-** एखाद्या समुदायातील (खेड्यातील वा शहरातील) बाजारपेठ म्हणजे स्थानिक बाजारपेठ होय. दूध, भाजीपाला, फळे, मांस, इत्यादी नाशवंत वस्तूंची विक्री उत्पादनस्थळीच त्वरित करणे आवश्यक असते. अशा वस्तूंची बाजारपेठ स्थानिक बाजारपेठ असते. आज प्रगत तंत्रज्ञानाच्या मदतीने नाशवंत वस्तू अधिक काळ टिकवणे.

**२) प्रादेशिक बाजारपेठ:-** ही दीर्घकाळासाठी एक दोन वर्षासाठी असलेली बाजारपेठ असून तिच्यात पूर्व अनुरोधाने मागणीचा पुरवठा कमी जास्त केला जातो. मागणी नुसार पुरवठ्यात बदल करता येतो. तसेच कांही उत्पादनांतही (यंत्रे, तंत्रे, हत्यारे अवजारे) आवश्यक ते फेरफार केले जातात.

**३) प्रदिर्घकालीन बाजारपेठ:-** ही प्रदीर्घ काळासाठीची बाजारपेठ आहे. याठीकाणी प्रदीर्घ काळ म्हणजे ग्राहकांच्या आवडी-निवडी, पसंती, अभिरूची, अभिवृत्ती, सामाजिक परिस्थिती इत्यादीत. बदला होण्यास लागणारा दहा बारा वर्षाचा किंवा एक-दोन पिढ्यांचा काळ असा अर्थ घेतला जातो.

**क) वस्तू:- या निकषाच्या आधारे दोन प्रकार पडतात.**

**१) वस्तू बाजारपेठ:-** या बाजारपेठेत विविध वस्तूंची (उदा. अन्नधान्य कपडेलत्ते यंत्रे, अलंकार, हत्यारे, वाहने इ. खरेदी विक्री होत असल्याने तिला वस्तू बाजारपेठ म्हणतात. वस्तूंच्या गुणधर्मावर या बाजारपेठेचा विस्तार (व्याप्ती) अवलंबून असते उदा. वस्तूचा टिकाऊपणा, तिचे प्रमाणीकरण व प्रतवारी करणे वस्तू सुलभपणे ओळखता येणे, तिची वाहतूक सहजसाध्य असणे, ही असे गुणधर्म नसणाऱ्या वस्तूंच्या बाजारपेठेपेक्षा अधिक विस्तृत व व्यापक असते.

**२) घटक बाजारपेठ:-** भांडवल, श्रम इत्यादी उत्पादन घटकांची देवाण-घेवाण होणाऱ्या बाजारपेठेस घटक बाजारपेठ म्हणतात. त्या किंमतीची बाजारपेठेत समान होण्याची प्रवृत्ती इत्यादी बाजारपेठेतील घटक आहेत.

**स्पर्धा:-** बाजारपेठेत स्पर्धा आहे की नाही या आधारे दोन प्रकार पडतात.

**१) स्पर्धात्मक बाजारपेठ:-** जिच्यात विविध घटकांत स्पर्धा असते तिला स्पर्धात्मक बाजारपेठ म्हणतात. हिच्यात ग्राहक व विक्रेते या दोन समूहात स्पर्धा असते. तसेच या दोन समूहांचीही परस्परांशी स्पर्धा असते.

**२) मक्तेदारी बाजारपेठ:-** ज्या बाजारपेठेतील विविध घटकांत स्पर्धा नसते तिला मक्तेदारी बाजारपेठ म्हणतात. हिच्यात ग्राहक व विक्रेते या दोन्ही घटकांचीही मक्तेदारी असू शकते मात्र ग्राहकांची संख्या प्रचंड मोठी असल्याने व त्यांच्यात ऐक्य संघटना नसल्याने ग्राहकांची मक्तेदारी फारशी आढळत नाही. मक्तेदारी तीन प्रकारची असते.

**अ) नैसर्गिक मक्तेदारी:-** खनिज, तेल, सोने, रत्ने इत्यादींचा साठा निर्सगत:च काही ठिकाणापुरताच मर्यादित असल्याने त्यांचे उत्पादन करणाऱ्या राष्ट्रांना प्राप्त होणारी मक्तेदारी नैसर्गिक मक्तेदारी ठरते.

**ब) सार्वजनिक मक्तेदारी:-** सरकारद्वारे निर्माण केलेली मक्तेदारी म्हणजे सार्वजनिक मक्तेदारी होय. विशिष्ट व्यक्तीस वा संस्थेस विशिष्ट वस्तू उत्पादन करण्याचा वा विशिष्ट सेवा पुरविण्याचा अधिकार दिल्याने ही मक्तेदारी निर्माण होते.

**क) संयोगात्मक मक्तेदारी:-** जेव्हा दोन किंवा अधिक मंडळे एकत्र येऊन उत्पादन वा खरेदी-विक्रीचे व्यवहार केवळ आपल्याच हातात केंद्रित करतात. तेंव्हा या मक्तेदारीस संयोगात्मक मक्तेदारी म्हणतात.

ही मुख्यत: उत्पादकांची मक्तेदारी असते.

**बाजारपेठेची वैशिष्ट्ये :**

**१) मुद्राप्रधान विनिमयास चालना:-** बाजारपेठांचा विस्तार वा विकास झाल्याने ग्रामीण समाजात मुद्राप्रधान विनिमय पध्दतीस मोठी चालना मिळालेली आहे. परंपरागत खेड्यात नियमित बाजारपेठेचा अभाव होता. खेड्यातील बहुतांशी आर्थिक देवाणघेवाण ही नियमित बाजारपेठ वस्तू विनिमय पध्दतीने होई. वस्तू व सेवांच्या मोबदल्यात वस्तू व सेवा दिल्या जात होत्या. या देवाणघेवाणीत मुदलेचा (पैशाचा) वापर फारसा होत नव्हता. एखाद्या मोठ्या आकाराच्या खेड्यात आठवड्यातील एका ठराविक दिवशी बाजार (आठवडी बाजार) भरत असे व त्याच्या आसपासच्या १०-१२ लहान खेड्यातील लोक आपल्याकडील वस्तूंची तेथे खरेदी-विक्री करीत. या खरेदी-विक्रीत प्रामुख्याने धान्याचा व अन्य वस्तूंच्या विनिमयाचे साधन म्हणून वापर होईल. ब्रिटीश राजवटीत विनिमयाचे साधन म्हणून मुद्रेचा मोठ्या प्रमाणावर वापर करणे सुरू झाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी कृषी उत्पादन वाढीस मोठी चालना आली. हे वाढीव उत्पादन विकण्यासाठी आठवडी बाजारपेठ अपुरी पडू लागली. ग्रामीण लोकांना उत्पादीत केलेल्या अन्नधान्य व अन्य वस्तुंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी म्हणून शासनाने अनेक ही प्रादेशिक व राष्ट्रीय बाजारपेठांशी जोडली गेली. या बाजारपेठांत शेतकरी व ग्रामीण कारेगिरांना मुद्रेचा वापर करणे अनिवार्य बनले. अशाप्रकारे बाजारपेठांमुळे मुद्राप्रधान विनिमयास चालना मिळाली.

**२) उत्पादनाचा हेतू बदलला:-** बाजारपेठांच्या विस्तारामुळे शेतकरी व ग्रामीण कारगिरांचा उत्पादना मागे असलेला हेतू बदललेला आहे पारंपारिक खेड्यात शेतकरी व ग्रामीण कारागीर हे केवळ आपला निर्वाह चालविण्याच्या हेतूने कृषी व बिगरकृषी उत्पादन करीत असत. जातीप्रथेवर आधारलेल्या बलुतापध्दतीद्वारे शेतकरी व बिगरशेती व्यवसाय करणारे बलुतेदार हे दोन आपल्या कुटुंबाच्या विविध गरजा भागवित असत. बाजारपेठांचा विस्तार झाल्यानंतर मात्र, हा हेतू बदलला शासनाने राबविलेल्या कृषी विकासाच्या योजनांमुळे हरितक्रांतीचे प्रयोग यशस्वी झाले. कृषी उद्योगाची वाढ व विस्तार झाला अधिकाधिक उत्पादन करून ते बाजारपेठेत विकून अधिकाधिक नफा मिळवावा. यासाठी ते प्रयत्न करू लागले त्यामुळे पूर्वीच्या निर्वाहप्रधान अर्थव्यवस्थेच्या जागी बाजारपेठीय अर्थव्यवस्था प्रस्थापित होण्यास चालना मिळाली आहे. आज खेड्यातील शेतकरी हे देशातील नागरी लोकांच्या गरजा पूर्ण करण्याच्या उद्देशाने अन्नधान्याबरोबरच भाजीपाला, फळे, फुले दुग्धजन्य पदार्थ इत्यादींचे उत्पादन करण्यास प्राध्यान देऊ लागले आहेत. थोडक्यात बाजारपेठामुळे ग्रामीण लोकांच्या उत्पादनाचे हेतू बदलण्यास चालना मिळाली आहे.

**५) जागतिकीकरणातील सहभाग:–** बाजारपेठांमुळे शेतकरी व ग्रामीण उद्योजकांना जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी प्राप्त झालेली आहे. जागतिकीकरण ही देशाची अर्थव्यवस्था जगाच्या सहभागी अर्थव्यवस्थेशी जोडून संपूर्ण जगासाठी एकच अर्थव्यवस्था म्हणजेच जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करण्याची प्रक्रीया आहे. ही जागतिकीकरणात स्थानिक (ग्रामीण) बाजारपेठ महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडीत आहे. शेतकरी व ग्रामीण उद्योजकांना आपली उत्पादने ही जागतिक बाजारपेठेत विकून अधिक नफा कमावणे शक्य झाले आहे. जागतिकीरणात निर्यातीवरील निर्बंध हटविल्याने व निर्यातीचे दर देखील कमी केल्याने भारतातून विविध देशांमध्ये कापूस, तांदूळ, गहू, चहा, कॉफी, ताग, फुले, फळे, भाजीपाला इत्यादी कृषी उत्पादनांची निर्यात होऊ लागली आहे. त्यामुळे भारतात शेतीमालावर प्रक्रिया करून कुरकुरे, चिप्स, सॉस, शीतपेये, फळांचे रस, आईस्क्रीम इत्यादीच्या उत्पादनाचे कारखाने निघाले आहेत. त्यामुळे बटाटा, टोमॅटो, विविध फळे यांच्या उत्पादनवाढीस चालना मिळाली आहे. याचा फायदा शेतकऱ्यांना विशेषत: बागाईतदारांना होऊ लागला आहे. सर्व बाजारपेठांच्या विस्तारामुळे शक्य झालेले आहे. आज भारतात अन्नधान्याचे शिलकी उत्पादन होत आहे. शिवाय जागतिक बाजारपेठेच्या तुलनेत भारतात अन्नधान्याच्या किंमतीही कमी आहेत. त्यामुळे भारतीय शेतकरी जागतिक बाजारपेठेचा फायदा उठवून कृषीमालाची निर्यात वाढवू शकतात व अधिक नफा कमावू शकतात. मात्र, त्यासाठी शेतीला बारमाही पाणीपुरवठा करून उत्पादन वाढविणे, कृषीमालाची गुणवत्ता वाढविणे, कृषीमालाच्या साठवणुकीचे व पॅकेजिंगचे आधुनिकीकरण करणे, वाहतूक सुविधा वाढविणे, बंदरांचा विकास करणे आवश्यक आहे. हे झाल्यास शेतकरी वर्ग जागतिक बाजारांमध्ये अधिक सक्षमपणे सहभागी होऊन अधिक नफा मिळवू शकेल.

**ब) जमीन सुधारणा** (Land Reforms)

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताला वाढती लोकसंख्या, बेकरी दारिद्र्य, उपासमार, निरक्षरता, अंधश्रध्दा, दैववादीवृत्ती, अनारोग्य आर्थिक व सामाजिक विषमता इ. गंभीर समस्यांना सामोरे जावे लागले. या समस्यांची सोडवणूक करून देशाचा सर्वांगिण विकास घडवून आणण्याचे कार्यक्रम सुरू करणे आवश्यक ठरले. स्वांतत्र्य प्राप्तीच्यावेळी सुमारे ८५% पेक्षा जास्त लोकसंख्या खेड्यात राहत असल्याने खेड्यांचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही. याची जाणीव राज्यकर्त्यांना होती. त्यामुळे खेड्यांच्या समस्यांचे निर्मलून करून त्यांचा सर्वांगीन विकास करण्याचे आणि राज्यघटनेने स्वीकारलेल्या लोकशाही समाजवादी धर्मनिरपेक्ष या मूल्यांवर आधारलेली समाज रचना निर्माण करण्याचे ध्येय निश्चित केले. यालाच ग्रामीण पुनर्रचना किंवा पुनर्रबांधणी (Rural Reconstruction) असे म्हणतात. ग्रामीण पुनर्रचनेसाठी साधने असे म्हणतात. पंचवार्षिक योजना समुदाय विकास योजना पंचायत राज्यपध्दती सहकारी संस्थाची उभारणी इ. ग्रामीण पुनर्रचनेची साधने आहेत.

**भारतातील जमीनधारणा पद्धती** (Land Tenure System)

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग्रामीण विकासासाठी राबविण्यात आलेल्या जमीन सुधारणा कार्यक्रमाचे स्वरूप समजावून घेण्यासाठी प्रथम भारतातील जमीनधारणा पध्दतींचा अभ्यास करणे गरजेचे ठरते.

**जमीनधारणा पध्दतीचा अर्थ:–** 'जमिनीवरील मालकी व तिचा उपभोग घेण्याचा अधिकार निश्चित करणाऱ्या पध्दतीस जमीनधारणा पध्दती असे म्हणतात.' जमीनधारणा पध्दती व जमिनीची कूळ-वहिवाट पध्दती (Land tenure system and Land tenancy system) यात फरक आहे. जमीनधारण पध्दती ही जमिनीवरील मालकीचा व उपभोगाचा अधिकार निश्चित करते. याउलट जमीन कूळ वहिवाट पध्दती ही जमिनीचा मालक व प्रत्यक्षात जमीन कसणारी व्यक्ती म्हणजेच कूळ यांच्यातील वाटावयाच्या उत्पन्नाचे प्रभाव निश्चित करते.

**१) जमीनदारी पध्दती:–**

**जमीनदारी पध्दतीचा अर्थ:–** ''ज्या जमीनसुधारणा पध्दतीत जमीनधारक म्हणजेच जमिनीचा मालक हा स्वत: शेती न कसता इतर व्यक्तींना जमीन कसण्यासाठी देऊन त्याबदल्यात यांच्याकडून शेती उत्पन्नातील ठराविक हिस्सा घेत. तसेच तो जमीन महसूल किंवा शेतभारा (Land Revenue) गोळ करून सरकारकडे जमा करत असे त्या पध्दतीस जमीनदारी असे म्हटले आहे, या पध्दतीत जमीन मालकास जमीनदार (Land Lord) जमीन कसणाऱ्यास कूळ (Tenant) हे नाव मिळाले.

**जमीनदारी पध्दतीची सुरुवात:–** भारतात ही पध्दती ब्रिटीश सत्तेच्या प्रोत्साहनामुळे सुरू झाली असली तरी तिचे मूळ मोगल राजवटी अस्ताच्या काळात आढळते. प्राचीन भारतातील खेड्यात ग्रामीण (गावप्रमुख) व ग्रामपंचायत गावातील शेतकऱ्यांकडून शेतसारा गोळ करून राजसत्तेकडे जमा करीत मध्ययुगात भारतात अनेक लहान मोठी राज्ये निर्माण झाली. राज्यविस्तारासाठी होणाऱ्या सततच्या युध्दामुळे राजवटी सतत बदलत असत. शेतकरी जो कोणी राजा असेल त्याला साधारणपणे शेती उत्पन्नाचा १/६ इतका शेतसारा देत. पुढे मोगल सम्राट अकबराचा प्रधान तोडरमल याने जमिनीची प्रतावरी ठरवून त्यानुसार पध्दती सुरू झाली. शेतसारा ठरवून दिला. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शेतसारा वसुलीसाठी लिलाव पध्दती सुरू झाली. जी जास्त रक्कम देऊन लिलाव खरेदी करी त्यास शेतसारा वसुलीचे अधिकार मिळाले.

**जमीनदारीचे प्रकार:–** जमीनदारी मुख्यत: दोन प्रकारची होती पहिल्या प्रकारात जमीनदाराने सरकारला द्यावयाची शेतसाऱ्याची रक्कम कायमची निश्चित केली होती. एकदा निश्चित केलेल्या रक्कमेत सरकारला वाढ करता येत नसे. शेतकऱ्यांकडून गोळा होणाऱ्या शेतसाऱ्यांपैकी ८९% भाग सरकारला व ११% भाग जमीनदाराला देण्याचे निश्चित केले. ही पध्दती कॉर्नवालिसने २२ मार्च १७९३ पासून बंगाल, बिहार, ओरिसा या प्रांतात आणि मद्रास तामिळनाडू व आसामचा काही भाग तसेच उत्तरप्रदेशातील बनारस जिल्हा यामध्ये लागू केली. या पध्दतीलाच कायम धारा पध्दती म्हटले गेले.

**मालगुजार पध्दती:–** मध्यप्रदेशात मराठेशाहीच्या काळापासून शेतसारा गोळा करणाऱ्या व्यक्तींनी आपणच तेथील जमिनीचे मालक आहोत असा दावा केला. ब्रिटीश सत्तेने हा दावा मान्य करून त्यांना जमिनदारीचे अधिकार दिले. त्यांनाच 'मालगुजार' हे नाव मिळाले. याच लोकांना गुजरातमध्ये 'तालुकादार' तर कोकणात 'खोत म्हटले जाई. याच मालगुजार, तालुकादार, खोत हे ही जमीनदाराप्रमाणेच कुळाकडून शेती कसून घेत.

**जमीन पध्दतीची वैशिष्ट्ये:-**

१) या पध्दतीत विशिष्ट प्रदेशातील शेकडो एकर जमिनीची मालकी जमीनदारांकडे होती.

२) जमीनदार स्वत: शेती न कसता तिचे लहान तुकडे करून वेगवेगळ्या कुळांना कसण्यासाठी देत व कुळाकडून खंड घेत.

३) कुळांना नेमणे, कुळांना बदलणे, खंडाचे प्रमाण बदलणे, खंडाच्या वसुलीची पध्दत ठरविणे खंड न देणाऱ्या कुळांना कच्चा कैदेत ठेवणे इ. अधिकार जमिनदारांना होते.

४) शेतसारा गोळा करून ती सरकारजमा करण्याचे काम जमीनदार करीत.

५) ठरलेला शेतसारा ठरलेल्या वेळी सरकार जमा न करणाऱ्या जमिनदाराची जमिनदारी काढून घेण्याचा अधिकार सरकारला होता.

६) शेतसारा व्यवस्थितपणे जमा करणाऱ्या जमीनदारावर सरकारचे इतर कोणतेही नियंत्रण नसल्याने जमीनदारांचे आपल्या प्रदेशात वर्चस्व निर्माण झाले.

**जमीनदारी पध्दतीचे गुण:-**

**१) उत्पन्नात वाढ:-** जमिनदारी पध्दतीमुळे ब्रिटीश सत्तेच्या महसूल उत्पन्नात वाढ झाली. कायमधारा पध्दतीमुळे कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त व कायमस्वरूपी उत्पन्न मिळू लागले.

**२) अडचणीचे निर्मूलन:-** ईस्ट इंडिया कंपनी सरकारला भारतातील कृषीव्यवस्थेची माहिती नव्हती तिच्याकडे जमिनीचे नकाशे नव्हते. शेतसारा वसुलीसाठी पुरेसे कर्मचारी नव्हते. पैशाची चणचण भासत होती जमीनदारी पध्दतीमुळे या सर्व अडचणीचे बऱ्याच प्रमाणात निर्मुलन होण्यास मदत झाली.

**३) राजकीयदृष्ट्या उपयोग:-** ही पध्दत ब्रिटीश सत्तेस आपला प्रतिनिधी ठेवता आला. जमिनदाराच्या रूपाने या सत्तेस प्रत्येक खेड्यात आपला हितसंबंध ब्रिटीश जोडल्याने ही सत्ता टिकली तरच आपली जमीनदारी टिकेल अशी जमीनदारांची भावना झाली.

**४) भीती व गैरव्यवहारास आळा:-** ही पध्दती सुरू होण्यापूर्वी सारा वसुलीच्यावेळी शेतकरी वर्गास किती सारा आकारला जाईल याची सतत भीती व चिंता असे. पण निश्चित स्वरूपाचा सारा लागू केल्याने ही भीती संपली.

**जमीनदारी पध्दतीचे दोष:-**

**१) कुळांचे शोषण:** जमिनदारांनी कंपनी सरकारला विशिष्ट शेतसारा देण्याचे कबूल केल्याने त्यांनी पूर्वीच्या दरापेक्षा अधिक चढ्या दराने व बळजबरीने कुळांकडून खंड वसूल करण्याचे धोरण स्वीकारले कुळाकडून नजराणे स्वीकारणे, वरचेवर खंड वाढविणे, कुळांना हाकलून लावणे इ. मार्गांनी जमिनदार कुळांचे शोषण करू लागले.

**२) हस्तकांचा उदय:** जमीनदारांना विनासायास सत्ता व संपत्ती मिळाल्याने ते आळशी, विलासी, चैनीखोर व ऐतखाऊ बनले. ते खेडी सोडून शहरात राहू लागले. शेतसारा गोळा करण्यासाठी त्यांनी मध्यस्थ किंवा हस्तक नेमले. या मध्यस्थांनीही शेतसारा वसुलीचे अधिकार इतरांना दिले. त्यामुळे मध्यस्थांची एक साखळीच तयार झाली. सायमन कमिशनच्या अहवालात अशा ५० मध्यस्थांची नोंद आढळते.

**३) सरकारचा तोटा:–** जमीनदार प्रचंड प्रमाणावर शेतसारा वसूल करीत असले तरी सरकारच्या तिजोरीत ठराविकच रक्कम भरीत, त्यामुळे सरकारचा तोटा होऊ लागला. कायमधारा पध्दतीत किती सारा गोळा केला हिशेब जमीनदारांना सरकारला द्यावा लागत नसल्याने ते निरंकुश बनले.

**४) व्यापारांकडून लूट:–** पूर्वी शेतसारा धान्याच्या किंवा पैशाच्या रूपात देण्याची सवलत होती. या पध्दतीत तो पैशाच्या रूपात भरणे आवश्यक केले. त्यामुळे पीक निघताच बाजारात मिळेल. त्यामुळे सारा भरण्यासाठी कुळे भरमसाठ व्याजाने सावकाराकडून कर्ज घेऊ लागले.

**५) कर्जबाजारीपणा वाढला:–** वेळेत सारा भरण्यासाठी जमीनदार कुळांची जमीन शेती अवजारे, गुरे ढोरे बळकावू लागले त्यामुळे सारा भरण्यासाठी कुळे भरमसाठ व्याजाने सावकाराकडून कर्ज घेऊ लागले. कर्जफेडीच्या नावाखाली सावकार त्यांच्या जमिनी बळकावू लागले.

**६) शेती विकासास मारक:–** कॉर्नवॉलिसची अशी अपेक्षा होती की कायमधारा पध्दतीमुळे जमीनदार अधिक नफ्याच्या अपेक्षेने शेती सुधारतील. अधिक जमीन लागवडीखाली आणून अधिक धान्य उत्पादन करतील परिणामी सुबत्ता शेती सुधारण्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले.

**२) महालवारी पध्दती:–**

**महालवारी पध्दतीचा अर्थ:–** महाल म्हणजे खेडे किंवा जमीनमुल्याचा (शेतवडीचा) प्रदेश होय. ज्या जमीनधारणा पध्दतीत प्रत्येक जमीन मालकावर स्वतंत्रपणे शेतसारा न आकारता संपूर्ण खेड्यावर (महालवार) सामुदायिक स्वरूपात आकारला जातो. आणि तो गोळा करण्याची जबाबदारी एखाद्या प्रमुख व्यक्तीवर टाकली जाते त्या पध्दतीस महालवारी पध्दती असे संबोधले गेले.

**महालवारी पध्दतीची सुरुवात:–** उत्तरभारतातील बराच भाग ब्रिटीश सत्तेखाली आल्यानंतर तेथेही बंगाल, बिहार, ओरिसाप्रमाणेच कायमधारा पध्दती लागू करण्याचा प्रयत्न गव्हर्नर जनरल लॉर्ड होस्टिंग्जने केला.

तथापि, ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालक मंडळाने त्याला परवानगी दिली नाही. त्यामुळे कमिशनर्स बोर्डाचा सेक्रेटरी व्होल्ट मॅकेन्झी याच्या सल्ल्यानुसार प्रथम आग्रा, औंध व नंतर पंजाबमध्ये महालवारी पध्दती सुरू करण्यात आली. १८२२ मध्ये त्यासंबंधीचा कायदा करण्यात आला.

**महलवारी पध्दतीची वैशिष्ट्ये:–**

१) या पध्दतीत व्यक्तीऐवजी खेडे हा घटक मानून संपूर्ण गावावर सामुदायिक स्वरूपात शेतसारा आकारला जाई. पंजाबमध्ये मात्र पाच–सहा गावांचा एक गट करून त्या खेड्यातील जमिनीचा उत्पन्नाचा अंदाज घेऊन शेतसारा आकारला जाई.

२) शेतसारा गोळा करणारी व सरकारजमा करणारी व्यक्ती ही गावप्रमुख (पंजाब मध्ये गटप्रमुख) असे तिला वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या नावांनी (उदा. महालदार, नंवरदार, चौधरी, पटेल इ.) ओळखले जाई.

३) शेतसाऱ्याची रक्कम गावप्रमुख किंवा गटप्रमुख आणि ग्रामपंचायतीचे सदस्य यांच्याशी चर्चा करून ठरविली जाई. तसेच शेतसारा ठरविताना जमिनीची प्रत, उत्पादन, क्षमता, पिकांचा प्रकार, पिकाची किंमत इ. बाबी विचारात घेतल्या जात.

४) गावकऱ्यांशी सामुहिक करार करून शेतसारा काही वर्षासाठी (पंजाबात २० तर आग्रा प्रांतात ३० वर्षासाठी) निश्चित केला जाई. या करारावर गावाच्या व गटाच्या वतीने अनुक्रमे गावप्रमुख व गटप्रमुख सही करीत.

५) आकारण्यात आलेल्या एकूण शेतसाऱ्यामध्ये प्रत्येक व्यक्तीचा वाटा किती हे गावप्रमुख प्रत्येक व्यक्तीचे उत्पन्न विचारात घेऊन निश्चित करीत असे. पंजाब मध्ये हा वाटा खेड्याच्या उत्पन्नानुसार गटप्रमुख ठरवित असे.

६) या पध्दतीत प्रत्येक जमीनधारकास त्याचा जमिनीवरील मालकी हक्क दर्शविणारा दस्ताऐवज दिला जाई. व्यक्ती जोपर्यंत व्यवस्थितपणे शेतसारा भरत असे. तोपर्यंत तिची जमिनीवरील मालकी मान्य केली जाई. वेळेवर शेतसारा न भरणाऱ्याची जमीन काढून घेण्याचा अधिकार सरकारला होता.

**महालवारी पध्दतीचे गुण:–**

१) या पध्दतीत जमीन कसण्याचे काम जमीन मालकच करीत असल्याने मध्यस्थाकडून त्यांचे शोषण होण्याची शक्यता नव्हती.

२) शेती व्यवसायाकडून मिळणारे सर्व फायदे जमीन मालकासच मिळत असल्याने शेती व्यवसायात सुधारणा करण्याची प्रेरणा त्यांना मिळू शकते.

३) प्राचीन भारतात थोड्याफार फरकाने ही पध्दती होती. ग्रामिणी हा प्रमुख शेतसारा गोळा करून मध्यवर्ती सत्तेकडे जमा करीत असे. त्यामुळे लोकांना महालवारी पध्दती आपल्या परंपरेस धरून आहे असे वाटे.

**महालवारी पध्दतीचे दोष:–**

१) या पध्दतीत सरकार जमीन कसणारे लोक यांचा प्रत्यक्ष संबंध येत नव्हता. कारण शेतसारा गोळा करणारा व सरकारजमा करणारा मध्यस्थांचा (गावप्रमुख व गटप्रमुख) वर्ग उदयास आला.

२) या मध्यस्थांना फाजील महत्त्व प्राप्त झाले. ते लोकांकडून जादा शेतसारा गोळा करून त्यातील काही भाग हडप करू लागले. त्यामुळे ते श्रीमंत बनले व त्यांचा खेड्यात वरचष्मा निर्माण झाला. ते शेतकऱ्यांकडून नजराणे स्वीकारू लागले.

३) या पध्दतीत शेतसाऱ्यांचे प्रमाण बरेच मोठे असल्याने शेतकऱ्यांना ही पध्दती फारशी फायदेशीर व प्रेरणादायी ठरली असे म्हणता येत नाही.

**३) रयतवारी पध्दती:–**

**रयतवारी पध्दतीचा अर्थ:–** ''ज्या जमीनधारणा पध्दतीत जमीन करणाऱ्या रयतेकडे 'प्रजेकडे जमिनीची मालकी असते. व कोणत्याही प्रकारच्या मध्यस्थाशिवाय सरकार स्वत:च रयतेकडून शेतसारा गोळा करते त्या पध्दतीस रयतवारी पध्दती म्हटले गेले.

**रयतवारी पध्दतीची सुरुवात:–** ही पध्दती ब्रिटीश राजवटीपूर्वीपासूनच अंमलात होती. ब्रिटीश सत्तेने फक्त तिला मान्यता दिली. जमिनदारी पध्दतीचे अनेक दुष्परिणाम घडून आले. जमीनदारांचा वर्ग, भ्रष्ट, ऐतखाऊ व माजोर बनल्याने सरकारचे ना पुरेसे उत्पन्न वाढले शेतीला सुधारणा झाली. हा वर्ग कुळांचे प्रचंड शोषण करू लागल्याने कुळे दरिद्री व असहाय्य बनली. सरकारविषयी त्यांच्या मनात अप्रिय भावना निर्माण झाली. त्यामुळे ईस्ट इंडिया कंपनीच्या काही संचालकांना व अधिकाऱ्यांना जमीनदारी पध्दती व कायमधारा पध्दती नकोशी वाटू लागली. शेतसाऱ्याची रक्कमही कायम स्वरूपात निश्चित लागू केल्यास सरकार व रयत यांच्यात प्रत्यक्ष संबंध येतील. मध्यस्थ नसल्याने रयतेचे शोषण होणार नाही व रयत खूप एलरिफरटन (मुंबईचा गव्हर्नर) व चॅम्लीन या अधिकाऱ्यांनीही आपल्या अहवालात जवळपास अशाच शिफारसी केल्या. कंपनीने या शिफारशींना मान्यता दिली व दक्षिण व पश्चिम भारतातील प्रदेश कंपनीच्या या शिफारशींना मान्यता दिली जमिनीचे नकाशे बनविले तसेच या प्रदेशातील जमिनीतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा अंदाज घेऊन शेतसारा निश्चित केला.

**रयतवारीची वैशिष्ट्ये:–**

१) या पध्दतीत जमीन कसणाऱ्यांना जमिनीचे मालकी हक्क वंशपरंपरेने दिले. प्रत्येक गावाचे सर्वेक्षण करून एक रजिस्टर बनविले. त्यामध्ये प्रत्येक शेतकऱ्यांना नाव व त्याच्या जमिनीची नोंद केली गेली. शेतमजमिनीस सर्व्हे नंबर दिले. शेतकऱ्यांना ओळखपत्रे दिली.

२) रजिस्टरमध्ये नोंद झालेल्या शेतकऱ्यांना आपल्या मालकीची जमीन विकणे, गहाण ठेवणे, भाड्याने देणे, इतरांकडे हस्तांतरित करणे इ. बाबतचे अधिकार दिले. जोपर्यंत शेतकरी सरकारला सारा व्यवस्थित देत असे तोपर्यंत त्याचा जमिनीवर अधिकार होता.

३) या पध्दतीत सरकार स्वत:च शेतसारा गोळा करत असल्याने जमीनदार वैगेरे सारखा मध्यस्थांचा वर्ग नव्हता.

४) शेतकऱ्यांचे प्रमाण जमिनीतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा अंदाज घेऊन ठरविण्यात येई साधारण शेती उत्पन्नातून खर्च वजा जाता शिल्लक राहिलेल्या निव्वळ उत्पन्नाच्या ५०% इतका शेतसारा ठरविला जाई.

५) शेतसाऱ्याचा कालखंड वेगवेगळ्या भागात वेगवेगळा होता.

**रयतवारी पध्दतीचे गुण:–**

**१) शेतीत सुधारणा:–** जमिनीची मालकी कसणाऱ्याकडे असल्याने व जामीनदारांसारखे मध्यस्थ नसल्याने शेतीतून होणारा लाभ फक्त त्यानांच मिळू लागला. परिणामी शेतीत गुतंवणूक व सुधारणा करण्यास प्रोत्साहन मिळाले.

**२) शेतकऱ्यांना दिलासा:–** सरकारच शेतसारा गोळा करीत असल्याने सरकार व शेतकरी यांच्यात प्रत्यक्ष संबंध येऊ लागले. त्यामुळे शेतकऱ्याच्या अडीअडचणी सरकारला समजू लागल्या.

**३) सहकाराचा फायदा:–** या पध्दतीत सरकार काही विशिष्ट काळानंतर शेतसाऱ्यात सुधारणा करीत असल्याने सरकारला शेतसाऱ्यात वाढ करून अधिक उत्पन्न मिळवता येऊ लागले.

**४) रयतेचा पाठिंबा:–** या पध्दतीमुळे मुठभर जमीनदारांऐवजी संपूर्ण रयतेचा पाठींबा मिळवणे सरकारला शक्य होते तसेच ही पध्दती काही भागात पूर्वापारपणे चालत आलेली असल्याने जनतेनेही तिला पाठिंबा दिला. उलट रयतेत आत्मविश्वास व स्वावलंबनाची भावना निर्माण होण्यास मदत झाली.

**रयतवारी पध्दतीचे दोष:–**

**१) डोईजड शेतसारा:–** कायमधारा पध्दतीपेक्षा रयतवारीत शेतकऱ्याचे प्रमाण जास्त होते विशिष्ट काळानंतर सरकार त्यात वाढ करू शकत होते. त्यामुळे सरकारचा जरी फायदा होत असला तरी शेतकऱ्यांना मात्र शेतसारा डोईजड होऊ लागला.

**२) शोषन :–** शेतसारा वेळेत न भरणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनी सरकार जप्त करू लागले तसेच सरकारी अधिकारी जमीनदारांसारखेच कठोरपणे सारा गोळा करू लागले, सारा न भरणाऱ्यास उपाशी ठेवणे, निसर्ग विधीला न जाऊ देणे, त्यांचे केस प्राण्यांच्या शेपटीला बांधणे त्यांच्या गळ्यात हाडांची माळ घालणे. इत्यादी.

**३) कर्जबाजारीपणा वाढला:–** शेतीसारा न भरल्यास जमीनीवर येणारी जाती व होणारी शिक्षा टाळण्यासाठी शेतकरी सावकराकडून भरमसाठ व्याजदराने कर्ज घेऊ लागले. कर्ज न फिटल्यास सावकार त्यांच्या जमिनी लुबाडू लागले.

**४) शेती सुधारण्यात अडथळा:–** सरकार वेळोवेळी शेतसारा वाढवित असल्याने शेतकऱ्यांकडे शेतीत गुंतवणूक करण्यासाठी पैसा शिल्लक राहणे अवघड झाले. शेतात सुधारणा करून उत्पन्न वाढविल्यास सरकार शेतसारा वाढविल या भीतीपोटी शेतकऱ्यांनी शेतीत सुधारणा न करण्याचे धोरण स्वीकारले.

**५) कुळांचे शोषण:–** या पध्दतीत जमीनमालकच शेती कसत, तथापि बड्या शेतकऱ्यांना आपली विस्तृत जमीन कसणे शक्य नसल्याने ते कुळांना जमिनी कसण्यासाठी देऊन त्यांच्याकडून भरमसाठ खंड उकळू लागले. परिणामी, जमीनदारी प्रमाणेच रयतवारीतही कुळशोषण काही प्रमाणात चालूच राहिले.

**क) हरितक्रांती**

**हरितक्रांतीचा अर्थ:–** शेती क्षेत्रात नियोजनबध्द परिवर्तन घडवून आणण्याचा हरितक्रांती हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. क्रांती हा शब्द आकस्मिक किंवा झटपटपणे आमूलाग्र किंवा मूलभूत बदल घडवून आणणे या अर्थाने वापरला जातो. क्रांती म्हणजे समाजाच्या कोणत्याही क्षेत्रात किंवा व्यवस्थेत मूलभूत बदल घडून येणे म्हणजेच प्रस्थापित व्यवस्था नष्ट होऊन तिच्या जागी नवीन व्यवस्था येणे होय. या अर्थानुसार हरितक्रांती म्हणजे कृषी क्षेत्रात किंवा कृषी उत्पादक व्यवस्थेत मूलभूत बदल घडून येणे होय. शेतजमिनीचे आकारमान न वाढवता आहे त्या शेतजमिनीत आधुनिक किंवा प्रगत उत्पादन तंत्र वापरून शेती उत्पादनात मोठी वाढ करणे. यालाच उद्देशून हरितक्रांती ही संज्ञा वापरली जाते. सुधारित शेती अवजारे, संकरित बी–बियाणे, रासायनिक खते, जंतुनाशके, कृत्रिम पाणीपुरवठ्याच्या सुविधा इत्यादींचा वापर करून वर्षातून दोन–तीन पीक घेणे. वर्षभर शेती हिरवीगार ठेवणे म्हणजे हरितक्रांती होय. शेती क्षेत्रातील या विकासास उद्देशून युनायटेड स्टेटस एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट या संस्थेचे संचालक विल्यम गॉड यांनी हरितक्रांती असे म्हटले आहे.

**भारतात हरितक्रांतीचा प्रारंभ:–** हरितक्रांती जगात सर्व प्रथम उत्तर अमेरिकेतील मेक्सिको देशात सन १९४०–४१ मध्ये घडून आली. त्यानंतर ही क्रांती डॉ. नॉमरन बोरलॉग यांच्या मार्गदर्शनाखाली जगातील इतर अनेक देशांत घडून आली. रॉक फेलर' नावाच्या फाऊंडेशनने शेतातील नवे संशोधन जगभर पोहचविले. भारतात सन १९६७–६८ मध्ये पहिली हरितक्रांती घडून आली. तर सन १९८३–८४ मध्ये दुसरी हरितक्रांती घडून आली असे मानले जाते.

स्वांतत्र्यप्राप्तीनंतर भारताला दारिद्र्य, बेकारी, अन्नधान्य टंचाई, उपासमार अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागले या समस्यांचे निर्मलून करून देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी नियोजनाचा स्वीकार करण्यात आला. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने शेतीचा विकास केल्याशिवाय देशाचा आर्थिक विकास अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी तसेच कापड, साखर, ताग, तेल, गिरण्या इत्यादी उद्योगधंद्याच्या कच्चा मालाची गरज भागविण्यासाठी शेतीचे उत्पादन व उत्पादकता वाढविणे आवश्यक होते. याबाबतचा सल्ला फोर्ड फाऊंडेशनच्या तज्ञ समितीकडून घेण्याचे सरकारने ठरविले. या समितीने एप्रिल १९५१ मध्ये आपला अहवाल सादर केला. त्यानुसार १९६० पासून हा भारतातील अन्नधान्याचे विशेषत: तांदुळ, गहू, बाजरी, मका यांचे उत्पादक मोठ्या प्रमाणावर वाढून हरितक्रांती घडून आली. त्यानंतर पुढे ऊस, कापूस, ताग, ह्या नगदी पीकांचेही उत्पादक बऱ्यापैकी वाढले.

**हरितक्रांतीची कारणे:–**

**१) कृषी संशोधन:–** स्वांतत्र्यानंतर केंद्र सरकारने भारतीय कृषी संशोधन मंडळ स्थापन केले. शिवाय घटक राज्यातही अशी मंडळे स्थापन झाली. तसेच देशात सर्वत्र कृषी विद्यापीठे व महाविद्यालये सुरू झाली. या सर्व मंडळांनी व विद्यापीठांनी पीक, लागवड, मशागत, बी–बियाणे, खते व जंतुनाशके, जलसिंचन सुविधा इ. संदर्भात मौलिक संशोधन केले व ते शेतकऱ्यापर्यंत पोहचविले या संशोधनामुळे शेतकऱ्यांना शास्त्रीयदृष्ट्या शेती कशी करावी याचे ज्ञान झाले.

**२) जलसिंचन सुविधा:–** भारतीय शेती लहरी अशा मान्सूनवर अवलबूंन असल्याने शेतीची उत्पादकता कमी आहे. म्हणून स्वातंत्र्यानंतर शेतीला बारमाही पाणीपुरवठा व्हावा म्हणून सरकारने मोठ्या, मध्यम व लघू पाठबंधारे योजना राबविल्या. तसेच विहिर, कुपनलिका, पाझर तलाव यांची खुदाई करून जलसिंचन सुविधा वाढविल्या तसेच उपसा जलसिंचनाच्या (Lift Irrigation) सोयीही निर्माण झाल्या.

**३) संकरित बी–बियाणे:–** कृषी शास्त्रज्ञांनी बी–बियाणांच्या संदर्भात संशोधन करून अधिक उत्पादन देणाऱ्या बी–बियाणांच्या जाती शोधून काढल्या. ही सुधारित बी–बियाणे शेतकऱ्यांना पुरवठा केली. तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी, मका या धान्यांच्या संकरित बी–बियाणांचा शेतकऱ्यांना पुरवठा केला. तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी, मका या धान्यांची संकरित बी–बियाणे शेतकरी वापरू लागले.

**४) खतांचा वापर:–** कृषी संशोधनातून नवनवीन रासायनिक खते तयार होऊ लागली. सरकारने सहकारी संस्था स्थापन करून त्यांच्यामार्फत ही खते शेतकऱ्यांपर्यंत पोहचविली. शिवाय शेतकऱ्यांना ही खते खरेदी करणे शक्य व्हावे म्हणून सरकारने सबसिडीही दिली. त्यामुळे शेतात अल्पावधीत खतांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला. सन १९६०–६१ ते १९६१–६६ या कालावधीत खतांचा वापर प्रतिवर्षी सुमारे ९० हजार टनांनी वाढला.

**५) प्रगत शेती अवजारे:–** स्वातंत्र्यानंतर आधुनिक वा प्रगत अशी शेती अवजारे निर्माण करण्याचे कारखाने मोठ्या प्रमाणावर निघाले. त्यामुळे नांगरणीसाठी ट्रॅक्टर, पीक कापणीची यंत्रे, मळणीची यंत्रे, पाणीपुरवण्यासाठी डिझेल इंजिन व वीजेचे पंप, पाईप लाईन्स अशी शेती अवजारे शेतामध्ये वापरली जाऊ लागली. परिणामी हरितक्रांती होण्यास चालना मिळाली.

**६) वित्तपुरवठा:–** शेती व्यवसाय करण्यासाठी शेतकऱ्यांना पैशाची गरज असते. नवीन शेती, अवजारे, खते, बीयाणे खरेदी करणे इत्यादीसाठी शेतकऱ्यांना पैसा लागतो. शेतकऱ्यांची पैशाची गरज भागविण्यासाठी सरकारने व्यापारी बँका, सहकारी बँका, भुविकास बँका, सहकारी पतसंस्था इत्यादीच्याद्वारे अल्प व्याजदराने त्यांना कर्ज पुरविणे सुरू केले. परिणामी, शेतकऱ्यांना शेतीत सुधारणा करणे शक्य होऊ लागले.

**७) शेती मालास हमी:–** शेतीमध्ये आधुनिक उत्पादन तंत्र वापरून भरपूर अन्नधान्य उत्पादन होऊ लागले. परिणामी, शेतीमाल बाजारात मोठ्या प्रमाणावर होऊ लागला अशा स्थितीत शेतीमालाच्या किंमती ढासळू नयेत व शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये. म्हणून सरकारने शेतीमालाच्या हमी किंमती निश्चित केल्या.

धान्य खरेदी करण्याची शाश्वती शेतकऱ्यांना दिली. सरकारच्या ह्या प्रोत्साहनात्मक धोरणामुळे शेतकऱ्यांना अधिक धान्य पिकविण्याची प्रेरणा मिळू लागली व हरितक्रांती घडून आली.

**८) अन्य काही कारणे:–** वरील प्रमुख कारणाशिवाय इतरही अन्य काही कारणे हरितक्रांती होण्यास कारणीभूत ठरली. त्यामध्ये जंतुनाशकांचा वापर करणे, शेतीमालावर प्रक्रिया करणे, शेतीमाल बाजारपेठेपर्यंत पोहचविण्यासाठी वाहतूक सुविधांत वाढ करणे, धान्य साठवणुकीसाठी गोदामे बांधणे, जमिनीची धूप होऊ नये म्हणून बांधबंदिस्ती करणे इत्यादींचा समावेश. या छोट्यामोठ्या कारणांमुळेही अन्नधान्याचे उत्पादन वाढून हरितक्रांती होण्यास मदत झाली.

**हरित क्रांतीचे परिणाम:–**

**अनुकूल परिणाम:–**

**१) शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनात बदल:–** हरित क्रांतीमुळे शेतकऱ्यांच्या शेतीकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात बदल घडून आला. शेतकरी फार पूर्वीपासून शेतीकडे केवळ निर्वाहाचे (पोट भरण्याचे) साधन म्हणून पाहात आलेला आहे. कसे तरी करून आपले व आपल्या कुटंबाचे पोट भरणे एवढ्या संकुचित दृष्टिकोनातून शेतकरी शेती करीत आहे. हरितक्रांतीमुळे शेतीचे उत्पादन वाढले. परिणामी, शेतकऱ्यांना नफा होऊ लागला. त्याच्या हाती पैसा येऊ लागला. म्हणजेच शेतीकडे तो व्यापारी दृष्टिकोनातून बघू लागला. थोडक्यात हरितक्रांतीमुळे उत्पादनाचा हेतूच बदलला हा बदल नक्कीच स्वागतार्ह ठरला.

**२) शेतीचे उत्पादन व उत्पादकता वाढली:–** हरित क्रांतीमुळे शेतीचे उत्पादन व उत्पादकता मोठ्या प्रमाणात वाढली. सुधारित शेती, अवजारे, रासायनिक खते, जंतुनाशके, जलसिंचन सुविधा इत्यादीचा वापर करून वर्षातून दोन–तीन पीके घेतली जाऊ लागले. गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, मका यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होऊ लागले. उदा: १९६०–६१ मध्ये अन्नधान्याचे उत्पादन ८२ दशलक्ष टन एवढे होते ते वाढून इ. स. १९८४–८५ मध्ये १४६ दशलक्ष टनावर पोहचले. परिणामी देशातील अन्न धान्याच्या टंचाईची समस्या संपुष्टात आली. आधी धान्य आयात करावे लागे, हरित क्रांतीमुळे हा प्रकार बंद झाला. त्यामुळे देशाची पत व प्रतिष्ठा वाढली.

**३) शेतीतील गुंतवणूक वाढली:–** हरितक्रांतीच्या पूर्वी शेतीत अप्रगत उत्पादन तंत्र वापरले जाई. परिणामी, शेतीचे उत्पादन व उत्पादकता खूपच कमी असे त्यामुळे शेती व्यवसाय तोट्यात असे म्हणून शेतकरी शेती व्यवसाय गुंतवणूक करण्यास धजावत नसत. हरितक्रांतीमुळे शेतीचे उत्पादन व उत्पादकता म्हणून वाढता शेती व्यवसाय फायदेशीर ठरू लागला. त्यामुळे शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढला. ते शेतीत सुधारणा करण्यासाठी उदा: विहिर खोदणे, पाईप लाईन टाकणे, विजेचा पंप बसविणे, टॅक्टर घेणे बांधबंधिस्ती करणे इ. गुंतवणूक करू लागले.

**४) शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली:–** हरितक्रांतीमुळे शेतीचे उत्पादन वाढले परिणामी, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले. त्यांच्या हाती पैसा खेळू लागला. परिणामी त्यांची आर्थिक स्थिती सुधारली.

शेतकरी मोठमोठी घरे बांधू लागले. घरात भांडीकुंडी व फर्निचर घेऊ लागले. दुचाकी, चारचाकी वाहने बाळगू लागले आरोग्यासाठी पैसा खर्च करू लागले.

**५) रोजगारात वाढ:–** हरितक्रांतीमुळे ग्रामीण भागात रोजगार वाढला कारण हरितक्रांतीमुळे शेतात वर्षातून दोन–तीन पीके घेणे शक्य होऊ लागले परिणामी शेतात पेरणी, खुरपणी, काढणी, मळणी, मशागत, पिकांना पाणी देणे इत्यादी क्रिया–प्रक्रियांमध्ये वाढ होऊन ग्रामीण लोकांना शेतात वर्षभर रोजगार मिळू लागला. ज्या भागात हरित क्रांती यशस्वी झाली तेथील शेतीचे हंगामी स्वरूप कमी झाले. त्यामुळे हंगामी बेकारी कमी झाली.

**६) औद्योगिक विकासास चालना:–** हरितक्रांतीमुळे औद्योगिक विकासास चालना मिळाली. हरितक्रांतीमुळे ऊस, कापूस, ताग, इत्यादीचेही उत्पादन वाढले. त्यामुळे साखर कारखाने, सूत गिरण्या, ताग गिरण्या इत्यादी उद्योगांच्या कच्चा मालाची गरज पूर्ण होऊन त्यांचा विकास होण्यास मदत झाली. तसेच हरितक्रांतीमुळे अनेक नवे उद्योग सुरू झाले.

**प्रतिकूल परिणाम:** हरितक्रांतीचे काही प्रतिकूल परिणाम म्हणजेच दुष्परिणामही घडून आले आहेत. या दुष्परिणामांना हरितक्रांतीमुळे निर्माण झालेल्या समस्या असेही म्हणतात.

**१) केवळ बड्या शेतकऱ्यांचा फायदा:–** हरितक्रांतीचा फायदा केवळ बड्या शेतकऱ्यांनाच झाला. कारण आधुनिक शेती अवजारे, रासायनिक खते व जंतुनाशके, संकरित बी–बियाणे, जलसिंचन सुविधा इत्यादींचा वापर करण्यासाठी लागणारा पैसा ह्या बड्या शेतकऱ्यांकडेच होता. छोट्या शेतकऱ्यांकडे पैसा नसल्याने हे नवीन उत्पादन तंत्र त्यांना वापरणे शक्य झाले नाही. त्यामुळे त्यांची शेती अप्रगतच राहीली.

**२) आर्थिक विषमता वाढली:–** हरितक्रांतीचा लाभ केवळ बड्या शेतकऱ्यांनाच झाला. त्यामुळे ते अधिक श्रीमंत बनले तर छोटे शेतकरी वा अल्पभूधारक शेतकरी हे हरितक्रांतीच्या लाभापासून वंचित राहिल्याने ते अधिकच गरीब बनले. परिणामी, ग्रामीण भागात आर्थिक विषमता वाढली.

**३) प्रादेशिक विषमता वाढली:–** हरितक्रांतीमुळे भारतात प्रादेशिक विषमताही वाढली कारण हरितक्रांती ही देशाच्या कांही मोजक्या राज्यांमध्येच उदा: पंजाब, हरियाणा, गुजरात, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, केरळ इत्यादी घडून आली. त्यामुळे या राज्यांतील शेतकऱ्यांची स्थिती सुधारली इतर राज्यांत मात्र हरितक्रांतीचा प्रयोग फारसा यशस्वी झाला नाही.

**४) पीकांच्या उत्पादनातील असमतोल:–** हरितक्रांतीमुळे पीकांच्या उत्पादनात असमतोल निर्माण झाला. कारण हरित क्रांतीमुळे प्रामुख्याने गहू व तांदूळ यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढले. त्या खालोखाल ज्वारी, बाजरी, मका, ऊस यांचे उत्पादन वाढले. मात्र तेलबिया, कडधान्ये, मसाल्याचे पदार्थ, फळे यांच्या उत्पादनात फारशी वाढ झाली नाही.

**५) बेकारी वाढली:–** हरितक्रांतीमुळे बेकारी वाढली, कारण हरितक्रांतीमुळे शेतीत यंत्रे वापरली जाऊ लागली त्यामुळे शेतमजूरांवर बेकारीची पाळी आली. ते शेती क्षेत्राबाहेर फेकले गेले. अनेकांना स्थलांतरित

व्हावे लागले. हरितक्रांतीमुळे अल्पभूधारक व कुळे देखील बेकार झाली. कारण बड्या शेतकऱ्यांप्रमाणे आपल्या जमिनी बड्या शेतकऱ्यांना विकल्या. तसेच अनेक बड्या शेतकऱ्यांनी कुळांनाही हाकलून लावले व ते स्वत:च यंत्रांच्या मदतीने आधुनिक शेती करू लागले.

**६) इतर समस्या:–** हरितक्रांतीमुळे संकरित बी-बियाणांचा वापर वाढला. त्यामुळे अन्नधान्यांचे उत्पादन वाढले. पण त्याची गुणवत्ता कमी झाली. हे धान्य निकृष्ट दर्जाचे असल्याने लोकांचे आरोग्य ढासळले. हरितक्रांतीमुळे रासायनिक खते, जंतुनाशके, किटकनाशके, पाणी यांचा बेसुमार व अतिवेळा वापर वाढला. त्यामुळे अनेक ठिकाणी जमिनी क्षारपड (मीठ फुटणे) बनल्या. तसेच खंताचे व जंतुनाशकांचे अंश अन्नधान्यात उतरले असे धान्य खाणाऱ्यांचे आरोग्य बिघडले.

### **४.२.३ शेतीविषयक (कृषक) समस्या** (Agrarian Issues)

भारतीय शेतीपुढे अनेक गंभीर प्रश्न आहेत. शेतीविषयक (कृषक) प्रश्नांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

अ) नैसर्गिक आपत्तीचे प्रश्न:

उदा: १) पावसाची आपत्ती २) हवामान बदलाची आपत्ती

ब) संरचनात्मक प्रश्न:

उदा: १) जमिनीच्या विषम वितरणाचा प्रश्न २) तुकडीकरणाचा प्रश्न

क) आर्थिक व वित्तीय प्रश्न:

उदा: १) बेकारी २) दारिद्र ३) कर्जबाजारीपणा ४) वाढता उत्पादन खर्च ५) शेती उत्पादनास कमी भाव

ड) शेतीच्या आधुनिकीकरणाचे प्रश्न:

उदा: १) आधुनिक उत्पादन तंत्राचा वापर २) शेती संशोधनाचा वापर ३) शेतकऱ्यांचे मानसिक आधुनिकीकरण

ई) जागतिकीकरणामुळे निर्माण झालेले प्रश्न:

उदा: १) निर्यातीतील अडथळे २) अनुदानात कपात विशेष आर्थिक क्षेत्रांचा प्रश्न ३) आत्महत्या

आता आपण वरील सर्व प्रश्नांची तपशिलवारपणे चर्चा करणार आहोत.

**अ) नैसर्गिक आपत्तीच्या समस्या** (Issues of Natual Disasters)

भारतीय शेतकऱ्यांना नेहमीच नैसर्गिक आपत्तींना (संकटांना) तोंड द्यावे लागते. या आपत्ती शेतीचे व म्हणून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान करतात या आपत्ती दोन प्रकारच्या आहेत.

**१) पावसाविषयीची आपत्ती:** भारतीय शेती ही मुख्यत: लहरी अशा मोसमी पावसावर अवलंबून आहे. एखाद्या वर्षी भरपूर पाऊस पडतो. तर एखाद्या वर्षी खूपच कमी पडतो. त्यामुळे कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ पडतो. ओल्या दुष्काळात हाती आलेले पीक अति पावसामुळे बुडते तर कोरड्या दुष्काळात कधी कधी पेरणीही होऊ शकत नाही. त्यामुळे शेती हंगाम बुडतो शेतकऱ्यांच्या हाती काहीच लागत नाही. बऱ्याच वेळा हंगामाच्या प्रारंभी समाधानकारक पाऊस पडतो. त्यामुळे शेतकरी आनंदाने पेरणी करतो. पुढे मात्र पाऊस पडत नाही. त्यामुळे पीक जळून जाते पेरणीचा खर्च व श्रम वाया जाते आपल्याकडील हवामान खात्याचे अंदाज बहुधा चुकतातच असा अनुभव आहे. या खात्याचा चांगला पाऊस होणार असा अंदाज खोटा ठरतो व शेतकरी पेरणीच्या खर्चास मुकतो. थोडक्यात, भारतात मोसमी पाऊस पडेल की नाही याची निश्चिती नसल्याने शेतकरी नेहमीच संभ्रमात पडतो.

भारतात मोसमी पाऊस केवळ अनिश्चितच नाही तर त्याचे वितरण मोठे असमान (विषम) आहे. ही असमानता स्थळ व काळ या दोन्ही संदर्भात आढळते. म्हणजे एखाद्या स्थळी व काळी कमी पडतो. उदा: कच्छत्वे रण (गुजरात) पश्चिम राजस्थान, जम्मू-काश्मिरचा उत्तर भाग नैऋत्य पंजाब, पश्चिम हरियाणा इ. भागात ४० सें.मी. पेक्षा कमी पाऊस पडतो तर पश्चिम किनारपट्टी, अरूणाचल प्रदेश, मिझोराम, मेघालय, इ. भागात २५० सें.मी. पेक्षा जास्त पडतो. मोसमी पाऊस काही महिन्यात त्यामध्ये खंड पडतो. पावसाची सुरुवात कधी लवकर तर कधी उशिरा होते. कधी कधी वर्षभराचा पाऊस एकाच महिन्यात पडतो व बाकीचे महिने कोरडे जातात. एकंदरित मोसमी पाऊस हा अनिश्चित व अनियमित असल्याने शेती संबंधी काय निर्णय घ्यावयाचा हा प्रश्न शेतकऱ्याला सतत भेडसावतो. म्हणुनच भारतीय शेती हा एक जुगार आहे असे म्हटले जाते.

**२) हवामानातील बदलाची आपत्ती:** भारतात अनेकदा अचानकपणे हवामानात मोठे बदल होतात. कधी कधी कडाक्याचे ऊन पडते, कधी थंडी पडते तर कधी धुके पडते, कधी मोठे वादळ होते, तर कधी गारपीट होते. यामुळे पिकांचे प्रचंड नुकसान होते तसेच अनेकदा पिकावर कीड पडते तर कधी टोळधाड पडते. त्यामुळे हाती आलेले पीक बघता बघता नष्ट होते. हवामानातील या बदलांवर पूर्णत: मात करणे शक्य नसले तरी त्या बदलांपासून पिकांचे संरक्षण करण्याची यंत्रणा उभारणे शक्य आहे. तथापि, त्यासाठी लागणारे मोठे भांडवल बहुसंख्य शेतकऱ्यांकडे नाही.

आज शासनाने पीक विमा योजना सुरू करून शेतकऱ्यांना पीक बुडाल्यास, नुकसान भरपाई देण्याची योजना सुरू केली आहे पण ही भरपाई अनेकदा खूपच कमी असते व ती ही वेळेवर मिळत नाही. शासकीय कर्मचारी यामध्ये मोठा भ्रष्टाचार करतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हाती फारसे काही लागत नाही.

अशाप्रकारे नैसर्गिक आपत्ती हा भारतीय शेतकऱ्यांच्या पुढे मोठा गंभीर प्रश्न आहे. त्यामुळे नैसर्गिक आपत्तीला शासनाकडून मदत मिळावी म्हणून अनेकवेळा शेतकरी आंदोलन/चळवळ करताना दिसतात.

**ब) सरंचनात्कक समस्या** (Structural Issues)

भारतीय समाजरचनेतील काही घटकांमुळेही शेतकऱ्यांच्या जीवनात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

**१) जमिनीच्या विषम वितरणाची समस्या:** शेतजमिनीच्या वितरणात (वाटपात) मोठी विषमता आढळते. जमिनदारी निर्मूलन कायदे करण्यापूर्वी सुमारे १% लोकसंख्या असलेल्या जमीनदारांकडे (Landlords) सुमारे १६% पेक्षा जास्त जमीन होती. म्हणजेच उरलेल्या ९९% लोकसंख्येकडे ८४% जमीन होती. आज सुमारे २०% शेतकऱ्यांकडे सुमारे ७०% जमीन आहे तर ८०% शेतकऱ्यांकडे ३०% जमीन आहे. शेतकऱ्याकडे किती हेक्टर्स जमीन आहे या निकषावर शेतकऱ्यांचे चार वर्ग पाडता येतात.

**अ) बडे** (Big) **शेतकरी–** म्हणजे १० हेक्टर्सच्या दरम्यान जमीन असणारे यांचे प्रमाण सुमारे १८% आहे.

**ब) मध्यम** (Middle) **शेतकरी–** म्हणजे ५ ते १० हेक्टर्सच्या दरम्यान जमीन असणारे यांचे प्रमाण ६% आहे.

**क) लहान** (Small) **शेतकरी** – म्हणजे २ ते ५ हेक्टर्सच्या दरम्यान जमीन असणारे यांचे प्रमाण सुमारे १६% आहे.

**ड) सीमांत** (Marginal) **शेतकरी** – म्हणजे २ हेक्टर्सपेक्षा कमी जमीन असणारे यांचे प्रमाण सुमारे ६०% आहे.

वरील विवेचनावरून हे लक्षात येते की लहान व सीमांत शेतकऱ्यांचे एकत्रित प्रमाण सुमारे ७६% आहे. जमिनीचे क्षेत्र (आकार) लहान असल्याने या शेतकऱ्यांना आपल्या शेतीत आधुनिक यंत्र, तंत्रे, अवजारे, कृत्रिम पाणीपुरवठ्याच्या (जलसिंचनाच्या) सुविधा इ. वापरता येत नाहीत. तसेच बांधबंदिस्ती करता येत नाही. त्यामुळे त्यांची शेती किफायतशीर होत नाही. त्यामुळे लहान क्षेत्रात किफायतशीर शेती कशी करावयाची हा शेतकऱ्यांपुढील गहन प्रश्न आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठीच म्हणजेच जमिनीचे न्याय वाटप व्हावे म्हणून लहान शेतकऱ्यांनी व भूमीहीन शेतमजुरांनी काही चळवळी केलेल्या आहेत.

जमिनीच्या विषम वितरणाचा प्रश्न सोडविण्यासाठी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शासनाने जमीन सुधारणा (Land Reform) कार्यक्रम राबविला. त्या अंतर्गत जमीनदारी निर्मूलनाचे कायदे केले. त्यानुसार जमीनदारांकडील काही जमीन काढून लहान शेतकऱ्यांना व भूमीहीनांना दिली. तसेच कुळांनाही जमिनीचे मालकी हक्क देणारे कायदे केले. जमीणधारणेवर कमाल मर्यादा घालणारे कायदे केले या कायद्यांनी ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा जास्त जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांकडील अतिरिक्त (जादाची) जमीन काढून घेऊन भूमीहीनांना वाटली. तथापि या कार्यक्रमाची प्रामाणिक अंमलबजावणी न झाल्याने जमिनीच्या विषम वितरणाचा प्रश्न अद्यापही सुटलेला नाही. त्यामुळे आजही लहान व सीमांत शेतकरी व भूमीहीन लोक विशेषत: दलित व आदिवासी लोक आपणास शेतजमीन मिळावी म्हणून अधून मधून वळवळ करताना दिसतात. पण ही चळवळ संघटित नसल्याने तिच्यात जोर दिसत नाही.

**२) तुकडीकरणाचा प्रश्न–** शेतजमिनीचे लहान लहान तुकडे पडत जाणे म्हणजे तुकडीकरण होय. तुकडीकरण हा ही शेती व्यवसाय व शेतकरी यांच्यापुढील एक चिंताजनक प्रश्न आहे. बहुसंख्य

शेतकऱ्यांकडे मुळातच लहान आकाराचे शेतीक्षेत्र असून विविध कारणांमुळे त्या क्षेत्राचे आणखीन लहान तुकडे पडत चालले आहेत या तुकडीकरणाची पुढील कारणे आहेत.

**अ) वाढती लोकसंख्या :** खेड्यात पर्यायी रोजगाराच्या पुरेशा संधी नसल्याने वाढत्या लोकसंख्येचा भार शेतीवर पडून तिचे तुकडे पडतात.

ब) औद्योगिकीकरणामुळे ग्रामोद्योग व कुटिरोद्योग बंद पडून त्यातील बेरोजगार लोक शेतीकडे वळले व तिचे तुकडे पडले.

क) वारसाहक्काच्या कायद्यानुसार वडिलोपार्जित जमिनीचे वारसांमध्ये वाटप होऊन तिचे तुकडे पडतात.

ड) संयुक्त कुटुबांचे विघटन होऊन अस्तित्वात आलेल्या अनेक विभक्त कुटुबांत जमिनीचे वाटप होऊन तुकडे पडतात.

इ) कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांनी सावकाराकडे गहाण ठेवलेल्या जमिनीचा काही भाग नंतर सावकारांकडे जातो व जमिनीचे तुकडे पडतात.

वरील कारणांमुळे जमिनीचे लहानलहान तुकडे पडणे हे नुकसानकारक ठरते. कारण लहान तुकड्यावर आधुनिक उत्पादन तंत्र वापरता येत नाही. जमिनीला बांध व कुंपण घालण्यात बरीच जमीन वाया जाते. जमिनीच्या सीमा व येण्याजाण्याची वाट यावरून भांडणतंटे उद्‌भवतात त्यातून कोर्टकचेऱ्या सुरू होतात. त्यामध्ये वेळ, श्रम व पैसा खर्च होतो. लहान तुकड्यांमुळे शेतकऱ्यांची जिद्द व धडाडी मारली जाते. शेती सुधारण्यासाठी कर्ज काढण्याची कुवत कमी राहते.

तुकडीकरणाचे वरील दुष्परिणाम टाळण्यासाठी शासनाने तुकडेबंदी व तुकडेजोडीचे कायदे केले. पण त्यांची अमंलबजावणी खूपच मंदगतीने केली. शिवाय शेतकऱ्यांनाही त्याला योग्य प्रतिसाद दिला नाही. शेतकऱ्यांचे आपल्या वडीलोपार्जित जमिनीवर अंत्यत प्रेम असल्याने ते जमिनीची अदलाबदल करण्यास आणि दुसऱ्याचा व आपला तुकडा एकत्र जोडण्यास तयार झाले नाहीत. त्यामुळे तुकडीकरणाचा प्रश्न सुटलेला नाही.

थोडक्यात तुकडीकरण व त्याचे दुष्परिणाम कसे रोखावयाचे हा एक शेती क्षेत्रातील गहन प्रश्न आहे.

**क) आर्थिक व वित्तीय समस्या** (Economic and Financial Issues)

भारतीय शेतकऱ्यांकडे आर्थिक व वित्तीय समस्या देखील खूपच गंभीर आहेत.

१) दारिद्र्य- एकुनच भारतात दारिद्र्य मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे भारतीय लोकसंख्येतील आकाराने (संख्येने) सर्वात मोठ्या असलेल्या शेतकरी वर्गात विशेषत: लहान व सीमांत शेतकऱ्यांमध्ये कमालीचे दारिद्र्य आढळते. त्यांची शेती ही लहान आकाराची व अनिश्चित व अनियमित अशा मोसमी पावसावर अवलंबून असल्याने तिच्यातून निश्चित उत्पादन व उत्पन्न मिळेल याची खात्री नाही. ओल्या

किंवा कोरड्या दुष्काळामुळे शेतीत केलेला खर्च व श्रम अनेकदा वायाच जातात. तसेच शेतकऱ्यांना विविध प्रकारच्या बेकारीसह सतत तोंड द्यावे लागते. बेकारीमुळे कमी उत्पन्न असते. त्यामुळे ते शेतात आधुनिक उत्पादन तंत्र वापरू शकत नाहीत. परिणामी शेतीतून अपूरे उत्पन्न मिळते. यातूनच दारिद्र्य निर्माण होते. त्यामुळे बहुसंख्य शेतकरी हे दारिद्र्य रेषेखालील जीवन जगतात. त्यांच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य या मूलभूत गरजाही धडपणे पूर्ण होत नाहीत. दारिद्र्यामुळे शेतकरी आपल्या मुलामुलींना चांगले शिक्षण देऊ शकत नाहीत. आजारपण योग्य ते वैद्यकीय उपचार घेऊ शकत नाहीत. बहुसंख्य शेतकरी हे नागरी सुविधांचा अभाव असलेल्या दगडमातीच्या व पत्र्याच्या घरात राहतात. एकंदीरत दारिद्र्यामुळे अशा शेतकऱ्यांच्या जीवनमानाचा (राहणीमानाचा) स्तर, सामाजिक दर्जा व प्रतिष्ठाही निम्नच असल्याचे दिसते.

**२) बेरोजगारी –** भारतीय शेतकऱ्यांना बेराजगारीचा प्रश्न सतत भेडसावतो. भारतीय शेती व्यवसाय हा हंगामी स्वरूपाचा आहे. बहुसंख्य शेतकऱ्यांची शेती ही जिरायत वा कोरडवाहू म्हणजे पावसाच्या पाण्यावर शेतीक्षेत्रात खरीप व रब्बी असे दोन शेती हंगाम आहेत. साधारणत: शेतकऱ्यांना या दोन्ही हंगामातच रोजगार मिळतो. हंगाम संपल्यानंतर मात्र शेतकरी बेरोजगार (बेकार) बनतात. दोन्ही हंगाम क्वचितच पिकतात. अनेकदा एकच हंगाम पिकतो. उरलेल्या हंगामात शेतकरी बेकार राहतात. कधीकधी दोन्हीही हंगाम पिकत नाहीत. त्यामुळे शेतकरी वर्षभर बेकार राहतात बेकारीच्या काळात त्यांना शेतीक्षेत्राबाहेरील रोजगार शोधावा लागतो. पण तो मिळेल याची खात्री नसते.

अशाप्रकारे शेतकऱ्यांमध्ये पूर्ण बेकारी, अर्ध बेकारी हे दोन्ही प्रकार आढळतात. एवढेच नव्हे तर शेतकरी वर्गात छुपी बेकारीही मोठ्या प्रमाणावर आढळते. समजा कुटुबांच्या लहान आकाराच्या शेतजमिनीवर कुटुबांतील दोन व्यक्तींनाच वर्षभर रोजगार उपलब्ध होऊ शकतो. प्रत्यक्षात मात्र त्यापेक्षा अधिक व्यक्ती शेतात काम करीत असतात. अशावेळी सर्वांनाच रोजगार आहे असे भासते. पण प्रत्यक्षात काहींना तो असतो व काहींना नसतो. अशावेळीही काही सदस्यांची बेकारी लक्षात येत नाही. अशी बेकारीही छुपी बेकारीच ठरते. थोडक्यात शेतकऱ्यांच्या बेकारीचा प्रश्न गंभीर असून वर्षभर रोजगार कसा उपलब्ध होईल हा त्यांच्यापुढील एक गहन प्रश्न आहे.

**३) कर्जबाजारीपणा** – ही भारतीय शेतकऱ्यांची परंपरागत अशी एक ज्वलंत समस्या आहे. बेकारी व दारिद्र्य या प्रश्नांनी गांजलेल्या शेतकऱ्यांना आपल्या शेतीविषयक व प्रपंचाच्या गरजा भागविण्यासाठी नाईलाजाने कर्ज घ्यावे लागते. तथापि ग्रामीण भागात कर्जपुरवठा करणाऱ्या संघटीत संस्था (बँका, पतसंस्था, वित्त कंपन्या इ.) अपुऱ्या आहेत. जेवढ्या संस्था आहेत, त्या शेतकऱ्यांना कर्ज देण्यास टाळाटाळ करतात. कारण त्यांना कर्जफेडीची खात्री वाटत नाही. शिवाय या संस्थांची कर्ज देण्याची पद्धती अत्यंत किचकट असून त्या कर्जदाराकडून अनेक कागदपत्रे मागतात. त्यामुळे शेतकरी खाजगी सावकाराकडून अवाजवी किंवा चढ्या व्याजदराने कर्ज घेतात. त्यासाठी जमीन, घर, अलंकार, गुरेढोरे इ. गहान ठेवतात. कर्ज न फिटल्यास या गहाणवट वस्तूंना मुकावे लागते. बरेच शेतकरी कर्जाचा वापर शेती सुधारण्यासाठी न करता घरबांधणी, मुलामुलींचे विवाह, सणसमारंभ साजरे करणे अशा अनुत्पादक बाबींवर खर्च करतात. परिणामी कर्ज फेडणे, अवघड होते. अनेकदा सावकार चक्रवाढ व्याज लावतात, त्यामुळे पहिले कर्ज

फेडण्यासाठी नव्याने कर्ज घ्यावे लागते. यातूनच कर्जाचे ओझे वाढत जाते. कर्ज फिटत नाही. बापाचे कर्ज वारसाहक्काने मुलांकडे येते व त्याला ते फेडावे लागते. त्यामुळे अनेक शेतकरी कुटंबांत कर्जबाजारीपणा हा पिढ्यान्पिढ्या चालत आलेला दिसतो. म्हणूनच ''भारतीय शेतकरी हा कर्जात जन्मतो, कर्जात जगतो व कर्जातच मरतो. असे म्हटले जाते कर्जवसूलीसाठी सावकारी दबाव वाढल्यास शेतकऱ्यांवर ताण येतो. परिणामी कर्जबाजारीपणास कंटाळून अनेक शेतकरी आत्महत्या करतात.

**४) वाढता उत्पादन खर्च –** दिवसेंदिवस महागाई वाढत चालल्याने शेतीतील उत्पादन खर्च वाढत चालला आहे. बी-बियाणे, खते, जंतुनाशके, शेतीअवजारे, जलसिंचन, शेतीमालाची वाहतूक इत्यादीवरील खर्च वाढत आहे. तसेच शेतमजुरीचे दरही सतत वाढत आहेत. त्यामुळे शेती व्यवसाय करणे सामान्य शेतकऱ्यास कठीण होत आहे. तेवढ्यातूनच खर्च केला, तरी पुरेसे उत्पादन निघेल याची खात्री नसते. अनेकदा संपूर्ण पीक बुडते व केलेला उत्पादन खर्च वाया जातो. त्यामुळे शेती तोट्यात जाते. या तोट्यास कंटाळून अनेक लहान शेतकरी आपली शेती एकतर पडीक ठेवू लागले आहेत किंवा विकू लागले आहेत. अनेकजण शेतीचा त्याग करून इतर व्यवसायाकडे वळत आहेत. शेतीकडे पाहण्याचा हा नकारात्मक दृष्टीकोन वाढत जाणे हा ही एक चिंताजनक प्रश्न म्हणावा लागेल.

**५) शेती उत्पादनास कमी भाव –** औद्योगिक उत्पादनाप्रमाणे शेती उत्पादनास निश्चित भाव मिळत नाही. हा देखील एक गंभीर प्रश्न आहे. शेती हंगाम (सुगी) संपली की, बहुसंख्य शेतकरी आपला शेतीमाल एकाच वेळी विक्रीसाठी बाजारपेठेत आणतात. त्यामुळे पुरवठा वाढतो अशावेळी व्यापारी वर्ग शेतीमालाच्या किंमती मुद्दाम पाडतो. त्यामुळे नाईलाजाने शेतकरी हा व्यापारी ठरवेल त्या किंमतीस आपला माल विकण्यास तयार होतो. अनेकदा उत्पादन खर्च व वाहतूक खर्चही निघत नाही. वर्षभर अपार कष्ट करून पिकवलेला माल तोट्यात विकावा लागतो. बराच शेतीमाल हा नाशवंत असल्याने त्याची दिर्घकाळ साठवण करून योग्य किंमत येईल तेव्हा विकणे अशक्य असते. त्यामुळे माल नासण्यापेक्षा तोट्यात विकणे शेतकऱ्यास भाग पडते. परिणामी, त्यांचे मोठे नुकसान होते. अलिकडे शासनाने काही पिकांना किमान हमी भाव दिलेला आहे. पण हा हमी भाव नेहमीच खर्चाच्या मानाने कमी असतो. व तोही शेतकऱ्यांना अनेकदा मिळत नाही. तसेच प्रचंड पुरवठा झाल्यास माल हमी भावाने खरेदी करण्याची टाळाटाळ केली जाते. परिणामी शेतकऱ्यांचा माल विक्री केंद्रावर पडून राहतो व शेवटी कंटाळून तो माघारी घेऊन जावा लागतो. अलिकडे तर, कांदा याबाबत असा अनुभव आलेला आहे. अनेकदा एखाद्या मालाची आवक बाजारात प्रचंड प्रमाणात वाढते. त्यामानाने मागणी कमी राहते. अशावेळी शेतकरी माल रागाने रस्त्यावर फेकून देतो. भाव नाही म्हणून शेतातील पिकावरच नांगर फिरवितो (फळभाज्या व पालेभाज्यांच्या बाबतीत असे घडते.) शिवाय भाव नाही म्हणून फळभाग तोडून टाकतो. उदारीकरणाच्या प्रक्रीयेत भारतीय बाजारपेठेत परकीय शेतीमाल मोठ्या प्रमाणावर येऊ लागला आहे. त्याच्याशी स्पर्धा करताना भारतीय शेतकऱ्यांना आपल्या मालाची किंमत कमी करावी लागत आहे. यातून त्यांना मोठे नुकसान सोसावे लागत आहे. थोडक्यात शेतीमालास कमी भाव मिळणे हा एक गंभीर प्रश्न बनला आहे.

### ड) शेतीच्या आधुनिकीकरणाचे प्रश्न:

**१) आधुनिक उत्पादन तंत्राचा वापर –** शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी आधुनिक शेती अवजारे, रासायनिक खते व जंतुनाशके, सुधारित बी–बियाणे, जलसिंचन सुविधा इत्यादींचा वापर करून वर्षातून दुबार, तिबार, पीक घेणे आवश्यक आहे. यालाच शेतीचे आधुनिकीकरण असे म्हणतात. तथापि, बहुसंख्य शेतकरी गरीब असल्याने त्यांच्याकडे भांडवलाचा अभाव आहे. त्यामुळे इच्छा असूनही ते आधुनिक उत्पादन तंत्र वापरू शकत नाहीत. त्यामुळे ते नाईलाजाने जुनाट असे परंपरागत व कालबाह्य झालेले उत्पादन तंत्र वापरतात. भारतात सुमारे ३५% शेतीक्षेत्रात जलसिंचन सुविधा उपलब्ध असून उर्वरित ६५% शेतीक्षेत्र कोरडवाहू आहे. हे कोरडवाहू क्षेत्र लहरी अशा मोसमी पावसावर अवलंबून आहे. तसेच भरघोस उत्पादन येण्यासाठी सुधारित बी–बियाणे व त्यांना पोषक ठरणारी खते वापरणे कोरडवाहू क्षेत्रातील शेतकऱ्यांना शक्य होत नाही. परिणामी ''त्यांच्या शेतीची उत्पादकता खूपच कमी आहे. उत्पादकता कमी म्हणून उत्पन्न कमी आहे. उत्पन्न कमी म्हणून बचत नाही. बचत नाही म्हणून भांडवल नाही भांडवल नाही म्हणून आधुनिक उत्पादन तंत्राचा वापर नाही. हे तंत्र वापरत नाहीत म्हणून उत्पादकता वाढत नाही ''असे हे दुष्टचक्र आहे. हे दुष्टचक्र कसे भेदावयाचे हा शेतकऱ्यांपुढील अवघड प्रश्न आहे. थोडक्यात, जुनाट उत्पादन तंत्रज्ञानाचा त्याग करून आधुनिक उत्पादन तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा प्रश्न म्हणजेच शेतीच्या आधुनिकीकरणाचा प्रश्न मोठा गंभीर आहे.

**२) शेती संशोधनाचा वापर –** आज बी–बियाणे, खते, जंतुनाशके, शेती अवजारे, पीक लागवड पध्दती, शेतीमालाची साठवण, शेतीची मशागत इत्यादीविषयी सतत शास्त्रीय संशोधन होत आहे. पण शेतीक्षेत्रातील हे संशोधन बहुसंख्य शेतकऱ्यांपर्यंत पोहचत नाहीत. पोहचले तरी अडाणी निरक्षर व रूढीप्रिय असलेल्या बहुसंख्य शेतकऱ्यांना त्याचे आकलन होत नाही. त्यासाठी शासन, कृषीतज्ञ, कृषी विद्यापीठे व महाविद्यालये इत्यादीकडून अपेक्षित प्रयत्न होत नाही. परिणामी, शेतकरी कृषी संशोधनापासून वंचित राहतात. आधुनिक ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन इत्यादीपासून वंचित असणे हा ही शेतकऱ्यांचा एक गंभीर प्रश्न आहे.

**३) शेतकऱ्यांची मानसिकता –** शेतीचे आधुनिकीकरण करताना शेतकऱ्यांची मते, कल्पना, दृष्टीकोन, मनोवृत्ती इत्यादीतही बदल हा आवश्यक आहे. यालाच मानसिक आधुनिकीकरण म्हणतात. दुर्दैवाने बहुसंख्य शेतकरी हे मानसिकदृष्ट्या आधुनिक नाहीत. कारण ते अडाणी, निरक्षर, अंधश्रध्दा, रूढीप्रिय, दैववादी आहेत. परंपरेने चालत आलेल्या शेतीसंबधी गोष्टीकडे (उदा. अवजारे, लागवडीपध्दती, मशागत, इ.) मोठ्या श्रध्देने पाहतात. त्यामुळे त्यांच्या विरोधी अशा नवीन गोष्टी स्वीकारण्यास पटकन तयार होत नाहीत. शेतीक्षेत्रातील नवे ज्ञान, नव्या कल्पना, नवे दृष्टीकोन स्वीकारण्यास धजत नाहीत. त्यामुळे त्यांच्या शेतीचे आधुनिकीकरण होण्यास अडथळे येतात. बहुसंख्य शेतकऱ्यांचा शेती व्यवसायाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा निर्वाहप्रधान आहे. म्हणजे ते केवळ आपल्या कुटुंबाचे पोट भरणे एवढ्याच संकुचित हेतूने शेती करतात. आधुनिक उत्पादन तंत्र वापरून अधिकाधिक उत्पादन करावे, ते उत्पादन बाजारात विकून अधिकाधिक नफा

कमवावा अशा व्यापारी दृष्टीकोनातून अनेकजण शेती करत नाहीत. हा व्यापारी दृष्टीकोन नसल्याने त्यांचा व त्यांच्या शेतीचा विकास होऊ शकत नाही.

थोडक्यात शेती व शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी आधुनिक उत्पादन तंत्र व कृषी संशोधन यांच्या वापराबरोबरच शेतकरीही मानसिकदृष्ट्या आधुनिक होणे गरजेचे आहे. तथापि, असंख्य शेतकरी हे परंपरागत पध्दतीत व दृष्टिकोनात अडकून पडलेले आहेत. यातून त्यांना बाहेर काढून आधुनिक बनविणे हा एक मोठा आव्हानात्मक प्रश्न आहे.

**ई) जागतिकीकरणामुळे निर्माण झालेले प्रश्न:-**

१९९१ पासून राबविण्यात आलेल्या जागतिकीकरणाच्या धोरणामुळे शेती व्यवसाय आणि शेतकऱ्यांना काही नवीन प्रश्नांना तोंड द्यावे लागत आहे.

**१) निर्यातीतील अडथळे -** जागतिकीकरणाच्या उदारीकरणाच्या प्रक्रियेत भारतीय शेतकऱ्यांना आपल्या शेती उत्पादनांची निर्यात वाढविण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. पण या निर्यातीच्या मार्गात एक अडथळा येत आहे.

१) पहिला अडथळा म्हणजे काही परकीय राष्ट्रे भारताच्या निर्यातीत अडथळे उभारत आहे उदा. भारतीय मच्छीमार मासे पकडताना कासव निवारक सामग्री वापरत नाहीत म्हणून अमेरिकेने भारतीय कोळंबीच्या आयातीवर बंदी घातली. आरोग्यविषयक गोष्टींची काळजी घेतली जात नाही म्हणून युरोपियन संघाने भारतातून होणारी माशांची निर्यात थांबविली. अधिक जंतुनाशके फवारली जातात म्हणून मध्य-पूर्वेतील देशांनी भारतातून होणारी फळांची (द्राक्षे, आंबे, संत्री इ.) निर्यात रोखून धरली. त्यामुळे भारतीय शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले.

२) दुसरा अडथळा म्हणजे भारतीय शेतीमालाची गुणवत्ता आंतरराष्ट्रीय मानकांच्या कसोटीवर उतरत नाही. म्हणून विकसित राष्ट्रे भारतीय शेतीमाला नाकारताना दिसतात.

३) तिसरा अडथळा म्हणजे भारतात सुसज्ज बंदरे, वाहतूक, साठवणूक, पॅकेजिंग च्या प्रगत सोयीसुविधा अपुऱ्या असल्याने शेतीमालाच्या निर्यातीवर मर्यादा पडतात.

अशा या अडथळ्यांवर मात करून आपली निर्यात कशी वाढवावी हा शेतकऱ्यांपुढील एक महत्त्वाचा प्रश्न आहे.

**२) अनुदानात कपात -** जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यासारख्या वित्तसंस्थांच्या दबावामुळे भारताने समाजवादी व कल्याणकारी धोरणाकडे पाठ फिरवली आहे. त्यातूनच शेतीला मिळणारी विविध प्रकारची अनुदाने बंद वा कमी झालेली आहेत. बहुराष्ट्रीय कंपन्यांकडे बी-बियाणांचे पेटंट गेले आहे. त्यामुळे शेतीचा उत्पादन खर्च वाढला आहे. परिणामी, गरीब शेतकऱ्यांना शेती करणे कठीण झाले आहे. उदारीकरणाच्या धोरणामुळे परकीय शेतीमाल देशी बाजारपेठेत येत आहे. त्या मालाशी स्पर्धा करताना शेतकऱ्यांना आपल्या मालाची किंमत कमी करावी लागत आहे त्यामुळे त्यांचे उत्पन्न घटत आहे.

**३) विशेष आर्थिक क्षेत्रांचा प्रश्न** – जागतिकीकरणात भारताची निर्यात वाढवण्यासाठी विशेष आर्थिक क्षेत्रे (Special Economic Zones – SEZs) निर्माण करण्यासाठी सुरवात झाली. (फेब्रुवारी २००६ पासून) या क्षेत्रांच्या उभारणीसाठी पडीक जमीन वापरणे अभिप्रेत आहे. पण उद्योजकांनी पैशाच्या जोरावर गरीब शेतकऱ्यांच्या लागवडीखाली सुपीक जमिनी कमी मोबदल्यात खरेदी केल्या आहेत. परिणामी लागवडीखालील क्षेत्र तर घटलेच शिवाय अनेक गरीब शेतकरी हे भूमिहीन झाले. अनेक लोक विस्थापित झाले. यातूनच असंतोष उद्‌भवून शेतकऱ्यांनी विशेष आर्थिक क्षेत्रांच्या विरोधी आंदोलन/चळवळी केलेल्या आहेत. ?

**४) आत्महत्या:** १९९१ पासून भारतीय शेतकरी मोठ्या प्रमाणावर आत्महत्त्या करू लागले आहेत. याबाबतची शासन स्वंयसेवी संस्था, संशोधक इत्यादींनी दिलेली आकडेवारी वेगवेगळी असल्याने ती विश्वसनीय वाटत नाही. केंद्रिय कृषी मंत्रालयाने लोकसभेत दिलेल्या आकडेवारीनुसार भारतात २०१३ मध्ये १९७७२, २०१४ मध्ये १२३६०, २०१५ मध्ये १२६०२ तर २०१६ मध्ये ११३७० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा, मध्यप्रदेश, छत्तीसगड, इ. राज्यात आत्महत्येचे प्रमाण अधिक आहे. भारतात पूर्वीपासूनच शेतकरी हा बेकारी, दारिद्र्य, कर्जबाजारीपणा, शेतीमालास कमी भाव मिळणे. इत्यादी प्रश्नांना तोंड देत आलेला आहे. पण त्यामुळे तो त्रस्त होऊन तो आत्महत्या करीत नव्हता. जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झालेपासूनच शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र सुरू झाले आहे. असे जागतिकीकरणाचे विरोधक म्हणतात. जागतिकीकरणात लहान व सीमांत शेतकऱ्यांचे विविध प्रश्न (उदा. बेकारी, दारिद्र्य, कर्जबाजारीपणा, शेतीमालास कमी भाव मिळून नुकसान होणे इ.) तीव्र झाले असून त्यातून ताणतणाव वैफल्य आल्याने शेतकरी आत्महत्या करत आहेत असे म्हणतात.

## ४.३ सारांश

ग्रामीण समाजशास्त्र समाजाचा अभ्यास वैज्ञानिक दृष्टीकोनातून करत असतो. प्रस्तुत प्रकरणात ग्रामीण सहकारी संस्था अर्थ व्याख्या समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. आधुनिक कालखंडात सहकारी संस्था महत्त्वाची भुमिका पार पाडत आहेत. सहकारी संस्थाकडून लोकशाही मुल्यांचे जतन होत असते. व्यवहारात बाजारपेठ ही वस्तू व सेवा यांची देवान-घेवाण ह्यात असते. याविषयी ही आपण अर्थव्यवस्था व स्वरूप याचा आढावा घेतला आहे. त्याचबरोबर जमीन सुधारणा, जमीन रयतवारी पध्दतीचे गुण, दोष, हरीत क्रांतीचे फायदे यांचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेतला आहे.

## ४.४ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कोणत्या संघटनेचा कारभार लोकशाही पद्धतीने चालतो.

२) कोणत्या व्यवस्थेत गळेकापू स्पर्धा निर्माण होते.

३) ग्रामीण पुनर्रचनेची साधने कोणती.

४)  जमीनदारी पद्धतीचे कोणतेही दोन दोष.

५)  रयतवारी पद्धती केंव्हापासून अंमलात होती?

६)  कोणाच्या मार्गदर्शनाखाली हरीतक्रांती जगाच्या इतर भागात घडून आली.

७)  हरीत क्रांतीचे कोणतेही दोन परीणाम

## ४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे.

१)  सहकारी संस्था

२)  भांडवलशाही

३)  पंचवार्षिक योजना, समुदाय विकास योजना, पंचायत राज पद्धती, सहकारी संस्था.

४)  कुळाचे शोषण, कर्जबाजारीपणा.

५)  ब्रिटीश राजवटीपूर्व

६)  डॉ. नॉरमन बोरलॉग

७)  शेतीचे उत्पादन वाढले, रोजगारात वाढ, औद्योगिक विकासाला चालना.

## ४.६ सरावासाठी प्रश्न

**सविस्तर उत्तरे लिहा**

अ)  दीर्घ उत्तरे लिहा.

१)  ग्रामीण सहकारी संस्था आणि ग्रामीण उद्योग या विषयी चर्चा करा.

२)  बाजारपेठा, जमीन सुधारणा आणि हरीत क्रांती यांचे विश्लेषण करा.

३)  शेतीच्या समस्येवर विस्तृत विवेचन करा.

ब)  टिपा लिहा.

१)  गामीण उद्योग

२)  जमीन सुधारणा (रयतवारी, महालवारी)

३)  हरीत क्रांती

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


1. Desai A. R. : Rural Sociology in India, Popular Prakashan, Bombai (1969 reprint 2009)
2. Beteille Andre : Caste, Class and Power, Oxford University Press (India), New Delhi, 2012.
3. Dhanagare D. N. : Green Revolution and Social Inequtities in Rural India, from Economic and Political Weekly, Vol. 22. 19/21 Annual Number (May 1987)
4. Dubese : India Village Routledge, New York, (Second edition, 2018).


❑❑❑